UNIVERSAL
LIBRARY
OU_196129
UNIVERSAL
LIBRARY

[ प्रकाशकानें सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| प्रस्थानभेद .... .... .... .... .... | १ |
| चवदा विद्या. .... .... .... .... | १–३ |
| वेद | |
| मंत्र व ब्राह्मण. .... .... .... .... | ३–१० |
| ऋग्वेद. .... .... .... .... | १०–२३ |
| क्रम, जटा, घन .... .... .... | २३–२४ |
| कृष्ण यजुर्वेद. .... .... .... | २४–४१ |
| शुक्ल यजुर्वेद. .... ... .... | ४१–४८ |
| सामवेद. .... .... .... .... | ४९–५६ |
| अथर्ववेद. .... .... .... .... | ५७–६५ |
| षडङ्गें ( वेदाचीं ) | |
| शिक्षा– .... .... .... .... | ६६–६९ |
| कल्पसूत्रें– .... .... ... .... | ६९–७२ |
| व्याकरण– .... .... .... .... | ७३–७६ |
| निरुक्त– .... .... .... .... | ७७–७९ |
| छन्दः– .... .... .... .... | ७९–८० |
| ज्योतिष– .... .... .... .... | ८०–८२ |
| वेदाचीं उपांगे | |
| पुराणें– .... .... .... .... | ८३–८५ |

न्यायदर्शन— .... .... .... ८६—९४
वैशेषिक दर्शन— .... .... .... ९४—१०३
पूर्वमीमांसा— .... .... .... १०३—१२४
उत्तरमीमांसा— .... .... .... १२५—१६७

**अद्वैतवेदांतमत वेदांतसार**

**धर्मशास्त्रें.**

स्मृतिकार. .... .... .... .... १६८—१६९
सांख्यदर्शन .... .... .... १७०—१७६
योगदर्शन. .... .... .... .... १७६—१८५
नारदीयपाञ्चरात्र, रामानुज, पूर्णप्रज्ञदर्शन १८५—१८९
नकुलीय पाशुपतदर्शन. .... .... १८९—१९५
शैवदर्शन. .... .... .... .... १९५—२००

**उपवेद.**

आयुर्वेद— .... .... .... .... २००—२०४
धनुर्वेद— .... .... .... .... २०४—२०५
गांधर्व वेद— .... .... .... २०५—२०६
अर्थशास्त्र, ६४ कलांचीं नांवें— .... २०६—२०७
चार्वाकदर्शन— .... .... .... २०७—२११
बौद्धदर्शन— .... .... .... २११—२३०
अर्हद्दर्शन— .... .... .... २३१—२४९
उपसंहार.— .... .... .... २५०—२५६

# प्रस्तावना.

आमचा धर्म वैदिक आहे. वेदामध्यें जें प्रत्यक्षतेनें किंवा अप्रत्यक्षतेनें सांगितलें नाहीं, तें कोठेंहि नाहीं अशी आमची सनातन समजूत आहे. आमच्या धर्माचा, आमच्या प्राचीन शास्त्रांचा व आमच्या तत्त्वज्ञानाचा आम्हांस कौतुकास्पद अभिमान आहे. हा अभिमान लेखांत व भाषणांत वेळोवेळीं प्रकट होत असतो, ही खऱ्या आनंदाची गोष्ट आहे. पण वेळेच्या अभावामुळें, औत्सुक्याच्या मंदगतित्वामुळें आणि श्रद्धातिरेकामुळें आमच्या प्राचीन विद्यांचें स्वरूप काय, त्या त्या विद्यांनीं कोणते त्रिकालाबाधित सिद्धांत प्रकट केले आहेत, आपण ब्रह्मयज्ञांत ज्या ऋषींस व आचार्यांस तृप्त करण्यासाठीं उदकदान करितों, त्या ऋषींची व आचार्यांची योग्यता मोठी व अभिमानास्पद कां, वेदांत कोणते विषय अंतर्भूत झाले आहेत, वेदांगें म्हणजे काय, व तीं कोणतीं, ब्राह्मणें म्हणजे काय, उपनिषदांचें स्वरूप कसें असतें, दर्शन कशाला म्हणतात, धर्मशास्त्रांत काय सांगितलें आहे, पुराणें कोणती कामगिरी करितात, इत्यादि हजारो मनोहारी व मनःसंस्कारी प्रश्नांचीं उत्तरें देण्याला आधुनिक हिंदुधर्माभिमान्यांपैकीं पुष्कळांस सामर्थ्य नसतें, असें म्हटल्यास सत्यभ्रष्टतेचा दोष लागेलसें मला वाटत

नाहीं. 'चवदा विद्या आणि चवसष्ट कला' ही शब्दश्रेणी कदाचित् पुष्कळांस ठाऊक असेल; पण त्या विद्या कोणत्या, हें अधिकारी वाणीनें फारच थोड्यांस सांगतां येईल. ही सद्य:कालीं स्वाभाविक झालेली अज्ञानदशा संपावी व प्राचीन विद्यांचा नामनिर्देश करितां येऊन त्या विद्यांचें स्थूलस्वरूप तरी समजावें, या उद्देशानें माझे मित्र प्रो० भाऊसाहेब लेले, यांनीं हें 'प्रस्थानभेद' नामक लहानसें पुस्तक लिहिलें आहे.

प्रो० लेले, यांचें स्तुतिस्तोत्र गाण्याचा माझा हेतु नाहीं! त्यांचें मजवर जें अबाधित बंधुप्रेम आहे, तेंच मला पुढील दोन शब्द लिहिण्याची प्रेरणा करित आहे.

'वेदांत नाहीं, तें जगतांत नाहीं' अशी सांप्रदायिक म्हण आहे, व ती बहुंशीं खरीही आहे. पहा कीं यज्ञयागास लागणाऱ्या दिनशुद्धीसाठीं वैदिक **ज्योतिष** सिद्ध झालें. स्थंडिलें बांधण्यासाठीं व मंडपविरचनेसाठीं **स्थापत्य** शास्त्राची योजना झाली. मंत्रांतील वर्णांचा उच्चार स्पष्ट स्वच्छ व शुद्ध व्हावा, एतदर्थ '**शिक्षानामक**' वेदांग प्रकट झालें. शरीरप्रकृतीच्या योगक्षेमासाठीं **आयुर्वेद**, आणि सामाजिक संस्था ठीक चालाव्या म्हणून **धनुर्वेद** अवतीर्ण झाले. इतर **व्याकरण**, **कल्प**, **निघंटु** (**निरुक्त**), **छंद**, यांविषयींहि असेंच म्हणतां येईल. कर्म वाढत गेलें तदनुसार ब्राह्मणें नामक वेदभागाची योजना अस्तित्वांत आली. मंत्रांचें व मंत्रोद्दिष्ट कर्मांचें प्रामाण्य ठरविण्यासाठीं **उपासना**विद्येचा व **तत्त्वज्ञानाचा** उदय झाला. याप्रमाणें

वेदांसाठीं व वेदामधून गणित, स्थापत्य, वैद्यक, युद्ध, कर्मकांड, उपासनाकांड इत्यादि शास्त्रांचा उदय झाला आहे. व्याकरण आणि छंद हीं पौरस्त्य आर्यांचीं शास्त्रें तर सर्व जगतांस सर्वकालीं ललामभूत होतील अशींच आहेत. जगताच्या उत्पत्तिस्थितिलयासंबंधीं आमच्या पूर्वजांनीं जिज्ञासामूलक शोध किती गंभीर निरीक्षणानें केले होते, हें आपण समजून घेतल्यास आपल्या पूर्वजांची जिवंत कार्यक्षमता व बुद्धिकुशाग्रता किती प्रचंड होती, याची अल्प स्वल्प तरी कल्पना करितां येण्याची सवड या 'प्रस्थानभेदानें' प्राप्त होणार आहे.

जिज्ञासेच्या प्रेरणेनें आमच्या आर्य पूर्वजांनीं ज्ञानसमुद्रांत फारच खोल बुड्या मारून तेथील ज्ञानरत्नें उद्धृत केलीं होतीं, असें निदर्शनास येईल. तर्कशास्त्रांतील पदार्थविवेचन, न्यायप्रणेत्या गौतमांचे प्रमाणप्रमेयांविषयींचे अगाध विचार हेच जरी नुसते समजून घेतले, तरी सुद्धां अलीकडील नैय्यांयिकांसहि तोंडांत बोटेंच घालावीं लागतील ! पांचभौतिक वाद काय किंवा परमाणुवाद काय, कोणताहि घेतला तरी, तत्तत्कालीन परिस्थितीच्या मानानें कणादगौतमादिकांनीं स्थापिलेल्या कल्पना या पूर्वऋषींच्या गहन व सूक्ष्म बुद्धिवैभवाची खाशी साक्ष पटवितात. कपिलमहामुनीसारखे निष्ठुर ज्ञानैकतत्त्वज्ञ वीर हाताच्या बोटांइतके तरी निर्दिष्ट करतां येतील कीं नाहीं, याची शंकाच आहे. असो; पण ध्यानांत ठेवावयाचें हें कीं, हीं

सर्व दर्शनें यज्ञयागांत व्यापृत झालेल्या ऋत्विजांनीं व यजमानांनीं फावल्या वेळांत वेदप्रसादानें प्रकाशित केलीं आहेत. सांख्यांनीं प्रकृतिशास्त्रांचा अभ्यास केला, तर योगाचार्य पतंजलीनीं प्रकृतीच्या अंतरंगांत प्रवेश करून प्रकृतीस स्ववश करून घेतलें आहे, असें दिसतें. शिवाय, सांख्ययोगादिदर्शनांचें क्षेत्र इतकें व्यापक आहे कीं बाह्य विश्वांत किंवा अंतर्विश्वांत कोणताहि नवीन शोध कोणत्याहि कालीं कोणींहि लाविला, तरी त्याचा अंतर्भाव वरील दोन दर्शनांत करितां येईल. ह्या शास्त्रांनीं जी रूपरेखा आंखून ठेविली आहे, ती इतकी विस्तीर्ण आणि संग्राहक होण्यासारखी आहे कीं विश्वाच्या अंतिम उत्क्रांतींत सुद्धां ही रूपरेखा बदलण्याचें कारण पडणार नाहीं. मात्र आपणा जीवांचें एक पवित्र कर्तव्य आहे. कपिलपतंजलीत्यादिकांनीं जो ज्ञानप्रदीप लावून ठेविला आहे, त्याच्या प्रकाशाचें ग्रहण सर्वथा करून ह्या ज्ञानसाह्यानें आपणापैकीं प्रत्येकानें हा प्रदीप दिनप्रतिदिनीं अधिक प्रकाशमान होईल, अशी आपली तपश्चर्या ठेवावयाची. ‘यज्ञो दानं, तपः कर्म’ ह्या कर्तव्यत्रयींतील ‘ तप ’ हें कर्तव्य अत्यंत व्यापक आहे. आपण प्रामाणिक पद्धतीनें तपोव्रत चालवून आपल्या पूर्वजांनीं दिलेलें ज्ञानभांडार आपणहि प्रयत्नपूर्वक वाढविलें, तरच आपण आपल्या पितृ–ऋणांतून मुक्त होऊं. अर्थात् हें ऋण काय व किती आहे, ह्याचें दिग्दर्शन प्रो. भाऊसाहेबांनीं केलें आहे. तें पाहून प्रत्येक वैदिकाभिमानी द्विजानें आपलें ज्ञानक्षेत्र दूर-

यावें आणि ज्ञानवृद्धि व कर्मवृद्धि, यांच्या मार्गास लागावें. 'ब्रह्ममीमांसा' या नांवाचें एक दर्शन आहे, हें अलीकडे वेदांताला जी भरती आली आहे, त्यावरून बऱ्याच लोकांस कळलें आहे. पण, पूर्वमीमांसा, हें काय प्रकरण आहे, याचें अल्पस्वल्प सुद्धां ज्ञान, गृहस्थांस राहोच, पण वेदशास्त्रसंपन्नापैकीं सुद्धां फारच थोडे लोकांस असेल. सांख्यांनीं कर्मावर व कर्मप्रवृत्तीवर जो हल्ला केला, त्याचा जबाब पूर्वमीमांसा देते आणि हल्ला मागें फिरविते. कर्म म्हणजे काय, तें कां करावें, वेदांतील वाक्यांची संगति कशी लावावी, इत्यादि विषयांचें ज्ञान पूर्वमीमांसेवरून झालें असतां वेदकालीन लोकांच्या ज्ञानाची कल्पना करितां येते. प्रस्तुत ग्रंथांत जें एक अधिकरण सविस्तर दिलें आहे, त्यावरून मी म्हणतों, याचा प्रत्यय येईल.

वेदांतदर्शन सुप्रसिद्धच आहे. प्रो. लेले यांनीं केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादिसंबंधानें जें त्रोटक दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून प्लेटो–अरिस्टाटल; डेका–स्पायनोझा; कँट, हेगेल; इत्यादि सुप्रसिद्ध तत्त्वज्ञांचीं द्वयें स्मरणांत येतात; तसेंच ह्या निर्दिष्ट तत्त्वज्ञांहून अधिक ओजस्वी असें श्रीमच्छंकराचार्य–श्रीमद्रामानुज यांचें युग्म दृक्पथांत अवतीर्ण होतें. या महानुभव महात्म्यांचें प्रासादिक ग्रंथ वाचणें व समजून घेणें म्हणजे 'अवघाचि संसार सुखाचा' करण्याच्या मार्गाला लागणें होय. अनेक विपत्तींचें निर्दालन करून व्यष्टि व समष्टि, यांचा उद्धार संपादावयाचा असेल, निष्काम कर्मोपासनेचें व केवल ज्ञानाचें बीज रुजवावयाचें

असेल, तर या महात्म्यांची ओळख करून घेण्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें कोणासहि स्पष्ट दिसेल. ही ओळख व्हावी, म्हणून ग्रंथांत या भाष्यकारांचा निर्देश करून त्यांच्या अति सोज्ज्वल विचारसरणीचें दिग्दर्शन प्रो. लेले यांनीं केलें आहे.

केवल अद्वैतापूर्वींच चार्वाकादि नास्तिक मतांचा निर्देश ग्रंथांत प्रथमारंभीं करणें अवश्य होतें. पण मुख्य सिद्धांतांचा परिचय झाल्यानंतर तद्विरोधाचा आभास मात्र दाखविणारें पण वस्तुतः अद्वैतज्ञानमंदिराला कांहीं अंशानें उपकारक होणारें नास्तिक मत अद्वैताच्या नंतर देण्याची योजना करण्यामध्यें प्रो. लेले यांनीं विशेष चातुर्य दाखविलें आहे. या चातुर्याचा प्रत्यय काळजीपूर्वक ग्रंथ वाचिला असतां मात्र येणार आहे.

असो; प्राचीन ज्ञानमंदिराची उभारणी कशी झाली होती, त्याची आंखणी विस्तीर्ण आणि विस्तार्य कशी आहे, इत्यादिकांसंबंधी जाणीव उत्पन्न करण्याचें आणि ज्ञानविस्तार आणि निष्कामकर्मविस्तार संपादण्याची प्रेरणा करणारें श्रेयस्कारी सुफल जर परमेश्वरी अनुग्रहानें प्राप्त झालें तर प्रो. लेले यांच्या दृढ आणि दीर्घ परिश्रमाचें सार्थक होईल, असें मला वाटतें. परमेश्वर करो, आणि ज्ञानकर्माच्या साम्राज्यामध्यें राहून अज्ञानालसग्रस्त झालेला हिंदी व महाराष्ट्र-समाज ज्ञानकर्मक्षम होवो! अशी त्या महायोजक परमेश्वराची प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितो.

**चिं. गं. भानु.**

वे. शा. सं. रा. वासुदेव शास्त्री अभ्यंकर फरगसन् कॉलेजांतील गुरु यांच्या जवळ माझे कांहीं मित्र सर्वदर्शन संग्रहाचें अध्ययन करीत होते. त्या प्रवचनांचे श्रवणाचा लाभ मला काहीं दिवस मिळाला. त्यावेळीं मधुसूदनसरस्वतीकृत 'प्रस्थानभेद' ह्या नांवाचा लहानसा संस्कृत ग्रन्थ माझ्या पाहण्यांत आला. ह्या ग्रंन्थांत दिलेली माहिती मराठींत लिहून प्रसिद्ध केली तर त्यापासून आपल्या समाजांतील पुष्कळ जिज्ञासु लोकांस फायदा होईल असें वाटून, हें पुस्तक लिहिण्यांस मीं आरंभ केला. मूळ ग्रन्थ अगदीं लहान असल्यामुळें त्याचें भाषान्तर केलें असतें, तर हवी तितकी माहिती देतां आली नसती. म्हणून प्रस्थानभेदांतील माहितीहून अधिक माहिती मिळविण्यासाठीं मला अनेक मराठी, संस्कृत व इंग्लिश पुस्तकें धुंडाळावीं लागलीं आणि माझ्या विद्वान मित्रांपासून वारंवार माहिती मिळवावी लागली, या सर्वांचे आभार मी मनःपूर्वक मानतों. नामनिर्देशानें सर्वांचे आभार पृथक् पृथक् मानणें येथें अशक्य आहे, तथापि वे. शा. सं रा. रा. वासुदेव शास्त्री अभ्यंकर यांचे प्रवचनांचा लाभ मला झाल्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. तसेच वे. शा. सं नारायण शास्त्री मराठे वाईकर हे भाद्रपदमासीं पुण्यास आले होते, त्यावेळीं त्यांनीं माझे हस्तलिखितांत मंत्राचे स्वरासंबन्धी झालेल्या चुक्या मला दाखविल्या आणि न्याय वैशेषिक दर्शनावरच्या ग्रन्थांचीं नांवें सांगितलीं, म्हणून त्यांचाहि मी आभारी आहें.

माझे मित्र प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानु ह्यांनीं ह्या पुस्तकांत प्रस्तावना लिहावी असें वाटल्यावरून मीं त्यास विनंति केली आणि त्यानीं ती मान्य करून प्रस्तावना लिहिली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

पुणें माघ शु. १३ रविवार १८३५<br>तारिख ८ फेब्रुवारी १९१४ } गं. वा. लेले.

# प्रस्थानभेद,

आपल्या हिंदुलोकांच्या सर्व धार्मिक व तात्त्विक किंवा शास्त्रीय ग्रंथांत ईश्वरप्राप्ति, मोक्ष, परागति, अतिश्रेयस्कर वस्तु किंवा ब्रह्मज्ञान, हीं प्राप्त करून घेण्यास मार्ग कोणते ? आपण कोण ? जग हें काय आहे ? आपलें आचरण ह्या जगांत कसें असावें ? आपण काय केलें पाहिजे ? वगैरे गोष्टी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें सांगितल्या आहेत. अनेक काळीं आणि निरनिराळ्या परिस्थितींत तत्त्वज्ञानी लोकानीं ह्या गोष्टींचा विचार केला आहे, आणि त्यांच्या विचारसरणीस जो जो मार्ग श्रेयस्कर असा वाटला त्या त्या मार्गाचें अवलंबन करावें, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. ह्या अनेक मार्गांस प्रस्थान असें म्हणतात, ह्या प्रस्थानाचे कोणकोणते भेद आहेत, हें सांगून व त्यांचें स्वरूप त्रोटकरीतीनें वर्णन करून पूर्वीच्या मान्य व धर्मास आधारभूत झालेल्या ग्रन्थांविषयीं काहींनाकाहींतरी खरी कल्पना सामान्य वाचकांच्या मनात यावी, या हेतून हा अल्प प्रयत्न केला आहे. आपल्या सर्व तात्त्विक व धार्मिक ग्रन्थांस वेद हे प्रमाणभूत आहेत, हें येथें सांगावयास नको.

१ ऋग्वेद, २ यजुर्वेद, ३ सामवेद आणि ४ अथर्ववेद असे चार वेद आहेत. १ शिक्षा, २ कल्प, ३ व्याकरण,

४ निरूक्त, ५ छन्दः व ६ ज्योतिष अशीं ह्या वेदांचीं सहा अंगें आहेत. १ पुराणें, २ न्याय, ३ मीमांसा आणि ४ धर्मशास्त्रें ह्या चार ग्रन्थांस वेदांचीं उपांगें म्हणतात. ह्याप्रमाणें ह्या १४ विद्या झाल्या, चौदा विद्या आणि चौसष्ट कला ही मराठी भाषेंतील म्हण प्रसिद्ध आहेच.

याज्ञवल्क्यांनीं आपल्या स्मृतींत असेंच म्हटलें आहे.

**पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्रांगमिश्रिताः ।**
**वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्यच चतुर्दश ॥**

'पुराण' शब्दानें १८ महापुराणें व १८ उपपुराणें ह्यांचा बोध होतो, असें समजावें; 'न्यायांत' न्यायशास्त्र व वैशेषिक दर्शनाचा अन्तर्भाव होतो, मिमांसेंत वेदान्तदर्शनहि येतें. स्मृति, धर्मशास्त्रें, आणि सांख्य, पातंजल, पाशुपत व वैष्णव हीं दर्शनें, आणि महाभारत व रामायण हे इतिहास ह्या सर्वांची गणना धर्मशास्त्रांत होते. याप्रमाणें ४ वेद, त्यांचीं ६ अंगें, व ४ उपांगें (पुराणें न्याय, मीमांसा आणि धर्मशास्त्रें) हीं मिळून १४ विद्या होतात. याशिवाय आणखी चार उपवेद आहेत. त्यांची नांवें येणेंप्रमाणें:---१ आयुर्वेद, २ धनुर्वेद, ३ गांधर्ववेद आणि ४ अर्थशास्त्र. पूर्वींच्या १४ विद्या आणि हे चार उपवेद मिळून १८ विद्या मानिल्या आहेत. ह्या अठरा विद्या येऊं लागल्या म्हणजे सांगोपांग वेदाचें अध्ययन होतें.

वर सांगितलेलीं सर्व प्रस्थानें अस्तिकमताचें प्रतिपादन व मंडन करणारीं आणि विधिनिषेधाचें कथन करणारीं आ-

हेत. ह्या मतांशिवाय आणखी दुसरीं प्रसिद्ध अशीं सहा मतें आहेत. त्यांस पूर्वींचे विद्वान नास्तिक मतें असें मानतात. बृहस्पति, बुद्ध व जिन हे तीन मोठे तत्ववेत्ते विचारी पुरुष पूर्वी होऊन गेले. त्यांनीं आपलीं मतें स्थापित करून, त्या मतांचें प्राबल्यहि पुष्कळ दिवस हिंदुस्थानांत चालू होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. बौद्ध व जैनधर्मी लोकांची संख्या आज मितीला पुष्कळ आहे. बौद्धमताच्या ४ शाखा झाल्या, आणि त्याचीं चार प्रस्थानें झालीं. जैनांच्या दोन शाखा आहेत. परंतु त्यांचें प्रस्थान एकच मानिलें आहे. आणि चार्वाक मताचें (बृहस्पतीचें) एक प्रस्थान, हीं सर्व मिळून सहा प्रस्थानें होतात. चार्वाक पंथी लोक सध्यां कोठें दिसत नाहींत. तथापि तत्पन्थीय आम्हीं आहोंत असें न म्हणतां त्या पंथाप्रमाणें वागणाऱ्या लोकांची संख्या समाजांत वाढण्याची भीति वाटूं लागली आहे. या सर्व मतांचें दिग्दर्शन यथाक्रम पुढें केलें आहे.

---

# वेद.

वेद म्हणजे काय? त्याचें सामान्य लक्षण कसें करावें? असें विचारलें असतां, त्याचें उत्तर थोडक्या शब्दांनीं देता येईल. धर्म किंवा कर्म आणि ब्रह्म ह्यांचें प्रतिपादन करणारा, ईश्वरप्रणीत, मनुष्यानें न केलेला, विश्वसनीय प्रमाणात्मक जो ग्रन्थ, त्याला वेद म्हणतात. इष्टप्राप्ति आणि अ-

निष्टपरिहार हीं करण्यास अलौकिक उपाय ज्या ग्रन्थांत सांगितला आहे तो ग्रन्थ वेद होय. "प्रत्यक्षेणानुमित्या वा यस्तूपायो न बुध्यते ॥ एनं विदन्ति वेदेनतस्माद्वेदस्य वेदता ॥" वेद वस्तुतः एकच आहे. परंतु प्रयोगभेदामुळें आणि यज्ञादिकांच्या निर्वाहाकरितां त्याचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार भेद झाले आहेत. हौत्रप्रयोग ऋग्वेदानें करावा, आध्वर्यव प्रयोग (अध्वर्यूचें काम) यजुर्वेदानें करावा, आणि औद्गात्र प्रयोग (गाण्याचें काम) सामवेदानें करावा. हीं तीन कामें यज्ञांचे प्रकार वाढल्यामुळें वाढलीं, आणि त्यासंबंधीं मंत्रतंत्राचें अध्ययनहि निराळें करावें लागल्यामुळें वेदाचे हे तीन भेद झाले असावेत. ब्रह्मा आणि यजमान यांच्या कर्तव्यासंबंधीं मंत्रांचा आणि विधींचा अन्तर्भाव ह्या तीन वेदांतच होतो. म्हणून अथर्ववेदाची यज्ञास जरूरी नाहीं. त्यांत केवळ यज्ञप्रकरणींच मंत्र येत नाहींत. शांति, पुष्टि, अभिचार (जारणमारणादि क्रिया) इत्यादि कर्मांचें प्रतिपादन अथर्ववेदांत केलें आहे.

वेदाचे दोनच मुख्य भाग आहेत.—मंत्र आणि ब्राह्मण. अनुष्ठान, द्रव्यें, देवता, त्यांचे गुण, क्रिया, स्तुति इत्यादिकांचें वर्णन मंत्रांत केलेलें असतें. ऋक्, यजु आणि साम असे मंत्रांचे तीन प्रकार आहेत. पद्य किंवा गायित्री वगैरे छन्दोवृत्तांत जो मंत्र सांगितला असतो, त्यास ऋक् म्हणतात. याच ऋचांचा गायनाच्या कामांत विनियोग करून त्या गीतिविशिष्ट झाल्या म्हणजे त्यांस साम म्हणतात.

ऋक् व साम यांहून निराळे जे गद्यात्मक मंत्र, त्यास 'यजुः' हें नांव आहे. संबोधनवाचक शब्द आणि संभाषण यांचाहि अन्तर्भाव यजु शब्दांत होतो. 'अग्निमीळे (डे) पुरोहितं, यज्ञस्य देवमृत्विजं, होतारं रत्नधातमम्' ॥ 'इमं मे वरुण-श्रुधि हवमद्या च मृळय' (डय) इत्यादि ऋचा होत. 'अग्न आयाहि वीतये गृणानो हव्यदातये' इत्यादि ऋचा असूनहि साम आहेत. 'इषेत्वोर्जेत्वा,' यजमानस्य पशून् पाहि,' 'अग्नीदग्नीन्विहर' या चारहि यजु आहेत.

ब्राह्मणः—यज्ञयागादि प्रकरणासंबंधानें मंत्र, तंत्र, सामग्री, त्यांची तयारी, त्यांच्या गोष्टी, वेदान्तविचार इ० विषय ब्राह्मणांत सांगितलेले असतात. हें ब्राह्मण तीन प्रकारचें असतें. (१) कर्माचा विधि सांगणारें ब्राह्मण, (२) अर्थवाद करणारें आणि (३) विधि आणि अर्थवाद यांहून भिन्न विषयाचें प्रतिपादन करणारें; असे ब्राह्मणाचे तीन प्रकार आहेत. तिसऱ्या प्रकारच्या ब्राह्मणांत बहुतकरून कर्म द्रव्यादिकांविषयीं गोष्टी, इतिहास आणि ब्रह्मविचार असतात. 'विधि' या शब्दाचे अर्थासंबंधानें बराच मतभेद आहे. (१) कुमारिलभट्टाचे मताचे लोक (भाट्टाः) विधि शब्दाचा अर्थ शब्दभावना असा करतात. त्यांच्या मताप्रमाणें विधि ह्मणजे केवळ मंत्रांच्या शब्दाविषयीं किंवा शब्दावरून त्याच्या अर्थाविषयीं निश्चय. २ पूर्वमीमांसानुयायी (प्राभाकर) विधि ह्मणजे योग असें म्हणतात. कोणत्या कर्मात कोणत्या मंत्रांचा उपयोग करावयाचा, हें मंत्राच्या अर्थावरून

विधि सांगतो. ३, तार्किकादि बाकीचे सर्व तत्त्ववेत्ते असें म्हणतात कीं विधि शब्दाचा ‘ इष्टसाधनता ’ असा अर्थ आहे. इष्टवस्तु साधून घेणें व ती साधन करून घेण्यास जीं साधनें लागतात, तीं मिळविणें हाच विधि. विधि शब्दाच्या अर्थासबंधीं याप्रमाणें तीन मतें आहेत. कार्य, कर्म, त्याचें स्वरूप, अंग, फळ इत्यादि, साधनें, मंत्र, तें कर्म कसें करावें, इत्यादिविषयीं ज्या वाक्यांत निर्देश असतो, तो विधि समजावा. ह्या अर्थाचीं वाक्यें ज्या ब्राह्मणांत, असतात तें विधिब्राह्मण समजावें.

विधीचे चार भाग आहेत. १ उत्पत्ति, २ अधिकार, ३ विनियोग आणि ४ प्रयोग, ह्या चार गोष्टींच्या अनुरोधानें हे विधीचे चार भेद किंवा भाग झाले आहेत. ( १ ) ज्यांत कर्माचें केवळ स्वरूपच सांगितलेलें असतें तो उत्पत्तिविधि समजावा. उ०--‘ आग्नेयोऽष्टाकपालो भवति ’ आग्नेय ( ग्रह=पात्र ) आठ पुडांचा असतो. (२) यागादि कर्माची इतिकर्तव्यता व फल यासंबंधाचा ज्या वाक्यांत बोध असतो, तें अधिकार विधीचें वाक्य आहे असें समजावें. उ० स्वर्गाची इच्छा करणाऱ्यानें शुक्ल व कृष्ण प्रतिपदेस यजन करावें. ( दर्शपूर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेत ). (३) विनियोगविधींत कर्माच्या अंगासंबंधीं माहिती असते. उ० तांदुळाचें हवन करावें, समिधांचें हवन करावें. ( व्रीहीभिर्यजेत; समिधोयजेत. ) (४) मुख्य कर्म, त्याचीं अंगें, त्यांच्या प्रयोगाचें ऐक्य आणि वर सांगितलेले तीन विधि, हीं सर्व

ज्यांत सांगितलीं असतात, त्यास प्रयोगविधि म्हणतात. ह्या प्रयोगास कोणी श्रौतप्रयोग म्हणतात व कोणी कल्प्यप्रयोग म्हणतात.

क्रतुसंबंधीं कर्माचें स्वरूप दोन प्रकारचें असतें. एक गुणकर्म व दुसरें अर्थकर्म. यज्ञाच्या द्रव्यादि साधनांच्या संबंधानें जें कर्म सांगितलें असतें, तें गुणकर्म. साधनांच्या स्थितीच्या अनुरोधानें, या गुणकर्माचे चार भाग केले जातात. १ साधन पूर्वी नसून तें उत्पन्न करावयाचें असेल. २ साधनें अस्तित्वांत असून तीं प्राप्य करून घ्यावयाचीं. ३ साधनांत विकृति किंवा विकार उत्पन्न करून त्यांचा मग उपयोग करावयाचा, आणि ४ साधनांचा संस्कार करून मग तीं यज्ञकर्मांत घ्यावयाचीं. उदाहरणांनीं हे ४ प्रकार अधिक चांगल्या रीतीनें समजून सांगतां येतील. " वसंते ब्राह्मणाऽग्निमादधीत." "यूपं तक्षति" वसंतांत ब्राह्मणानें अग्नीचें आधान ( स्थापन ) करावें. यूप तासून तयार करतो. ह्या दोन्ही उदाहरणांत अग्नि व यूप हे पूर्वी नव्हते, त्यास उत्पन्न करावयाचें आहे म्हणून यास उत्पत्तिगुणकर्म म्हणतात. २ दुसरें आप्यगुणकर्म. उ०— ' स्वाध्यायोऽध्येतव्यः ' ' गां पयः दोग्धि ' आपला अभ्यास करावा. गाईचें दूध काढतो. ह्या उदाहरणांत विद्या व दूध हीं दोन्ही अस्तित्वांत आहेत. तीं प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. ३ रें विकृतिगुणकर्म. द्रव्यादिकांच्या पूर्वरूपांत विकार करून मग तें घ्यावयाचें. " व्रीहीनवहन्ति " " आज्यं विलापयति "

भात कांडतो; तूप पातळ करतो. भातांचे कांडून तांदूळ होणें, व घट्ट तुपाचें पातळ होणें, ह्या दोन्ही त्यांच्या पूर्व स्वरूपांत विकृति झाल्या असतात. ४ थें संस्कृतिगुणकर्म "व्रीहीन् प्रोक्षति" तांदूळ धुतो.येथें धुण्याचा संस्कार तांदुळांवर होतो, म्हणून हें संस्कृतिगुणकर्म समजावें. ह्याच चार गुण-कर्मांस ( यागाचीं—कर्मांचीं ) अंगें म्हणतात. अर्थकर्म हें क्रतुकाराच्या संबंधानें सांगितलें असतें. ह्या अर्थकर्मांचे दोन भाग असतात. दुसऱ्याकरितां केलेलें आणि दुसऱ्याकरितां नव्हे, आपल्या स्वतःकरितां जें कर्म केलेलें असतें तें. अन्यार्थ केलेल्या कर्मास अंग म्हणतात. अनन्यार्थाकरितां केलेल्या कर्मास 'प्रधान' असें म्हणतात. याप्रमाणेंच सर्व विधिवाक्यें समजून घ्यावींत.

ब्राह्मणाचा दुसरा भाग अर्थवादरूप ब्राह्मण. एकाद्या वस्तुची स्तुति किंवा निंदा ज्या वाक्यांत केली असत व त्याबरोबर विधिविशेषहि सांगितला असतो, अशा वाक्यास 'अर्थवाद म्हणतात. अर्थवादाचे तीन भेद आहेत. १ गुणवाद, २ अनुवाद आणि ३ रा भूतार्थवाद. कोणत्याहि गोष्टींमधील विरोध दिसत असून त्या इष्टकार्यास गुणावह आहेत, असें ज्या वाक्यांत दाखविलें असतें, त्यास गुणवाद म्हणतात. एखाद्या वस्तुविषयीं ज्ञान पूर्वी असतांही, किंवा करून दिल्यावर तें ज्ञान निश्चित व दृढ होण्यास जें पुनः पुनः सांगितलें असतें, त्यांस अनुवाद म्हणतात. भूतार्थ-वादांत वस्तुस्थिति जशी असत तशीच्या तशीच सांगितली

असते, किंवा एखादी गोष्ट जशी घडली असेल तशीच ती सांगितली असते. हा एक प्रकारचा भूतार्थ होय. दुसऱ्या प्रकारच्या भूतार्थानें माहीत नसलेल्या वस्तूचें ( अज्ञाताचें ) व अबाधित वस्तूचें ज्ञान भूतार्थवादापासून प्राप्त होतें. त्यांत प्रामाण्य असतें. ' आदित्यो यूपः ', ( यूप हाच आदित्य होय ) हें गुणवादाचें उदाहरण होय. ' अग्निर्हिमस्य भेषजम् ' ( थंडीला अग्नि औषध आहे. ) हें अनुवादाचें उदाहरण आहे. इंद्रो वृत्राय वज्रमुद्यच्छत् हें व अशा गोष्टी हीं भूतार्थवादाचीं उदाहरणें आहेत.

ज्या ब्राह्मणवाक्यात कोणत्याहि एखाद्या कर्माविषयीं विधि सांगितला नसतो किंवा ज्यांत यज्ञकर्मांचा, किंवा त्यांच्या द्रव्यादिकांचा अर्थवादहि नसतो, किंवा विधि व अर्थवाद यासंबंधी वस्तुस्थिति किंवा एखादी गोष्ट सांगितली नसते, अशा सर्व ब्राह्मणवाक्यांत वेदान्तपर विचार केला असतो. परमानन्द ज्ञानात्मक ब्रह्म हेंच या वेदान्तवाक्यांचा स्वार्थ आहे. याप्रमाणें विधिरूप, अर्थवादरूप आणि वेदान्तरूप असे ब्राह्मणाचे तीन भाग करतां येतात. कर्मकाण्ड, हें धर्म, अर्थ, काम, साधण्यास, व ब्रह्मकाण्ड हें मोक्ष प्राप्त करून देण्यास मोठीं साधनें आहेत.

वेदाचे दोनच मुख्य भाग—मंत्र आणि ब्राह्मण हे मंत्र गद्य किंवा पद्य असतात. त्यांत अनुष्ठान, द्रव्यदेवता इत्यादिकांचें वर्णन, स्तुति, वगैरे केलीं असतात. ब्राह्मणांत यागकर्मासंबन्धी सर्व माहिती दिली असते असें वर सांगितलें आहेच.

कालगतीनें यजनाचे प्रकार पुष्कळ वाढले आणि कार्य-विस्तारही फार झाला. याकरितां होता, अध्वर्यु, उद्गाता या ऋत्विजांच्या सोईसाठीं ऋक् यजु साम असे प्रयोगभेदामुळें तीन निरनिराळे वेदग्रंथ झाले. प्रवचनभेदामुळे त्यांच्या पुष्कळ भिन्न शाखा किंवा गाथा झाल्या. तथापि ब्रह्मकांडा-सम्बन्धानें सर्वांचें एक्यच आहे. चारांहि वेदांत काय काय सांगितलें आहें ह्याची सविस्तर माहिती येथें देणें शक्य नाहीं, तथापि प्रत्येकांत येणाऱ्या विषयांची थोडीबहुत कल्पना यावी इतकी माहिती पुढें दिली आहे.

ऋग्वेद, यजुर्वेद, आणि सामवेद असे पहिल्यांदा तीन भाग ऋत्विजांच्या सोईकरितां झाले. पुढें अथर्ववेद होऊन त्यांस जोडला गेला. ह्या चारहि वेदांत ऋग्वेद हा मोठा व त्यांतील अगदीं प्राचीन असा ग्रंथ आहे. या वेदाचीं आठ अष्टकें आहेत. प्रत्येक अष्टकांत आठ आठ अध्याय असतात. ह्मणून एकंदर अध्याय ६४ आहेत. अध्यायांचे पोटभागास वर्ग म्हणतात. वर्गांत ऋचा असतात. हे वर्ग सुमारें दोन हजार आहेत. मंत्रद्रष्ट ऋषी यांनीं प्रकट केलेले मंत्र निरनिराळे आहेत, म्हणून ऋषींवरून ऋग्वेदाचे दहा भाग केले आहेत. या भागांस मंडलें असें नांव आहे. प्रत्येक मंडलांत अनुवाक असतात. अनुवाकाचे पोटांत सूक्तें, व सूक्तांत ऋचा असे ऋग्वेदाचे विभाग केले आहेत. मंडलें १० आहेत; अनुवाक ८५, सूक्तें (११ वालखिल्यें धरून) १०२८ आहेत एकंदर ऋचा १०५८०॥ आहेत. शब्द

१,५३,८२६ आणि पदें (अक्षरें) ४,३२,००० आहेत.

गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज आणि वसिष्ठ हे अनुक्रमें २ तें ७ मंडलांचे ऋषि आहेत. या ऋषींना ' माध्यम ' म्हणतात. त्यांच्या मंडलांत विशेष रचनापद्धति दिसून येते. स्वतःचे गोत्राकरितांच त्या ऋषींनीं आपापले मंत्र निरनिराळे केले असावेत. यज्ञांत पशु आणण्याचे पूर्वी ' आप्री ' नांवाचे मंत्र म्हणावयाचे असतात, ते प्रत्येक ऋषीचे वेगळे वेगळे आहेत. हेच मंत्र त्यांनीं म्हणावेत, दुसऱ्या ऋषींचे मंत्र म्हणूं नयेत असें ऐतरेय ब्राह्मणांत ( २-४ ) सांगितलें आहे. या मंडलांत पहिल्यांदा अग्नीविषयीं व नन्तर इंद्रादिकांच्या ऋचा येतात. ह्या व इतर कारणावरून हीं मंडलें अगोदर रचलीं असावींत, असा अदमास आहे. या मंडलानंतर, पहिलें, आठवें, व नववें हीं मंडलें झालीं असावींत. पहिल्या मंडलांत अनेक ऋषींचीं सूक्तें आहेत. त्यांत कण्व व कण्वगोत्रज ऋषींचीं सूक्तें बरींच आहेत. या ऋषींस शतर्ची म्हणतात. कारण प्रत्येकानें शंभर शंभर ऋचा केल्या आहेत. आठव्या मंडलांत प्रगाथा आहेत. यांतहि कण्वऋषींचीं सूक्तें बरींच आहेत. या सूक्तांत आणि पहिल्या मंडलांतील कण्वांचे सूक्तांत बरेंच साम्य आहे. नववें मंडल, पहिलीं आठ झाल्यावर झालें असावें. यांत फक्त पवमानसोमाचें वर्णन आहे. वर सांगितलेल्या ऋषींनीं केलेलीं पवमानसूक्तें यांत ग्रथित केलीं आहेत. दहावें मंडल शेवटीं झालें. क्षुद्रसूक्तें व महा-

सूक्तें यांत आहेत. पूर्वींच्या मंडलांत येणाऱ्या विषयांपेक्षां निराळे विषय आले आहेत. रुद्र, अग्नि आणि विशेषतः विश्वेदेव, मन्यु, श्रद्धा इत्यादि देवताचें वर्णन यात आहे. शिवाय विवाह, और्ध्वदेहिक कर्म, सृष्टीची उत्पत्ति, तत्त्वशास्त्र आणि मोहनी वगैरेचे मंत्र इ० नवीन विषय या मंडलांत आले आहेत. अनेक देवता आहेत, ही कल्पना कमी कमी होत जाऊन एकच देव आहे ही भावना समाजात जागृत झालेली असावी, असें या मंडलात दिसतें.

ऋग्वेद हा हौत्रवेद असल्यामुळें होतृऋत्विजानें म्हणावयाचे मंत्र यात आले आहेत. देवताची स्तुति व त्यांची प्रार्थना हे दोन त्यांतील मुख्य विषय होत. अनेक देवताचे पराक्रम, त्याचें माहात्म्य, वैभव, तेजस्वीपणा, औदार्य, शहाणपण इत्यादि गुणांचें वर्णन यांत आलेलें आहे. तसेंच आह्मांस गोधन द्या, संतति द्या, आमची भरभराट होऊं द्या, युद्धांत आह्मांस जय मिळो, आमच्या शत्रूंचें निसंतान होवो. आमचें वैभव वाढो, आणि आह्मीं दीर्घायु होवो! अशा प्रकारच्या प्रार्थना या वेदांत आल्या आहेत.

ऋग्वेदांत ३३ देवांचें वर्णन आलेलें आहे. परंतु फक्त सुमारें २० देवाचें वर्णन तीन किंवा तीनहून अधिक सूक्तांत झालेलें आढळतें. पर्जन्य, वात आणि यम यांचीं प्रत्येकाचीं तीनच सूक्तें आहेत. इंद्राचीं सूक्तें २५० आहेत. अग्नि व सोम यांचीं सूक्तें अनुक्रमें सुमारें २०० व शंभर आहेत. इंद्र, अग्नि (मित्र व मातरिश्वन्) सोम,

सूर्य ( याचीं पांच स्वरूपें मित्र, अर्यमा, विष्णु, सविता आणि पुषा. ) अश्विनीकुमार, उषस्, वरुण, रुद्र, मरुत्, वायु, पर्जन्य, यम, प्रजापति, द्यौ ( आकाश ) इत्यादि देवतांच्या पराक्रमादिगुणांचें वर्णन, त्यांची स्तुति प्रार्थना व अशा अनेक गोष्टी ऋग्वेदांत आल्या आहेत. सृष्टींतील अनेक अद्भुत चमत्कार पाहून आपल्या पूर्वजांच्या मनांत विस्मय उत्पन्न झाला, आणि हे चमत्कार निरनिराळ्या देवतांचे आहेत अशी त्यांच्या मनांत भावना उत्पन्न झाली. ऋषींनीं केलेलें हें देवतांच्या प्रभावादिकांचें वर्णन केवळ रूपकच आहे, अशी आधुनिक विद्वानांची समजूत आहे. या सर्व देवांचे गुण किंवा पराक्रम व अधिकार यांचें सविस्तर वर्णन येथें देतां येत नाही. तथापि त्यांतील सुप्रसिद्ध देवांचे गुण किंवा ऐश्वर्याविषयीं थोडीबहुत माहिती पुढें दिली आहे.

इन्द्र हा सर्व देवांत प्रमुख देव आहे. सर्वांत तो बालिष्ठ, वीर्यवान्, व तेजस्वी असा आहे. ‘ इन्द्रो वै देवानामोजिष्ठो बलिष्ठः’ असें कौषितकी ब्राह्मणांत म्हटलें आहे ( ६, १४). यानें सोम पिऊन मरुतांच्या साहाय्यानें वृत्रासुराशीं घनघोर युद्ध करून त्यास आपल्या वज्रानें ठार मारलें. आणि ढगांतून पाणी बाहेर जाण्यास वाट खुली करून दिली. नद्यांचा प्रवाह तो नेहमीं चालू ठेवतो. सारांश, तो पाऊस पाडतो. विद्युत् ही त्याचें वज्र होय. ह्या कामाबद्दल इंद्राची स्तुति वारंवार केली आहे. इंद्रानें वृत्रास मारलें, गाई सोड-

विल्या आणि त्या त्यांच्या मालकांस दिल्या; नद्यांना वाट करून दिली; पर्वतांचा ( अद्रींचा ) भेद केला, असें मंडल १०–८९–१७ यांत त्याचें वर्णन आहे. इंद्राचें वृत्रहन् हें नांव प्रसिद्ध आहे. यानें अद्रींचा भेद करून त्यांवर असणारीं ९०, ९९ आणि १०० पुरें मोडून टाकलीं आणि तेथील रहाणारांस खालीं ढकलून दिलें. इंद्र हा मोठा योद्धा होता. ह्मणून शत्रूचा पराजय करण्याचे कामीं त्याचें साहाय्य पृथ्वीवरचे आर्य लोक नेहमीं मागत असत. इन्द्रानें पृथ्वीला स्थिर केलें. पर्वतांना एका ठिकाणीं खिळून टाकलें; अन्तरिक्षास मापिलें आणि आकाशास धिरा दिला. ( २, मं. २, २ ). इन्द्राला सोम पिण्याची फार आवड असे. सोम पिऊन तो वल्गना करी. ( मं. १०–११९ पहा.)

**रुद्रांचें** वर्णन तीन चार सूक्तांतच आहे. हे देव मोठे भयंकर व क्रूर आहेत. यांच्या हातांत धनुष्यबाण असतात; कधीं कधीं त्यांच्याजवळ वज्र व विजेचा तीर, हीं असतात. बहुधा रुद्रांच्या इषु व मन्यु यांची प्रार्थना रक्षणार्थ केली असते. आपदापासून रक्षण करा येवढेंच नाहीं, तर मनुष्यांचें व पशूंचें कल्याण करा आणि त्यांस शर्म द्या, अशी रुद्रांस विनंति केलेली आढळते. रुद्रांच्या अंगीं, रोग बरे करण्याचें मोठें सामर्थ्य आहे. यामुळें या कामींहि त्यांचें साहाय्य मागतात.

**मरुद्गण** हे मोठे बलाढ्य, शूर व भयंकर असे देव आहेत. हे रुद्र व पृश्नी यांचे पुत्र होत. यांच्या हातांत

भाले व परशु असतात. डोक्यावर शिरस्त्राण असतें. ते अंगावर दागिने घालतात आणि सोन्याच्या रथांत बसून हिंडतात. लढाईच्या कामीं इंद्रास त्यांची मदत असते. ते पाऊस पाडतात. अग्नीच्या बरोबरहि कधीं कधीं मरुद्गण जातात. त्यांची संख्या २१ आणि १८० अशी दिली आहे. वायु किंवा वात यांचेंहि वर्णन ऋग्वेदांत आलें आहे.

अग्नि हा सर्व यज्ञकर्मांत प्रधानसाधन असल्यामुळें तो सर्व देवांत मुख्य देव आहे. अग्निसूक्तें दोनशेंहून अधिक आहेत. अग्नि हा यज्ञाचा देव आहे. तो ऋत्विज आहे. सर्व देवतांस दिलेले हविर्भाग तो त्यांस पोंचवितो, म्हणून त्यास हव्यवाहन असें नांव आहे. तो यजमानाचें कल्याण करितो. सहस्र नेत्रांनीं त्याचें रक्षण करून त्याच्या शत्रूंस जाळून टाकतो. संपत्तीचा तो निधि आहे. जातवेद रत्नधातम आणि गृहपति असा अग्नि आहे. तो यजमानांचें कल्याण करतो, त्यांस संपत्ति व संतति देतो आणि त्याचें वैभव वाढवितो. जुने नवे सर्व ऋषि त्याची स्तुति करितात. अग्नि राक्षसादि दुष्टांचा नाश करतो, म्हणून त्याला रक्षोहन् असेंहि नांव आहे. अग्नीचा तीन स्थानीं जन्म होतो. द्युलोकांत, अन्तरिक्षांत, आणि पृथ्वीवर; किंवा स्वर्गांत, पृथ्वीवर आणि जलांत, अशा तीन ठिकाणीं त्याचा जन्म होतो. म्हणून त्याचीं तीन स्वरूपें आहेत असें मानलें गेलें आहे. सूर्य, वायु किंवा इंद्र आणि अग्नि हीं त्याचीं तीन रूपें होत. ह्याच कारणावरून कदाचित् अग्निहोत्रांत

गार्हपत्य, दक्षिणाग्नि आणि आहवनीय, अशा तीन अग्नींचें अन्वाधान ( स्थापन ) करण्याची चाल पडली असावी. अग्नि घरोघरीं प्रत्येक दिवशीं प्रज्वलित होतो, म्हणून त्याला तरुण असें म्हणतात. स्वतः अमर असून स्वर्ग लोकांतून येऊन तो मर्त्यांत राहिला आहे. तो अनेक प्रकारचीं रूपें या जगांत धारण करतो म्हणून त्यास अनेक निरनिराळीं नावें मिळालीं आहेत. सर्व देव त्याच्या पोटांत आहेत. चाकाचे आऱ्यास पुठ्ठा किंवा पाट जसें आवरून धरतात त्याप्रमाणें अग्नीनें सर्व देवांस आवरून धरलें आहे. वैश्वदेव केल्यावर अग्नीची प्रार्थना करीत असतां त्याच्या जवळ यजमान जे जे मागतो ते व तशाच तऱ्हेच्या देणग्या अग्नि मनुष्यास देतो, असें सामान्यतः धरून चाललें तर हरकत नाहीं. अग्नि हा पुरोहित ( ब्राह्मण ) आहे. इन्द्र राजा व योद्धा आहे.

**वरुण** हा वेदांतील देवांपैकीं एक **श्रेष्ठ** देव आहे. वेदाच्या पूर्वीं व आरंभकाळीं वरुणाची फार महती होती. वरुण शब्दाचा अर्थ आवरण करणारा किंवा आकाश असाच असावा. इंद्र, अग्नि व सोम यांच्या सूक्तांपेक्षां वरुणाचीं सुक्तें पुष्कळच कमी आहेत. तथापि त्या सूक्तांत नीति व भक्ति यांचा बराच आविर्भाव दिसून येतो. वरुण राजाचा अधिकार नैतिक आणि भौतिक सृष्टीवर चालू असतो. त्यानें सृष्टीस नियम घालून दिले आहेत, आणि त्या नियमांप्रमाणें ( ऋतांप्रमाणें ) सर्व वस्तु चालताहेत,

किंवा नाहींत हें तो पहात असतो. त्याच्या नियमास अनुसरून द्यावापृथ्वी हीं निराळीं राहिलीं आहेत. वरुणानें सूर्य निर्माण केला, आणि त्याच्यासाठीं विस्तीर्ण वाट करून दिली. वायु हा वरुणाचा श्वासोच्छ्वास आहे. वरुणाच्या आज्ञेनें चंद्र व नक्षत्रें रात्रीं प्रकाशतात आणि दिवसां नाहींशीं होतात. त्याच्याच अतर्क्य शक्तीनें पाऊस पडतो, जमीन भिजते आणि डोंगर मेघाच्छादित होतात. हा अपांपति आहे. पक्ष्यांची उड्डाणगति, नौकांचा समुद्रांतील मार्ग, वायूची गति व प्रदेश या सर्व गोष्टी वरुणाला माहीत असतात. उत्पन्न झालेल्या आणि पुढें होणाऱ्या सर्व वस्तु त्याच्या लक्षांत असतात. मनुष्यांचीं खरीं खोटीं कर्में तो नेहमीं पहात असतो. वरुणाच्या आज्ञेशिवाय पापणी सुद्धां लवत नाहीं. मनुष्यांच्या पापाबद्दल तो त्यांस शिक्षा करतो व पाशानें बांधून टाकतो. ‘वरुणाच्या व्रताचा भंग झाला असतां, क्षमा करा’ अशी त्याची प्रार्थना केली तर तो पापांचें क्षालन करतो. पूर्वजांनीं केलेल्या पापापासून सुद्धां त्यांच्या संततीची मुक्ति करतो. उदरासारखे रोग वरुण बरे करतो. आतां वरुण हा उदकांचा पति एवढीच भावना राहिली आहे.

सूर्याच्या निरनिराळ्या गुणांवरून आणि त्याच्या पराक्रमाप्रमाणें त्याचें पांच स्वरूपांत वर्णन ऋग्वेदांत आलें आहे. ‘मित्र’ हा प्राण्यांचा स्नेही आहे तो चर्षणींचें (प्रजेचें) पालन करतो. मित्र आणि वरुण यांची जोडी आहे. मित्रा-

वरुण या नांवानें ते प्रसिद्ध आहेत. ' सूर्य ' हा मित्राचा आणि अग्नीचा डोळा आहे. तो अंधकार नाहींसा करतो. आणि सर्व जगांतील आचारावर त्याचें लक्ष असतें. ते त्याला दिसतात. सात घोड्यांच्या रथांत तो बसून येतो. सूर्य उगवला म्हणजे लोक आपापलीं कामें करूं लागतात आणि ' पापांपासून आमचें क्षालन कर ' अशी त्यास प्रार्थना करतात. रोग व दुष्ट स्वप्नें तो घालवितो. त्याच्या योगानें कालगणना होते. उषा त्याला घेऊन येते. ती त्याची स्त्री आहे. ' सविता ' हा प्रचोदक आहे. लोकांच्या कर्तृत्वशक्तीस तो प्रोत्साहन देऊन त्यांस आपापलीं कामें करण्यास लावतो. त्याची हिरण्मय मूर्ति आहे. त्याचे हात पाय व रथ सोन्याचे आहेत. पूर्वेकडून तो आपला प्रकाश चोहोंकडे पसरतो. राक्षस, रोग व दुष्टस्वप्नें यांचा नाश सविता करतो, देवांना अमृतत्व आणि मनुष्यास दीर्घ आयुष्य तो देतो. सर्व देव त्याचें ऐकतात. तो नायक आहे. सवितृदेवाची गायित्रीछन्दोबद्ध प्रार्थना सुप्रसिद्ध आहे. त्यांत आपलें मन व बुद्धि शुद्ध व्हावी, अशा हेतूनें त्याचें ध्यान करावें असें सांगितलें आहे. ' तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्. ' ह्या मंत्राचा प्रत्येक धार्मिक ब्राह्मण दररोज जप करीत असतो. ' पूषा ' हा नुकताच उगवलेला सूर्य होय. तो सर्वांचें पोषण करणारा आहे. विशेषतः गुराढोरांचें रक्षण करतो, त्यांस वाट दाखवितो, आणि अशारीतीनें तो लोकांचें कल्याण करतो.

मेलेल्या मनुष्यांस तो पितृलोकीं नेतो. विष्णु हा देव ऋग्वेदांत इतका प्रसिद्ध नाहीं. सूर्य उगवतो, मध्यान्हीं तो आपल्या मस्तकावर येतो आणि संध्याकाळीं तो अस्तास जातो. हीं विष्णूचीं तीन पाऊलें आहेत. ह्या तीन पावलांनीं तो सर्व जगत् क्रमून जातो. तो सर्व धर्मांचें पाळण करतो व लोकांना ते धर्म पाळण करण्यास लावतो. तो इन्द्राचा सखा आहे.

**उषा** ही फार सुंदर स्त्री आहे. रात्रीची ती बहीण व सूर्याची बायको आहे. सुमारें वीस सूक्तांत सृष्टींतील ह्या सुंदर चमत्काराचें फार सुंदर रीतीनें व काव्यरसपरिपूर्ण असें वर्णन आलें आहे. अशाप्रकारचें अनेक देवतांचें ऋग्वेदांत वर्णनें केलेलें आहे. त्याविषयीं अधिक हकीगत येथें देतां येत नाहीं.

ब्राह्मणांचें सामान्यस्वरूप पूर्वींच सांगितलें आहे. ऋग्वेदांचीं दोन ब्राह्मणें आहेत —ऐतरेय ब्राह्मण आणि कौषितकी किंवा शांखायन ब्राह्मण. ऐतरेय ब्राह्मणांत आठ पंचिका आहेत. प्रत्येक पंचिकेंत पांच पांच अध्याय असतात. या ब्राह्मणांत एकंदर ४० अध्याय आणि १६२ खंडें आहेत. पहिल्या सोळा अध्यायांत अग्निष्टोमाविषयीं हकीगत आहे. अग्निष्टोमाचें अनुष्ठान एका दिवसाचेंच असतें. सतरा व अठरा अध्यायांत ‘ गवायमन ’ यज्ञाचें वर्णन आहे. हें अनुष्ठान ३६० दिवस चालू असतें. १९—२४ अध्यायांत ‘ द्वादशाह ’ यागासंबन्धी माहिती दिली आहे. २५—३२

अध्यायांत ' अग्निहोत्र सांगितलें आहे. राजाचा अभिषेक व त्याचा पुरोहित इत्यादिकांविषयीं शेवटच्या ८ अध्यायांत वर्णन आहे. हा भाग पाठीमागून या ब्राह्मणास जोडला असावा. कारण कौषितकी ब्राह्मणांत याविषयींचें प्रतिपादन केलेलें नाहीं. कौषितकी किंवा शांखायन हें ऋग्वेदाचें दुसरें ब्राह्मण होय. ऐतरेयांत आलेल्या विषयांचेंच या ब्राह्मणांत प्रतिपादन केलें आहे. तथापि हें प्रतिपादन अधिक विस्तृत आहे. अग्न्याधान ( अग्नीची स्थापना ) अग्निहोत्राचे सायंप्रातर्होम आणि दर्शपूर्णमासाच्या इष्टी या विषयांविषयीं सविस्तर माहिती येथें दिली आहे. यांतहि सोमयागाचें ( अग्निष्टोमाचें ) वर्णन प्राधान्यानें आलेलें आहे. ग्रन्थाची रचना अधिक पद्धतशीर आहे. ऐतरेय ब्राह्मणाच्या ३३ व्या अध्यायांत हरिश्चन्द्र राजा व शुनःशेप यांची आख्यायिका सांगितली आहे.

ऐतरेय ब्राह्मणाचें ऐतरेय आरण्यककांड आहे. याचे पांच भाग केले आहेत, प्रत्येक भागास आरण्यक ह्मणतात. आरण्यकाचे अध्याय व खंड असे विभाग आहेत. एकदर १८ अध्याय आहेत, आणि ७५ खडें आहेत. पहिल्या आरण्यकांत इंद्रानें वृत्राला ठार मारला त्यामुळें तो इन्द्र महान् झाला आणि त्याला आनंद व्हावा म्हणून सोम सवनादि अग्निष्टोम हें महाव्रत आरंभावें, असें सांगून त्याचें अनुष्ठान सांगितलें आहे. प्रातःसवनाचीं प्राकृत व वैकृत अशीं दोन आज्यशस्त्रें वर्णिलीं आहेत. पुढें माध्यं-

दिन सवनाचे शस्त्राचें वर्णन करून मारुत्वती शस्त्र व पक्षीरूपी निष्कैवल्य शस्त्राच्या सर्व अंगाच्या अवयवांचें सविस्तर प्रतिपादन आहे. दुसऱ्या आरण्यकांत पहिल्या तीन अध्यायांत प्राण व पुरुष यांविषयीं विचार आहे. उक्थ शस्त्रांत ध्येय जो प्राण त्याचे अनेक उपास्यगुण सांगून मण्डलाचे सर्व ऋषि व मंत्र यांच्यांशीं प्राणांचा संबंध जोडून दिला आहे. ह्या आरण्यकांतील चवथ्या अध्यायापासून सातव्या अध्यायांपर्यंत ऐतरेय उपनिषद् आहे. कर्मकांड संपल्यावर उपनिषदास आरंभ चवथ्या अध्यायांत केला आहे.

'आत्मा वा इदमेक एकाग्र आसीन्नान्यं किंचन मिषत्"

येथून आरंभ होऊन सातव्या अध्यायाचे शेवटीं 'वक्तारमवतु वक्तारम्' येथें उपनिषदाची समाप्ति झाली आहे. दुसऱ्या आरण्यकांत मध्यम विद्याधिकारी लोकांकरितां प्राणविद्या सांगितली आहे, आणि उत्तम विद्याधिकाऱ्यासाठीं ब्रह्मविद्या ( उपनिषद् ) सांगितली आहे. तिसऱ्या आरण्यकांत अधम विद्याधिकाऱ्याकरितां संहिता, पद आणि क्रम यांचें कसें अध्ययन करावें हें रूपक करून सांगितलें आहे. त्याचप्रमाणें मूळ अक्षरांतील स्वर, व्यंजनें आणि उष्म, ( श, ष, स आणि ह ) यांची माहिती आहे. चवथ्या आरण्यकांत अरण्यांत जाऊन अध्ययन करण्यास योग्य असे मंत्र सांगितले आहेत. या मंत्राचा विनियोग आश्वलायन सूत्रांत दिला आहे. पांचव्या आरण्यकांत महाव्रतासंबंधीं २५

साभिधेनीऋचा सांगितल्या आहेत. पहिल्या आरण्यकांत महाव्रताचेंच प्रतिपादन आहे. तें अपौरुषेय ब्राह्मण आहे. पांचव्या भागांतील ग्रन्थ ऋषिप्रणीत व सूत्रात्मक आहे. म्हणून एक विषय दोनदा आला असा पुनरुक्त दोष येथें होत नाहीं.

कौषितकी ब्राह्मणाचें कौषितकी आरण्यक आहे. याचे पंधरा अध्याय आहेत. पहिल्या दोन अध्यायांत महाव्रता-संबन्धी विवेचन आहे. (ऐतरेयांतील १ व ५ आरण्यकें पहा). पुढल्या चार अध्यायात कौषितकी उपनिषद् आहे. (ऐ. अ. ३—६ पहा). सातव्या आणि आठव्या अध्यायांत संहिता, पद, क्रमादि विषय आले आहेत. (ऐतरेय ३ रें आरण्यक पहा).

१ शाकल, २ बाष्कल, ३ आश्वलायन, ४ शांखायन आणि ५ मांडुकेय, अशा ऋग्वेदाच्या पांच शाखा आहेत, असें चरणव्यूहांत सांगितलें आहे. शाकल संहितेंत वाल-खिल्यांचा अन्तर्भाव करीत नाहींत. आश्वलायन व शांखा-यन संहितेंत तीं अन्तर्भूत आहेत. बाष्कलसंहितेंत आठ ऋचा अधिक आहेत आणि पहिल्या मंडलांतील सूक्तांचा अनुक्रम भिन्न आहे. मांडुकेय संहिताग्रन्थ सध्यां उपलब्धच नाहीं असें म्हणतात. ऋग्वेदाचे आठ भेद आहेत, असेंहि चरणव्यूहांत सांगितलें आहे. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:— चर्चाश्रावक, चर्चक, श्रवणीयपार, क्रमपार, क्रमजट, क्रम-वट, क्रमरथ, आणि क्रमदंड.

पदक्रमादि पाठांची अध्ययनपरिपाठि अबाधित राहिल्यामुळें सर्व वेद होते तसेच आजपर्यंत राहिले, असें म्हटलें असतां कोणी हरकत घेणार नाहीं. क्रम, जटा व घन म्हणण्याचा परिपाठ उत्तरोत्तर कमी होणारच. आतां सुद्धां फार थोडे घनपाठी वैदिक आढळतात. यासाठीं हे पाठ कसे असतात, याविषयीं थोडीबहुत कल्पना यावी, म्हणून पहिल्या ऋचेचे क्रम जटा व घन पाठ पुढें दिले आहेत.

अग्निमीळे पुरोहितम् यज्ञस्य, देवमृत्विजम्
होतारं रत्नधातमम् ॥

पदेः—अग्निम्, ईळे, पुरोहितम्, यज्ञस्य, देवम्, ऋत्विजम्, होतारम्, रत्नधातमम् ॥

क्रमः—अग्निमीळे, ईळे पुरोहितम्. पुरोहितम् यज्ञस्य, यज्ञस्य देवम्, देवमृत्विजम् इत्यादि इत्यादि.

जटाः—अग्निमीळे, ईळेऽग्निम्, अग्निमीळे; इळेपुरोहितम् पुरोहितमीळे, ईळेपुरोहितम्; पुरोहितम् यज्ञस्य, यज्ञस्य पुरोहितम्, पुरोहितम् यज्ञस्य; यज्ञस्य देवम्, देवम् यज्ञस्य, यज्ञस्य देवम्; इत्यादि इत्यादि.

घनः—अग्निमीळे, ईळेऽग्निम्; अग्निमीळे पुरोहितम्; पुरोहितमीळेऽग्निम्, अग्निमीळेपुरोहितम्. इळेपुरोहितम्, पुरोहितमीळे, ईळेपुरोहितम् यज्ञस्य, यज्ञस्य पुरोहितमीळे, ईळेपुरोहितम् यज्ञस्य. पुरोहितं यज्ञस्य;

**यज्ञस्य पुरोहितम्. पुरोहितं यज्ञस्य देवम्, देवम् यज्ञस्य पुरोहितम्, पुरोहितं यज्ञस्य देवम्. इत्यादि.**

वस्तुस्थिति आतां पुष्कळ बदलली आहे. घोकंपट्टीची आतां अगदीं जरूरी राहिली नाहीं. कोणी अशी घोकंपट्टी करूं लागला तर व्यर्थ श्रम करीत आहे असें म्हणून त्यास लोक हसतील. तथापि ह्या घोकंपट्टीच्याच साहाय्यानें आजपर्यंत सर्व वेदग्रन्थाचा बचाव झाला आहे.

पुढें वेदांगांत छंदःशास्त्रांत जीं मुख्य छन्द (वृत्तें) सांगितलीं आहेत, तीं बहुतेक सर्व ऋग्वेदांत आलीं आहेत.

तथापि त्रिष्टुभ् आणि गायित्री या वृत्तांचा भरणा सर्वांत अधिक आहे. चार हजारांहून अधिक मंत्र त्रिष्टुभ् छन्दांत आहेत. गायित्रीमंत्र सुमारें २४५० आहेत.

---

## यजुर्वेद.

यजुर्वेद हा 'अध्वर्यु' ऋत्विजाचा वेद आहे. यजन कर्माची सर्व तयारी करणें, त्याची तंत्राप्रमाणें व्यवस्था लावणें व तत्संन्बधीं मंत्र म्हणणें, आहुति देणें, इत्यादि कामें अध्वर्यूचीं आहेत. ह्या कर्मासंबन्धीं सर्व मंत्र व ब्राह्मण या वेदांत संकलित केलीं आहेत. त्याचप्रमाणें यजमान व त्याचीं कर्में आणि त्या संबन्धी मंत्रादि या वेदांत सांगितले आहेत. यजुः या शब्दाचा सामान्यतः अर्थ, गद्यात्मक मंत्र असा करतात. यजुः हें छन्दोबद्ध नसतें.

यजुर्वेदाचे दोन तट किंवा पक्ष झाले. ते कसे, केव्हां व कां म्हणून झाले, याविषयीं निश्चित अशी कांहीं एक माहिती नाहीं. परंतु त्याविषयीं एक दंतकथा परंपरेनें आली आहे ती अशी*:—वेदव्यासांनीं वेदाचे चार भाग केल्यावर यजुर्वेदाचा उपदेश वैशंपायनास केला. वैशंपायनानें याज्ञवल्क्यादि शिष्यांकडून त्याचें अध्ययन करविलें. कांहीं कारणानें वैशंपायन याज्ञवल्क्यावर रागावले, आणि 'माझ्याजवळून शिकलेला वेद मला परत दे' असें ते याज्ञवल्क्यांस म्हणाले. यावर याज्ञवल्क्यानें वेद ओकून टाकला. तो वैशंपायनाच्या शिष्यांनीं त्यांच्या आज्ञेवरून तित्तिरिपक्ष्याचें रूप धारण करून खाऊन टाकला. ओकून टाकलेला वेद रखरखित निखाऱ्यासारखा होता. तित्तिरपक्षी निखारे खातात म्हणून वैशंपायन शिष्यांनीं तित्तिरिपक्षी होऊन तो वेद ग्रहण केला. याज्ञवल्क्यानें पुढें सूर्याची उपासना करून त्यापासून यजुः पुनः शिकून घेतलें. यांस शुक्ल यजुर्वेद म्हणतात. कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेंत मंत्र व ब्राह्मण मिश्रित आहेत, आणि याशिवाय ब्राह्मण आणखी निराळें आहे. शुक्ल यजुर्वेदांत संहितेंत सर्व मंत्रच आहेत. आणि त्याचें ब्राह्मण अगदीं वेगळें केलें आहे. हा भेद ह्या दोन वेदांत आहे. शिवाय मंत्रांत पाठभेद व क्रमभेद हीं आढळून येतात. यजुर्वेदांत सगळे

* श्रीविष्णुपुराणांत ही गोष्ट आली आहे, तिचा सारांश असाच आहे. (वि. पु. अं० ३ अ० ५.)

मंत्र यजुः नाहींत. त्यांत होत्यानें म्हणावयाचे मंत्र— याज्या व पुरोनुवाक्या—यांच्या ऋचा आल्या आहेत. तसेंच उद्गात्याचे साममंत्रहि आले आहेत. तथापि यजूंची संख्या या वेदांत अधिक असल्यामुळें या वेदास यजुर्वेद म्हणतात.

वेदांचे कर्मकांड व ज्ञानकांड असे दोन भाग असतात. या वेदाचे कर्मकाण्डांत नित्य, नैमित्तिक, काम्य आणि निषिद्ध अशा चार कर्मांचें प्रतिपादन केलें आहे. या कर्मांचे दोन भाग केले आहेत. प्रकृति आणि विकृति. प्रत्येक कर्माचीं कांहीं तरी अंगें असतातच. ज्यांत कर्माच्या सर्व अंगांचा उपदेश केला असतो, म्हणजे प्रत्येक अंग सांगून तें कसें करावें, इत्यादि सर्व माहिती जेथें दिली असते, त्याला प्रकृति म्हणतात. कर्माच्या प्रधानअंगांचेंच तेवढें वर्णन करून बाकीच्या अंगांविषयीं जेथें अतिदेश केला असतो, त्यास विकृति हें नांव आहे. दुसऱ्या एखाद्या कर्मांत तीं अंगें कशीं करावींत हें सांगितलें असतें, तशींच प्रस्तुत कर्मांत तीं करावींत असें सांगणें, यास अतिदेश म्हणतात. अग्निहोत्र, इष्टि आणि सोम हे प्रकृतीचे तीन प्रकार आहेत. या तिन्ही प्रकारांत दुसऱ्या कर्माची अपेक्षा न धरतां त्या कर्माच्या सर्व अंगांचा पूर्ण उपदेश केला असतो, म्हणजे त्यांच्या सर्व अंगांचें इत्थंभूत वर्णन केलें असतें. या तीन जातींच्या कर्मांव्यतिरिक्त कर्मे विकृति होत. कारण त्यांच्या कांहीं अंगांचा अतिदेश केला असतो.

कृष्णयजुर्वेदाचे ८६ भेद आहेत असें चरणव्यूह ग्रंथांत

सांगितलें आहे.* कठसंहिता पंजाब व काश्मीर या देशांत यजुःशाखीय ब्राह्मण म्हणतात. कपिष्ठल संहिता नाहींशी झाली. मैत्रायणिसंहिता गुजराथ, मोर्वी आणि नर्मदानदीचे आजूबाजूचे प्रदेशांत पठन करितात. तैत्तिरीयसंहिता दक्षिण हिंदुस्थानांत आहे. बाकीच्या नष्ट झाल्या, किंवा अजून त्यांचा पत्ता लागला नाहीं. वैशंपायनानें तैत्तिरीयसंहिता पैंगि यास्कास, यास्कानें तित्तिरीस, आणि तित्तिरीनें उखास शिकविली. औख्य आणि खांडिकेय असे तैत्तिरीयसंहितेचे दोन भेद आहेत. बौधायनी, आपस्तंभी, सत्याषाढी, हिरण्यकेशी आणि औधेयी, असे पांच पोटभाग खांडिकेयाचे

---

* **टीपः**– चरणव्यूहांत कृष्ण यजुर्वेदाच्या ८६ शाखा आहेत असे सांगितलें आहे. परंतु त्या ग्रन्थात त्याची नावें दिलेला नाहीत. **चरकाचे बारा भेद** सांगितले आहेत. चरक, आव्हरक, कठ, प्राच्यकठ कपिष्ठिलकठ, रायणीय, वारायणीय, वार्तान्तवेय, श्वेत, [illegible], मैत्रायणीय आणि औपमन्यव. मत्रायणीच्या सात शाखा सांगीतल्या आहेत, त्या येणेंप्रमाणेः—मानव, दुंदुभ, ऐकेय वाराह, हारिद्रवेय, श्याम- आणि श्यामायनीय-कठाचे तेराभेद आहेत म्हणून ऐकतों, परंतु त्यांचीं नांवें माहित नाहींत. तैत्तिरीय शाखेंतील खांडिकेयाचे पांच भेद आणि औखेय शाखा ह्या एकंदर सहा आहेत. या सर्वांची बेरीज केली तर एकंदर ३८ शाखा होतात. बाकीच्या कोठें आहेत किंवा होत्या हें समजण्याचा मार्ग उरला नाहीं. ह्याच वेदाच्या इतक्या शाखा कां व्हाव्यात, हे कळत नाहीं. उपलब्ध असलेल्या संहिता व ब्राम्हण ग्रन्थां, त म्हणण्यासारखा पाठभेद दिसून येत नाही. विशिष्टकर्मांत मंत्राच्या विनियोगासंबंधानें किंवा प्रयोगाविषयीं अनेक ऋषींचा मतभेद होऊन अनेक शाखा होण्याचा संभव आहे. ह्या वेदाच्या वैशंपायनानें २७ शाखा केल्या, असें श्रीविष्णुपुरणांत सांगितलें आहे. (अंश ३ अध्याय ५.)

आहेत. आत्रेय हा उखाचा शिष्य होता. आत्रेयानें ह्या वेदाचीं पदें केलीं. कौण्डिणेयाची या वेदावर वृत्ति आहे. बौधायन, आपस्तंभ, सत्याषाढ, हिरण्यकेशी हे मुख्य सूत्रकार होत.

तैत्तिरीयसंहितेचे मुख्य सात भाग केलेले आहेत. प्रत्येक भागास ‘ कांड ’ हें नांव आहे. प्रत्येक काडांत प्रश्न किंवा प्रपाठक असतात, आणि प्रपाठकांच्या पोटांत अनुवाक असतात. प्रत्येक अनुवाकांत विशिष्ट कर्माविषयीं मंत्र किंवा ब्राह्मण असतात. ह्या संहितेचीं सात काडें आहेत. एकंदर प्रपाठक ४४ आहेत, अनुवाक ६५१ आहेत आणि पदसंख्या १,१०,२९३ आहे. तै० ब्राह्मणांत ३ काडें, २८ प्रपाठक आणि ३३९ अनुवाक आहेत. आरण्यकात १० प्रपाठक आणि त्यांचे पोटांत अनुवाक आहेत.

तैत्तिरीय शाखेंत कर्म व ज्ञान या विषयासंबंधीं दोन्ही मिळून एकंदर ५२ प्रकरणें सांगितलीं आहेत. अर्थात् प्रत्येक कर्मास लागणारे मंत्र, त्यांचा प्रयोग व त्याचीं सर्व तंत्रें यांचा विचार या प्रकरणांत केलेला असतो. या प्रत्येक प्रकरणांस ‘ कांड ’ ही पारिभाषिक संज्ञा आहे. या ५२ कांडांपैकीं ४१ शाखाकांडें ( कर्मकांडें ) होत. तीन उपनिषद् किंवा वेदान्त कांडें आहेत आणि आठ काठकें आहेत. प्रत्येक कांडाचा एक ऋषि असतो. शाखाकांडांचे प्रजापति, सोम, अग्नि आणि विश्वेदेव असे चार कांडऋषि आहेत. शाखादि ( पुरोडाशिय ) याजमान, होतृ, हौत्र

दार्शिक या तिन्हींचे तीन विधि आणि पितृमेध अशा नऊ कांडांचा प्रजापति ऋषि आहे, असें तद्विद लोक मानतात. अध्वर, ग्रह, दाक्षिण, त्यांचा विधि, वाजपेय, त्याचा विधि, प्रवर्ग्य, तद्विधि, आणि सव, अशा नऊ कांडांचा सोम हा ऋषि आहे. अग्न्याधेय, अग्न्युपस्थान, अग्नि, त्याचे दोन विधि, आणि अग्निहोत्राचा विधि, ह्या सात कांडांचा अग्नि, कांडऋषि आहे. राजसूय, काम्यपशू, इष्टी, उपानुवाक्या, याज्या, राजसूयाविधि, सत्रायण, अश्वमेध, उपहोम, कौकिली, सौत्रामणी, नक्षत्रेष्टि, नरमेध, पाशुक हौत्र, अच्छिद्र-कांड आणि अश्वमेधविधि ह्या बाकी राहिलेल्या सोळा कर्मांचे ऋषि विश्वेदेव आहेत, असें मानिलें आहे.

आरण्यकाच्या दहा प्रपाठकांपैकीं पहिल्यांत आरुणकेतुक अग्नीची चिति, व त्याच्या कुंडाच्या इष्टिकांचे ( विटांच्या ) स्थापनेचे मंत्र सांगितले आहेत. अरुण आणि केतु या मुनींनीं ह्या अग्नीचें चयन पहिल्यांदा केलें म्हणून त्याला आरुणकेतुक असें म्हणतात. वातरशना मुनीनेंही या अग्नीचें चयन केलें होतें. २ दुसऱ्या प्रपाठकांत स्वाध्याय सांगितला आहे. त्यांत त्या वेळच्या संध्येचे मंत्र व कुष्मांड होम, त्या होमाचे मंत्र, दीक्षा, विधान, हे विषय आले आहेत. याशिवाय देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, आणि विशेषतः ब्रह्मयज्ञ ह्या पंचमहायज्ञांची हकीकत आहे. ३ तिसऱ्या प्रपाठकांत चातुर्होत्रमंत्र, पुरुषसूक्त, उत्तर-नारायण, मृत्युसूक्त, वगैरे विषय आहेत. ४—५ चवथ्या व

पांचव्या प्रपाठकांत प्रवर्ग्य व त्यासंबंधीं ब्राह्मण आलीं आहेत. प्रवर्ग्य हा एक प्रकारचा यज्ञच आहे. ६ सहाव्या प्रपाठकांत और्ध्वदेहिक कर्मापैकीं प्रेतदहनाचे मंत्र सांगून पितृमेधाचे मंत्र सांगितले आहेत. येथें कर्मकांड संपलें. पुढें ७–९ प्रपाठकांत तैत्तिरीय उपनिषद् आहे. ह्याविषयीं थोडीशी माहिती पुढें दिली आहे. १० प्रपाठकांत ' महानारायण ' उपनिषद् आलें आहे. कृष्णयजुर्वेदी ब्राह्मणांच्या आन्हिक कर्मांपैकीं संध्या, वैश्वदेव, त्रिसुपर्ण इत्यादि अनेक कर्मांतील मंत्र ह्या प्रपाठकांत आले आहेत.

काठकें आठ आहेत, असें वर सांगितलेंच आहे. ब्राह्मणाच्या तिसऱ्या कांडांतील १०–११–१२ प्रपाठकांत आणि आरण्यकाच्या १–२ प्रपाठकांत ( प्रश्नांत ) तीं काठकें आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—सावित्र ( ब्रा. कां. ३, प्र. १० ), नाचिकेत ( ब्रा. कां. ३ प्र. ११ चातुर्होत्र ( ब्रा. कां. ३, प्र. १२ अ. ५ ), वैश्वसृक् ( ब्रा. कां. ३, प्र. १२ अ. ६–९ ), दिवःश्येनयोपमा ( ब्रा. कां. ३, प्र. १२, अ. १–२ ), आपाद्येष्टी ( ब्रा. कां. ३, प्र. १२, अ. ३–४ ), आरुण ( आ. प्र. १ ), आणि स्वाध्याय ( आ. प्र. २ ) अशीं हीं आठ काठककांडें आहेत. यांत अग्निचयनाचा विशेषतः विचार केला आहे. हीं कठ शाखेंतून घेतलीं असावींत म्हणून त्यास काठक म्हणतात.

ऋग्वेदांत आलेले सर्व देव या वेदांत येतात. परंतु विशेषतः अग्नि, प्रजापति, ब्रह्मा, बृहस्पति, सूर्य, वायु, चन्द्रमा, इन्द्र, यम, वरुण, सोम, वैश्रवण, वसु, रुद्र, आदित्य इत्यादि देवांच्या संबन्धीं यजन कर्मे बरींच आहेत. अग्निस्थापना करण्याचे वेळीं प्रत्येक वर्णाचे मनुष्यानें आपापल्या दैवताचें व्रत आचारण करून अग्नीचे आधान करावें असें सांगितलें आहे. ( तै ब्रा. १.१.४ ). असें केलें असतां, तो मनुष्य धनवान् होतो. ब्राह्मणांची 'आदित्य' देवता आहे. राजाची वरुण देवता, राजन्यांची इंद्रदेवता, याप्रमाणें निरनिराळ्या वर्णाच्या निरनिराळ्या देवता सांगितल्या आहेत. असें सांगण्याचें कारण असें दिसतें, कीं, त्यावेळीं देवगणांत सुद्धां वर्णभेद आहे, अशी समजूत झाली होती. अग्नि, प्रजापति, बृहस्पति, आदित्य हे ब्राह्मणदेव आहेत, असें मानिलें जात असे. इंद्र, वरुण, सोम, यम आणि वैश्रवण ( कुबेर ) हे क्षत्रिय असावेत. पुष्कळ ठिकाणीं ह्या देवांना 'राजा' हें विशेषण लावलेलें आढळतें.

तैत्तिरीय संहिता आणि ब्राह्मण हीं ज्या कालीं दुसऱ्या वेदापासून निराळीं झालीं, त्या कालाला अनुसरून व त्या वेळीं सोपें व सोईस्कर होईल अशा रीतीनेंच त्यांतील विषयांचा अनुक्रम ठरविला असावा. यामुळें कांडाकांडास अनुसरून कोणताहि विषय पूर्णपणें सांगतां येणार नाहीं. दोन चार प्रधान कर्मांची सविस्तर माहिती येथें देणें स्थलसंकोचामुळें अशक्य आहे. तथापि ह्या वेदांत किती विषय आले

आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांचीं नांवेंहि दिलीं आहेत. कालपरत्वें सद्यःपरिस्थिति इतकी बदलली आहे कीं त्या नांवांवरून किंवा त्याविषयीं थोडीबहुत माहिती दिली तरी याज्ञिक कर्मांची नीटशी कल्पना सद्यःकालीन आपल्या गृहस्थ ब्राह्मण लोकांस कितीशी येईल याबद्दल शंका वाटते.

तैत्तिरीय ब्राह्मण, तैत्तिरीय संहितेच्या वेळीच ग्रथित झालें असावें. त्याची भाषा संहितेच्या भाषेसारखी आहे,आणि तें सर्व स्वरित आहे. या दोन कारणांवरून तैत्तिरीय ब्राह्मण सर्व ब्राह्मणांहून प्राचीन ग्रन्थ असावा.

आरण्यकांत तैत्तिरीय उपनिषद आहे ( प्र. ७--९ ) यांत शिक्षा, ब्रह्मविद्या, आणि भृगु ह्या तीन वल्ली आहेत. महानारायण हें उपनिषद दहाव्या प्रपाठकांत आहे. सहवै (प्र.२) आणि चित्ति ( प्र. ३ ) हे दोन प्रपाठक उपनिषदेंच आहेत असें समजतात.

तैत्तिरीय आरण्यकाचे सातव्या प्रपाठकांत शिक्षावल्ली उपनिषद आहे. या उपनिषदाला सांहिती उपनिषद म्हणतात. कारण त्यांत संहिता आली आहे. ह्या प्रपाठकाचे बारा अनुवाक आहेत. पहिल्या अनुवाकांत **शंनोमित्र**, इत्यादि प्रार्थना आहे. दुसऱ्या अनुवाकांत, वर्ण, उदात्तादिस्वर, ह्रस्वदीर्घादि मात्रा, बल म्हणजे प्रयत्न ( स्पृष्ट, ईषत्स्पृष्ट इत्यादि जे व्यंजनाचे भेद आहेत ते ) साम (वर्ण किंवा शब्द उच्चारण्यास बरोबर लागणारा वेळ, )आणि संतान(संहिता,

वाक्यें ) यांचा अभ्यास करण्यास सांगितलें आहे. तिसऱ्या अनुवाकांत संहितेचें उपनिषत् सांगितलें आहे. अधिलोक, अधिज्योतिष, अधिविद्य, अधिप्रज, आणि अध्यात्म हे पांच ज्ञानाचे विषय आहेत, ते समजून घ्यावे. चवथ्या अनुवाकांत मेधा आणि श्री प्राप्त करून घेण्याची इच्छा करणाऱ्यांनीं म्हणावयाचे मंत्र सांगितले आहेत. पांचव्या आणि सहाव्या अनुवाकांत ब्रह्मोपासनेचे मंत्र आहेत. व्याहृती वगैरे सांगून ब्रह्माचे मनागोचर गुण वर्णिले आहेत. सातव्या अनुवाकांत पृथ्वी इत्यादि महाभूतांच्या स्वरूपानें ब्रह्माचें वर्णन आहे. आठव्या अनुवाकांत ॐ शब्दानें अभिधेयब्रह्माची उपासना सांगितली आहे. नवव्या अनुवाकांत ब्रह्मोपासनेसह—वर्तमान श्रौतस्मार्त नित्य कर्मांची उपासना करावी असें सांगितलें आहे. दहाव्यांत ब्रह्मयज्ञाचे वेळीं म्हणावयाचा मंत्र सांगितला आहे. वेदांचा पाठ न झाल्यास '**अहंवृक्षस्यरेरिवा**' इत्यादि मंत्र तरी म्हणावा, असें निर्दिष्ट केलें आहे. अकराव्या अनुवाकांत गुरूनीं वेदाचें अध्यापन केल्यावर शिष्यास जगांत कसें वागावें हा उपदेश केला आहे. ह्या उपदेशांत सांगितलेले आचरणाचे नियम सध्यांच्या कोणत्याहि समाजस्थितींतील लोकांस अग्राह्य होणार नाहींत. हेंच उपास्य आहे असें शेवटीं सांगितलें आहे. बाराव्या अनुवाकांत कृतज्ञतादर्शक शांतीचे मंत्र आहेत.

आठव्या आणि नवव्या प्रपाठकांत अनुक्रमें ब्रह्मवल्ली व भृगुवल्ली हीं दोन उपनिषदें आहेत. यांस वारुणी उप-

निषद् म्हणतात. कारण त्यांचा संप्रदायप्रवर्तक वरुण आहे. दोहोंमध्येंहि ब्रह्मविद्येचें प्रतिपादन आहे. ह्या उपनिषद्द्वयांची महती फार आहे. सर्व उपनिषदांचें हें उपनिषद्द्वय शिरोमणीच मानिलें आहे. आठव्या अध्यायांत नऊ अनुवाक आहेत. पहिल्या अनुवाकांत गुरुशिष्यांची प्रार्थना आणि शांति आहेत. दुसऱ्या अनुवाकांत '**ब्रह्मविदाप्नोतिपरं**' हें जें सर्व उपनिषदांचें तात्पर्य तें पहिल्याप्रथमच सांगितलें आहे. ब्रह्म जाणणारास परब्रह्म मिळतें. हें सांगून '**सत्यं-ज्ञानमनन्तं ब्रह्म**' हें ब्रह्माचें लक्षण दिलें आहे नंतर ह्या ब्रह्मापासून आकाश–वायु–अग्नि–पाणी–पृथ्वी–अन्न–रेत–अन्न–अन्नापासून अन्नरसमय पुरुष अशा रीतीनें उत्पत्ति-क्रम सांगितला आहे, आणि ह्या पुरुषाची प्रशंसा केली आहे. अन्नापासून सर्व प्रजा उत्पन्न होतात, जगतात इत्यादि; अन्न हें ज्येष्ठ आहे, ह्या अन्नरूपी ब्रह्माची उपासना करतात. अन्नरसमय पुरुषाहून (आत्म्याहून) निराळा प्राणमय असा अन्तरात्मा आहे. या प्राणमयाची प्रशंसा केली आहे. ३ (तिसऱ्या अनुवाकांत.) प्राण हा देव, मनुष्य आणि सर्व भूतें यांत असतो. तो त्यांचें आयुष्यच आहे. प्राण हेंच ब्रह्म होय. प्राणमयाची स्तुति केली आहे. त्या प्राणमय आत्म्याहून मनोमय शारीर आत्मा निराळाच आहे. ४ (चवथ्या अनुवाकांत) ब्रह्मानन्दाचें वर्णन वाणीला करतां येत नाहीं. मनाला त्याची कल्पना होत नाहीं. हीं दोन्ही ब्रह्मापासून परत फिरतात (**यतो वाचो निवर्तन्ते**....)

असा ब्रह्मानन्द ज्याला ठाऊक आहे त्याला कधींहि भीति वाटत नाहीं. ह्या मनोमय आत्म्याहून निराळा असा विज्ञानमय आत्मा आहे. त्याची प्रशंसा आहे. ५ ( पाचव्या अनुवाकांत ) विज्ञानाच्या योगानें यज्ञादि श्रौत आणि व्यावहारिक कर्मे होतात. त्या विज्ञानाची उपासना, तें ब्रह्म ज्येष्ठ आहे. असें समजून सर्व देव करतात. ह्या विज्ञानमयाहून निराळा असा आनन्दमय अंतरात्मा आहे. त्याची प्रशंसा केली आहे. अन्नमय इत्यादि जे हे पांच आत्मकोश वर्णिले आहेत, त्याचीं स्वरूपें श्येन पक्ष्याच्या- रूपकानें वर्णिलीं आहेत. उदाहरणार्थ ह्या आनन्दमय आत्म्याचें प्रिय हें शिर आहे. मोद हा उजवें पंख, प्रमोद डावें पंख, आनन्द हें शरीर ( आत्मा ) आणि ब्रह्म हेंच पुच्छ व प्रतिष्ठा अशा प्रकारानें त्यांची प्रशंसा ( श्लोक ) केलेली असते. ६ ( सहाव्या अनुवाकांत ) पूर्वीच्या अनुवा- कांत अन्नमय आत्म्यापासून ( पुरुषापासून ) आनन्दमय आत्म्यापर्यंत एकाहून एक अधिक अशी व्यवस्था सांगितली आहे, आणि सर्वांची प्रतिष्ठा ब्रह्म आहे, असें दाखविलें आहे. असें हें ब्रह्म नाहींच असें म्हणणारा मनुष्य असत् आहे असें समजावें. असें ब्रह्म आहे, असें म्हणणारा सत् म्हणजे ज्ञानवान् आहे, असें समजावें. याप्रमाणें ब्रह्माविषयीं गुरूनीं उपदेश केल्यावर शिष्यास शंका येऊन विद्वान् व अविद्वान् मनुष्य मेल्यावर ब्रह्माकडे जाईल किंवा नाहीं व ब्रह्मानन्द त्यास मिळेल किंवा कसे! असे प्रश्न त्यानें केले आहेत.

यांचें उत्तर तेथें दिलें आहे. पुढें ब्रह्माला आपण पुष्कळ व्हावें आणि प्रजा उत्पन्न करावी, ( **बहुस्यां प्रजायेय इत्यादि** ) अशी इच्छा झाली. त्याप्रमाणें त्यानें तप करून सर्व सृष्टि निर्माण केली आणि त्यांत आपण प्रवेश केला. प्रवेश केल्यावर सत्य व अनृत, मूर्त व अमूर्त इत्यादि रूपें त्यानें धारण केलीं हें जें सर्व जगत् आहे, तें वस्तुतः सत्य म्हणजे ब्रह्मच आहे. ७ ( सातव्या अनुवाकांत ), पूर्वी हें सर्व जगत् अव्यक्त होतें, म्हणजे नामरूपांनीं समजण्यासारखें नव्हतें. ब्रह्मानें स्वतः आपल्यासच तें जगत् करून घेऊन तें व्यक्त केलें. तें ब्रह्म सुकृत आहे, रस आहे. हा ब्रह्मरूपी रस ज्याला मिळतो तोच आनन्दी होय. हें ब्रह्म नसतें तर जगांतील सर्व चराचर वस्तूंत क्रियादि करण्याचें जें सामर्थ्य आहे, किंवा जी प्राण-शक्ति आहे, त्या त्यांत कशा आल्या असत्या? अशा प्रकारचें ब्रह्म ज्याला समजलें आहे, त्याला संसाराची भीति नाहीं. अज्ञानांना संसाराची भीति असते. ८ ( आठव्या अनुवाकांत ), वायु, सूर्य, अग्नि इन्द्र मृत्यु इत्यादि सर्व देवता आपापलीं कामें ह्याच्या भीतीनेंच बरोबर करतात. ह्याप्रमाणें ब्रह्मानं-दाची मीमांसा ह्या उपनिषदांत केली आहे. हा आनंद सर्व देवांच्या आनंदाहून शतपटीनें मोठा आहे. ही गोष्ट येथें निर्दिष्ट केली आहे. ब्रह्मनन्दाचा अनुभव प्राप्त झालेला मनुष्य ह्या लोकांतून गेल्यावर अन्नमय, प्राणमय इत्यादि आत्म्यांतून जाऊन आनन्दमय आत्म्यांत उपसंक्रमण करतो. ९ ( नवव्या अनुवाकांत ) **यतो वाचो निवर्तन्ते** इत्यादि

सांगून ब्रह्मानन्दी मनुष्यास बरें वाईट केल्याबद्दल अनुताप होत नाहीं, असें सांगितलें आहे. या उपनिषदांस ब्रह्मविद्या असेंहि म्हणतात.

भृगुवल्ली नवव्या प्रपाठकांत आहे. त्याचे दहा अनुवाक आहेत. संहिती उपनिषदांत बहिरंगसाधनें सांगितलीं आहेत. ह्या उपनिषदांत अंतरंगसाधनांचा विचार केला आहे. मनांत सतत ब्रह्मविचार चालला, तर अन्नमयादि कोशांत हळूंहळूं आणि क्रमानें कसा प्रवेश होतो आणि शेवटीं ब्रह्मस्वरूप कसें कळतें, हें स्पष्ट रीतीनें येथें दाखविलें आहे. वरुणाचा मुलगा भृगुऋषी आपल्या बापाकडे जाऊन म्हणाला, ' भगवन् मला ब्रह्म काय आहे हें शिकवा. " ब्रह्मविद्येचीं द्वारें पहिल्यांदा समजावींत म्हणूनच वरुणांनीं आपल्या मुलास अन्न, प्राण, चक्षु, श्रोत्र, मन, आणि वाणी हींच ब्रह्म आहेत असें सांगून हीं सर्व भूतें ज्यापासून उत्पन्न झालीं, ज्याच्यामुळें जगतात, नाश पावतात आणि ज्यामध्यें तीं भूतें शेवटीं प्रवेश करतात, असें जें कांहीं आहे, तेंच ब्रह्म होय, असें समजून घेण्याची इच्छा कर, असें त्यांनीं भृगूस सांगितलें. भृगूनें तप केलें, तप केल्यावर अन्न हेंच ब्रह्म आहे असें त्यास वाटलें, कारण अन्नापासून सर्व कांहीं उत्पन्न होतें, वांचतें आणि नष्ट होतें. पुढें बापाच्या आज्ञेवरून भृगूनें तप केलें ( विचार करूं लागला ) प्राण, मन आणि विज्ञान हेंच ब्रह्म आहे अशी अनुक्रमानें त्याची खात्री होत गेली. शेवटीं विज्ञान हें सुद्धां ब्रह्म नाहीं असें

वाटून आनन्द हेंच ब्रह्म, असें त्यास विचारान्तीं प्रतीत झालें. हीच भृगूला वरुणानीं दिलेली विद्या, हिची समाप्ति परब्रह्मांत होते. (**सैषा भार्गवी वारुणी विद्या ॥ परमे व्योमन् प्रतिष्ठिता ॥** ). ब्रह्मज्ञान झालेल्या मनुष्यास ब्रह्मप्रतिष्ठा प्राप्त होते. पुढें अन्नादिकांचें महत्त्व वर्णन करून चित्ताची एकाग्रता हें तप परम पुरुषार्थाचें साधक आहे, असें सांगितलें आहे. ब्रह्मज्ञानी ह्या जगांत जोंपर्यंत असतो तोंपर्यंत त्याला जीवन्मुक्त ह्मणतात, ब्रह्मानन्दांत तल्लीन होऊन ह्या जगांत कामान्नी, आणि कामरूपी होऊन अन्न, आणि अन्नाद मीच आहें असें सामगान करीत तो हिंडत असतो.

कृष्ण यजुर्वेदांतील कठ आणि मैत्रायणीय ( कलाप ) शाखा आज मित्तीस उत्तर हिंदुस्थानांत चालू आहेत. असें वर सांगितलें आहे. त्या शाखांचें ब्राह्मण निराळें नाहीं त्यांतील गद्यात्मक ग्रन्थ हाच त्याचे ब्राह्मण होय. मैत्रायणीयाचे चौथ्या कांडांत त्यांचें ब्राह्मण आहे. त्याचीं चारच कांडें असून त्यांत ५४ प्रपाठक आहेत. कठ संहिता बहुतेक मैत्रायणीयासारखी आहे. तैत्तिरीय ब्राह्मणाचे तिसरे कांडांतील शेवटचे तीन प्रश्न आणि आरण्यकाचीं पहिलीं दोन प्रपाठकें हीं कठ शाखेंतील आहेत. म्हणून त्यास काठक असें म्हणतात, असें वर सांगितलें आहे. काठकोपनिषद्, मैत्रायणीयोपानिषद् आणि श्वेताश्वेतरोपनिषद् हे तीन ग्रंथ या शाखांचे आहेत. काठकोपानिषदांत

आलेली नाचिकेताची गोष्ट तै. ब्राह्मणांत आली आहे. (ब्रा. ३ प्र. ११ अ. ८) दोन्हीं गोष्टींच्या तात्पर्यांत फरक नाहीं. ब्राह्मणांत आलेली आख्यायिका अशी आहे. वाजश्रवस नांवाच्या मुनीनें (गौतमपुत्र उद्दालक) एकदां सर्वदक्षिणाक असा याग केला. यांत यजमानाजवळच्या सर्व संपत्तीची दक्षिणा द्यावयाची असते. याप्रमाणें वाजश्रवसानें आपलें सर्वस्व देऊन टाकल्यावर ऋत्विज तें घेऊन जात असतां वाजश्रवसाचा नचिकेता नांवाचा एक मुलगा होता त्याची या दानावर फार श्रद्धा बसली आणि आपणहि आपल्या बापाचें धनच आहोंत, आपल्यास बापानें कोणाला तरी दिलें, तर त्याच्या कर्माचें साफल्य होईल असें नाचिकेत्यास वाटलें. म्हणून तो बापाकडे गेला आणि म्हणाला "बाबा! तुम्हीं मला कोणाप्रत देणार! बापानें उत्तर न दिल्यामुळें नाचिकेत्यानें हाच प्रश्न पुनः पुनः तीनदां विचारला. वाजश्रवसाला राग आला, आणि तुला मीं यमाला देऊन टाकतों, असें नचिकेत्यास म्हणाला. या वेळीं आकाशवाणी होऊन ती नचिकेत्यास म्हणाली, "हे गौतमकुमारा तुझ्या बापानें तुला यमास दिलें आहे; तूं आतां त्याच्या घरीं जा, असें तुझा बाप सांगतो आहे. मी तुला सांगतें त्याप्रमाणें तूं आतां कर. यम बाहेर प्रवासास गेला असेल अशा वेळीं तूं त्याच्या घरीं जा. कांहीं एक न खातांपितां तूं तेथें तीन रात्रीं रहा. यम परत घरीं आल्यावर तो तुला प्रश्न करील त्यांचीं उत्तरें मीं सांगतें

तशीं दे." आकाशवाणीनें सांगितल्याप्रमाणें नचिकेता यमाच्या घरीं गेला. यम बाहेर गेला होता. नचिकेता कांहीं एक न खातां, तीन रात्र तेथें राहिला. यम घरीं आल्यावर त्यानें नचिकेत्यास प्रश्न केले. यमः—किती दिवस ( रात्री ) तूं येथें राहत आहेस. ? नचिकेताः-तीन रात्रीं. यमः—पहिल्या रात्रीं तूं काय खाल्लेंस. ? नचिकेता तुझी प्रजा. यमः—दुसऱ्या रात्रीं काय खाल्लेस ? नचिकेताः-तुझे पशू. यमः—तिसऱ्या रात्रीं काय खाल्लेंस ? नचिकेताः—तुझीं साधु कृत्यें. याप्रमाणें नचिकेत्यांची उत्तरें ऐकून यम संतुष्ट झाला आणि 'वर माग' असें तो नचिकेत्यास म्हणाला. **न मरतां असा माझा जिवंत बाप** मला मिळावा असा वर नचिकेत्यानें मागितला. हा वर देऊन पुनः 'दुसरा वर माग' असें यमानें सांगितल्यावरून त्यानें माझ्या इष्टापूर्तांचा कधींहि क्षय होऊं नये असा वर मागितला. हा वर दिल्यावर तिसरा वर माग असें यम नचिकेत्यास म्हणाला. पुनर्मृत्यु येऊं नये, मृत्यूचा पराजय करून टाकावा, मोक्षप्राप्ति व्हावी असा तिसरा वर नचिकेत्यानें मागितला. तोहि यमानें त्यास दिला. नचिकेत अग्नीचें चयन व त्याची उपासना हींच त्यांचीं साधनें होत.

यजुर्वेद ( तैत्तिरीयशाखा ) हा एक पक्षी आहे. शीक्षावल्ली, ब्रह्मवल्ली व भृगुवल्ली हीं त्या पक्ष्याचीं तीन शिरें आहेत. प्रधान नऊ* कर्मांचे विधि हा त्याचा आत्मा.

*टीपः—पुरोडाशः एष्टिक याजमानं, तद्विधिः दार्श्यब्राम्हणं, होतारः, तद्विधिः पुरोडाश विधिः दार्श्य हौत्रम. पितृमेधही ती नऊ कर्मे होत.

प्रवर्ग्य व त्यांचा विधि हे त्या पक्ष्याचे खांदे होत. आठ काठक प्रश्न हे त्याचें पुच्छ होय आणि बाकीं राहिलेलीं तीस कर्में हीं त्या पक्ष्याचा पिसारा आहेत. अशाच रीतीनें यजुर्वेद ह्या वृक्ष आहे असें रूपक केलें आहे. उपनिषदाचें रहस्य हें ह्या वृक्षाचें मूळ होय. ऋचा ह्या त्यांचीं पानें; यजु हीं त्यांची फुलें व प्रवाल, आणि यज्ञकर्म हें त्या वृक्षाचें फल होय. विप्ररूपी भ्रमरानें सेवित असा वृक्ष नेहमीं असतो.

---

## शुक्लयजुर्वेद.

कृष्णयजुर्वेदाची व्यवस्था संकीर्ण आहे. मंत्र व ब्राह्मण संहितेंतच आलीं आहेत आणि शिवाय ब्राह्मण निराळें आहे. ही गोष्ट वर सांगितली आहे. याज्ञिक कर्में जसजशीं वाढत गेलीं व त्यांचा विस्तार जसजसा फैलावला तसतशीं तीं कर्में या वेदांत अन्तर्भूत करण्यांत आल्यामुळें कृष्णयजुर्वेदाचें असें हें स्वरूप झालें. ह्या स्वरूपांत बदल करून मूळ व प्रधान याज्ञिक कर्मांचे मंत्र व ब्राह्मण अगदीं निरनिराळीं करावींत असें याज्ञवल्क्यास वाटल्यावर त्यानें शुक्ल यजुर्वेदाची नवी व्यवस्था केली. या व्यवस्थेनें संहितेंत केवळ मंत्रच ( ऋचा व यजु ) आले आहेत, आणि ब्राह्मण हा ग्रन्थ अगदीं वेगळा केला आहे. तथापि येवढी मात्र

गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं दर्शपूर्णमास इष्टि, अग्नि-ष्टोम अग्निचयन हीं जीं यजनकर्मांतील मूळ कर्मे, त्यांचे मंत्र व ब्राह्मण कृष्ण यजुर्वेदांत संकीर्ण केलेलीं नाहींत. ह्या कर्मांचे मंत्र व ब्राह्मण अगदीं पृथक् पृथक् आहेत. दर्शपूर्णमासेष्टि ह्या सर्व यजनकर्मांची प्रकृति आहे. असें मानिलें आहे. पुढें नवींनवीं जीं कर्मानुष्ठानें प्रचारांत आलीं तीं सर्व ह्या प्रकृतिकर्मांच्या विकृति होत. मूळ व प्रकृति कर्माविषयीं व्यवस्था कृष्ण यजुर्वेदांत पद्धतवार आहे. शुक्ल म्हणजे शुद्ध मिश्रित नव्हे असा त्या शब्दाचा अर्थ आहे. याज्ञवल्क्याच्या वाजसनेय शाखेचे पंधरा भेद आहेत. चरणव्यूहांत सतरा नांवें दिलेलीं आहेत; तीं येणेंप्रमाणें. (१) जाबाला, (२) गौधेया (बहुधेय ?), इकाण्वा, ४ माध्यंदिना, ५ शापाया. ६ तापनीय ७ कापाल ८ पौंड्रवत्सा, ९ आवटिका, १४ परमावटिका, ११ पाराशर्या १२ वैनेया, १३ वैधेय, १४ औधेया. १५, गालवा, १६ वैजेया, आणि १७ कात्यायनीया. याप्रमाणें शुक्लयजुर्वेदाच्या शाखा होत्या. त्यापैकीं माध्यंदिन आणि काण्व ह्या दोनच सध्यां चालू आहेत. दोन्ही शाखांतील मंत्रक्रम, रचना, इत्यादिक व्यवस्था एकसारखी आहे. थोडे ठिकाणीं पाठभेद आढळतो. शुक्लयजुर्वेदसंहितेस वाजसनेय संहिता म्हणतात. याज्ञवल्क्यानीं ती वाजीपासून (सूर्यापासून) घेतली म्हणून त्या संहितेस हें नांव प्राप्त झालें असें श्रीविष्णुपुराणांत सांगितलें आहे. (अं. ३ अ. ५)

**वाजसनेय संहितेचे** ४० अध्याय आहेत, आणि त्यांत १९७६ कंडिका आहेत. तैत्तिरीय शाखेंत आलेलीं कर्मे व तत्संबन्धी मंत्र हे ह्या संहितेच्या पहिल्या अठरा (१८) अध्यायांत आलीं आहेत.*

२२–२५ अध्यायांत अश्वमेधमंत्र सांगितले आहेत. २६–३९ अध्यायांत तैत्तिरीय ब्राह्मणांतील विषय व अवान्तर कर्मे व अनुष्ठानें सांगितलीं आहेत. २६–३५ अध्याय हे खिल आहेत, असें कात्यायनाचें मत आहे. २६–२९ अध्यायांत पूर्वी आलेल्या याज्ञिक कर्मासंबन्धानें अधिक मंत्र सांगितले आहेत. चाळीसाव्या अध्यायांत याज्ञिककर्माविषयीं एकहि मंत्र नसून तो अध्याय वेदान्तपर आहे. आत्मा व ब्रह्म, ह्या अध्यायाच्या देवता आहेत, म्हणजे यांच्याविषयीं त्यांत विचार केला आहे. ‘ईशावास्य’ या नांवाचें जें उपनिषद् आहे, तेंच हा अध्याय होय. “ईशा वास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्” असा या अध्यायाचा आरंभ आहे. म्हणून या उपनिषदाला ‘ईशावास्य’ हें नांव पडलें. मूळची ही संहिता आठरा अध्यायाचीच असावी, पुढें व्हो-

---

*टीप:--ह्या विषयांची नांवें येणंप्रमाणेः--दर्शपौर्णिमास, पितृयज्ञ, आधानमंत्र, अग्निहोत्र, होम, होममंत्र, उपस्थानमंत्र, चातुर्मास्य, आग्रयण, [illegible], गवामयनमंत्र, [ ३६० दिवस चालणारा ]. [illegible], वाजपेय, राजसूय, चरकसौत्रामणी, अग्निचयन, शतरुद्र [illegible], [illegible], या सर्वांचे मंत्र. येणंप्रमाणे मंत्र ह्या १८ अध्यायांत आले आहेत.

वेळीं श्रौतकर्मे जसजशीं विस्तृत होत गेलीं, तसतशी या मंत्रांत अधिक भर पडत गेली आणि अठराचे २२ अध्याय या संहितेंत ग्रथित करण्यांत आले, असें कांहीं आधुनिक विद्वानांचें मत आहे.

ऋग्वेद आणि कृष्णयजुर्वेद ह्यांत आलेल्या देवता शुक्लयजुर्वेदांत आल्या आहेत. त्याशिवाय आणखी अनेक देवता आहेत. देवतांच्या जोड्याहि अनेक आहेत. विद्वान्, प्राण, योगी, गृहपति, अन्तर्यामी ईश्वर, अग्न्यब्रृहस्पतय: सूर्यविद्वांसौ, प्रजासभ्यराजान: । इत्यादि अनेक देवता ह्या वेदांत अनेक ठिकाणीं येतात. या वेदांतील ऋषिसंख्याहि पुष्कळ आहे. ऋग्वेदांतील ऋषी येथें आले आहेत हें प्रामुख्यानें सांगण्याचें कारण नाहीं. कारण त्या वेदांतील ऋचा येथें यावयाच्याच, कृष्णयजुर्वेदाप्रमाणें होत्याचे मंत्र ऋग्वेदांतून घेतलेले असतात. छन्द:शास्त्रांत वर्णिलेलीं मुख्य सात वृत्तें गायित्री, जगती, त्रिष्टुभ्, अनुष्टुभ इत्यादि वृत्तें व त्यांचे अनेक प्रस्तार व पोटभेद अशीं नानाप्रका-रचीं भिन्न नांवाचीं वृत्तें या वेदांत आलीं आहेत. शुक्लयजुर्वे-दांत एक विशेष आढळून येतो. प्रत्येक मंत्राला एक ऋषि, देवता, आणि च्छन्द: हीं असून त्याला सप्तसुरांपैकीं एक सूर असतो. षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, आणि निषाद, या सप्तसुरांतील एका कोणत्या तरी सुरांत तो मंत्र म्हणावयाचा असतो ‘ईषेत्वोर्जेत्वा’ इत्यादि हा

पहिल्या अध्यायांतील पहिला मंत्र आहे. याचा प्रजापति परमेष्ठी, ऋषि आहे. सविता, देवता, स्वराड्बृहती व ब्राह्मुष्णिक्, हीं छन्दें आहेत. स्वर—मध्यम आणि ऋषभ; ह्या दोन सुरांत हा मंत्र म्हणावयाचा असतो. या वेदांत दुसरा एक विशेष दिसून येतो तो असा. दुसऱ्या वेदांचे स्वर कण्ठगत असतात किंवा ते मान हालवून दाखविले जातात ह्या वेदाचे हस्तस्वर आहेत, म्हणजे शब्दांतील उदात्त, अनुदात्त किंवा स्वरित अक्षरें, हात उजवीडावीकडे वळवून तीं दाखविलीं जातात. मंत्रांतील 'य', आणि 'ष' यांचा उच्चार अनुक्रमें ज, आणि ख असा करतात. उदाहरणार्थः— 'सहस्त्रशीर्षः पुरुषः सहस्राक्षः सहस्त्रपात्. ' हा मंत्रभाग सहस्रशीर्खा पुरुखः असा म्हणतात.'यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः' हा मंत्र 'जज्ञेन जज्ञमयजन्त' देवाः असा म्हणतात तथापि पोथींत, य, ष, अशींच अक्षरें लिहिलेलीं असतात. ज्या ठिकाणीं 'य' चा 'ज' उच्चार करावयाचा असतो त्याठिकाणीं 'यला' विशेष खूण केलेली असते.

वाजसनेय शाखेच्या ब्राह्मणास 'शतपथ ब्राह्मण' म्हणतात. काण्व व माध्यंदिन या दोन वाजसनेय शाखांचींच ब्राह्मणें उपलब्ध आहेत. दोन्हींतहि १०० अध्याय आहेत. परंतु काण्व ब्राह्मणाचे १७ भाग केलेले आहेत, आणि माध्यंदिन ब्राह्मणाचे चवदा भाग आहेत. या भागांस 'कांड' अशी संज्ञा आहे. माध्यंदिन ब्राह्मणाच्या कांडांचीं नावें व प्रत्येक कांडांतील

अध्याय आणि कंडिका अनुवाक यांची संख्या टिपेंत दिली आहे.*

याप्रमाणें शतपथ ब्राह्मणांत १४ कांडें ६८ अनुवाक १०० अध्याय आणि ७६२४ कंडिका आहेत. एक कंडिका म्हणजे साधारणतः त्यांतील एक ब्राह्मण मंत्र असें समजावें. ' ब्राह्मण ' असाहि त्यांतील एक पोटभाग आहे

पहिल्या नऊ कांडांत या संहितेंतील १८ अध्यायांत सांगितलेल्या कर्मानुष्ठानांचें ब्राह्मण आहे, ह्मणजे संहितेंत आलेल्या त्या सर्व प्रकरणांविषयीं, प्रयोग विनियोग तंत्रें वगैरे यांचें सविस्तर वर्णन व खुलासा आणि शब्दाशब्दांचें

| कांड | नांव | अ. संख्या, | अनुवाक संख्या | कंडिका. |
|---|---|---|---|---|
| १ | हविर्यजन | ९ | ७ | ८३७ |
| २ | एकपादिका | ६ | ५ | ५४९ |
| ३ | अध्वर | ९ | ७ | ८५९ |
| ४ | ग्रह | ६ | ५ | ६४८ |
| ५ | सव | ५ | ४ | ४७१ |
| ६ | उखासंभरण | ८ | ५ | ५३० |
| ७ | हस्तिघट | ५ | ४ | ३९८ |
| ८ | चिति | ७ | ४ | ४३७ |
| ९ | संचिति | ५ | ४ | ४०२ |
| १० | अग्निरहस्य | ६ | ४ | ३६९ |
| ११ | अष्टाध्यायी | ८ | ४ | ४३७ |
| १२ | मध्यम | ९ | ४ | ४५९ |
| १३ | अश्वमेध | ८ | ४ | ४३२ |
| १४ | उपनिषद् | ९ | ७ | ७९६ |
| १४ | | १०० | ६८ | ६२४ |

स्पष्टीकरण हीं त्या नऊ कांडांत केलीं आहेत. दाहाव्या कांडांत अग्नीचें रहस्य वर्णिलें आहे. आकराव्या कांडांतील आठ अध्यायांत मागील सर्व यजनप्रकरणांचें पुनरालोकन केल्यासारखें आहे. १२ आणि १३ हीं कांडें परिशिष्ट किंवा खिलकांडासारखीं आहेत. १४ वें कांड हें या ब्राह्मणांतील आरण्यक होय. यांतील शेवटच्या सहा अध्यायांत बृहदारण्यक उपनिषद् आहे. ह्या शाखेंत अग्निचयनादि कर्मासंबन्धानें शांडिल्य हाच प्रमाण मानला आहे. बाकीच्या विषयासंबन्धानें याज्ञवल्क्यच प्रमाण आहे.

शतपथ ब्राह्मणांत अर्हत्, श्रमण, प्रतिबुद्ध अशीं नांवें येतात. गौतमाचेंहि नांव वारंवार येतें. गौतम कुळांत शाक्य मुनींचें जन्म झालें, अशी परंपरा चालत आली आहे. जनकाच्या दरबारांत धर्मासंबंधीं वादविवाद होत असत. असें येथें सांगितलें आहे. इत्यादि गोष्टींवरून बुद्ध धर्माच्या विचारांचें व त्याच्या तत्त्वाचें बीज अल्परूपांत तरी त्यावेळीं प्रगट झालें असावें, असें दिसतें. सांख्यतत्त्वाचे प्रतिपादनास याच काळीं आरंभ झाला असावा. त्या मताचा कट्टा अभिमानी आसुरि होता. त्याचें नांव या ब्राह्मणांत आलें आहे. जन्मेजय राजाचें नांव या ग्रन्थांत आलें आहे. परंतु पांडवासंबन्धी उल्लेख कोठेंहि नाहीं. अर्जुन हें नांव आलें आहे. परंतु तें इंद्राचें विशेषण आहे. महाभारतांतील अर्जुन हा इंद्राचाच अंश होता. ह्मणून इंद्राचें हें नांव त्याला दिलें असावें. पुरूरवा आणि उर्वशी, दुष्यन्त त्याचा

मुलगा भरत, व शकुंतला, यांच्या गोष्टी शतपथ ब्राह्मणांत आल्या आहेत. पुरूरवाची गोष्ट विस्तृत रीतीनें सांगितली आहे. मनु, मत्स्य व मनूची नौका ही गोष्टही या ब्राह्मणांत सांगितली आहे. एकदां एक मासा मनूकडे आला, आणि माझें पोषण कर असें तो मनूला म्हणाला. मनूनें त्याचें पोषण केलें, तो मासा मोठा होतां होतां विश्वायेवढा झाला. त्याच्या सांगण्यावरून मनूनें एक नौका तयार केली. ही त्यानें मत्स्यशृंगास बांधून ठेविली. प्रलय झाला त्यावेळीं मनु या नौकेंत बसून राहिला. नंतर त्यापासून पुढें सर्व सृष्टि उत्पन्न झाली. ह्या गोष्टीचें वर्णन मत्स्यपुराणाचे आरंभीच फार विस्तारानें केलें आहे.

बृहदारण्यक हें उपनिषद् सर्व उपनिषदाहून मोठें आहे आणि त्यांत आलेल्या विषयावरून त्याची महती, सर्वांहून अधिक मानली आहे. याज्ञवल्क्य, जनक आणि त्यावेळचे नामांकित विद्वान ब्राह्मण याज्ञवल्क्याच्या दोन स्त्रिया ह्या सर्वांचा संवाद फार उत्कृष्ट आहे. तत्त्वशास्त्राचे विचारांत त्यावेळी पुष्कळ प्रगति झाली होती, असें त्यावरून दिसतें. सर्व सृष्टि एका तत्त्वापासून विकास पावली आहे ही बुद्धि दृढ झालेली होती. 'ईशावास्य' हें एक दुसरें उपनिषद् वाजसनेय संहितेंत शेवटीं आहे असें वर सांगितलेंच आहे. हें उपनिषद् सर्वांत लहान आहे. यांत १७ च मंत्र आहेत. आत्मा आणि ब्रह्म यांचा विचार त्यांत केला आहे. आत्मज्ञानी आणि अनात्मज्ञानी यांच्यांतील भेद यांत दाखविला आहे. वेदांताचें सारच हें उपनिषद् आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

# सामवेद.

उद्गातृ ऋत्विजांचा सामवेद आहे. सोमयागांत साम म्हणण्याचें काम म्हणजे गाण्याचें काम उद्गात्याचें असतें. हीं सामें ( गाण्याचे मंत्र ) बहुतेक सर्व ऋग्वेदाच्या आठव्या आणि विशेषतः नवव्या मंडलांतून घेतलेलीं आहेत. आठव्या मंडलांत प्रगाथा आहेत आणि नववें मंडल सर्वस्वी पवमान सोमविषयक असल्यामुळें त्या मंडलांतून सामवेदांत ऋचा घेणें हें उचितच आहे. सामवेदांत एकंदर मंत्र ( ऋचा ), १५४९ आहेत. ह्या ऋचांपैकीं पंचाहत्तर कायत्या ऋषींनीं नवीन केल्या आहेत. बाकीच्या सर्व ऋग्वेदांतून घेतल्या आहेत. विशिष्ट कर्मांस जीं सामें योजिलीं असतात, त्यांचा संग्रह त्या त्या कर्माप्रमाणें निरनिराळा करून निराळ्या दशतींत किंवा प्रपाठकांत तीं सामें ग्रथित केलीं आहेत. यामुळें ऋग्वेदांतील ऋचांचा अनुक्रम सामवेदांत असतोच, असें होत नाहीं.

चरणव्यूहांत सामवेदाच्या हजारों शाखा किंवा भेद होते असें लिहिलें आहे. स्वरांचे प्रस्तार नानाविध होत असल्याकारणानें एकच साम गाण्याच्या निरनिराळ्या रागरागिणींत म्हणतां येईल. या कारणास्तव सामवेदाचे हजारों भेद होण्याचा संभव आहे. हे बहुतेक सर्व भेद इन्द्रानें नष्ट करून टाकले असें त्या ग्रन्थांत लिहिलें आहे. आसुरायणीय, सुरायणीय, प्रांजलि, रुग्रैनवी ( पे? )या, प्रान्तरेवय, प्राची

( न? )योग्य, ( ज्ञा )नयोग्य, असे भेद चरणव्यूहांत सांगितले आहेत. राणायणीयाचे नऊ भेद आहेत. राणायणीय, शाठ्यान्तवेय, शाठ्यमुद्गल, खल्वल, महाखल्वल, लांगल कौथ( थू? )म, गौतम, आणि जैमिनीय, हीं त्या भेदांचीं नांवें आहेत. यापैकीं राणायणीय आणि कौथूम या दोन शाखांचेच ग्रन्थ उपलब्ध आहेत. कौथूम शाखेचें ब्राह्मण गुजराथ व उत्तरेकडील भाग यांत आहेत. राणायणी शाखेचा प्रचार दक्षिणेंत, तेलंगण व द्रविड देशांत आहे, असें म्हणतात. सध्यां सामवेदी शाखा लुप्तप्राय झालीशी दिसते. ह्या प्रान्तांत सामवेदी ब्राह्मण आढळण्यांत येत नाहींत. उपलब्ध असलेल्या दोन शाखांच्या संहितेंत फारसा फरक नाहीं.

सामवेद संहितेचे दोन भाग आहेत. त्याला अध्याय किंवा आर्चिक म्हणतात. पहिल्या अध्यायास पूर्वार्चिक आणि छन्दोग प्रकृतिऋक्, अशीं दोन नांवें आहेत. या अध्यायांत सहा प्रपाठक आहेत. प्रत्येक प्रपाठकांत दहा दशति असतात. प्रत्येक दशतींत सुमारें दहा दहा ऋचा ( साम ) असतात. सहाव्या प्रपाठकांत कांहीं पुस्तकांत नऊच दशति आहेत. परंतु अजमीरांत छापलेल्या पोथींत ह्या प्रपाठकांत चवदा दशति दिल्या आहेत. ह्यांत ५५ सामें ( ऋचा ) अधिक आहेत. ह्या ऋचा धरून पहिल्या अध्यायांत एकंदर ६४० सामसंख्या आहे. याशिवाय महानाम्न्यार्चिक या नांवाचा एक स्वतंत्र आर्चिक आहे. ह्यांत दहा साम आहेत.

" विदा मघवत् विदा गातुम् " असा या आर्चिकाचा आरंभ आहे.

दुसऱ्या अध्यायांत ( उत्तरार्चिकेंत ) नऊ प्रपाठक आहेत. प्रत्येक प्रपाठकाचे दोन भाग केलेले असतात. त्यांस प्रथमार्ध व द्वितीयार्ध प्रपाठक अशीं नांवें आहेत. सहापासून नऊ प्रपाठकांचे प्रत्येकीं तीन तीन भाग केले आहेत. त्यांस प्रथम द्वितीय आणि तृतीय अर्ध असें म्हणतात. दुसऱ्या एका छापील पुस्तकांत ह्या अध्यायाचे अकरा प्रपाठक केले आहेत आणि प्रत्येक प्रपाठकाचे दोन दोनच भाग पाडले आहेत. शाखाभेदामुळें संहितेंत असा फरक पडला आहे कीं काय, हें समजण्यास सध्यां मार्ग नाहीं. या सर्व प्रपाठकांत एकंदर ४०४ सामें आहेत. गायन या दृष्टीनें सामवेदाचे आर्चिक आणि स्तौभिक असे दोन भाग करतां येतील. आर्चिकेंत 'वेयगान' आणि ' आरण्यगान ' अशीं दोन प्रकारचीं गायनें असतात. स्तौभिकाचेही दोन भाग करतात, त्यास ' उहगान ' ' आणि उह्यगान ' अशीं नांवें आहेत. वेयगान म्हणजे ग्रामगेयगान. ह्यांतील प्रत्येक सूक्तास निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. बृहत्साम, रथंतर, वैराज, वैरूप्यसाम, रैवतसाम, दीर्घसाम, वामदेवसाम, पंचनिधान इत्यादि बरींच नांवें आहेत.

पहिल्या अध्यायांत अग्नि, पवमानसोम, अश्विनीकुमार आणि विशेषतः इन्द्र, या देवता आल्या आहेत. दुसऱ्या अध्यायांत ह्या देवता असून आणखी, सूर्य, आदित्य, उषा,

वायु, मरुत्, वरुण, त्वष्टा, अंगिरा, पूषा इन्द्राग्नी, वेन, विश्वेदेव, मित्रावरुणौ, वैश्वानर, तनूनपात्, सरस्वती, ब्रह्मणस्पति, प्रजापति, इत्यादि देवता आल्या आहेत. या वेदांतील मंत्रद्रष्टे ऋषी ऋग्वेदांतील ८ व ९ मंडलांतीलच असावयाचे. भरद्वाज, मेधातिथि, उशन, वत्स, वामदेव, मधुच्छन्द, शुनःशेप, वसिष्ठ, कण्व, विश्वामित्र, कश्यप (असित, देवल )सौभरि, वसूयव, आत्रेय, गोपवन इत्यादि अनेक ऋषींचीं नांवें आलीं आहेत. ह्या वेदाचे आर्षेय ब्राह्मणांत– ऋषींची नामावळी दिली आहे.

गायित्री, बृहती, त्रिष्टुभ्, जगती, अनुष्टुभ् , पंक्ति, उष्णिक् , ककुप् हीं छंदें या वेदांत आलीं आहेत. षड्ज, ऋषभ, गांधार, इत्यादि सप्तसुरांपैकीं कोणत्यातरी एका निर्दिष्ट केलेल्या सुरांत प्रत्येक ऋचा ( साम ) म्हणावयाचें असतें. कोणत्या सुरांत कोणती ऋचा म्हणावयाची, हें दशतीच्या किंवा प्रपाठकाच्या भागांत आरंभीं सांगितलें असतें. सामगायनाचे ३६ प्रकार आहेत. प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार, उप-द्रव, निधान, हिंकार, प्रणव, अशांति, स्तोभसाम, आदिमध्य निधान, पदविभाग, ऋग्व्यूह इत्यादि त्यांचीं नांवें ऐकण्यांत येतात. अग्नीचे सूक्तांस निधान म्हणतात, इंद्राचे सूक्तास प्रस्तुत, आणि प्रजापतीचे सूक्तांस स्वर अशीं नांवें आहेत.

‘ सामवेदाचीं ब्राह्मणें ’ या नांवानें प्रसिद्ध अशी अनेक ब्राह्मणें आहेत. त्यांपैकीं आठांचीं नांवें येणेंप्रमाणें. १ पंचविंश किंवा ताण्ड्य, २ षड्विंश, ३ तलवकार किंवा

जैमिनीय, ४ छान्दोग्य, ५ सामविधान, ६ संहितोपनिषद ब्राह्मण, ७ देवताध्याय, आणि ८ वंशब्राह्मण. तलवकार ब्राह्मणाचे पांच भाग किंवा कांडें आहेत. पहिल्या तीन भागांत यजनकर्मे व अनुष्ठानें यांचा विचार केला आहे. चवथ्या भागांत आरण्यकासारख्या गोष्टी असून आचार्यांच्या दोन अनुक्रमणी, प्राणाची उत्पत्ति, आणि सावित्री यांच्या संबंधी विचार निर्दिष्ट केले आहेत. यांशिवाय सुप्रसिद्ध 'केनोपनिषद्' ह्याच भागांत आहे. तलवकार ब्राह्मणाच्या पांचव्या भागास 'आर्षेय ब्राह्मण' म्हणतात. या ब्राह्मणांत मंत्रद्रष्टे ऋषींची नांववारी दिली आहे. तांड्य किंवा पंचविंश ब्राह्मण यांस प्रौढ ब्राह्मण असेंहि नांव आहे. या ग्रन्थांत २५ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत खंडें असतात. त्यांत सर्व सोमयागांचें वर्णन आहे. लहानशा इष्टीपासून अनेक वर्षे चालू राहणाऱ्या सर्व सोमयागांचें प्रतिपादन या ब्राह्मणांत केलेलें आहे. सरस्वती आणि दृषद्वती या नद्यांच्या कांठीं झालेल्या यज्ञांचीं वर्णनें येथें आलीं आहेत. १७ व्या अध्यायांत व्रात्य–यक्ष–स्तोम वर्णिला आहे. त्या यज्ञानें हीन किंवा पतित लोक पावन होतात. अब्राह्मण ब्राह्मण होतात. षड्विंश ब्राह्मण हें पंचविंश ब्राह्मणाचें परिशिष्टच आहे. त्यांत सहा अध्याय किंवा प्रपाठक आहेत. त्यांतील शेवटच्या सहाव्या अध्यायास अद्भुत ब्राह्मण म्हणतात. यांत अद्भुत शांतीचीं अनुष्ठानें सांगितलीं आहेत. देवतांच्या मूर्ति, हसूं, रडूं लागल्या किंवा भंगल्या

अशा प्रकारचीं अद्भुत कृत्यें किंवा गोष्टी घडून आल्या असतां, त्यांचे दुष्ट व अनिष्ट परिणामांचें निवारण करण्यास उपाय ह्या अद्भुत ब्राह्मणांत सांगितले आहेत. सामविधान ब्राह्मणांत कोणत्या कर्मात कोणकोणतीं सामें गावींत हें सांगितलें आहे. 'देवता अध्याय' ब्राह्मणांत सामवेदांतील प्रधान देवतांचीं नांवें दिलीं आहेत आणि प्रत्येक देवतांची सामसूक्तें कोणतीं व त्या देवतेचीं विशिष्ट छन्दें कोणतीं यांचें निरूपण आहे. वंशब्राह्मणांत सामवेदाचे आचार्यांचे वंश दिले आहेत. ' संहितोपनिषद ' या नांवाच्या ब्राह्मणांत ऐतरेय ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंचिकेंत सांगितल्याप्रमाणें, वेद कसा ह्मणावा याविषयीं नियम सांगितले आहेत.

छान्दोग्य व केन हीं उपनिषदें सामवेदीय ब्राह्मणांत आलीं आहेत, असें वर सांगितलें आहेच. हीं फार प्रसिद्ध आहेत. छान्दोग्यांत आठ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत खंडें असतात. पहिल्या दोन अध्यायांत सामांची प्रशंसा व त्यांचीच उपासना करावी असें वर्णिलें आहे. सारांश, हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार, आणि निधान हीं पांच सामें सर्व चराचर जगत् आणि त्रयी विद्या आहेत, असें निरूपण येथें केलें आहे. केवल सामोपासनेनें मोक्ष प्राप्त होत नाहीं, त्याच्या प्राप्तीसाठीं ओंकाराची उपासना केली पाहिजे. अध्ययन, यज्ञ आणि दान हीं तीन धर्मस्कंध आहेत. ब्रह्मचारी, गृहस्थ आणि वानप्रस्थ यांकडून हे धर्म पाळले जातात, त्यांस पुण्यलोक मिळतात. ब्रह्मस्थासच मोक्ष ( अमृतत्व )

प्राप्त होतो. प्रजा उत्पन्न करण्याच्या हेतूनें प्रजापतीनें ध्यान-व्रत केलें, त्याला त्रयी प्राप्त झाली. त्रयीचें ध्यान केल्यावर व्याहृती ( भूः भुवः स्वः ) दिसल्या; व्याहृतींच्या ध्यानानंतर ॐकार साक्षात्कार झाला. ॐकार हा सर्व जगताचें ( देठ ) आहे. त्याची उपासना केली असतां अमृतत्व मिळतें. तिसऱ्या अध्यायांत ब्रह्म हें सर्व विश्वांतील आदित्य आहे. ब्रह्म प्रत्ये-कांचे हृदयांत आहे. ब्रह्म कसें साधन करून ध्यावें इत्यादि गोष्टींचें निरूपण येथें केलें आहे. ब्रह्माण्डाची उत्पत्ति कशी झाली हेंहि वर्णिलें आहे. चौथ्या अध्यायांत वायु, प्राण इत्यादिकांचें वर्णन आहे. आणि मरणानन्तर जीवात्मा ब्रह्म स्वरूपाकडे कसा जातो, हें निरूपिलें आहे. पांचव्या अध्या-याचे पूर्वार्धांत पुनर्जन्म किंवा जीवात्म्याची पुनरावृत्ति, तप करणारे लोक मेल्यावर आर्चिष मार्गानें सूर्यलोकास कसे कसे जातात; इष्टापूर्त्ति वगैरे कर्मे करणारे धूममार्गानें चंद्रलो-कांत कसे जातात; पुण्य संपल्यावर कोणत्या मार्गानें ते जीव कोणत्या योनींत जन्म घेतात, इत्यादि गोष्टींचें निरूपण येथें केलें आहे. ह्या अध्यायाचे उत्तरार्धांत औपमन्यवादि पांच गृहस्थ आणि उद्दालक यांचा कैकेयाशीं संवाद आहे; व अग्निहोत्राचें फल सांगितलें आहे. साहाव्यांत सर्व सृष्ट वस्तू असत् आहेत. सत् हेंच एक खरें आहे. ह्यापासून त्याच्या इच्छेनें महाभूतें झालीं. जीवात्मा होऊन हें सत् त्यांत शिरून सर्व विकार उत्पन्न झाले आहेत. सत् हेंच आत्मा. तत्त्वमसि इत्यादि विषयांचें

प्रतिपादन केलें आहे. सातव्या अध्यायांत सनत्कुमारांनीं नारदांस उपदेश केला आहे. नामाहून वाणी चांगली, वाणीहून मन मोठें, मनाहून संकल्प, अशा रीतीनें पुढें चित्तविज्ञानादिकांच्या पायऱ्या लावून सर्वांत उत्तम भूमा आहे असें सांगितलें आहे. भूमाचें स्वरूप सांगून त्याची उपासना करावी, असा उपदेश केला आहे. आठव्या अध्यायांत ह्या लहानशा हृदयरूपी ब्रह्मपुरांत जो आत्मा आहे, त्याचें आणि परमात्मा याचें निरूपण करून ब्रह्मसाधनाचा मार्ग सांगितला आहे. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचें वर्णन केलें आहे. सुषुप्तींत विषयी आणि विषय यांतील भेद राहात नाहीं. तलवकार किंवा केन उपनिषद हें सामवेदांतील दुसरें उपनिषद आहे. हें अगदीं लहान आहे. पहिला भाग पद्यात्मक आहे, त्यांत सगुण व निर्गुण ब्रह्माचें वर्णन आहे. सगुण ब्रह्माची उपासना आपण करतों. निर्गुणब्रह्म डोळ्याला दिसत नाहीं, वाणीला सांगतां येत नाहीं. बुद्धीला त्याची कल्पना करवत नाहीं. असें त्याचें स्वरूप आहे. दुसऱ्या भागांत केवळ ब्रह्माच्या कृपेनें व त्यापासूनच वायु, अग्नि, इन्द्रादिदेवतांचें सामर्थ्य त्या त्या देवतेंत आलें आहे असें यक्ष संवादावरून दाखविलें आहे. कात्यायन आणि पारस्कर यांनीं या वेदाचीं सूत्रें केलीं आहेत. ह्यांत श्रौत आणि गृह्य विषयांचें वर्णन आहे.

---

# अथर्ववेद.

होता, अध्वर्यु, आणि उद्गाता, या यज्ञांतील तीन मुख्य ऋत्विजांचे मंत्र ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद, या वेदांत आले आहेत. यांशिवाय दुसरे कोणतेहि ग्रन्थांत ते मंत्र नाहींत. ह्या तीन वेदांचाच यजनाशीं संबन्ध असल्यामुळें त्यांस त्रयी म्हणतात. अथर्व वेदाचा यज्ञाशीं कांहीं एक संबन्ध नाहीं. तरी पण तो ब्रह्माऋत्विजाचा वेद आहे, असें म्हणतात; यज्ञांत ब्रह्माचें काम केवळ अध्यक्षाचें आहे.

अथर्ववेदाचे नऊ भाग किंवा शाखा आहेत. त्यांचीं नांवें येणंप्रमाणें:-१ पैप्पला, २ दान्ता, ३ प्रदान्ता, ४ स्तौता, ५ औता ६ ब्रह्मदायश (वश बलं!), ७ शौनकी, ८ वेददर्शी, ९ चरणविद्या (विध?). अथर्ववेदाचे पांच कल्प आहेत, नक्षत्रकल्प, विधानकल्प विधिविधानकल्प, संहिताकल्प आणि शान्तिकल्प, असे ते कल्प आहेत.

या नऊ शाखा किंवा भेदापैकीं शौनकी आणि पैप्पल (पिप्पिलादाची) ह्या दोनच शाखांचे ग्रन्थ उपलब्ध आहेत. ह्या दोन्हीं संहितेंत फरक नाहीं. शौनकी संहितेंत २० कांडें, ३४ प्रपाठक, (१९-२० कांडांत प्रपाठक नाहींत.) १११ अनुवाक, ७३१ सूक्तें आणि ५८४९ ऋचा किंवा मंत्र आहेत. कांडें ८, १४ आणि १७ व १८ यांत 'दशिका' असा एक पोटभाग केलेला असतो. या वेदांत मुख्यतः अभिचार, (जारण, मारण, उच्चाटण इत्यादिकांचे मंत्र) आणि

जन्म, विवाह, और्ध्वदेहिककर्म, अशा गृह्य संस्कारांचें प्रतिपादन केलेलें आहे. यज्ञकर्मांतील मंत्र कांहीं एक नाहींत. २० व्या कांडांत मात्र सोमयागाचे मंत्र आले आहेत, ते सर्व ऋग्वेदांत आहेत तसेच, येथें घेतलेले आहेत. यज्ञयागादि श्रौत कर्मांशीं संबन्ध जोडण्यासच जणूकाय हें कांड मागून या वेदांत अन्तर्भूत केलेलें असावें. हीं सोमसूक्तें एकंदर १३१ आहेत. सुमारें १२०० सूक्तें ऋग्वेदांतून घेतलीं आहेत. तीं मुख्यतः दहावें, पहिलें, व आठवें, या मंडलांतून घेतलीं आहेत. यजुर्वेदाप्रमाणें या वेदांतहि गद्यात्मक ग्रन्थ आहे. एकषष्ठांश असा गद्य ग्रन्थ असावा. पहिल्या तेरा कांडांतील विषय अनुक्रमानें किंवा संगतवार नाहीत. इकडे तिकडे मिसळलेले आहेत. पुढल्या पांच कांडांत विषय पद्धतशीर व सुसंगत आहेत. १४ व्या कांडात विवाहसंस्काराचे मंत्र आहेत. हे ऋग्वेदातील दहाव्या मंडलांतील घेतले आहेत. १५ व्या कांडांत 'व्रात्याची' महती व वैभव गाईलीं आहेत. व्रात्य म्हणजे साक्षात् ब्रह्मच आहे. या व्रात्यस्वरूपाची थोडीशी कल्पना यावी, म्हणून पंधराव्या कांडांतील पंधराव्या सूक्ताचा अर्थ खालीं दिला आहे. 'ह्या व्रात्याचे सात प्राण, सात अपान आणि सात व्यान आहेत. 'ऊर्ध्व' नांवाचा पहिला प्राण हा अग्नि होय; याचा प्रौढनामा दुसरा प्राण, तो आदित्य आहे. अभ्यूढ हा तिसरा प्राण, तो चंद्रमा आहे. चवथा प्राण विभू हा पावमानसोम होय. योनि नांवाचा पांचवा प्राण तो आप (पाणी) आहे. सर्व पशु हे त्याचा

सहावा प्राण, त्याचें नांव प्रिय आहे. अपरिमित नांवाचा सातवा प्राण; तो ह्या सर्व प्रजा आहेत. अशा प्रकारचें व्रात्याचें वर्णन आहे. १६ व १७ कांडें अगदींच लहान आहेत. यांत आमच्या विद्वेष्ट्यांचा नाश आणि आमचा उत्कर्ष होऊं द्या, अशा प्रार्थना आहेत. सोळाव्यांत एक लहानसें स्वप्नसूक्त आहे. जें फार चांगलें आहे. १८ व्या कांडांत और्ध्वदेहिक संस्कार व पितरें, याविषयीं मंत्र आले आहेत. हेहि ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांतले आहेत. १९ वें कांड खिल किंवा परिशिष्ट यासारखेंच आहे. २० वें कांड सोमाविषयीं आहे हें वर सांगितलेंच आहे. यांत कुंतापाध्याय आहे. तो ऋग्वेदांतील 'दानस्तुती' सारखा आहे, असें म्हणतात. त्या अध्यायाचीं दहा सूक्तें आहेत. ( १२६–१३६ ). हीं दहा सूक्तें आणि ४८ व ४९ वीं सूक्तें याशिवाय बाकीचीं सर्व सूक्तें ह्या कांडांत ऋग्वेदांतून उतरून घेतलीं आहेत. अथर्व वेदास अथर्वण वेद अथर्वांगिरस, भृग्वांगिरस आणि ब्रह्मवेद अशीं नांवें आहेत.

अथर्वण वेदाचे ब्राह्मणास 'गोपथ' ब्राह्मण म्हणतात. या ब्राह्मणाचे दोन भाग आहेत. पूर्वार्धांत पांच अध्याय आहेत आणि उत्तरार्धांत सहा अध्याय आहेत. पूर्वभागांत विशिष्ट यज्ञादिकांचें प्रतिपादन पद्धतशीर केलेलें आहे, असें नाहीं. अथर्ववेदाची प्रशंसा आणि 'ब्रह्मा' नांवाचे ऋत्विजाची महती ह्या दोन गोष्टी या भागांत मुख्यतः वर्णिल्या आहेत. उत्तरार्धांत ब्राह्मण आहे, 'वैतान' श्रौतसूत्रांत सांगितलेल्या

विषयानुक्रमाप्रमाणें या भागांत ब्राह्मण आलें आहे. ह्या ब्राह्मणाचा पुष्कळसा भाग, ऐतरेय, तैत्तिरीय, शतपथ, मैत्रायणी, आणि पंचविंश, या ब्राह्मणातून घेतला आहे. गोपथ ब्राह्मण वैतान श्रौतसूत्र झाल्यावर, ग्रथित केलें असावें; त्यांत श्रौतसूत्राचा अनुक्रम घेतला आहे. अथर्ववेदाचीं वीस कांडें आहेत, असें त्या वेदाचे प्रातिशाख्यात लिहिलें नाहीं. ह्या ब्राह्मणांत अथर्वाचीं २० कांडें आहेत, असें मानिलें आहे. ह्या ब्राह्मणांत शिवाचें नांव येतें, इत्यादि गोष्टीवरून इतर ब्राह्मणें ज्याकालीं झालीं, त्या कालानन्तर हें ब्राह्मण रचलें असावें, असा तर्क आहे.

या ब्राह्मणाचे आरंभीं ॐ कारं पृच्छामः इत्यादि असें एक ब्राह्मण आहे. त्यास प्रणवोपनिषद् म्हणतात, अथर्ववेदाचीं उपनिषदें* ह्या नांवाखालीं अनेक उपनिषदें येतात. ५२ उपनिषदें अथर्ववेदाचीं आहेत, असें कोणी म्हणतात. या बावन्नांत दुसऱ्या वेदांचीं उपनिषदें आहेत. कोणी ३७ – ३८आहेत असें मानतात. त्यापैकीं २७ सांचाच अन्तर्भाव या उपनिषदांत होतो, असें काहींचें म्हणणें आहे. मुसलमानी साम्राज्याच्या वेळीं विद्वान गृहस्थांनीं एक अल्लोपनिषद् केलें आहे.

* टीप:–मुंडक, प्रश्न, ब्रह्मविद्या, क्षुरिका, चुलिका, शिर, अथर्वशीर्ष, गर्भ, मह, ब्रह्म प्राणाग्निहोत्र मांडुक्य, नीलरुद्र, नादबिंदु, ब्रह्मबिन्दु, अमृतबिंदु, ध्यानबिंदु, तेजोबिंदु, योगशिखा, योगतत्व, आरुणेय, कंठश्रुति, पिंड, आत्मा, नृसिंहतापिनी, नारायण, सर्व, हंस, परमहंस, गारुड, भस्म, रामतापिनी, कैवल, जाबाल, आणि आश्रम, याशिवाय गणेशतापिनी, गणपति अथर्वशीर्ष इत्यादि आहेत,

अथर्ववेदांत येणारीं उपनिषदें बहुतेक सर्व वेदकालानन्तर प्रसंगानुसार रचलेलीं असावीत, असें दिसतें. इतर वेदांतील उपनिषदें त्या त्या वेदांच्या ब्राह्मणांत किंवा आरण्यकांत आलेलीं आहेत. त्यांचीं नांवें हीं वेदावरून किंवा मंत्रावरून पडलीं आहेत. त्यांतील आत्मतत्त्वज्ञानाविषयीं विचारांची सरणि ही विशिष्ट प्रकारची असते. अथर्ववेदाच्या उपनिषदांत दोन तीन उपनिषदांशिवाय, कोठेंहि वर सांगितलेलें उपनिषदाचें स्वरूप दिसून येत नाहीं. सामान्यतः अथर्वण वेदांच्या उपनिषदांचे चार भाग करतां येतील. ( १ ) दुसऱ्या वेदांतील उपनिषदांसारखीं व त्यांच्या पद्धतीनें लिहिलेलीं. ( २ ) ॐ हेंच ब्रह्म मानून योगाभ्यासानें ब्रह्मसाधन करण्यास सांगणारीं, ( ३ ) ह्या मोक्षासाठीं संन्यासाश्रम धारण करण्यास सांगणारीं व त्याचे धर्म प्रतिपादन करणारीं, आणि ४ था भाग आपापल्या विशिष्ट आराध्य देवता, ह्याच ब्रह्म आहेत, त्यांचे उपासनेनें ब्रह्मप्राप्ति होते, असें म्हणणारीं, अशीं चार प्रकारचीं उपनिषदें आहेत. ह्यांत पहिल्या वर्गांत येणारीं अशीं मुण्डक, प्रश्न आणि मांडुक्य हीं तीनच उपनिषदें आहेत.

मुंडकोपनिषदाचीं तीन मुंडें ( भाग ) आहेत. आणि प्रत्येक मुंडांत दोन खंडें आहेत. अंगिरा ऋषींनीं हें गौतमास शिकविलें आहे. पहिल्या मुंडांत परा आणि अपरा ह्या दोन विद्यांचें ज्ञान करून घ्यावें, असा उपदेश केला आहे. ऋग्वेदादि सर्व ग्रन्थांत सांगितलेली अपरा विद्या होय;

अक्षर ब्रह्माचें पूर्ण ज्ञान ज्या विद्येनें होतें ती परा विद्या. अपरा विद्येचें फल संसार आहे, परा विद्येचें मोक्ष आहे. इष्टापूर्तादि कर्म केल्यानें मनुष्य, पुण्य आहे तोंपर्यंत, स्वर्गांत रहातो, पुण्य संपल्यावर पुनः पृथ्वीवर जन्म घेतो. परा विद्येनें मोक्ष प्राप्त होतो, इत्यादि. दुसऱ्या मुंडकांत अक्षर ब्रह्माचें स्वरूप सांगितलें आहे आणि ही सर्व सृष्टि त्यापासून झाली आहे, असें प्रतिपादन केलें आहे. ॐ हें धनुष्य करून त्याच्याशीं आत्मारूपी शराचें संधान करून (जोडून) तो शर ब्रह्म लक्ष्यावर वेधावा. ब्रह्म हें सत्य, अमृत आहे. हेंच चोहोंकडे आहे, हेंच विश्व, इत्यादि गोष्टी ह्या मुंडांत सांगितल्या आहेत. ब्रह्मज्ञान झालें म्हणजे संसारग्रन्थी (वासनादि) तुटून जातात आणि सर्व संशय नाहींसे होतात. तिसऱ्या मुंडकांत जीवात्मा आणि परमात्मा, यांचें ऐक्य दोन पक्ष्यांचें रूपक करून दाखविलें आहे. दोन सुपर्ण संयुक्त, मित्र, असे दोन पक्षी आहेत. एक झाडावर बसून पिप्पल खात असतो, दुसरा तें पहात असतो. म्हणजे जीवात्मा संसारभोग भोगीत असतो, आणि परमात्मा तटस्थ असतो, इत्यादि. मुमुक्षूनें निष्काम होऊन ब्रह्मज्ञान मिळविण्याची खटपट केली पाहिजे. चक्षु, वाचा, तप, कर्म, किंवा अन्य देवांच्या उपासनेनें ब्रह्म दिसणार नाहीं. केवळ ज्ञानप्रसादानें विशुद्धसत्त्व होऊन आणि ध्यान करून तें निष्कल ब्रह्म प्राप्त होईल.

प्रश्नोपनिषदांत सहा ऋषींनीं भगवान् पिप्पलादास सहा

निरनिराळे प्रश्न विचारले आहेत. त्यांचीं उत्तरें भगवान् पिप्पलादांनीं ऋषींस दिलीं आहेत. त्यांत प्रश्न केले आहेत, म्हणून त्यास प्रश्नोपनिषद हें नांव मिळालें. परब्रह्माचें अन्वेषण करण्याच्या हेतूनें हे ऋषी पिप्पलादाकडे गेले. १ पहिला प्रश्न कबन्धी कात्यायनानें केला. भगवन् ह्या प्रजा कोठून निर्माण झाल्या? २ भार्गव वैदर्भि ऋषींनीं दुसरा प्रश्न केला. भगवन् कोणते देव या प्रजांचें विशेष रीतीनें धारण करतात? त्यापैकीं कोणते देव त्यांना बुद्धीन्द्रियें वगैरे देऊन त्यांचें प्रकाशन करतात. त्यांपैकीं कोणता देव वरिष्ठ आहे? ३ तिसरा प्रश्न कौसल्य आश्वलायनानें विचारला. महाराज! प्राणाची उत्पत्ति कोठून झाली? तो शरीरांत कसा येतो आणि स्वतःला विभागून शरीरांत कसा रहातो? बाहेर कसा जातो? आधिभौतिक, आधिदैवत आणि आध्यात्म कसें धारण करतो? ४ सौरायणी गार्ग्यानें चवथा प्रश्न विचारला. भगवन्! या पुरुषाचे ठायीं कोण जागतात! कोण झोंप घेतात! कोणास स्वप्न दिसतें! कोणाचे ठिकाणीं ह्या सर्वांचें प्रतिष्ठापन आहे! ५ शैब्य सत्यकाम पांचवा प्रश्न विचारतो. महाराज! ह्या मनुष्यांमध्यें कोणी आमरण ओंकार स्वरूपाचें ध्यान करावें? अशा चिंतनानें कोणता लोक प्राप्त होतो? ६ वा प्रश्न सुकेशा भारद्वाजानें केला आहे. तो ह्मणाला. भगवन्! हिरण्यनाभ नांवाचा कौसल्य राजपुत्र माझ्याकडे आला आणि षोडशकल पुरुष तुला माहीत आहे काय? असें त्यानें मला

विचारलें. मला खरोखरच माहीत नव्हता. म्हणून मीं त्याला तसें सांगितलें. खोटें जो बोलतो, त्याचा समूळ नाश होतो. मी खोटें बोलत नाहीं, असें मीं त्यास सांगितलें. हें ऐकून रथावर बसून तो राजपुत्र निमूटपणें निघून गेला. महाराज हा षोडशकल पुरुष कोणता ! ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें पिप्पलादांनीं प्रश्न विचारल्यावर दिलीं आहेत.

मांडुक्योपनिषद् अगदीं लहान आहे. तथापि तें फार महत्त्वाचें आहे. गौडपादाचार्यांच्या प्रसिद्ध कारिका या उपनिषदाच्या आधारानेंच रचिल्या आहेत. ॐकार हेंच अक्षर ब्रह्म, हाच आत्मा, याचीं चार स्वरूपें आहेत. १ बहिःप्रज्ञ, २ अन्तःप्रज्ञ, ३ प्राज्ञ, आणि हा सर्वेश्वर सर्वांच्या उत्पत्ति, स्थिति व लय यांचें कारण आहे.

श्रीविष्णु पुराणांत वेदांच्या शाखांचा अधिक विस्तार करून वर्णन केलें आहे. व्यासांनीं एक लक्ष वेदाचे ऋक्, यजुः, साम आणि अथर्व असे चार भाग केले, आणि ते अनुक्रमे आपल्या पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमन्तु ह्या चार शिष्यांस शिकविले. पैलानें ऋग्वेदाच्या दोन शाखा करून त्या अग्निप्रमति आणि बाष्कल ह्या दोन शिष्यांस शिकविल्या. अग्निप्रमतीनें आपल्या मांडुकेय मुलास ती शाखा सांगितली. मांडुकेयाच्या शिष्य व प्रतिशिष्यांपासून वेदमित्रशाकल्यानें ह्या शाखेचा पाठ घेतला. शाकल्यानें आपल्या शाखांचे अध्ययन पांच शिष्यांकडून करविलें. मुद्गल, गोखल, वात्स्य, शालीय आणि शिशिर असे हे शाकल्याचे पांच शिष्य होते. शाकपुणि हा नांवाचा अन्य शिष्य होता, त्यानें ह्या शाखेच्या तीन प्रतिशाखा करून त्या

क्रौंच, वैतालिक व बलाक ह्या तीन शिष्यांस शिकविल्या आणि निरूक्त चवथ्या शिष्यास शिकाविले. पैलाच्या बाष्कल शिष्यानें आपली बाष्कल शाखा, बोध्य, अग्निमाठर, याज्ञवल्क्य व पराशर ह्या चार शिष्यांस अध्यापिली. बाष्कलि शाखेच्या आणखी निराळ्या तीन शाखा झाल्या, त्यांचे अध्ययन, कालायनि, गार्ग्य, आणि कथाजव ह्या त्याच्या तीन शिष्यांनी केलें.

यजुर्वेदाच्या शाखाविषयीं ह्या पुराणांत सविस्तर माहिती नाहीं.

सामवेदाचें जैमिनीनी अध्ययन केलें; त्यानी तो वेद आपल्या सुमन्तु पुत्रास शिकाविला. सुमन्तूनें आपल्या सुकर्मा नांवाच्या पुत्रांस शिकविला. सुकर्म्यानें सामवेदाच्या हजारो शाखा केल्या; त्यांचें अध्ययन हिरण्यनाभ कौशल्य आणि पौष्यजि ह्या दोन शिष्यांनी केलें. हिरण्यनाभानें या वेदाच्या १५ संहिता केल्या, आणि ह्या आपल्या पंधरा शिष्यांस शिकविल्या, ह्या शिष्यांस 'उदीच्यसामग' असें म्हणतात. दुसरे जे ह्या संहिता शिकले, त्यांस 'प्राच्यसामग' हें नांव आहे. हिरण्यनाभाच्या कृतिनामा शिष्यानें २४ संहिता करून त्यांचें अध्यापन आपल्या शिष्यांस केलें. सुकर्माच्या पौष्यंजि शिष्यानें, लोकाक्षि, कुथुमि, कुसीदि आणि लांगलि ह्या चार शिष्यांस शिकवून अनेक शाखा-भेद केले.

अथर्ववेद सुमन्तु व्यासाजवळ शिकले. कबन्ध नांवाच्या शिष्याकडून त्याचें अध्ययन सुमन्तूनें करविलें. कबन्धानें अथर्वाच्या दोन शाखा केल्या आणि त्या देवदर्श व पथ्य ह्या दोन शिष्यांस सांगितल्या. देवदर्शाचे मौद्ग, ब्रह्मबलि, शौल्कायनि आणि पिप्पलाद, असे चार शिष्य होते. त्यांच्या चार शाखा झाल्या, पथ्याचे जाजलि, कुमुदादि आणि शौनक असे तीन शिष्य होते; त्यांच्या तीन निराळ्या शाखा झाल्या. शौनकानें

आपल्या शाखेचे दोन भाग करून बभ्रु आणि सैन्धवायन ह्यास शिकविल्या. सैन्धवायन शाखेचे पुनः सैन्धव आणि मुंजकेश असे दोन पोटभेद झाले.

ह्याप्रमाणें अनेक शाखा व प्रतिशाखा श्रीविष्णुपुराणांत (अं. ३, अ. ४-५-६) सांगितल्या आहेत. ह्यापैकीं किती ग्रन्थ उपलब्ध आहेत ह्याविषयीं वर हकीकत दिली आहेच.

---

## वेदांगें-किंवा उपग्रन्थ.

वेदाविषयीं अति संक्षिप्त अशी माहिती वर दिली आहे. आतां वेदांत सांगितलेल्या कर्माचें अनुष्ठान यथाविधि, (बरोबर व बिनचूक) व्हावें, म्हणून कांहीं शास्त्रें चांगलीं अवगत असलीं पाहिजेत. त्यांचें ज्ञान नसल्यास कर्मात चूक होण्याचा संभव आहे, आणि कर्मात चूक झाली तर तें सर्व कर्म निष्फळ होतें. येवढेंच नाहीं तर त्यापासून हानिहि होते. म्हणून त्या शास्त्रांचा अभ्यास करणें अवश्य आहे. हीं शास्त्रें सहा आहेत; त्यांस वेदांचीं षडंगें किंवा उपग्रंथ असें ह्मणतात. हे उपग्रन्थ सर्व वेदांस साधारण आहेत, म्हणून त्यांचें अध्ययन प्रत्येक वैदिकानें केलें पाहिजे. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, च्छन्द आणि ज्योतिष हीं वेदांचीं अंगें, असें मागें सांगितलें आहेच.

**शिक्षाः**—हा ग्रन्थ अगदीं लहान आहे. त्यांत साठ श्लोक आहेत. हा पाणिनीच्या मतांस अनुसरून रचलेला

आहे. हा ग्रन्थ बराच अर्वाचीन असावा, असें दिसतें. शिक्षेंत वर्णोच्चार कसे करावेत ह्याविषयीं नियम व माहिती दिली आहे. संस्कृत व प्राकृत मिळून वर्ण एकंदर ६३ किंवा ६४ आहेत असें स्वयंभूनें सांगितलें आहे. हेंच शंभूचें मत आहे. स्वर आणि व्यंजनें मिळून वर्ण होतात. स्वर हे अनुदात्त, उदात्त किंवा स्वरित असतात. हा भेद त्यांच्या स्वरावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणें स्वर उच्चारण्यास जो काळ लागतो त्यावरून ते ऱ्हस्व, दीर्घ, किंवा प्लुत होतात. यावरूनच त्या स्वरांत मात्रा किती आहेत, हें समजतें. ऱ्हस्वांत एक मात्रा, दीर्घांत दोन, आणि प्लुतांत तीन मात्रा असतात. मुंगुसाच्या ओरडण्यास जितका वेळ लागतो, ती अर्धी मात्रा; चाष पक्ष्याच्या शब्दाची एक मात्रा, कावळ्याच्या ‘ काव ’ ‘ काव ’ शब्दांत दोन मात्रा असतात, आणि मोराच्या ‘ टाहो ’ स जो वेळ लागतो त्यांत तीन मात्रा असतात. उदात्तादि सप्तसुरांत बसवितां येतात. उदात्ताचा निषाद व गांधार; अनुदात्ताचा ऋषभ व धैवत; आणि स्वरिताचे षड्ज, मध्यम व पंचम; असे तीन सूर असतात. ऊर, कंठ, शिर, जिव्हामूळ, दंत, नासिका, ओठ, आणि तालू हीं वर्णांचीं आठ स्थानें होत. अच ( स्वर ) हे अस्पृष्ट असतात. यण ( य, र, ल, व ) हे वर्ण ईषत्स्पृष्ट असतात. इत्यादि सांगून वर्णांचें निरनिराळे वर्ग येथें सांगितले आहेत. ह्यालाच प्रयत्न म्हणतात. भरभर, अडखळत, अस्पष्ट उच्चार करणें, रेंगाळणें, हेल

काढणें, मान हालवणें इत्यादि उच्चारणांतील दोष सांगून माधुर्य, अक्षराचा स्पष्टोच्चार, इत्यादि गुण सांगितले आहेत. याप्रमाणें वर्णोच्चाराविषयीं माहिती शिक्षेंत दिली आहे. संहिता किंवा संतान ( वाक्य ) ह्याविषयीं व्याकरणांत सविस्तर विचार केला असतो, म्हणून येथें त्याचा विचार केला नाहीं. मंत्राचे वर्णाच्या उच्चारांत दोष झाला, तर तें वाग्वज्र यजमानाच्या डोक्यावर पडून त्याचा नाश होतो. ‘ इंद्रशत्रु ’ ह्या शब्दाचा स्वर चुकल्यामुळें केवढा घात झाला, ह्या गोष्टीचा उल्लेख शिक्षा ग्रन्थांत केला आहे ( १–५२ ). ही गोष्ट अशी आहे. त्वष्ट्याचा मुलगा इन्द्रानें मारल्यामुळें त्याला राग आला, म्हणून त्वष्ट्यानें यज्ञांत इन्द्राला हविर्भाग दिला नाहीं. इन्द्र साहसानें त्वष्ट्याच्या यज्ञशालेंत शिरला, आणि त्याचा सोम तो प्यायला. त्वष्ट्याला राग येऊन बाकी राहिलेल्या सोमाची आहुति त्यानें ‘स्वाहेन्द्रशत्रुर्वर्धस्व’ असें म्हणून अग्नींत दिली. त्वष्ट्याचे मनांत इन्द्राचा शत्रु ( मारणारा ) असा तूं वृद्धि पाव, असें म्हणावयाचें होतें. यासाठीं अन्त्यपद स्वरित पाहिजे होतें. म्हणजे इन्द्रशत्रुर्वर्धस्व असें त्यानें म्हटलें पाहिजे होतें, परंतु त्वष्ट्यानें ‘ इन्द्रशत्रुः ’ असा उच्चार केला. त्याबरोबर पूर्व पद स्वरित झालें आणि त्या शब्दाचा बहुव्रीहि समास झाला, त्यामुळें इन्द्राचा शत्रु असा अर्थ न होतां, इन्द्र आहे शत्रु ज्याचा असा अर्थ होऊन इंद्रानेंच त्या त्वष्ट्याच्या पुत्रांस मारिलें. ह्यासाठीं वर्णोच्चारणाचें विशेष

ज्ञान अवश्य आहे. म्हणून शिक्षा ग्रन्थाचा अभ्यास केला पाहिजे. याचे अकरा अध्याय आहेत. विषय प्रतिपादनावरून ह्याचीं पांच खंडें होतात. तीं तैत्तिरीय शाखेच्या शिक्षोपनिषदांत आरंभींच सांगितलीं आहेत. १ वर्ण, २ स्वर, ३ मात्रा, ४ बलं, ५ साम, ६ सन्तान, (संतान म्हणजे संहिता) याचा विचार व्याकरणांत होतो असें वर सांगितलें आहेच. याप्रमाणें शिक्षेंत पांच खंडें आहेत. शिक्षा ग्रन्थ सर्व वेदांस साधारण आहे, तथापि प्रत्येक वेदासंबधानें या विषयावर दुसऱ्या मुनींनीं प्रातिशाख्यें लिहिलीं आहेत.

---

## कल्प.

वेदकालाच्या आरंभीं दर्शपूर्णमासाच्याच इष्टि होत्या, पुढें यज्ञ, याग, इष्टि इत्यादि कर्में वाढत गेलीं, त्यामुळें त्यांस लागणाऱ्या मंत्रादिकांची संख्या व प्रयोग हे ही वाढत गेले. ह्यास्तव निरनिराळे वेद झाले, हें पूर्वी सांगितलेंच आहे. यज्ञांत होता, अध्वर्यु व उद्गाता या ऋत्विजांचीं कामें फार असतात आणि त्यांस म्हणावयाचे मंत्र, व त्यांनीं करण्याचीं अनुष्ठानें हींहि पुष्कळ असतात. याकरितां कोणत्या यज्ञात कोणते मंत्र म्हणावेत, कोणतें अनुष्ठान कसें करावें, इत्यादि गोष्टीविषयीं विशेष ज्ञान होण्याकरितां सविस्तर प्रयोग निरनिराळे करून ठवणें अवश्य झालें. ज्या ग्रन्थांत ही माहिती दिली असते त्यांस कल्पसूत्रें म्हणतात. कोणत्या अनुष्ठानांत

कोणते मंत्र व ब्राह्मण कल्पावेत, त्यांचा क्रम कसा असावा, असा आदेश किंवा उपदेश ज्यांत असतो तें कल्पसूत्र होय. हौत्र प्रयोगाचें ( होत्याचे कामाचें ) प्रतिपादन आश्वलायन, शांख्यायन, इत्यादि मुनींनीं आपल्या सूत्रांत करून ठेविलें आहे. हीं आश्वलायनसूत्रें ऋग्वेदान्तर्गत आहेत. शांखायन सूत्रें ऋग्वेदासंबंधींच आहेत, परंतु तीं आपल्या ह्या देशांत कोणी म्हणत नाहींत, यावरून तीं उपलब्ध व प्रसृत नाहींत असें दिसतें.

कृष्णयजुर्वेदाचे तैत्तिरीय शाखेचे तीन सूत्रकार सध्यां आहेत. त्यांचीं नांवें, बोधायन, आपस्तंब आणि सत्याषाढ, हिरण्यकेशी, कात्यायनानीं व पारस्करांनीं शुक्लयजुर्वेदाचीं सूत्रें केलीं आहेत. हीं सूत्रें अध्वर्यु ऋत्विजांचे कर्माविषयीं मुख्यत्वेंकरून प्रतिपादन करितात. ' मुख्यत्वेंकरून ' असें म्हणावयाचें कारण असें आहे कीं, आपस्तंभादिकांच्या सूत्रांत फक्त श्रौतप्रयोगच सांगितले नाहींत. त्यांत गृह्य प्रकरणेंही आहेत औद्गात्रप्रयोग ( उद्गाता ऋत्विजाचे) सामवेदास अनुसरून लिहिले आहेत. लाट्यायन द्राह्यायण इत्यादि मुनींनीं हीं कल्पसूत्रें लिहिलीं आहेत. अथर्ववेदाचीं वैतानसूत्रें ' या नांवाचीं कल्पसूत्रें आहेत.

शांखायन व आश्वलायन या दोन्ही सूत्रांत विषय व त्यांचा अनुक्रम बहुतेक सारखेच आहेत. संहिता किंवा ब्राह्मण यांच्या क्रमाप्रमाणें यांचा क्रम नाहीं; परंतु कोणकोणत्या यज्ञादि कर्मांत कोणते मंत्र म्हणावयाचे वगैरे

गोष्टी सांगून त्या त्या कर्मास लागणारे मंत्र व ब्राह्मण सांगितलीं आहेत, ह्मणजे कर्मांच्या अनुरोधानें मंत्र सांगितले आहेत. शांख्यायन सूत्रांचे अठरा भाग आहेत, त्यांतील शेवटचे दोन भाग कौषितकी आरण्यकास अनुसरून लिहिले आहेत. आश्वलायन सूत्र हें ऐतरेय ब्राह्मणांच्या आधारावर लिहिलें आहे. त्याचे बारा भाग आहेत. राजसूय यज्ञाविषयीं विशेष माहिती शांख्यायन सूत्रांत आहे. हें सूत्र गुजराथेंत व तिकडील देशांत प्रचलित असावें. आश्वलायन सूत्र दक्षिणेंत चालू आहे.

कृष्णयजुर्वेदीय सूत्रें एकंदर सहा आहेत असें म्हणतात त्यांचीं नांवें येणेंप्रमाणेः—बौधायन, आपस्तंब, हिरण्यकेशी, भारद्वाज, (तैत्तिरीय शाखांचीं) मानवसूत्र (मैत्रायणी शाखेचें) आणि वैखानस श्रौतसूत्र. हें कोणत्या शाखेचें आहे हें माहीत नाहीं. बौधायनसूत्र सर्वांत प्राचीन आहे.त्याचे मागून आपस्तंब आणि आपस्तंबाच्या आधारानें लिहिलेलें हिरण्यकेशी हीं तीन सूत्रें सुप्रसिद्ध आहेत. आपस्तम्ब सूत्राचे एकंदर २९ प्रश्न (भाग, प्रपाठक) आहेत, त्यांतील २४ भागांत श्रौतकर्म सांगितलें आहे, बाकीचे भागांत गृह्य प्रकरणें आहेत. हिरण्यकेशी सूत्रांत पहिले १८ भाग श्रौतविषयक आहेत. बाकीच्या ११ भागांत गृह्य प्रकरणें दिलीं आहेत. यांचे २९ च भाग आहेत. मानवसूत्र हें फार जुनें असावें, याची भाषा ब्राह्मणासारखी आहे, व यांत आख्यायिका वगैरे कांहींएक नसून केवळ प्रयोग सांगितले आहेत

ह्या सूत्रावरूनच कदाचित् मनुस्मृति पुढें मनूनें केली असावी, असें पाश्चिमात्य विद्वानांचें मत असावें असें दिसतें. याबद्दल विशेष आधार नाहीं. शुक्लयजुर्वेदाचें श्रौतसूत्र कात्यायनानीं केलें आहे. याचे २६ अध्याय आहेत. शतपथ ब्राह्मणाच्या अनुरोधानें हा ग्रंथ लिहिला आहे, परंतु २२–२४ अध्यायांत सामवेदीय कर्माविषयीं विवेचन आहे.

सामवेदाचीं ‘ मशक ’ ( आर्षेय ), ‘ लाट्यायन ’ आणि ‘ द्राह्यायण ’ अशीं तीन सूत्रें आहेत. मशक सूत्रांत फक्त सोमयागाच्या वेळीं म्हणावयाचे स्तोत्रमंत्र दिले आहेत. लाट्यायन सूत्र हा कौथुमशाखेचें सर्वमान्य सूत्रग्रंथ आहे.

तांड्य किंवा पंचविंश या ब्राह्मणाच्या आधारें हे दोन्हीहि ग्रंथ लिहिले आहेत. सामवेदाची ‘ राणायनीय ’ नांवाची जी शाखा आहे तिचें द्राह्यायणसूत्र आहे. सामवेदी ब्राह्मण ह्या देशांत आढळत नाहींत.

अथर्ववेदाचें वैतानसूत्र हें गोपथ ब्राह्मणाच्या आधारानें लिहिलें आहे, परंतु बरेच ठिकाणीं कात्यायन सूत्राप्रमाणें यांत विवेचन आहे.

———

# व्याकरण.

शिक्षा शिकली असतां शब्दांच्या किंवा पदांच्या योग्य उच्चारांचें विशेष ज्ञान होतें, परंतु येवढ्यानेंच काम भागत नाही. शब्दांत प्रकृति कोणती, प्रत्यय कोणता, शब्दाचें स्वरूप ह्मणजे काय, त्यांचा अर्थ काय असतो, शब्दांचा वाक्यांत परस्परांशीं कसा व काय संबन्ध असतो, वगैरे गोष्टींची चांगली माहिती झाल्याशिवाय संहितेचा किंवा वाक्यांचा अर्थ समजणार नाहीं. वेदाच्या षडङ्गांमध्यें व्याकरण हें मुख्य आहे. ह्मणून ह्या प्रधान अंगाचा अभ्यास अवश्य झालाच पाहिजे. व्याकरणाचे ज्ञानाशिवाय वाक्यार्थ समजणार नाही आणि अर्थ समजला नाहीं तर वेदाध्ययनांत कांहीं अर्थ नाहीं. हे सर्व व्यर्थ श्रम होतील. जेथें अग्नि नाहीं अशा ठिकाणीं पुष्कळ शुष्क इन्धन आणून ठेवलें, तर त्यापासून जसा अग्नि निघत नाहीं व अग्नीपासून होणारीं कार्यें घडत नाहींत, त्याप्रमाणें व्याकरणाचे ज्ञानावांचून अर्थबोध होत नाहीं, आणि अर्थबोध झाला नाहीं तर वेदकर्माचें फलहि प्राप्त होणार नाही. याकरितां व्याकरण शिकणें अवश्य आहे. शिवाच्या डमरूंतून पहिल्यांदा चौदा सूत्रें बाहेर पडलीं. त्यांस माहेश्वर सूत्रें म्हणतात. ' **अइउण् ऋऌक्** ' इत्यादि हीं सूत्रें होत. ह्या सूत्रांच्या आधारें पाणिनीनें आपला **व्याकरणाचा अष्टाध्यायीनामक** सूत्रात्मक ग्रंथ रचला. अष्टाध्यायींत आठ अध्याय आहेत. प्रत्येक

अध्यायांत चार पाद असतात. असें बत्तीस पादांचें हें पुस्तक आहे. ह्यांत सुमारें चार हजार सूत्रें आहेत. ( ३९९२ ). ह्या सूत्रांत वैदिक व लौकिक व्याकरणाचे सर्व नियम सांगितले आहेत. या सूत्रांवर कात्यायन मुनींनीं वार्तिक लिहिलें आहे, आणि ह्या वार्तिकावर भगवान् पतंजली मुनींनीं महाभाष्य केलें आहे. ह्या तीन ग्रंन्थांस वेदांग ह्मणतात.

कौमारादि व्याकरणावरचे ग्रन्थ दुसरे अनेक आहेत, परंतु त्यांस वेदांग म्हणत नाहींत. ते लौकिक ग्रन्थ होत.

तैत्तिरीय संहितेच्या सहाव्या काण्डाच्या चवथ्या प्रपाठकांतील सातव्या अनुवाकांतल्या तिसऱ्या मंत्रांत वाक् व्याकृत कशी झाली याविषयीं एक आख्यायिका आहे. समुद्राच्या कांठीं उभें राहिलें असतां, जसा ध्वनि ऐकूं येतो, तशी किंवा प्रतिध्वनीसारखी पूर्वीं वाणी होती. म्हणजे वाणीपासून अर्थबोध होत नसे. ती 'पराची' होती. देवांनीं इंद्राची प्रार्थना केली कीं, इन्द्रा ! ही वाक् आम्हांस व्याकृत करून दे. यावर इंद्रानें वर मागितला. तो असा "वायूला व मला एका पात्रांत ( ऐन्द्रवायव्यग्रह ) सोम प्यावयाला द्या" त्याप्रमाणें देवांनीं ऐन्द्रवायव्यग्रहांत सोम घालून इन्द्रास दिला. ह्या सोम पिऊन इन्द्र संतुष्ट झाला आणि वाचेच्यामध्यें शिरून तिला विभागली म्हणजे व्याकृत केली. ती व्याकृत झाल्यावर भाषेंत, प्रकृति प्रत्यय, पद, वाक्य इत्यादि भेद झाले. नाम

आणि आख्यात असे दोनच पदांचे भेद आहेत, असें कित्येकांचें मत आहे. नाम, आख्यात, उपसर्ग, आणि निपात असे पदांचे चार भेद होतात, असें पतंजलिप्रभृतींचें म्हणणें आहे. कर्मप्रवचनीय हा पांचवा भेद करावा असें हेलाराजाचें मत आहे, परंतु ह्या कर्मप्रवचनीयांचा उपसर्गांत अन्तर्भाव होतो, असें भाष्यकारांनीं सिद्ध केलें आहे, म्हणून सामान्यतः पदांचे ( शब्दांचे ) चारच भाग गणिले जातात.

व्याकरणाचा अभ्यास करणें अवश्य आहे याविषयीं पुष्कळ कारणें आहेत. त्यांचें सविस्तर वर्णन पतंजलीनीं महाभाष्यांत केलें आहे. त्यापैकीं कांहीं वर सांगितलीं आहेतच. भगवान वररूचीनीं मुख्य पांच कारणें सांगितलीं आहेत, तीं अशीं "**रक्षोहागमलघ्वसंदेहाः**" ( १ ) पहिलें कारण वेदांचें रक्षण ( रक्षा ) केलें पाहिजे. लोप, आगम, वर्णविकार, इत्यादिकांचें ज्याला ज्ञान आहे, त्यालाच वेदाचा अर्थ बरोबर समजल आणि त्याच्या हातून वेदांचें चांगलें परिपालन होईल. म्हणून व्याकरण शिकलें पाहिजे. २ दुसरें कारण ( उह ). तर्कानें व तारतम्यानें लिंग, विभक्ति, इत्यादिकांत भेद करून कर्मानुरूप मंत्रांचा प्रयोग केला पाहिजे. वेदांत प्रत्येक यज्ञकर्मास लागणारे सर्व मंत्र तयार करून ठेवलेले नसतात. हें ज्ञान व्याकरणानेंच प्राप्त करून घेतलें पाहिजे. ३ तिसरें कारण आगम. ब्राह्मणानें सांगवेदाध्ययन करावें, ही वेदाज्ञाच आहे. ४

चवथें कारण ( लघु ). थोडक्या कालांत लवकर माहिती करून घेतली पाहिजे. कोणी म्हणतील "आम्हीं प्रतिपद-पाठ करून सर्व वेदांतील पदांचें ज्ञान करून घेऊं." ही गोष्ट अशक्य आहे. कारण, इंद्र प्रतिपदपाठ करीत होता त्यास बृहस्पतीसारखा गुरु होता. हजार दिव्य वर्षे अध्ययन चाललें, तरी त्याची समाप्ति झालीच नाहीं. आपण तर मनुष्यें, फार झालें तर शंभर वर्षे आयुष्य असेल. यासाठीं व्याकरणाच्या द्वारें वेद लवकर शिकला पाहिजे. ५ असंदेह हें पांचवें कारण. कोणत्या शब्दाविषयीं किंवा शब्दसमुदायाविषयीं त्यांच्या अर्थादिका-संबधानें मनांत शंका किंवा संशय असतां कामा नये. असें असल्यास यथाविधि कर्म होणार नाहीं. उदाहरणानें ही गोष्ट स्पष्ट दिसून येईल. तैत्तिरीय संहितेंतील एक ब्राह्मणवाक्य आपण घेऊं. "स्थूलपृषतीमाग्निवारुणीमानड्वाहीमालभेत" स्थूलपृषती इत्यादि अशा गाईचें आलंभन करावें. येथें स्थूल आहे पृषती जिची असा समास सोडवावयाचा, किंवा स्थूला आणि पृषती असा समास सोडवायाचा. या शंकेचें समाधान केवल स्वरावरून होणार नाहीं. असल्या समासांत अन्त्यपद उदात्त असलें तर तो कर्मधारय समास होतो; पूर्व पदावर प्रकृति स्वर असला तर तो बहुव्रीहि होतो. हें ज्ञान व्याकरणानेंच प्राप्त होतें. म्हणून वैदिकानें वैयाकरणी झालें पाहिजे.

# निरुक्त.

निघंटु म्हणून जो शब्दकोश आहे, त्याचा अन्तर्भाव निरुक्त ह्या ग्रन्थांत होतो. हे दोन्ही ग्रन्थ यास्काचार्यांनीं केले आहेत. अमरसिंहाचा अमरकोश, वैजयन्ती, हलायुध इत्यादि संस्कृतांतील लौकिक शब्दांचे कोश पुष्कळ आहेत. परंतु ते वेदांगांत येत नाहींत. एकार्थवाचक अनेक पर्याय शब्द असतात. वेदांत येणाऱ्या असल्या शब्दांचा कोश निघण्टूंत दिला आहे. निघण्टूचीं तीन कांडें व पांच अध्याय आहेत. पहिल्या कांडास ' नैघंटुक ' कांड म्हणतात. ह्यांत तीन अध्याय आहेत. १ पहिल्या अध्यायांत पृथ्वी इत्यादि महाभूतें, दिक् काल वगैरे द्रव्यांचीं नांवें सांगितलीं आहेत. दुसऱ्यांत, मनुष्य, त्याचे अवयव इत्यादि द्रव्य-विषयांचीं नांवें आहेत. तिसऱ्या अध्यायांत ह्या पृथ्वी मनुष्य इत्यादि विषयांचे गुणधर्मांचीं वाचक अशीं नांवें दिलीं आहेत. २ दुसऱ्या कांडास नैगमकांड म्हणतात. कारण ह्या कांडास वेदवाक्यांचें अवतरण करते वेळीं, वेदवाचक ' निगम ' शब्द हा यास्कानीं फार वेळां वापरला आहे. या कांडाचा अध्याय एकच आहे. तिसऱ्या कांडास दैवतकांड म्हणतात. ह्यांत एकच अध्याय आहे या अध्यायांत सर्व देवतांची माहिती आहे. ' अग्नि ' या शब्दापासून देवी उर्जाहुती येथपर्यंत ज्या देवता सांगितल्या आहेत त्या पृथ्वीवरच्या

( भूर्लोकाच्या ) देवता समजाव्यात. ' वायु ' पासून ' भगा ' पर्यंत वर्णिलेल्या अन्तरिक्ष ( भुवर् ) देवता होत. सूर्यापासून देवपत्नी येथपर्यंत सांगितलेल्या देवता स्वर्गस्थ स्वर्लोकाच्या समजाव्यात. याप्रमाणें " गौ ग्मा " इत्यादि शब्दापासून देवपत्नींपर्यंत त्रिकांडी पांच अध्यायाचा हा निघण्टु ग्रन्थ आहे.

निरुक्त ग्रन्थांचे बारा अध्याय आहेत. दोन अध्याय अपुरे असल्यामुळें कोणी तेरा आहेत. असेंहि मानतात. या ग्रन्थास " **समाम्नायः समाम्नातः** " येथून आरंभ होऊन " **तस्यास्तस्यास्ताद्भाव्यमनुभवत्यनुभवति** " येथे तो संपूर्ण झाला आहे. १ नाम ( नामें व सर्वनामें ), २ आ-ख्यात ( क्रियापद ), ३ निपात आणि ४ उपसर्ग असे एकंदर चार भाग सर्व शब्दांचे ( पद जातीचे ) यास्काचा-र्यांनी केले आहेत. याप्रमाणें शब्दांचे भेद सांगून, वैदिक मंत्रांतील पदांचा अर्थ व त्याचा हेतु ही सांगितली आहेत. मंत्रवाक्यांचा अर्थ समजून यथाविधि अनुष्ठान होण्यास हें सर्व ज्ञान अवश्य आहे. अनुष्ठानमंत्रांतील पदांचा विशेष अर्थ कसा झाला, हें यास्कांनी व्याकरणाच्या नियमान्वयें आणि वेदांच्या ब्राह्मणवाक्यांच्या आधारानें सिद्ध केलें आहे. उदाहरणार्थ ' पृथ्वी ' (जमीन ) या शब्दाला पृथिवी हें नांव पडण्याचें कारण असें आहे. " **यदप्रथयत्तत्पृथिव्यै पृथिवित्वम्** " ( तै. ब्रा. १.१.३.७ ) तसेंच लौकिक संस्कृत भाषेंत ' **न** ' हा निषेधवाचक शब्द आहे. परंतु

वेदांत हा शब्द निषधार्थी आणि उपमाबोधक असतो, अशा रीतीनें वेदांतील शब्दांचे विशेष अर्थाचें निर्वचन या ग्रन्थांत केलें आहे. म्हणून यास निरूक्त असें म्हणतात.

---

## च्छन्दःशास्त्र.

वेदांतील बहुतक सर्व मंत्र च्छन्दोबद्ध किंवा पादबद्ध असतात, म्हणजे ते मंत्र वृत्तांत रचले असतात आणि त्याला चरण असतात. कांहीं वैदिक विशिष्टकर्मानुष्ठानें अमुक एक च्छन्दांत वर्णिलेल्या मंत्रांनींच करावींत. असें सांगितलें असतें. उदाहरणार्थ. तैत्तिरीय ब्राह्मणांत असा आदेश आहे कीं, ब्राह्मणांनीं अग्न्याधिष्ठान गायित्री मंत्रानें करावें, राजन्यांनीं त्रिष्टुभ्मंत्रानें व वैश्यांनीं जगतीवृत्तांतील मंत्रानें अग्नीचें आधान करावें." याप्रमाणें अनेक विशेष कर्मासंबंधानें अनेक निरनिराळीं विशेष वृत्तें असावींत असें कल्पिलें आहे. वेदांत मुख्यतः सात वृत्तें येतात. १ गायित्री, २ उष्णिक्. ३ अनुष्टुप्, ४ बृहती, ५ पंक्ति, ६ त्रिष्टुप् आणि ७ जगती, अशीं सात वैदिक वृत्तें आहेत. गायित्रींत २४ अक्षरें असतात. उष्णिक् वृत्तांत २८ अक्षरें असतात. अशारीतीनें पुढल्या प्रत्येक वृत्ताचीं चार चार अक्षरें वाढत गेलीं आहेत. कोणत्याहि मंत्राचा ऋषि, देवता, आणि च्छन्द हीं माहीत नसतां, जर तो मंत्र म्हटला, तर तें फार अपायकारक आहे, त्यापासून मोठी

हानि होते. म्हणून प्रत्येक मंत्राच्या ह्या तिन्ही गोष्टी माहीत असल्या पाहिजेत. यासाठीं वैदिककर्म यथाविधि होण्याकरितां च्छन्दःशास्त्र शिकणें अवश्य आहे.

वृत्तांवर अतिप्राचीन व उत्तम असा ग्रन्थ (छन्दोविवृति) पिंगल मुनीनीं लिहिला आहे. हाच वेदांग होय. ह्यांत आठ अध्याय आहेत. वर सांगितलेलीं वैदिक किंवा अलौकिक सात वृत्तें, आणि त्यांचे अवान्तर भेद, यांचें निरूपण ह्या ग्रन्थाच्या शेवटच्या तीन अध्यायांत केलें आहे. इतिहास, पुराणें, व इतर लौकिक पद्यग्रन्थ, यांत जीं लौकिक वृत्तें, असतात त्यांचें वर्णन पहिल्या पांच अध्यायांत आहे.

---

## ज्योतिष शास्त्र.

ज्याप्रमाणें च्छन्दःशास्त्राच्या ज्ञानाची अवश्यकता व प्रयोजन हीं वैदिक कर्मांस असतात, त्याप्रमाणेंच ज्योतिष-शास्त्राचें ज्ञान असणें, अगदीं अवश्य आहे. याचें प्रयोजन असें आहे, अमुक कर्मे, अमुककालीं, व अमुक कालपर्यंत करावीत, असें वेदांत सांगितलें असतें. कांहीं कर्में वर्षभर करावयाचीं असतात. चातुर्मास्येंहि असतात. विशेष ऋतूंत कांहीं कर्में करावींत असें आहे. दर्श व पूर्णिमा हीं केव्हां येणार हें ठाऊक असलें पाहिजे. त्याचप्रमाणें नक्ष-त्रांचीहि माहिती हवी. ज्योतिषाचें ज्ञान असणें त्यावेळीं

किती जरूर होतें हें खालीं दिलेल्या दोनचार उताऱ्यांवरून चांगलें लक्ष्यांत येईल. **वसन्त ब्राह्मणोऽग्निमादधीत। ग्रीष्मे राजन्य आदधीत। शरदि वैश्यआदधीत** (तै. ब्रा.) **फल्गुनीपूर्णमासे दीक्षेरन।**" (तै. सं.७,४,८) **कृत्तिकास्वग्निमादधीत.** (तै. ब्रा. १. १, २, १). याप्रमाणें विशेष कालीं विशेष कृत्यें करावयाचीं असतात.

ज्योतिषशास्त्र आदित्यानें प्रणीत केलें आहे. गर्गमुनिप्रणीत असा एक ज्योतिषावर ग्रन्थ आहे. ह्या शास्त्राचें प्रतिपादन करणारे असे बहुविध ग्रन्थ पुढें निर्माण झाले आहेत.

वर सांगितलेलीं सहा शास्त्रें हीं वेदांचीं अंगें आहेत, असें खुद्द शिक्षा ग्रन्थांतच सांगितलें आहे हें पुढल्या श्लोकांवरून दिसून येईल.

ज्योतिष शास्त्राची सामान्य जनांस बरीच माहिती असल्यामुळें त्याविषयीं येथें विशेष लिहिण्याची जरूरी नाहीं. स्थूलमानानें ज्योतिषाचे दोन भाग करतात. एक सिद्धान्त किंवा गणित ज्योतिष, व दुसरा भाग फलज्योतिष किंवा होराप्रश्न वगैरे. गणित ज्योतिषांत नक्षत्रांचीं स्थानें, ग्रहांची गति. त्यांचें परस्परांमध्यें अन्तर. अनियतपणें संचार करणारे धूमकेतु, दृश्यमान सूर्यगतीमुळें दिवस, महिने व वर्षे कशीं होतात, ग्रहणें, ग्रहांचे अस्तोदय इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केला असतो. फलज्योतिषांत ग्रहांच्या विशिष्ट स्थानीं असणाऱ्या स्थितीमुळें मनुष्यमात्राच्या आयुष्यक्रमावर कसा

व काय परिणाम होतो, आणि वनस्पति, प्राणी, ऋतु, पर्जन्यवृष्टि, धान्यादिकांची वृद्धि, इत्यादिकांवर ग्रहांचें आधिपत्य असल्यामुळें त्यांच्या स्थितींत कसा फेरबदल होत असतो, ह्या गोष्टींचें विवेचन केलें असतें. पूर्वकालीं हिंदुस्थानांत ज्योतिषशास्त्रांत बरीच प्रगति झाली होती. परंतु मध्यंतरीं कित्येक वर्षें त्यांत खंड पडल्यामुळें त्याची चालना होण्याचें बंद झालें आणि ज्योतिष गणितांत अन्तर पडूं लागलें आहे. ह्या गोष्टीकडे लोकांचें लक्ष्य जाऊन पाश्चिमात्य साधनांच्या साहाय्यानें आपल्या शास्त्रांत सुधारणा होणे फार इष्ट आहे. वेदकालीं अठ्ठावीस नक्षत्रें, व सूर्यचंद्राच्या गति येवढ्यांचीच माहिती होती, असें दिसतें. कांहीं ठिकाणीं पांचच ऋतूंचीं नांवें येतात. राशि, वार, महिने यांचीं नांवें आढळत नाहींत. चंद्राचा प्रकाश सूर्यापासूनच आहे, अशी त्या वेळच्या लोकांची समजूत होती, असें वेदांतील आख्यायिकेवरून दिसून येतें. तैत्तिरीय ब्राह्मणांत कृत्तिका नक्षत्रापासून नक्षत्रें मोजण्यास आरंभ केला आहे. कृत्तिकादि नक्षत्रावर अग्न्याधान केलें असतां काय फल प्राप्त होतें, हेंहि तेथें सांगितलें आहे. फलज्योतिषावर लोकांचा भरंवसा वेदकालीं होता असें यावरून दिसतें.

छन्दःपादौतु वेदस्य । हस्तौ कल्पोऽथ पठ्यते ॥
ज्योतिषामयनं चक्षुर्निरूक्तं श्रोत्रमुच्यते ॥
शिक्षा घ्राणं तु वेदस्य । मुखं व्याकरणं स्मृतम् ॥
तस्मात्सांगमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ॥

# उपांगें.

१ पुराणें, २ न्याय ( न्यायदर्शन व वैशेषिक दर्शन ), ३ मीमांसा ( पूर्व मीमांसा व उत्तर मीमांसा ), आणि ४ धर्मशास्त्रें ( स्मृति व वेदपुराण अशीं सांख्ययोगादि दर्शनें ), हीं चार वेदांचीं उपांगें मानिलीं आहेत.

**पुराणें**—पुराणांतील श्लोकसंख्या पूर्वी एक कोटी होती. ती व्यासमुनींनीं संक्षिप्त करून एकंदर चार लक्ष ग्रन्थ केला आणि महापुराणांत तो संकलित केला. महापुराणें अठरा आहेत. त्यांचीं नांवें व श्लोकसंख्या येणेंप्रमाणें:—१ ब्राह्मपुराण, ( ३०००० ), २ पद्म, ( ५५००० ), ३ विष्णु, ( २३००० ), ४ शिव, ( २४००० ), ५ भागवत ( देवी ) ( १८००० ), ६ नारद, ( २५००० ), ७ मार्कंडेय, ( ९००० ) ८ अग्नि, ( १६००० ), ९ भविष्य, ( १४५०० ), १० ब्रह्मवैवर्त, ( १८००० ), ११ लिंग, ( ११००० ), १२ वराह, ( २४००० ), १३ स्कंद, ( ८११०० ), १४ वामन, ( १०००० ), १५ कूर्म, ( १८००० ) १६ मत्स्य, ( १४००० ), १७ गरुड, ( १९००० ), आणि १८ वें ब्रह्माण्डपुराण. ( १२२०० ), ह्या पुराणांशिवाय उपपुराणें व अवान्तर दुसरी पुराणें अनेक आहेत. तीं सर्व ह्या महापुराणांच्या आधारानेंच रचलेलीं आहेत, अशी समजूत

असल्यामुळें त्यांची गणना निराळी केलेली नाहीं. सर्ग, प्रतिसर्ग (विश्वाची सृष्टि, स्थिति व लय) देव, ऋषि, सोम, सूर्य इत्यादिकांचा वंश, युगें व मन्वन्तरें आणि त्यांचें कालमान, एकाद्या वंशांतील पुरुषांचें अनुचरित, हीं पांच प्रकरणें प्रत्येक पुराणांत आलेलीं असतात. सर्व पुराणांत त्यांचीं वर्णनें सामान्यतः एकसारखींच आहेत. त्यांत विसंगतता दिसून येत नाहीं. म्हणून हीं सर्व व्यासानींच केलीं आहेत अशी भाविक लोकांची कल्पना होणें, हें योग्यच आहे. वस्तुतः पुराणें एककालीन नसून त्यांचा कर्ता एकच पुरुष नव्हता, ही गोष्ट एक दोन पुराणें वाचून सहज लक्ष्यांत येण्यासारखी आहे. भक्तिमार्गाचें प्रतिपादन करून त्याचा प्रसार करणें, हें पुराणांचें प्रधान प्रयोजन आहे. दुष्टांचा नाश करून भक्तांचें तारण करण्याचे कामीं देवानें काय काय पराक्रम केले, ह्याचें अनेक प्रकारांनीं वर्णन करून मनुष्यास भक्तिमार्गास प्रवृत्त करून भक्तीच्या योगानें संसारांतील दुःखें कमी होतात, व सुख, स्वर्ग आणि मोक्ष हीं प्राप्त होतात, अशी दृढभावना उत्पन्न करणें, हेंच पुराणांचें मुख्य स्वरूप होय. धर्म, अर्थ, काम व मोक्ष, हे चार पुरुषार्थ साधण्याचीं आचार, भक्ति व ज्ञान हीं प्रधान साधनें असतात. हींच पुराणात वर्णिलेलीं आहेत. म्हणून पुराण हें सर्व शास्त्रांत गणिलें आहे. ह्या अठरा पुराणांतील बरीचशीं पुराणें शिवभक्तिपर आहेत. विष्णूची भक्ति करण्यास सांगणारीं पुराणें त्यांहून कमी आहेत. आदिमाया शक्ति, हिचे पराक्रम, सामर्थ्य व वैभव एकाच पुराणांत

सांगितलें आहे. कांहीं पुराणें मिश्र आहेत; म्हणजे त्यांत अनेक देवांची भक्ति, सामर्थ्य वगैरे, यांचें वर्णन असतें. सर्व पुराणांस वेदांचा आधार आहे; वेदबाह्य अशा गोष्टी ह्यांत नाहींत, अशीं सामान्य जनांची समजूत पूर्वींपासून झालेली आहे. ह्याचें कारण असें दिसतें कीं, पुराणांतील बऱ्याचशा प्रमुख गोष्टी वेदांतील गोष्टींचा विस्तार करून सांगणाऱ्या आहेत. वैदिक आख्यायिकांच्या आधारानेंच बऱ्याच पौराणिक कथा रचून त्यांचा विस्तार केलेला दिसतो. उदाहरणार्थ, वामन व वराह अवतार, वसिष्ठ व विश्वामित्र यांचा कलह, त्रिपुरासुराची कथा इत्यादि. शिवाय भक्ति ( ही एका प्रकारचें कर्मच होय ), आणि ज्ञान, त्यांचें वर्णन व त्यांचा महती पदोपदीं पुराणांत दिसून येते. ह्या दोन्ही मोक्षमार्गांस वेदांत आधार सांपडतो, येवढेंच नाहीं, तर उपनिषदांत त्यांचें प्रामुख्यानें प्रतिपादन केलेलें असतें. अशा कारणांवरून पुराणें वेदतुल्यच आहेत, अशी बहुजनसमाजाची समजूत व्हावी, ह्यांत कांहीं विशेष चमत्कार नाहीं.

पुराणांतील मुख्य मुख्य गोष्टी माहीत होण्यास सध्यां पुष्कळ साधनें आहेत. तेव्हां पुराणांविषयीं अधिक प्रतिपादन येथें करण्याची अवश्यकता आहे असें वाटत नाहीं.

------

## न्यायदर्शन.

न्यायशास्त्राचा मुख्य व मूळ ग्रन्थ अक्षपाद किंवा गौतम या महर्षीनीं प्रणीत केला आहे. त्यांच्या न्यायदर्शनाचे पांच अध्याय आहेत, प्रत्येक अध्यायांत दोन दोन भाग आहेत, त्यास आन्हिक असें नांव आहे. हा सूत्रात्मक ग्रन्थ आहे. नैयायिकांच्या मतें एकंदर सोळा पदार्थ आहेत. ह्या पदार्थांचे उद्देश, लक्षण, परीक्षादि केल्यानें तत्त्वज्ञान प्राप्त होतें. तत्त्वज्ञान संपादन झाल्यावर दुःखाचा नाश होऊन निश्रेयस ( सर्व दुःख नाश–मोक्ष ) प्राप्त होतें, म्हणून न्यायशास्त्र शिकणें हें अगदीं अवश्यक आहे.

१ प्रमाण, २ प्रमेय, ३ संशय, ४ प्रयोजन, ५ दृष्टान्त, ६ सिद्धान्त, ७ अवयव, ८ तर्क, ९ निर्णय, १० वाद, ११ जल्प, १२ वितण्डा, १३ हेत्वाभास, १४ छल, १५ जाति, आणि १६ निग्रहस्थान. असे सोळा मुख्य पदार्थ आहेत. पहिल्या अध्यायाचे पहिल्या आन्हिकांत नऊ पदार्थांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, आणि शब्द अशीं चार प्रमाणें नैयायिक मानतात. ह्यांचीं लक्षणेंहि येथें दिलीं आहेत. त्याचप्रमाणें प्रमेयें कोणतीं, त्यांचीं लक्षणें हेंहि सांगितलें आहे. संशय, प्रयोजन, दृष्टान्त सिद्धान्त, अवयव, तर्क आणि निर्णय ह्या पदार्थांच्या व्याख्या दिल्या आहेत. म्हणजे प्रमाण व प्रमेय यांचीं लक्षणें, न्यायाचें

पूर्वांग, न्यायाचा सिद्धान्त; त्याचें स्वरूप, आणि न्यायोत्तरांग अशीं प्रकरणें ह्या आन्हिकांत आलीं आहेत. यांत ४१ सूत्रें आहेत. दुसऱ्या आन्हिकांत बाकी राहिले वादादिक सात पदार्थांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. कथा, हेत्वाभास, छल आणि दोषलक्षणें, अशीं चार प्रकरणें ह्यांत आहेत. सूत्र-संख्या २०.

दुसऱ्या अध्यायाचे पहिल्या आन्हिकांत ६८ सूत्रें आहेत. त्यांत संशयाचें विशेषपरीक्षण केलें आहे, आणि वर सांगितलेल्या चार प्रमाणांत प्रामाण्य नाहीं, अशी कोणी शंका घेऊन तीं प्रमाणें प्रमाणेंच नव्हत, असें प्रतिपादन करील तर त्याचें निराकरण येथें केलें आहे. संशय, प्रमाणसामान्य, प्रत्यक्ष, अवयव, अनुमान, वर्तमान, शब्दसामान्य आणि शब्द-विशेष अशीं आठ प्रकरणें या भागांत आहेत. दुसऱ्या आन्हि-कांत चारच प्रमाणें नाहींत, कारण ऐतिह्य ( परंपरेनें आलेली माहिती, ज्ञान, दन्तकथा ), अर्थापत्ति, संभव, अभाव, इत्यादि दुसरीं अनेक प्रमाणें विद्वानांनीं मानलीं आहेत. यासाठीं प्रमाणें चार आहेत असें म्हणतां येणार नाहीं, अशी शंका कोणी काढील तर त्यास उत्तर या आन्हिकांत दिलें आहे, ऐतिह्याचा शब्द-प्रमाणांत अन्तर्भाव होतो. अर्थापत्ती वगैरेचा अनुमानांत अन्तर्भाव होतो, असें येथें प्रतिपादिलें आहे. प्रमाणचतुष्टय, शब्दनित्यत्व, शब्दपरिणाम आणि शब्दपरीक्षा अशीं चार प्रकरणें या आन्हिकांत येतात. सूत्रें. ६७.

तिसऱ्या अध्यायाचे पहिल्या आन्हिकांत आत्मा, शरीर, इंद्रियें आणि अर्थ ( इंद्रियांचे विषय ), यांचें परीक्षण केलें आहे. इंद्रियभेद. देहभेद, चक्षुरद्वैत; मनोभेद. अनादिनिधन, शरीरपरीक्षा, इन्द्रियपरीक्षा, इन्द्रियनानात्व, आणि अर्थपरीक्षा ह्या नऊ विषयांचें या भागांत प्रतिपादन केलें आहे. सूत्रें ७२. दुसऱ्या भागांत बुद्धि व मन, यांचें परीक्षण केलें आहे. बुद्धिनित्यता, क्षणभंग, बुध्यात्मगुणत्व, बुद्धेः उत्पन्नापवर्गित्व, बुद्धिशरीरगुणभेद, मनःपरीक्षा, आणि शरीराची अदृष्टापासून निष्पत्ति. असे सात विषय ह्या पदांत आले आहेत. सूत्रें ७०.

चवथ्या अध्यायांतील पहिल्या आन्हिकांत १४ प्रकरणांचा विचार केला आहे. १ प्रवृत्ति व दोष यांचीं सामान्य लक्षणें सांगितलीं आहेत, २ दोषांची परीक्षा, ३ प्रेत्यभावाची परीक्षा, ४ शून्यतोपादन व निराकरण, ५ ईश्वर उपादानकारण, ६ आकस्मिकत्व, ७ सर्व अनित्य आहे या मताचें निराकरण, ८ सर्वनित्यत्वाचें निराकरण, ९ सर्व पृथक् आहे याचें निराकरण, १० सर्व शून्य आहे या मताचें निराकरण. ११ संख्यैकान्तवादाचें निराकरण, १२ फलपरीक्षा, १३ दुखःपरीक्षा, आणि १४ अपवर्गपरीक्षा. याप्रमाणें चवदा विषयांचें ह्या आन्हिकांत वर्णन आहे. सूत्रें ६८. दुसऱ्या आन्हिकांत सहा प्रकरणें आहेत. ( १ ) तत्वज्ञानोत्पत्तिप्रकरण, ( २ ) अवयविप्रकरण. ( ३ ) निरवयवप्रकरण, ( ४ ) बाह्यार्थभंगनिराकरण, ( ५ ) तत्त्वज्ञान-

विशुद्धि, आणि ( ६ ) तत्त्वज्ञानपरिपालन. याप्रमाणें ह्या सहा प्रकरणांचें विवेचन ४८ सूत्रांत केलें आहे.

पांचव्या अध्यायाचे पहिल्या आन्हिकांत एकंदर अठरा प्रकरणांचा विचार केला आहे. जातिषट्काचें निरूपण हें एक प्रकरण आणि प्राप्तिसम अप्राप्तिसम इत्यादि दुसरीं सतरा प्रकरणें आहेत. सूत्रसंख्या ४३. दुसऱ्या आन्हिकांत न्यायाश्रित असे पांच निग्रह, ( २ ) अभिमत अर्थाचें प्रतिपादन न करणारे असे चार निग्रह, ( ३ ) स्वसिद्धान्ताला अनुरूप प्रयोगाभासाचे तीन निग्रह आणि ४ निग्रहस्थानविशेष, अशा चार प्रकरणांचा विचार येथें केला आहे. या आन्हिकांत २४ सूत्रें आहेत.

येथपर्यंत न्यायसूत्रांची केवल अनुक्रमणिकाच सांगितली. प्रत्येक विषयांचें प्रतिपादन करून त्याविषयीं थोडीबहुत माहिती देणें येथें शक्य नाहीं. तथापि दोन चार मुख्य गोष्टींविषयीं न्यायशास्त्राचीं काय काय मतें आहेत, ह्याचें दिग्दर्शन येथें करतों.

ह्या दर्शनाला 'न्याय' हें नांव कां ह्मणून दिलें असें कोणी विचारतील! गौतमानीं आपल्या सूत्रांत प्रमाण प्रमेय इत्यादि सोळा मुख्य पदार्थांचें प्रतिपादन केलें आहे. तरी ह्या शास्त्राला न्यायशास्त्र म्हणण्याची कांहीं अवश्यकता दिसत नाहीं. यावर असें उत्तर आहे कीं, सामान्यतः कोणत्याहि वस्तूला त्या वस्तूंतील विशेष धर्मावरून नांव दिलें जातें,

ह्या शास्त्राचा परार्थानुमान हा विशेष आहे. परार्थानुमान हेंहि नांव या शास्त्राला देतां येईल. ह्या विशेषामुळें हें शास्त्र सर्व विद्या शिकण्यास मार्गदर्शक आहे, आणि सर्व कर्मांच्या अनुष्ठानास साधनभूतच असतें. म्हणजे कोणत्याहि कामांस सयुक्तिक व न्याय्य असा मार्ग किंवा पद्धति कोणती? हें हें शास्त्र सांगतें. म्हणून गौतमदर्शनास न्यायशास्त्र म्हणतात. हें नांव यथार्थ आहे. ह्या आन्वीक्षिकी विद्येविषयीं असें म्हटलें आहे:—

प्रदीपः सर्वविद्यानामपायः सर्वकर्मणाम् ।
आश्रयः सर्वधर्माणां विद्योद्देशे परीक्षिता ॥

(Logic is the science of sciences & art of arts.)

प्रमाण, प्रमेय, इत्यादि सोळा पदार्थांच्या तत्त्वज्ञानापासून निःश्रेयस ( मोक्ष ) प्राप्त होतो असें पहिल्या सूत्रांतच गौतम मुनींनीं सांगितलें आहे. यांवर कोणी असा प्रश्न विचारतात कीं तत्त्वज्ञान झाल्याबरोबरच कां मोक्ष प्राप्त होतो? तत्त्वज्ञान झाल्याबरोबरच मोक्ष मिळत नाहीं. कारण दुःख; जन्म प्रवृत्ति, दोष आणि मिथ्याज्ञान यांचा नाश तत्त्वज्ञानानें पहिल्यांदा झाला पाहिजे. एकेकांचा नाश होऊन शेवटीं ह्या सर्वांचा नाश झाला म्हणजे मोक्ष प्राप्त होतो. (दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्य ज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदनन्तरापायादपवर्गः अध्याय १, सूत्र २ ) देहादिवस्तु ज्या वस्तुतः आत्मा नसून, त्याच आत्मा आहेत अशी मनाची समजूत असणें, ह्याला मिथ्याज्ञान म्हणतात.

मिथ्याज्ञानामुळें (अनात्मनि आत्मबुद्धिः) अनुकूळ वस्तू आवडूं लागतात. प्रतिकूळ वस्तूंविषयीं द्वेष उत्पन्न होतो. यामुळें कामक्रोधादि दोष उत्पन्न होतात. या दोषांपासून चांगलीं वाईट कर्में करण्यास प्रवृत्ति होते. अशा बऱ्या वाईट कर्मांमुळें जन्म प्राप्त होतात. जन्मामुळें शरीर प्राप्त होऊन त्यास दुःख सोसावें लागतें. याप्रमाणें संसाराचा हा रहाट नेहमीं फिरत असतो. गुरूपदेशामुळें अज्ञानापासून निवृत्त होण्याची इच्छा एकाद्याचे मनांत उत्पन्न झाली असतां, तत्त्वज्ञान हें निवृत्ति होण्यास उपाय आहे. दुःखाच्या अत्यन्त उच्छेदानंतर किंवा निवृत्ति पूर्ण प्राप्त झाल्यावर मोक्ष प्राप्त होतो.

दुःखाचा अत्यन्त उच्छेद केल्यावर मोक्ष मिळतो असें आपण म्हणतां. दुःखाचा उच्छेद करण्यास सांगणें म्हणजे कोपराला गूळ चिकटवून तो जिभेनें चाटून घ्या (कफोणिगुडायितम्) असें सांगण्यसारखेंच आहे. कारण हें जसें अशक्य आहे, तसेंच दुःखाचा सर्वस्वीं नाश करणें अशक्य आहे. असें असून ही गोष्ट जशी कांहीं सिद्धच आहे असें धरून ती करण्यास कर्में सांगतां ' अशी शंका कांहीं लोक घेतात. यावर नैयायिकांचें असें उत्तर आहे कीं, मोक्षवादी लोकांच्या मताप्रमाणें मोक्षावस्थेमध्यें दुःखाची सर्वस्वीं निवृत्ति असते. आणि हाच अर्थ सर्व तन्त्रांचा (तत्त्वशास्त्रांचा) सिद्धान्त असल्यामुळें दुःखोच्छेद होतो व तो मोक्षप्राप्तीचा राजमार्ग आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. कर्म कर

ण्यास अप्रवृत्त जो मनुष्य आहे त्याला दुःख होतें, असें कोणीहि प्रतिपादन करणार नाहीं. २ बौद्धमतांतील माध्यमिक पंथी लोकांचें आत्मोच्छेद हाच मोक्ष आहे असें मत आहे. आत्मा नाहींसा झाला कीं, दुःखहि नाहींसें झालें. दुःखाचाच उच्छेद झाला पाहिजे असा ह्या मताचा अर्थ आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ३ आतां कोणी म्हणतील कीं दुःखाचा उच्छेद करावयाचा असेल, तर आत्म्याचाच उच्छेद करावा म्हणजे झालें. हें म्हणणें ठीक नाहीं. त्यांत विसंगति आहे, कारण विकल्पाची उपपत्ति येथें होत नाहीं. म्हणजे आत्म्याचे स्वरूपाविषयीं किंवा त्याच्या लक्षणाविषयीं जीं कांहीं अनेक मतें आहेत त्या सर्वांशीं विरोध न होतां. आत्मोच्छेद करणें शक्य नाहीं. उदाहरण घेऊन हें स्पष्ट करतां येईल. नैयायिक विचारतात. आत्मा म्हणजे काय! ( १ ) आत्मा हा ज्ञानसंतान आहे काय! म्हणजे आत्मा हा नानाविध ज्ञानांची एक लांब सांखळीच आहे कां! २ किंवा आत्मा ह्याहून व्यतिरिक्त आहे? प्रश्न करणाराच्या मतांप्रमाणें आत्मा ज्ञानसंतान असला तर नैयायिकांच्या आणि त्याच्या मतांत विरोधच रहात नाहीं. कारण नैयायिकांच्या मतें ज्ञान नश्वर असतें, तें एका क्षणांत उत्पन्न होतें. दुसऱ्या क्षणांत कायम असतें, आणि तिसऱ्या क्षणीं नष्ट होतें. असल्या ज्ञानापासून प्रवृत्ति होते. आणि प्रवृत्तीपासून जन्मदुःखें उद्भवतात, म्हणून प्रवृत्तीचा नाश करणें, हें इष्टच आहे. प्रश्न करणाराचें मत आत्मा ज्ञानाच्याहून भिन्न आहे, असें

असेल, तर आत्मा नित्य असल्यामुळें त्याचा उच्छेद होणें अशक्यच आहे.

ह्याप्रमाणें बौद्धमतांतील विज्ञानवादी, जैन, चार्वाकपक्षीय, सांख्यवादी, भट्टसर्वज्ञ, इत्यादि लोकांच्या मतांचें खंडन करून, किंवा त्या मतांचा स्वीकार केला असतां, त्यांत अडचणी काय येतात हें सांगून दुःखाची अत्यंत निवृत्ति हेंच निश्रेयस आहे असें नैयायिक प्रतिपादन करितात.

ईश्वराचे सद्भावाविषयीं अनेक शंकांचें निरसन न्यायशास्त्रांत केलेलें आहे. द्रव्यांपैकीं चार द्रव्यांचे परमाणु असतात. तें नित्य व अतीन्द्रिय आहेत. तेच उपादानकारण आहेत. आत्मा नित्य आहे. तो प्रत्येक शरीरांत निरनिराळा असतो; याप्रमाणें अनन्त आत्मे आहेत. मन अणु आहे. विषय, ( एखादी वस्तु ) इंद्रिय, मन आणि आत्मा यांचा संनिकर्ष ( संयोग ) झाला म्हणजे विषयाचें प्रत्यक्ष ज्ञान उत्पन्न होतें. न्यायशास्त्र वैशेषिक शास्त्राच्या मागून झालेलें असावें. ह्या शास्त्राचें महत्त्व व त्याची विशेष उपयुक्तता, त्यांत प्रतिपादन केलेल्या अनुमानाचे पंचावयवी वाक्यामुळें व प्रमाणहेत्वाभासादि विषयांवरून, तीं स्पष्ट दिसून येतात. व्याप्तिज्ञान करून घेणें, व्याप्य जेथें आहे, तेथें व्यापक असतें. व्यापक ज्या ठिकाणीं नाहीं तेथें व्याप्य नसावयाचेंच. इत्यादि नियमावरून निर्णय करणें इत्यादि गोष्टीची अवश्यकता सत्य जाणण्यास किती आहे, हें त्यावेळीं चांगलें समजलें होतें. आधुनिक तर्क शास्त्रां-

तील इंडाक्टिव व डिडाक्टिव हें जें मुख्य भाग, त्यांची कल्पना ह्या परार्थानुमानाच्या पंचावयवी वाक्यांत चांगली दिसून येते. तथापि तर्कशास्त्राच्या ह्या दोन भागांस आज जें पूर्ण स्वरूप आलेलें आहे तें सर्व त्या वेळच्या लोकांस समजलें होतें, असें म्हणणें मात्र वितण्डवाद होईल.

---

## वैशेषिक दर्शन.

वैशेषिकदर्शन हें कणादमहामुनीनें प्रणीत केलें आहे. हा ग्रन्थ न्यायशास्त्रावरचाच आहे. ह्या दर्शनांत मुख्य पदार्थ सहा मानिले आहेत. त्याच्यांत ‘ विशेष ’ हा पदार्थ अगदीं नवीनच असल्यामुळें आणि ह्या पदार्थास विशेष महत्त्व दिल्यामुळें ह्या दर्शनास वैशेषिक दर्शन हें नांव मिळालें आहे. त्याचप्रमाणें कणाद हेंहि ग्रन्थकर्त्याचें मूळ खरें नांव नसावें. ह्या शास्त्रांत द्रव्याचे परमाणू असतात, हें तत्त्व मोठ्या जोरानें प्रतिपादलें आहे. ही नवीन अश्रुत कल्पना लोकांस मान्य न होऊन ग्रन्थ कर्त्यास थट्टेनें कण ( अणु ) भक्षण करणारा ( कणाद--कणभुक्--कणभक्षक ) असें ते ह्मणू लागले. औलुक्यदर्शन असेंहि वैशेषिक दर्शनास नांव आहे. ( हेमचन्द्रकृत अभिधानचिन्तामणि ) परंतु कणादाचें उलूकि हें नांव असावें, असें दिसत नाहीं. कारण वायुपुराणांत अक्षपाद; कणाद उलूकि आणि वत्स हे शिवाचे पुत्र होते असें सांगितलें आहे. ह्मणजे त्या

पुराणाच्या वेळीं तरी हे दोन निराळे पुरुष आहेत असें मानिलें होतें.

वैशेषिकदर्शन अक्षपादाचे दर्शनाहून प्राचीन आहे. दोहोंमध्यें पदार्थज्ञान, परमाणु, व्याप्ति, हेत्वाभास, जीवात्मा, इत्यादि विषयांत साम्य आहे. दोहोंमध्येंहि ईश्वरविषयक विचारास प्राधान्य दिलेलें नाहीं.

वैशेषिक दर्शनाचें दहा अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत दोन दोन भाग आहेत त्यास आन्हिक म्हणतात. ह्या ग्रन्थांत एकंदर सूत्रें ३७० आहेत. मोक्षप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर तत्त्वज्ञान झालें पाहिजे. धर्मविशेषापासून आणि पदार्थांचें साधर्म्य व वैधर्म्य ओळखल्यावर तत्त्वज्ञान होतें. कणादानीं पहिल्याच सूत्रांत धर्माची व्याख्या आम्ही सांगतों असें म्हणून, दुसऱ्या सूत्रांत धर्माची व्याख्या सांगितली आहे. " ज्यापासून अभ्युदय व निश्रेयस यांची सिद्धि होते तो धर्म होय. "

( अथातो धर्मं व्याख्यास्यामः ॥ १ ॥
यतोऽभ्युदयनिश्रेयसः सिद्धिः सः ( धर्मः ) ॥ २ ॥ )

१ पहिल्या अध्यायांत समवेत अशेष पदार्थ सांगितले आहेत. याच्या पहिल्या आन्हिकांत वेदमूल असा धर्म सांगून १ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष आणि ६ समवाय ह्या मुख्य सहा पदार्थांचें परीक्षण करण्यासाठीं द्रव्य, गुण, कर्म, यांचें निरूपण केलें आहे. २ ऱ्या आन्हि-

कांत द्रव्य, गुण, आणि कर्म ह्यांमध्यें कार्यकारणभावाची व्यवस्था आहे असें वर्णिलें आहे.

२ दुसऱ्या अध्यायांत द्रव्याचें निरूपण आहे. १ पहिल्या आन्हिकांत पृथ्वी, आप, ( पाणी ) तेज, वायु, आकाश, काल, दिक्, आत्मा आणि मन हीं नऊ द्रव्यें होत, यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत, आणि दुसऱ्या आन्हिकांत गंधादि गुणांचें स्वाभाविकत्व आणि औपाधिकत्व यांच्या व्यवस्थेचें वर्णन आहे.

३ तिसऱ्या अध्यायांत, आत्मा व अन्तःकरण यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. पहिल्या आन्हिकांत आत्मपरीक्षा आहे, व दुसऱ्यांत मनाचें परीक्षण करून, त्याच्याद्वारें हेतु आणि हेत्वाभास ह्यामधील विवेक (भेद) दाखविला आहे. (सूत्रें १९).

४ चवथ्या अध्यायांत शरीर व तदुपयोगी यांचें विवेचन आहे. १ पहिल्या आन्हिकांत परमाणु हे मूल कारण आहेत ते सत्, नित्य आणि अकारणवत् असे आहेत. ते कार्याचें कारण आहेत, असें वर्णन केलें आहे. यामुळें प्रकृति ही मूळ कारण आहे, ह्या तत्त्वाचा निरास होतो. २ ऱ्या आन्हिकांत पृथ्वीत्यादिक चार कार्यद्रव्यांचे विभाग सांगितले आहेत. शरीर, इंद्रिय आणि विषय हे कार्यद्रव्यांचे विभाग होत. ( सूत्रें २४ ).

५ पांचव्या अध्यायांत कर्मपरीक्षा आहे. १ ल्या आन्हिकांत प्रयत्नापासून निष्पन्न होणारीं कर्मे, यांचें परीक्षण आहे. उत्क्षेपण, अप्रयत्नोत्क्षेपण, पुण्यहेतुककर्म, पुण्य व पाप यासंबंधीं उदासीन असणारें कर्म, हीं सर्व शरीराचीं कर्मे होत. २ ऱ्या आन्हिकांत चोदनेपासून निष्पन्न होणाऱ्या कर्मांचें विवेचन आहे. ह्या कर्मास मानासिक कर्मे म्हणतात, ( सूत्रें ४४ ).

६ सहाव्या अध्यायांत श्रौतधर्माची परीक्षा आहे, म्हणजे संसाराचें मूळ जे धर्म व अधर्म त्याचें परीक्षण केलें आहे. १ ल्या आन्हिकांत धर्माचें मूळ जो वेद त्याचें उपपादन व्हावें, म्हणून गुणजन्यत्व धर्म साधण्यास साधन आहे, असें सांगितलें आहे. २ ऱ्यांत धर्माचें परीक्षण करण्यासाठीं दृष्ट आणि अदृष्ट कर्मांच्या फलांचें विवेचन केलें आहे.

७ सातव्या अध्यायांत गुणत्वानें गुणाचें परीक्षण केलें आहे. ( गुण आणि समवाय यांचें प्रतिपादन केलें आहे ). १ ल्या आन्हिकांत गुणांचे उद्देश व लक्षणें सांगितलीं आहेत. नित्य, व अनित्य ह्या दृष्टीनें गुणांची परीक्षा, पाकजगुण, संख्यादि अनेकवृत्तींचे, गुण आणि परिमाण. यांचें परीक्षण आहे. २ ऱ्या आन्हिकांत एकानेकवृत्ति, व अनेकमात्रवृत्ति अशा गुणांचें परीक्षण आहे. त्याप्रमाणें शब्दार्थसंबंध, विशेषगुणरहितविभुसंयोग इत्यादि, आणि समवाय यांचें विवेचन केलेलें आहे.

८ आठव्या अध्यायांत, ज्ञानोत्पत्ति व त्याचें निदान, यांचें निरूपण आहे. १ ल्या आन्हिकांत लौकिक सन्निकर्षजन्य सविकल्प आणि निर्विकल्प ज्ञानाची निष्पत्ति व तिचा क्रम हीं सांगितलीं आहेत. २ दुसऱ्या आन्हिकांत ( संनिकर्षज लौकिक ) विशिष्टवैशिष्ट्यप्रत्यक्ष ज्ञानाचें निरूपण केलें आहे.

९ नवव्या अध्यायांत बुद्धिविशेषांचें युक्तिपूर्वक स्थापन ( म्हणजे प्रत्यासत्तिजन्य, लौकिक व अलौकिक प्रत्यक्षाचें उपपादन ) केलें आहे. पहिल्या आन्हिकांत योगिप्रत्यक्ष व अयोगिप्रत्यक्ष, यांचें निरूपण, कारण, स्वरूप व लक्षण, यांवरून केलें आहे. आणि प्रत्यक्ष ज्ञान व लैंगिक ( अनुमानानें निष्पन्न झालेलें ) ज्ञान यांमधील भेद दाखवून प्रमाणाचे तदनुरूप दोन विभाग केले आहेत.

१० दहाव्या अध्यायात आत्म्याच्या मुख्य गुणाचे भेद, कारण दाखवून स्पष्ट करून दाखविले आहेत. पहिल्या आन्हिकात सुख व दुःख याचें परीक्षण केलें आहे. दुसऱ्या आन्हिकात समवायी, असमवायी, आणि निमित्त, अशीं जीं तीन कारणें आहेत, त्याचें निरूपण केलें आहे.

ह्या दर्शनांत उद्देश, लक्षण, आणि परीक्षा, अशा तीन विषयांचें प्रतिपादन केलें आहे. विश्वांतील सर्व पदार्थांचें वर्गीकरण केलें तर त्याचे मुख्य सहा वर्ग होतात. द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष आणि समवाय. हेच सहा मुख्य

पदार्थ आहेत, असें वैशेषिकांचें मत आहे. ह्या पदार्थांसच उद्देश ह्मणतात. त्यांचीं लक्षणें व परीक्षण या ग्रन्थांत केलेलीं आहेत. ह्या सहा पदार्थांचा जो अनुक्रम दिला आहे, तो सकारण आहे. त्यांत बदल करतां येणार नाहीं. द्रव्य हें सर्व पदार्थांचें आयतन आहे, म्हणून तें पहिल्यांदा सांगितलें आहे. गुण सर्व द्रव्यांत आहेत, ह्मणून ते ह्या क्रमांत दुसरे आहेत. द्रव्यगुणांप्रमाणेंच कर्माची जाति असते, म्हणून कर्म तिसरें आलें आहे. पाहिल्या तिन्ही वर्गांत सामान्य असतें, ह्मणून त्याचे नंतर सामान्य आहे. तसेंच विशेष अनन्त असून ते पहिल्या तिन्ही पदार्थांत समवेत असतात, आणि सामान्याचे पोटांत येतात, ह्मणून सामान्याचे मागून ते आले आहेत. समवाय एकच आहे, तो शेवटीं आला. अभाव हा सातवा पदार्थ आहे, ही गोष्ट निषेधमुखानें ठरवितां येईल ह्मणून अभाव हा सातवा पदार्थ मानिला आहे. द्रव्याचे नऊ पोटभाग आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, काल, दिक्, आत्मा व मन, हीं नऊ द्रव्यें होत. गुण २४ प्रकारचे असतात, रूप, रस, गन्ध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, संस्कार, अदृष्ट (धर्माधर्म), आणि शब्द, याप्रमाणें चोवीस गुण आहेत. उत्क्षेपण, अपक्षेपण, आकुंचन, प्रसारण, आणि गमन, असे कर्माचे पांच प्रकार आहेत. कोणत्याहि इतर कर्माचा अन्तर्भाव ह्या पांचांपैकीं कोणते तरी एकांत होतो. पर आणि अपर असे

सामान्याचे दोन विभाग होतात. **सत्ता ही परसामान्य होय.** जाति ही अपरसामान्य असते. विशेष हे अनन्त असतात. ते परमाणुसामान्यादिकांशीं समवायसंबन्धानें जोडलेले असतात. समवाय हा एकच पदार्थ आहे. समवायाचे अनेक प्रकार आहेत. अवयव व अवयवी, गुण व गुणी, जाति व व्यक्ति, इत्यादिकांमध्यें जो संबन्ध त्यास समवाय ह्मणतात. याप्रमाणें सर्व पदार्थांची व्यवस्था या दर्शनांत सविस्तर केली आहे.

द्रव्यांचे परमाणु असतात ही कल्पना प्रथम कणाद-मुनींनींच काढली आणि तिचें प्रतिपादन केलें, म्हणून परमाणुवादाची उपस्थिति वैशेषिक दर्शनांत पहिल्यांदा झाली. एखाद्या द्रव्याचे भाग करीत गेले तर शेवटीं परमाणू-पर्यंत ते भाग होत जातील. परमाणूंच्या पुढें त्यांचे अधिक सूक्ष्म भाग होत नाहींत. ते अतिसूक्ष्म आहेत. इन्द्रियांस दिसत नाहींत. प्रत्येक परमाणु एकटा, स्वतंत्र. नित्य, असा आहे. त्याला जाति नाहीं. सर्व विशेष यांच्याशीं समवाय संबन्धानें जुडलेले असतात. ह्या एकेका अणूचा दुसऱ्या अणूशीं संयोग होऊन द्व्यणुक बनतात. असल्या द्व्यणुकां-च्या संयोगानें त्र्यणुक वगैरे होतात. द्व्यणुकादि सर्व अनित्य आहेत. ह्यांपासूनच सर्व सृष्टि झाली आहे. परमाणु हेच सृष्टीचें उपादान कारण होत. **प्रकृति ही उपादान कारण नव्हे.**

विशेष हा सहा पदार्थांपैकीं एक स्वतंत्र पदार्थ आहे. हें मत वैशेषिकांनींच प्रथम प्रतिपादन केल्यामुळें त्यांस वैशेषिक हें नांव मिळालें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. जेथें सामान्य आहे तेथें विशेष असलाच पाहिजे, आणि विशेष दृष्टीस पडला कीं, त्याचें सामान्य असावयाचेंच, असा नियम आहे.

वैशेषिक मताभिमानी कोणास म्हणावें असें कोणी विचारलें तर त्यास उत्तर पुढल्या श्लोकांत दिलें आहे:—

द्वित्वे च पाकजोत्पत्तौ, विभागेच विभागजे ॥
यस्य न स्खलिता बुद्धिस्तं वै वैशेषिकं विदुः ॥

इंद्रियार्थ संनिकर्षानें म्हणजे इंद्रिय आणि एखादी (त्या इंद्रियाला ओळखतां येणारी) वस्तु या दोहोंचा संयोग झाला म्हणजे ती वस्तु एक आहे, असें आपल्यास ज्ञान होतें. असें ज्ञान प्रत्येक वस्तूच्या संबंधानें होतें. म्हणजे ती वस्तु पाहिली म्हणजे ती एकच आहे, असें आपल्यास समजतें. म्हणून वस्तूमध्यें त्यांचें एकत्व हें नित्य असतें. उदाहरणार्थ मीं आतां एक लेखणी पाहिलीं, तिच्यांत तिचें एकत्व आहे. पुनः दुसरी एक लेखणी पाहिली. ह्या दुसऱ्या लेखणींत तिचें स्वतःचें एकत्व आहेच. परंतु पहिल्यांदा पाहिलेली ही एक लेखणी, दुसऱ्यांदा पाहिलेली ही लेखणी, अशा ह्या दोन तीन चार इत्यादि, ह्या लेखण्या, असा विचार जेव्हां मी मनांत करतों, त्या वेळीं माझ्या मनांत अपेक्षा-बुद्धि उत्पन्न झाली असते. त्या अपेक्षाबुद्धीनें मीं त्या अनेक

लेखण्यांमध्यें विवेक ( भेद ) करीत असतां. ह्यामुळें वस्तूंत द्वित्व ( दुसरेपणा, भिन्नता ) उत्पन्न होतें. हें द्वित्व अपेक्षा बुद्धीवर अवलंबून असल्यामुळें तें अनित्य असतें. तशीच अपेक्षाबुद्धि हीहि अनित्य आहे, हें एक वैशेषिकांचें मत आहे.

पदार्थास उष्णता लागली असतां, ( विस्तव वगैरेची आंच मिळाली असतां ), त्या पदार्थाच्या गुणांत विकार होतो, म्हणजे पूर्वी जे गुण त्या पदार्थांत असतात, ते जाऊन दुसरे गुण त्यांत उत्पन्न होतात. ह्याला पाकजोत्पत्ति म्हणतात. झाडावरून आंबा तोडावा, तो त्यावेळीं हिरव्या रंगाचा असतो आणि त्याची चव आंबट असते. हा पिकत घालून ( म्हणजे त्यास उष्णता दिल्यावर ) बाहेर काढला म्हणजे, तो पिंवळा होतो आणि गोड लागतो. हा परिणाम पाकाचा आहे, असें वैशेषिकांचें मत आहे. हा विकार पदार्थाच्या ( आंब्याच्या ) द्व्यणुकांत होतो, म्हणजे पूर्वीच्या पदार्थाचे ( आंब्याचे ) सर्व मूळ अवयव नष्ट होऊन दुसरें द्व्यणुक तयार होऊन निराळाच आंबा होतो, असें वैशेषिक म्हणतात. नैयायिकांच्या मताप्रमाणें हा परिणाम किंवा विकार एकंदर सर्व पदार्थांत होतो. त्याच्या अवयवांत होत नाहीं. येवढा ह्या दोघांच्या मतांत फरक आहे. वैशेषिकांस पीलुपाकवादी म्हणतात, आणि नैयायिकास पिठरपाकवादी असें नांव आहे. पीलुपाक म्हणजे अणूंचा पाक, आणि पिठरपाक म्हणजे अणूनीं बनलेल्या सर्व वस्तूंचा पाक.

विभागापासून विभाग होतात हें एक तिसरें वैशेषिकांचें मत आहे. विभागजविभाग दोन प्रकारचे असतात, कारणमात्र विभागज, आणि २ कारणाकारण विभागज.

वैशेषिक आणि न्याय ह्या दर्शनांवर वात्स्यायनांचें भाष्य आहे.

---

## पूर्वमीमांसा.

मीमांसेचे पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा असे दोन भाग आहेत. पूर्वमीमांसेला धर्ममीमांसा किंवा जैमिनीसूत्रें, असेंहि म्हणतात. पूर्वमीमांसा हा सूत्रात्मक ग्रन्थ जैमिनींनीं प्रणीत केला आहे. याचे बारा अध्याय आहेत. याप्रमाणेंच संकर्षणकाण्ड या नांवाचा चार अध्यायांचा ग्रन्थ उपासनामार्गावर जैमिनींनीं लिहिला आहे. हा देवताकाण्ड या नांवानें प्रसिद्ध आहे. उपासना म्हणजे एक प्रकारचें कर्मच होय. ह्या ग्रन्थांत उपासना कर्माचें प्रतिपादन केलें आहे. म्हणून कर्ममीमांसेंत त्या ग्रन्थाचा अन्तर्भाव होतो, असें कोणी मानतात.

" वात्स्यायनांचे भाष्य, जयंतवृत्ति, विश्वनाथांची वृत्ति, कुसुमांजलि, तर्कभाषा, प्रशस्तपादभाष्य, किरणावलि उपस्कार, भाषापरिच्छेद, सिद्धान्तमुक्तावलि, तर्कसंग्रह, दीपिका सप्तपदार्थी, तत्वचितामणी, दीधिति, गदाधरी, कृष्णंभट्टी तर्ककौमुदी, न्यायमालाविस्तार, मानमनोहर, इत्यादि लहानमोठे अनेक ग्रंथ आहेत."

आपल्या अभिमताची ( इष्ट वस्तूची ) प्राप्ति व्हावी, म्हणून धर्माप्रमाणे वागावें, असें सांगतात, तर धर्म म्हणजे काय? याचें उत्तर या ग्रन्थांत भगवान् जैमिनींनीं दिलें आहे. " अथातो धर्मजिज्ञासा " हें पहिल्या अध्यायाचें पहिलें सूत्र आहे. धर्म म्हणजे काय हें समजून घेण्याची इच्छा ( सर्वांत असावी ), अशारीतीनें प्रतिपादनास आरंभ केला आहे.

१ पहिल्या अध्यायांत विधि, अर्थवाद, मंत्र, स्मृति आणि नामधेय, यांच्या प्रामाण्याविषयीं विचार केला आहे. २ दुसऱ्या अध्यायांत कर्मांच्या भेदाविषयीं चर्चा केली आहे. प्रमाणांचे अपवाद म्हणजे खोटीं प्रमाणें, आणि कर्मांच्या प्रयोगामधील भेद, त्यांचें विवेचन केलें आहे. ३ तिसऱ्या अध्यायांत शेषाशेषिभाव सांगितला आहे. श्रुति लिंग--वाक्य इत्यादिकांमधील विरोध, व तो विरोध आला असतां प्राधान्य कोणास द्यावें, ह्याचा विचार केला आहे. तसेंच प्रतिपत्तिकर्माचाहि विचार केला आहे. प्रतिपत्तिकर्म म्हणजे, यज्ञांत उपयोगांत आणलेल्या द्रव्यांपैकीं अवशिष्ट भागांचें काय करावयाचें, ह्याविषयीं सांगितलेलीं कर्मे. पशु मारल्यावर त्याचें चर्म व अस्थि. यांचें काय करावयाचें. सुरेचें हवन झाल्यावर बाकी राहिलेल्या सुरेचें काय करावयाचें ? इत्यादि. अनारंभाधीत, मुख्य प्रधान कर्मास उपकारक अशीं प्रयाजादि कर्मे, आणि यजमानाचें कर्तव्य, इतके विषयांचें तिसऱ्या अध्यायांत विवेचन आहे. ४

चौथ्या अध्यायांत क्रत्वर्थ आणि पुरुषार्थ यांच्या भेदांवरून विशेष प्रयोग कसे असावेत हें सांगितलें आहे. प्रधान व अप्रधान कर्माचें इतर कर्मासंबंधी प्रयोजकत्व, जुहुपर्णता इत्यादिकांचें फल; राजसूययज्ञाचे अक्षद्यूतादि जे गौण भाग, यांचा विचार केला आहे. ५ पांचव्या अध्यायांत श्रुति इत्यादिकांचा अनुक्रम, कर्मांची वृद्धि किंवा अवर्धन, श्रुति वगैरेच्या अनुक्रमानें त्यांचे प्राबल्य किंवा दुर्बलता, इत्यादि विषयांचें प्रतिपादन येथें केलें आहे. ६ सहाव्या अध्यायांत ( कर्म करण्यास ) अधिकारी, त्याचे धर्म, द्रव्यप्रतिनिधि. ( एखादें द्रव्य नसलें तर त्याचे जागीं घेण्यासारखें दुसरें द्रव्य ), अर्थाचा किंवा कर्माचा लोप, प्रायश्चित्तें, सत्रांत देण्यासारख्या वस्तु ( देय ), आणि यज्ञकर्मांतील अग्नि, या गोष्टींचा विचार केला आहे. ७ सातव्या अध्यायांत श्रुतीचें प्रत्यक्ष वचन नसलें, तर नाम आणि लिंग ह्यांच्या आधारावरून अतिदेश करणें, याचा विचार केला आहे. कोणत्याहि एकाद्या कर्मांत जो प्रयोग किंवा तंत्रादि सांगितलीं असतील, तीं सर्व तशींच्या तशींच दुसऱ्या एकाद्या कर्मांत करणें, यास अतिदेश म्हणतात. ८ आठव्या अध्यायांत प्रबल, स्पष्ट आणि अस्पष्ट अशा लिंगाच्या आधारानें ( संदर्भ ) करण्यासारखा अतिदेश व त्यास अपवाद, ह्या गोष्टींचा विचार केला आहे. ९ नवव्या अध्यायांत नवीं सूक्तें घ्यावीं किंवा नाहीं, याचा विचार ( ऊह ), सामोह आणि मन्त्रोह आणि त्यांच्या संबन्धानें प्रसंगोपात्त गोष्टी, यांचा विचार आहे.

१० दहाव्या अध्यायांत बाध सांगितले आहेत. प्रधानकर्म न केल्यामुळें, तदधीन गौण कर्म न करणें, एका कर्माचें फळ दुसऱ्या कर्माच्या अनुष्ठानानें उत्पन्न झालें असतां, तें कर्म न करणें, ग्रहादि प्रकरणें, साम आणि निषेधअर्थ, ह्या विषयांचा विचार केला आहे. ११ अकराव्या अध्यायांत तंत्र आणि अवाप यांचा सविस्तर विचार केला आहे. अनेकवेळीं करण्यास सांगितलेलें कर्म एका वेळींच करून अनेक वेळांचें काम भागविणें, यास तन्त्र म्हणतात. अवाप म्हणजे जितके वेळां कर्म करण्यास सांगितलें असेल, तितके वेळा तें करणें. १२ बाराव्या अध्यायांत प्रसंग, तंत्र, निर्णय, समुच्चय, ( अनेक कर्में एका वेळीं करणें ) आणि विकल्प ( करावें किंवा न करावें ), ह्यांचा विचार केला आहे. ह्या बारा अध्यायांत अनेक विषयाचें विवेचन केलें आहे, हें स्पष्टच आहे. एका विषयाचे संपूर्ण विवेचनास एक अधिकरण म्हणतात. अशीं अधिकरणें दोन्ही मीमांसांत आहेत. प्रत्येक अधिकरणाचे पांच भाग किंवा अंगें असतात. १ विषय, २ त्याविषयीं संशय. ३ शंका येणाराचा पूर्व पक्ष. ४ शंका निवारण करणाराचा सिद्धान्त आणि ५ संगति. अशीं अधिकरणें कर्ममीमांसेंत ९०७ आहेत. एकंदर सर्व सूत्रें २७४५ आहेत. प्रत्येक अध्यायांत चार पाद असतात. परंतु ह्यांतील तिसऱ्या, सहाव्या आणि दहाव्या अध्यायांत आठ आठ पाद आहेत. म्हणून पूर्वमीमांसेंत एकंदर ६० पाद आहेत.

अधिकरणांत युक्तिवादानें विवेचन करण्याची कशी काय पद्धति असते, ह्याची स्थूल मानानें तरी थोडीशी कल्पना यावी, म्हणून एक दोन अधिकरणांचा सारांश देणें अवश्य आहे, असें वाटल्यावरून तो होईल तितक्या स्वल्प व सोप्या भाषेंत पुढें दिला आहे.

वेदाचें अध्ययन करावें, हें अधिकरण आहे. '**स्वाध्यायोऽध्येतव्यः**' वेदाचें अध्ययन करणें अगदीं अवश्य आहे. हा ह्या अधिकरणातील विषय होय. "**चोदनालक्षणोऽर्थोधर्मः**" या सूत्रापासून आरंभ करून शेवटचें जें "**अन्वाहार्येच दर्शनात्**" ह्या सूत्रापर्यंत जैमिनींनीं केलेलें धर्मशास्त्र, हें वेदाचें अध्ययनाबरोबर शिकावें किंवा शिकूं नये ? ही त्या विषयावर शंका उत्पन्न होते. ह्या शंकेवरून कांहीं लोकांचें असें मत होईल कीं, वेदाध्ययनापासून प्राप्त होणारें दृष्ट फळ किंवा पुढें होणारें अदृष्ट फळ, या दोन्ही फळांचा विचार करून पहातां जैमिनीच्या धर्मसूत्रांचें अध्ययन करण्याची कांहीं-एक जरूरी नाहीं. मुख्य विषयाचे संबन्धानें हा पूर्वपक्ष झाला. आपलें ( पूर्वपक्षाचें ) मत स्थापित करण्यासाठीं त्या पक्षाचे लोक युक्तिवाद करतात तो असा. वेदाध्ययन करण्याच्या संबन्धानें दोन मतें आहेत. १ वेदाचीं अक्षरें नुसतीं तोंडपाठ केलीं, कीं झालें वेदाध्ययन, असें कांहीं-जणांचें मत आहे. ह्या मताविषयीं विचार पूर्वपक्षीय ( वादी ) येथें करीत नाहींत. अन्य लोकांचें असें म्हणणें आहे कीं, वेदाध्ययनांत वेदाच्या अर्थाचें ज्ञान झालेंच पाहिजे. अर्थ-

ज्ञान हें अवश्य आहे, आणि विचारशास्त्राशिवाय अर्थज्ञान जर होणार नाहीं, तर जैमिनीच्या ग्रन्थासारख्या विचारशास्त्राचें अध्ययन केलेंच पाहिजे. हें मत ज्यांचें आहे, त्यांस पूर्वपक्षी दोन प्रश्न विचारतात. १ काय हो! वेदाचा अर्थ समजण्याकरितां जैमिनीचें धर्मशास्त्र वाचलेंच पाहिजे का? नाहीं वाचलें तर चालणार नाहीं का? वेदाचे अर्थज्ञान होण्यासाठीं जैमिनीचीं सूत्रें शिकलीच पाहिजेत असें विधिवाक्य आहे, असें आपलें म्हणणें आहे काय? किंवा ( २ ) वेदाचा अर्थ! समजण्यास अनेक मार्ग असतांहि, कांहीं विशेष कारणास्तव अर्थज्ञानासाठीं हेंच धर्मशास्त्र पढलें पाहिजे, असा हा पाक्षिक विशेष नियम आपण घालून देतांहां! उदाहरणार्थः—साळीपासून तांदूळ काढण्यास नखांनीं सोलणें इत्यादि अनेक साधनें असतांहि, दर्शपूर्णमासाच्या वेळीं पुरोडाश करण्यास जे तांदूळ घ्यावयाचे, ते उखळींत भात कांडून तयार केलेले असे तांदूळ असावेत, हा नियमविधि घालून दिला आहे, त्याप्रमाणेंच धर्मशास्त्राचे द्वारा वेदार्थज्ञान करून घेतलें पाहिजे असा नियम आपला आहे किंवा काय? १ धर्मशास्त्र शिकलें पाहिजे असें विधिवाक्य आहे, असें जर तुम्ही म्हणाल, तर तुमच्या म्हणण्यात अर्थ नाहीं. कारण, विधिवाक्याची अपेक्षा न धरतां केवल अनुमानानेंच वेदाचा अर्थ समजून घेऊन वेदाध्ययन करावें, ही गोष्ट सिद्ध होते. ती कशी होते तें आतां पुढील अनुमानवाक्यांवरून स्पष्ट दिसून येईल. वेदाचें

अध्ययन करणें म्हणजे त्याचा अर्थ समजून घेऊन तो शिकणें असें आहे. ( प्रतिज्ञा ). कारण अध्ययन करणें असें म्हणतां ह्मणून. ( हेतु ). कोणत्याहि ग्रन्थाचें अध्ययन करणें म्हणजे त्यांचा अर्थ समजून घेऊन शिकणें होय. उदाहणार्थ, भारतादि ग्रन्थांचें अध्ययन. ( व्याप्ति व दृष्टान्त ) वेदाचें अध्ययन करणें आहे. ( उपनय ). म्हणून वेदाचा अर्थ समजून घेऊन तो शिकणें आहे, हा सिद्धान्त. ( निगम ). ह्याप्रमाणें वेदार्थज्ञान करून घेऊन अध्ययन करावें, ही गोष्ट आम्हांस अनुमानावरूनच जर कळून येत आहे, तर तें सांगण्यास आणखी एखादें विधिवाक्य कशाला पाहिजे ? 'म्हणून जैमिनीचें धर्मशास्त्र शिका' असा विधिच नाहीं. ( हुकूम नाहीं. ). २ 'जैमिनीचें धर्मशास्त्र शिकावें' असा पाक्षिक नियमविधि आहे असें म्हटलें, तर तेंहि लागूं पडत नाहीं. साळीपासून तांदूळ काढण्याचीं अनेक साधनें असूनहि दर्शपूर्णमासाच्या इष्टीचे वेळीं करण्याच्या पुरो-डाशास, उखळांत भात सडून काढलेलेच तांदूळ घ्यावेत असें सांगितलें आहे. हा नियम बांधून टाकला आहे. ह्याला कारण आहे. दर्शपूर्णमासांचें जें प्रधान मुख्य 'अपूर्व' ( अदृष्टफल ) तें उत्पन्न करण्यास, दर्शपूर्णमासाच्या अंग-भूत असलेल्या कर्मांचीं 'अपूर्वें' साधन असतात. म्हणजे तांदुळाच्या पिठाचा पुरोडाश करावा इत्यादि जीं कर्में दर्शपूर्ण-मासाचीं अंगें असतात, त्या कर्मांच्या अपूर्वांच्या साहाय्या-नेंच दर्शपूर्णमासांचें प्रधान 'अपूर्व' उत्पन्न होत असतें.

दुसऱ्या कोणत्याहि कारणानें तें 'अपूर्व' उत्पादित होत नाहीं. या गौण कर्मांचें 'अपूर्व' साधनभूत व्हावें, याकरितां त्या त्या कर्मासंबन्धीं विशेष नियम करून ठेवले आहेत. **अर्थज्ञानपूर्वक वेदाध्ययन** हा जो आपला प्रस्तुतचा विषय, त्यांत असला प्रकार कांहीं एक नाहीं. यज्ञकर्माचें अनुष्ठान यथाविधि होण्यास (वेदाचें) अर्थज्ञान हावें ही गोष्ट खरी; परंतु अध्ययनाचेवेळीं झालेलें वेदार्थज्ञान, किंवा लिहून ठेवलेले ग्रन्थ वाचून होणारें वेदार्थज्ञान, ह्या दोन्ही ज्ञानांपैकीं कोणत्याहि ज्ञानानें यज्ञानुष्ठानाची सिद्धि होते, असें आहे तर वेदाचें अर्थज्ञान होण्यास अमूक एक ग्रन्थ शिकलाच पाहिजे, असे नियम करण्याची कांहीं जरूरी नाहीं. म्हणून जैमिनीचें 'धर्मशास्त्र शिका' असा नियमविधि सांगतां येत नाहीं.

असें झालें तर "स्वाध्यायोऽध्येतव्यः" हें जें आपलें मुख्य विधिवाक्य, त्याची वाट कशी काय लावावयाची! असें कोणी विचारील तर त्यांस पूर्वपक्ष करणारे वादी असें उत्तर देतात— केवल वेदाक्षरांचें अध्ययन करावें. नुसता वेद तोंडपाठ केला, म्हणजे पुरें झालें. त्यापासून स्वर्गप्राप्ति होते. स्वर्ग हें त्याचें फल आहे. असें म्हणण्यास 'विश्वजित्' न्यायावरून कांहीं एक हरकत नाहीं. (३–४–१५). विधि सांगितला नसूनहि एखाद्या कर्माचें दृष्टफळ मिळत असल्यास त्या कर्माविषयीं विधि सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एखाद्या कर्माविषयीं विधि सांगितला असेल तर त्या विधीच्या साम-

र्थ्यानें त्या कर्माचें स्वर्ग हेंच फळ प्राप्त होईल, असें विश्वजिन्न्यायाच्या अनुरोधानें मानिलें पाहिजे.

जैमिनीचे धर्मविचारशास्त्राचें अध्ययन करूं नये असें म्हणण्यास आणखी एक कारण आहे. " **वेदमधीत्य स्नायात्** " वेद शिकल्यावर मुलानें घरीं येऊन समावर्तन करून लग्न करावें. अशी स्मृति आहे. वेद शिकल्यावर धर्मशास्त्र शिकण्यास पुनः गुरूचे घरीं जाऊन राहिलें पाहिजे. असें केलें तर वेदाध्ययन झाल्यावर समावर्तन करण्यास उशीर लागेल; आणि यामुळें स्मृतीची आज्ञा पाळली जाणार नाहीं. म्हणून स्मृतीला अनुसरून वेदाध्ययन झाल्याबरोबर समावर्तनच करावें. धर्मविचारशास्त्र शिकण्यास जाऊं नये.

याप्रमाणें जैमिनीचें धर्मशास्त्र शिकण्याची अवश्यकता नाहीं असें सिद्ध करण्यास पूर्वपक्ष तीन कारणें सांगतो.

१ जैमिनीचें शास्त्र शिकलेंच पाहिजे असा विधि ( वेदाज्ञा ) नाहीं. २ दुसरें, नुसतें वेदाध्ययन केल्यानें स्वर्ग प्राप्त होईल. ३ तिसरें कारण वेदाध्ययन केल्यावर जैमिनीचें धर्मशास्त्र शिकण्यांत वेळ न घालवितां समावर्तन केलें असतां स्मृतीची आज्ञा पाळल्यासारखें होईल.

यांवर सिद्धान्तवाद्यांचें उत्तर येणेंप्रमाणें आहे:—

१ विधिवाक्य नाहीं, कारण वेदाचा अर्थ समजून घ्यावा, हें अन्य रीतीनें सिद्ध होतें आहे. हें जें पूर्वपक्षाचें

म्हणणें आहे, तें आम्हास ( सिद्धान्त्यांस ) कबूल आहे. परंतु यासंबन्धीं नियमवाक्य सुद्धां नाहीं, असें ह्मणण्यांत अर्थ नाहीं. यासंबन्धी नियम आहे असें आह्मीं म्हणतों, आणि साक्षात् इंद्र वज्र घेऊन आला, तरी त्याच्या हातून आमचें मत खोडलें जाणार नाहीं. "**स्वाध्यायोऽध्येतव्यः**" ह्या विधिवाक्यांत 'अध्येतव्यः' ह्या शब्दाला 'तव्य' प्रत्यय जोडलेला आहे. या प्रत्ययाचे अर्थात प्रेरणा किंवा आज्ञा याची भावना असते. आज्ञा झाली म्हणजे मनुष्या-कडून प्रयत्न व कर्म झालीं पाहिजेत; आणि मनुष्याला त्या कर्माचें दृष्टफल प्राप्त करून घ्यावयाचें असतें. हें दृष्टफल मिळावें म्हणून त्या कर्माच्या योगानें साध्य होण्यासारखी अशी विशेष वस्तु त्याच्या पुढें असली पाहिजे. याला भाव्य म्हणतात. आतां प्रस्तुत विषयात हें भाव्य कोणतें ? 'नुसतें अध्ययन करा' अशीच प्रेरणा किंवा आज्ञा आहे, असें ह्मणणें योग्य नाहीं. कारण मनुष्य अध्ययन करूं लागला, म्हणजे शब्दाचे उच्चार बरोबर करणें वगैरे, त्यासंबंधीं ज्या ज्या क्रिया अस-तात, आणि त्या सर्व क्रिया करण्यास लागणारे श्रम तो मनुष्य करीतच असतो. मग 'तेच श्रम तूं कर' असें जोरानें त्यास सांगण्यांत काय अर्थ आहे. म्हणून 'तव्य' प्रत्य-याचा हेतु हा नव्हे. हा त्याचा हेतु नसला तर **स्वाध्या-योऽध्येतव्यः**' या सर्व वाक्याप्रमाणें मनुष्यानें सर्व वेद शिकावा असा त्या 'तव्या' चा अर्थ असेल. हें म्हणणेंहि असमंजसपणाचें होईल. कारण वेद हा नित्य आणि विभु

आहे. अशा विभु व नित्य वेदांचें अध्ययन करणें अशक्य आहे. यासाठीं वेदार्थाचा अवबोध ( ज्ञान ) ज्या शास्त्राच्या साहाय्यानें होईल तें शास्त्र शिकलें पाहिजे, म्हणजे जैमिनीचे सूत्रांचा अभ्यास केला पाहिजे. असा नियम ह्या विधीपासून सिद्ध होतो. दर्शपूर्णमासांविषयीं जे लोक अध्ययन करतात, ते त्या कर्माचा तत्त्वार्थ काय आहे, हें समजून घेण्याकरतां त्याचा अभ्यास करीत असतात. वेदाध्ययन पुस्तकाचे पाठानें करावयाचें नसल्यामुळें, गुरूजवळ शिकण्यांत कांहीं एक विशेष संस्कार प्राप्त होत असतो. तो विशेष संस्कार अर्थज्ञान होय.

( २ ) दर्शपूर्णमासांचें सामान्य व प्रधान अपूर्वानें तदंगभूत अवघातादिकांचीं ( तांदूळ सडून घेणें वगैरे ) अवान्तर अपूर्वें नियमानें जशीं बांधून टाकिलीं असतात, त्याचप्रमाणें सर्व यज्ञांचीं जीं प्रधान व मुख्य अपूर्वें, त्यांनीं कर्म, वेदाध्ययन, अर्थज्ञान इत्यादि यज्ञसाधनांचीं अपूर्वें बांधून टाकिलीं आहेत. म्हणून या नियमाप्रमाणें ( वेदाचें ) विशेष अर्थज्ञान झालेंच पाहिजे. यासाठीं जैमिनी सूत्रांचें अध्ययन करावें.

( ३ ) विश्वजिन्न्यायाप्रमाणें वेदाचें अध्ययन केलें म्हणजे स्वर्ग प्राप्त होतो, असें म्हणणें वाजवी नाहीं; कारण ‘ वेदाचें अर्थज्ञान ’ होणें हें जर दृष्टफल प्राप्त होत आहे, तर अदृष्टफलाची ( स्वर्गप्राप्ति ) कल्पना करूं नये. अशा

कामीं विधीला नियमाचें स्वरूप आलें तरी विधीला कांहीं बाधा होत नाहीं.

( ४ ) आतां पूर्वपक्ष असें प्रतिपादन करील कीं वेदाध्ययनाच्या बरोबर वेदाच्या अंगाचेंहि अध्ययन होतें. शिक्षा, व्याकरण व निरूक्त या तीन वेदांगांचें अध्ययन झाल्यावर वेदार्थ सहज समजूं लागेल. तर मग विचारशास्त्राचा ( जैमिनीसूत्रांचा ) आणखी अभ्यास कशाला करावयास हावा ! तें शास्त्र शिकण निरर्थक आहे. हें पूर्वपक्षाचें म्हणणें असमंजसपणाचें आहे. कारण व्याकरणादि वेदांगें शिकून आपलें कार्य होत नाहीं. वेदवाक्यांमध्यें बाध येतो, असें वाटलें, किंवा त्यांच्या अर्थाबद्दल शंका वाटूं लागली, तर विचारशास्त्रानेंच असल्या गोष्टींचा निर्णय होत असतो. उदाहरणार्थ अक्ताःशर्करा उपदधीत ( अक्त चोपडलेली अशी बारीक वाळू घालावी. ) असें वेदवाक्य आहे. याठिकाणीं ' अक्त कशानें ! तुपानें किंवा तेलानें ! ह्या गोष्टीचा निर्णय व्याकरणावरून किंवा निरूक्तावरून होणार नाहीं. विचारशास्त्राकडूनच ह्याचा निर्णय केला पाहिजे. अक्त म्हणजे तुपानें अक्त, तेलानें नव्हे; हा अर्थ विचारशास्त्राच्या साहाय्यानें समजतो. ' घृतं तेजः ' तूप हेंच तेज आहे. तेजस्वीपणा आणावयाचा असेल तर तुपाचाच उपयोग केला पाहिजे. यासाठीं तुपानेंच शर्करा तुळतुळीत कराव्यात असा अर्थ केला पाहिजे. अशा गोष्टीवरून जैमिनीचे शास्त्राचें अध्ययन करणें भाग आहे, हें सिद्ध होतें.

( ५ ) वेदाध्ययन झाल्यावर शिष्यानें आपल्या घरीं येऊन स्नात होऊन गृहस्थाश्रमी व्हावें ह्या स्मृतिवाक्याला शास्त्र शिकण्यांत वेळ घालविल्यामुळें, बाध येत नाहीं. वेदाचें अध्ययन संपल्याबरोबर कांहीं एक कालक्षेप न करतां, लागलीच समावर्तन करून लग्न करावें असा कांहीं ह्या स्मृतीचा ( वेदमधीत्य स्नायात् ) अर्थ नाहीं. ह्या दोन्ही कृत्यांत नैरंतर्य पाहिजे असें स्मृति सांगत नाहीं. अमुक मनुष्य स्नान करून जेवतो, ( स्नात्वा भुंक्ते ), असें म्हटलें म्हणजे, तो मनुष्य स्नान करतो आणि पानावर बसतो असा अर्थ नाहीं. स्नान केल्यावर संध्यावंदनादिकर्मांत त्याचा वेळ जातो. असाच ह्या स्मृतिवाक्याचा अर्थ केला पाहिजे.

या सर्व कारणांवरून जैमिनीशास्त्र शिकावें असा विधि आहे, हें सिद्ध झालें. कुमारिल भट्टाचार्यांच्या पद्धतीनें ह्या अधिकरणांतील हा सिद्धांत स्थापित झाला. प्रभाकरादि हाच सिद्धान्त दुसऱ्या रीतीनें सिद्ध करतात.

गुरु प्रभाकर या विषयाचा येणेंप्रमाणें विचार करतात. आश्वलायन गृह्य सूत्रांत ( १–१९–१ ) " अष्टवर्षं ब्राह्मणमुपनयीत तमध्यापयीत " आठ वर्षांच्या ब्राह्मण मुलाचें उपनयन करावें आणि त्याला शिकवावें, असें सांगितलें आहे. येथें अध्यापन करावें असा नियोग ( हुकूम, आज्ञा ) सांगितला आहे. आतां हुकूम दिला आहे कोणी ? तो हुकूम मानावा, त्या आज्ञेप्रमाणें कोणी वागावें ? म्हणजे

या नियोगाचा नियोज्य कोण ? असा प्रश्न उत्पन्न होतो. नियोगाला नियोज्य पाहिजे. वरच्या स्मृतिवाक्यांत क्रियापदांचीं आत्मनेपदि रूपें आहेत. ( उपनयीत, अध्यापयीत ) या रूपांवरून पाणिनीच्या सूत्राप्रमाणें ( १–३–३६ ) आचार्यच येथें नियोज्य आहे, म्हणजे आचार्यानें उपनयन व अध्यापन हीं दोन्ही कृत्यें त्यानें करावीत.

मुलाच्या अध्ययनावांचून आचार्याकडून होणारें अध्यापन सिद्धीस जाणार नाहीं. मुलगा शिकतच नाहीं, तर गुरुजी शिकविणार कसें! प्रयोजकाचें व्यापाराला प्रयोज्याचा व्यापार अवश्य झाला पाहिजे. वर सांगितलेल्या नियोगांत आचार्यानें शिकवावें, असें सांगितलें आहे, मुलानें शिकावें असा निराळा विधि सांगितला नाहीं. तेव्हां मुलगा शिकणारच नाहीं, असें म्हणणें चालणार नाहीं.—या शंकेंत अर्थ नाहीं.—कारण जरी अध्ययनाविषयीं निराळा विधिप्रयोग सांगितला नाहीं, तरी आचार्यानें अध्यापन करावें ह्या विधिप्रयुक्तीनें अध्ययनाचें अनुष्ठान झालें पाहिजे, असा अर्थ सिद्ध होतो; साक्षात् विधिवाक्य नसलें, तरी नित्य अनुवादानें ही गोष्ट सिद्ध होते. विधि असल्यावांचून अनुवाद यावयाचाच नाहीं. येथें अनुवाद आहे, तेव्हां विधि आहेच असें सिद्ध होतें. अध्यापन व अध्ययन ह्या दोन्ही अनुष्ठानांसंबंधानें विधिवाक्य आहे, असें समजून पूर्वींचे पूर्वपक्ष व सिद्धान्त हे निराळ्यारीतीनें येथें मांडतां येतील. 'विचारशास्त्र' हा वादाचा विषय होय.

हें शिकणें विधिप्रयुक्त आहे किंवा नाहीं, ही त्यावर शंका. विचारशास्त्राचा अभ्यास वैध आहे, म्हणजे तो विध्युक्त आहे, असें म्हणणारांस त्यांच्या प्रतिपक्षाचे लोक हा प्रश्न करतील. काय हो ! आचार्यानें जें मुलाचें अध्यापन करावयाचें तें त्या मुलाला वेदाचा अर्थ समजावून देऊन, त्याकडून अध्ययन करून घ्यावयाचें ? किंवा ( २ ) त्या मुलाकडून फक्त वेद पाठ करून घ्यावयाचा ? ह्या दोन गोष्टींपैकीं पहिली गोष्ट तर खास नाहीं. कारण मुलास वेदाचा अर्थ न शिकवितां आचार्यांकडून अध्यापन केलें जातें. वेद पाठ करून घ्यावा, येवढाच जर अध्यापनाचा अर्थ असेल तर मग ह्या विषयाचा विचार सुद्धां करावयास नको. कारण जेथें वेदाचा अर्थ मुळींच समजत नाहीं, तेथें त्या अर्थासंबन्धानें शंका येणार तरी कशी! शंका असल्यावर तिच्या निर्णयासाठीं विचारशास्त्राची मदत लागते. वेदाचें केवल पाठान्तर करण्यात अर्थबोध होत नाहीं. अर्थबोध न झाल्यामुळें त्याबद्दल शंका कधींच यावयाची नाहीं. शंका येत नाहीं म्हणून तिचा निर्णय करण्याचा प्रसंगहि येणार नाहीं. निर्णय करण्याची वेळच कधींहि येणार नसली, तर विचारशास्त्र शिकण्याची काय जरूरी आहे ? म्हणून दोन्ही पक्षीं विचार केला असतां, असें दिसून येतें कीं विचारशास्त्र हें वैध नाहीं, म्हणजे याचें अध्ययन करावें असें आम्हांस विधि सांगत नाहीं. हा पूर्वपक्षाचा वाद झाला. यावर सिद्धान्ती म्हणतात:—आचार्यानें अध्यापन करावें.

पण त्याच्या बरोबर वेदाचा अर्थ समजून द्यावा किंवा शिष्यानें तो समजून घेतलाच पाहिजे असें विधिवाक्य नाहीं, ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. परंतु शिष्यानें सर्व वेद पाठ करून त्या वेदांच्या अंगांचेंहि अध्ययन त्यानें केलें म्हणजे सामान्य ग्रन्थांचा जसा अर्थ समजतो त्याप्रमाणें शिक्षा व्याकरण निरुक्त ह्यांच्या साहाय्यानें त्याला वेदांचा अर्थ समजूं लागेल. यावर पूर्वपक्षकार अशी शंका घेतील कीं हा अर्थ समजतो तो केवळ शब्दांच्या मुख्यार्थावरून समजतो, तो वास्तविक अर्थ आहे असें होणार नाहीं. उदाहणार्थ "विष खा" असें आई मुलास एकदां म्हणाली ह्या वाक्याचा मुख्य उत्तान अर्थ जो आहे, तो कांहीं आईच्या मनांतील वास्तविक अर्थ नाहीं. अमक्याचे घरीं जेवण्यास जाऊं नकोस असा तिच्या मनांतील हेतु होता. तसेंच वेदाचा विवक्षित अर्थ कांहीं निराळाच असला तर केवळ शब्दार्थ समजण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. उलट नुकसानच होईल.वेदाचा बरोबर अर्थ समजणार नाहीं. आणि वास्तविक अर्थ न समजल्यामुळें, विचारशास्त्र व तें शिकण्याचें प्रयोजन ह्यांची अवश्यकता रहाणारच नाहीं. यावर सिद्धान्तवादी असें प्रतिपादन करतात कीं हा दृष्टान्त आणि दार्ष्टान्त यांत सादृश्य कांहीं एक नाहीं. आईसारखी मुलाची आप्त आपल्या मुलास विष खा असें म्हणते. तेव्हां तिच्या मनांतील विवक्षित अर्थ विष खाण्याहून कांहीं निराळाच असला पाहिजे हें स्पष्ट होतें. त्याप्रमाणें अपौरुषेय जे वेद त्यांचा मुख्य अर्थ तोच विवक्षित

अर्थ नाहीं, असें म्हणण्यास कांहीं कारण नाहीं. जो अर्थ आपल्यास समजतो तोच खरा अर्थ, असें समजलें पाहिजे. वेदाच्या ह्या विवक्षित अर्थाविषयीं एखाद्याला एखाद्या वेळीं कदाचित् शंका आली ( आणि अशी शंका येणें स्वाभाविक आहे. ) तर त्या शंकेचें निराकरण विचारशास्त्राकडूनच करून घेतलें पाहिजे. म्हणून विचारशास्त्र शिकणें अवश्य आहे. हा सिधान्त.

पूर्वमीमांसा हा ग्रन्थ एक मोठें विचारशास्त्र आहे. ह्याचें अध्ययन करणें सर्वस्वीं अवश्य आहे. हें ह्या पहिल्या अधिकरणांत सिद्ध केलें आहे. सर्व अधिकरणांत विषयांचें प्रतिपादन करण्याची पद्धति याचप्रमाणें असते. वेद पौरुषेय आहेत किंवा अपौरुषेय आहेत, या विषयाची चर्चा फार वेळ होत असते; मीमांसाकारांनीं वेदाचें अपौरुषेयत्व सिद्ध करण्यांत कसा बुद्धिवाद केला आहे, ह्याविषयीं थोडीशी माहिती असावी म्हणून त्या अधिकरणाचा सारांश पुढें दिला आहे. वेदाचें अपौरुषेयत्व हा या अधिकरणाचा विषय होय. वेद कोणीं तरी ( एकाद्या पुरुषानें ) रचले व सांगितले! किंवा कोणीहि ते रचिले नाहींत, ते स्वयंसिद्ध आहेत ( अपौरुषेय आहेत! ) ही शंका. नैयायिकांच्या मतें वेद हे पौरुषेय आहेत. मीमांसाकार वेद अपौरुषेय आहेत असें मानतात. नैयायिकांचा पूर्वपक्ष आहे. ते म्हणतातः—
( १ ) काय हो! कांहीं एक प्रमाण नसून तुम्ही वेद अपौरुषेय आहेत, असें कसें म्हणतां! अविच्छिन्न असा

संप्रदाय चालत आल्यामुळें ‘ आत्म्याचा ’ आदिकर्ता कोण ह्याची जशी आपल्यास स्मृति राहिली नाहीं, त्याप्रमाणेंच वेदाचा कर्ता कोण, हें आपल्यास स्मरत नाहीं, असें जर तुम्ही ( मीमांसाकार ) म्हणत असाल, तर तें म्हणणें यथार्थ नाहीं; कारण प्रलयकालीं वेदांच्या संप्रदायाचा विच्छेद होत असतो, असें आमचें ( नैयायिकांचें ) मत आहे म्हणून वेदाविषयीं अविच्छिन्न संप्रदाय नाहीं. ( २ ) वेदाच्या कर्त्याविषयीं आम्हास स्मरण नाहीं असें तुम्हीं म्हणतां, याचा अर्थ काय ? वेदाचा कर्ता आहे अशी तुमची समजूत होत नाहीं ( वाटत नाहीं. ) किंवा त्यांचा कोण कर्ता हें कोणाला आठवत नाहीं ( ठाऊक नाहीं )! पहिली गोष्ट अशक्य आहे. कारण ईश्वर हा वेदांचा कर्ता आहे, हें प्रमाणानें सिद्ध होत आहे. दुसरी गोष्ट वेदांचा कर्ता आठवत नाहीं. बरें! ही आठवण कांहींजणांस नाहीं? कां कोणा एकास सुद्धां सर्वांस ) नाहीं? कांहीं लोकांस आठवत नाहीं किंवा माहीत नाहीं, असें जर तुम्ही ( मीमांसाकार ) म्हणत असाल, तर तुमच्या मताप्रमाणें वेदांचेंच काय, पण दुसऱ्या अनेक ग्रन्थांसंबन्धानें अपौरुषेयत्व स्थापित होईल. उदाहरणार्थ “ यो धर्मशीलो जितमानरोषः इत्यादि ” ह्या चरणाचा कर्ता कोण, हें पुष्कळांना ठाऊक नसेल. म्हणून हा ग्रन्थहि अपौरुषेय होईल. आतां, कोणा एकालासुद्धां वेदाचा कर्ता माहीत नाहीं असें म्हटलें, तर हें म्हणणें मोठ्या धाडसाचें ठरेल! कारण सर्व लोकांचीं मनें, त्यांचीं मतें

व आठवणी ज्याला कळताहेत असा सर्वज्ञ मनुष्य असल्यावांचून त्याला असें विधान करतां येणार नाहीं, मनुष्यमात्रांत सर्वज्ञ तर कोणीच नाहीं. यावरून मीमांसाकारांचें मत स्थापित होत नाहीं. ( ३ ) वेदाचें पौरुषेयत्व अनुमानानें सिद्ध होतें. तें असें:—वेद हे पौरुषेय आहेत ( प्रतिज्ञा ), कारण ते वाक्यात्मक आहेत. जेथें जेथें वाक्यत्व असतें तेथें तेथें त्या वाक्यांचा कर्ताहि असावयाचाच. म्हणजे तीं वाक्यें पौरुषेय असतात. ( हेतु ) कालिदासादि कवींचे ग्रन्थ, हें याचें उदाहरण. वेद हे वाक्यें आहेत. ( उपनय ). म्हणून वेद हे पौरुषेय आहेत, हा सिद्धान्त ( निगमन ) .अशाच रीतीनें वेद हे प्रमाणभूत ग्रंथ आहेत असें सिद्ध करतां येईल. उदाहरणार्थ मन्वादिकांच्या स्मृती होत. ( ४ ) एकाद्या मुलानें वेदाध्ययन करण्यास आरंभ केला म्हणजे तो गुरूजवळ असतो. ह्या त्याच्या अध्ययनास आरंभ होण्याच्या अगोदर त्याच्या गुरूचें वेदाध्ययन झालें असलें पाहिजे, याप्रमाणें वेदाचे अध्ययनाची परंपरा अनादि कालापासून चालू असल्यामुळें आजमितीस जसें अध्ययन होत आहे तसेंच अनादिकालापासून तें होत आलें आहे, म्हणून वेद अपौरुषेय आहेत, असें जर मीमांसाकार म्हणतील तर त्यास आमचें ( नैयायिकांचें ) असें उत्तर आहे कीं हा कोटिक्रम योग्य नाहीं. कारण भारताच्या अध्ययनाचीहि अशीच अबाधित परंपरा आहे, असें आपल्यास सिद्ध करतां येईल. यावर मीमांसाकार असें म्हणतील

कीं भारताची अशी परंपरा असली तरी भारतग्रंथ व्यासानीं रचला आहे, असें स्मृतिवाक्य आहे म्हणून भारतग्रन्थ हा पौरुषेय आहे. यांस नैयायिकांचें उत्तर असें आहे. स्मृतीच्या आधारानें जर भारताचें पौरुषेयत्व सिद्ध होतें, तर वेदाच्याच आधारानें ते ईश्वरप्रणीत आहेत; म्हणजे पौरुषेय आहेत असें सिद्ध होईल. पुरुषसूक्तांत ( मं. १०-१-९० ) ऋच: सामानि जज्ञिरे, ह्या मंत्रांत ईश्वरापासून वेद निघाले असें अगदीं स्पष्ट सांगितलें आहे. यावर सिद्धान्तवादी मीमांसाकार नैयायिकास विचारतात. वेदांचें पौरुषेयत्व सिद्ध करण्याची तुमची इच्छा आहे, असें हें पौरुषेयत्व कोणतें? आपण दररोज वेद म्हणतों, त्याचें उच्चारण करतों, ह्या उच्चारणासंबंधानें वेदांचें पौरुषेयत्व तुमच्या मनांत सिद्ध करावयाचें, किंवा ( २ ) दुसऱ्या अनेक प्रमाणांनीं समजलेला अर्थ आपण जसा ग्रंथांत रचून प्रसिद्ध करतों, त्याच प्रमाणें वेद हे असेच ग्रथित आहेत, म्हणून त्यास पौरुषेयत्व आहे! आपण नेहमीं वेदाचें उच्चारण करतों तें पौरुषेय आहे, असें जर नैयायिकादि पौरुषेयत्ववादी लोकांचें म्हणणें असेल, तर त्यांच्या व आमच्या मतांत विरोध नाहींच, कारण त्या दृष्टीनें पाहिलें असतां वेद हे पौरुषेय आहेत, असें आम्हींहि कबूल करतों. २ त्यांच्या मतें वेद हे प्रमाणान्तरानें सिद्ध झालेल्या अर्थाचें प्रतिपादन करणारे असे ग्रंथ आहेत, असें जर त्यांचें म्हणणें असेल, तर कोणत्या प्रमाणाच्या आधारानें वेदांचें पौरुषेयत्व सिद्ध होतें अनुमानानें

किंवा आगमा ( वेदा ) वरून? अनुमानानें वेदाचें पौरुषे-यत्व सिद्ध होतें, असें जर म्हटलें तर त्या अनुमानांत व्यभिचरित हेतु होईल, म्हणजे खोटें अनुमान ठरेल. कारण असल्या अनुमानानें मालतीमाधवासारख्या काल्पनिक ग्रन्थास सुद्धां वेदाची योग्यता येईल. शिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांनीं जी गोष्ट सिद्ध होत नाहीं किंवा आपल्यास कळून येत नाहीं ती गोष्ट वेदावरून कळते, हें मत सर्वांस मान्य आहे. असें असून दुसऱ्या प्रमाणावरून सिद्ध झालेली वस्तू आपणास वेद सिद्ध करून देतात, असें म्हणण्यांत व्याघात उत्पन्न होतो. माझी आई वांझ आहे असें म्हणण्यासारखेंच हें म्हणणें आहे. परमेश्वरानें आपल्या लीलेनें देह धारण करून वेद उत्पन्न केले असें म्हटलें तर, देहाबरोबर त्याचे सर्व उपाधि येतात आणि इंद्रियें आपापलींच कामें करतील. म्हणून ईश्वराच्या शरीरांतील इंद्रियांना आपापल्या कार्याशिवाय दुसऱ्या इंद्रियांचें कार्य करतां येईल असें कधीं होणार नाहीं, किंवा त्याला अतीन्द्रियज्ञान होईल असेंहि होणार नाहीं. म्हणून ईश्वर वेदांचा कर्ता असें होणार नाहीं. पाणिनीच्या 'तेनोक्तम्' ( ४-३-१०१ ) या सूत्राप्रमाणें काठ, कापल, तैत्तिरीय या शब्दांचा अर्थ काठ कपल, तित्तिर यांनीं केलेले ग्रन्थ असा करूं नये, परंतु त्यांनीं त्या त्या विषयांची व्यवस्था लावली असा अर्थ होतो; याचप्रमाणें पुरुषसूक्तांतील ' ऋचः सामानि ' या मंत्राची व्यवस्था लावली पाहिजे. म्हणून आगमावरून सुद्धां वेद पौरुषेय आहेत असें सिद्ध होत नाहीं. हा सिद्धान्त.

याप्रमाणें वैदिक विषयांच्या शास्त्रार्थांचा विचार जैमिनीनीं ९०७ ( ९१५? ) अधिकरणांत केला आहे. पूर्वमीमांसेत एकंदर सूत्रसंख्या २७४५ आहे, हें पूर्वी सांगितलें आहे. जैमिनीप्रमाणें दुसऱ्या ऋषींनीं असल्या विषयांची मीमांसा केलीं असावी. म्हणजे त्यांनीं असलीं विचारशास्त्रें लिहिलीं असावींत, कारण जैमिनीचे मीमांसाग्रन्थांत त्याचा उल्लेख येतो. पूर्वमीमांसा शास्त्रावर 'उपवर्षांनीं' वृत्ति केली आहे. हे उपवर्षाचार्य नन्दाचें राज्य चालू असतां होते. शबरस्वामींचें मीमांसेवर मोठें भाष्य आहे. हर्षवर्धन राजाच्या लिंगानुशासन ग्रन्थावर व्याख्या लिहिणारे, भट्टदीप्ताचे पुत्र शबरस्वामी व मीमांसाभाष्य करणारे शबरस्वामी, हे दोघे एकच किंवा कसें, हें मात्र निश्चयानें सांगतां येत नाहीं. कुमारिल भट्टाचार्यांनीं याच ग्रंथावर वार्तिक लिहिलें आहे. कुमारिलभट्ट शंकराचार्यांचे समकालीन होत, ह्या वार्तिकाला अनुसरून पार्थसारथिमिश्रांनीं शास्त्रदीपिका नांवाचा ग्रन्थ प्रसिद्ध केला आहे. याप्रमाणें वेळोवेळीं अनेक ग्रन्थ पूर्वमीमांसा ग्रन्थावर झालेले आहेत. ह्या दर्शनाचा सारांश सर्वांस सहज समजावा म्हणून माधवाचार्यांनीं सोप्या भाषेंत आणि थोडक्यांत असा 'जैमिनीन्यायमाला' या नांवाचा ग्रन्थ लिहिला आहे. यास मीमांसाधिकरणमाला असेंहि नांव आहे. माधवाचार्य हे बुक्क राजाचे मंत्री होते ( इ. स. १३७५—पुढें ).

# उत्तरमीमांसा.

धर्म, अर्थ, काम, व मोक्ष, ह्या चार पुरुषार्थांची प्राप्ति होण्यास वेदाच्या अर्थाचें ज्ञान होणें अगदीं अवश्य आहे कर्म, उपासना आणि ज्ञान हीं पुरुषार्थप्राप्तीचीं साधनें होत. पूर्वमीमांसेंत वैदिक कर्मासंबन्धानें विचार केला आहे. उत्तरमीमांसेंत केवळ ज्ञानमार्गाचें प्रतिपादन केलें आहे. जीव व शिव ( म्हणजे ब्रह्म ) ह्यांत ऐक्य आहे. ह्या दोन निराळ्या वस्तू नाहींत. दोन्ही एकच, अशी मनाची पक्की खात्री होणें व ही प्रतीति मनांत बरोबर बिंबून रहाणें, यास ज्ञान म्हणतात. असल्या ज्ञानाचा विचार उत्तरमीमांसेंत केला आहे, म्हणून ह्या मीमांसेस शारीर ( ब्रह्म ) मीमांसा किंवा ब्रह्ममीमांसा असेंहि म्हणतात. यांतील सूत्रांचा कर्ता व्यासमुनि आहेत, म्हणून वैयासिकी मीमांसा असेंहि उत्तर-मीमांसेचें नांव आहे. उपनिषदें हीं वेदांच्या शेवटच्या भागांत अन्तीं सांगितलीं आहेत, म्हणजे तीं वेदांचा अन्त आहेत, म्हणून त्यांस वेदान्त म्हणतात. उपनिषदांच्या आधारावरून हा ग्रंथ लिहिला असल्यामुळें, आणि त्यांत उपनिषदांच्या तत्त्वार्थाचें प्रतिपादन असल्यामुळें, ह्या ग्रन्थास वेदान्तमीमांसा असें कोणी म्हणतात. हा ग्रन्थ सूत्रात्मक आहे. हीं सूत्रें बादराय-णांनीं केलीं आहेत म्हणून त्यांस बादरायणसूत्रें असें नांव आहे. वेदान्तसूत्रें, किंवा ब्रह्मसूत्रें या नांवानींहि त्याची प्रसिद्धि आहे. उत्तरमीमांसेचे चार अध्याय आहेत. प्रत्येक

अध्यायांत चार चार पाद आहेत. प्रत्येक पादांत सूत्रें व अधिकरणें असतात. या ग्रन्थांत एकंदर ५५५ सूत्रें व १९२ अधिकरणें आहेत. अधिकरणांची संख्या अद्वैतमतास अनुसरून दिली आहे. विशिष्टाद्वैत द्वैत इत्यादि मतांप्रमाणें अधिकरणांत कमीजास्ती सूत्रें येतात, त्यामुळें अधिकरणांची संख्या कमीजास्त होते. उदाहरणार्थ पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादांतील दुसरें व तिसरें सूत्र ( जन्माद्यस्य यत: ॥ २ ॥ शास्त्रयोनित्वात् ॥ ३ ॥ ) या प्रत्येकाचेंच एक एक अधिकरण आहे, असें अद्वैतमतवादी समजतात. परंतु वल्लभाचार्यांच्या मताप्रमाणें, हीं दोन्ही सूत्रें मिळून एकाच अधिकरणाची व्यवस्था लावतां येते. तसेंच ह्याच पादांतील अद्वैतमताप्रमाणें दहाव्या अधिकरणास २४–२७ सूत्रांची जरूरी आहे. मध्वाचार्य एकट्या २४ व्या सूत्रावरच आपलें एक अधिकरण स्थापित करतात.

(१) पहिला समन्वय अध्याय; यांत सर्व वेदान्तवाक्यांचा तात्पर्यार्थ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतानें, प्रत्यगभिन्न, अद्वितीय असें जें ब्रह्म त्याजकडेसच जातो, असें प्रतिपादिलें आहे. म्हणून या अध्यायास समन्वय अध्याय असें म्हणतात. पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादांत स्पष्ट ब्रह्मलिंग अशीं जीं वाक्यें आहेत त्यांचा विचार केला आहे. दुसऱ्या पादांत अस्पष्टलिंग, उपास्यब्रह्म या विषयींच्या वाक्यांची मीमांसा आहे. तिसऱ्या पादांत अस्पष्टलिंग ज्ञेयब्रह्म संबंधीं वाक्यांचा विचार केला आहे. याप्रमाणें पहिल्या तीन पादांत सर्व

वाक्यांचा विचार करून चवथ्या पादांत मुख्य विषया-संबंधीं **अव्यक्ता, अजा,** इत्यादि जीं संदिग्ध पदें आहेत, त्यांचा विचार केला आहे. पहिल्या अध्यायांत एकंदर १३४ सूत्रें व ३९ अधिकरणें आहेत. ह्या अध्यायांत सर्वज्ञ सर्वेश्वर ह्या जगताचें उत्पत्तिकारण आहे, असें प्रतिपादन केलें आहे. मृत्तिका,सुवर्ण इत्यादि जशीं घट, अलंकार इत्यादिकांचीं उत्पत्तिकारणें असतात,त्याच प्रमाणें सर्वेश्वर जगाचें उत्पत्तिका-रण आहे. ह्या जगाचा तो नियंता असल्यामुळें त्याचें स्थितिकारणहि तोच आहे. योनिज अण्डज इत्यादि चार प्रकारच्या सृष्टीचा उपसंहार किंवा लय जसा पृथ्वींत होतो त्याच प्रमाणें सर्व जगताचा लय ईश्वरांत होतो. तोच आपल्या सर्वांच्या शरीरांतील आत्मा होय. ह्या उपनिषदवाक्यांचा ( वेदान्ताचा ) समन्वय पहिल्या अध्यायांत लाविला आहे आणि अद्वितीय ब्रह्म सिद्ध केलें आहे.

२ अविरोधाध्याय असें दुसऱ्या अध्यायाचें नांव आहे. या अध्यायांत स्मृति व न्याय इत्यादिकांकडून येणाऱ्या ( वेदान्तमतांस ) विरोधाचा परिहार केला आहे. या अध्यायाचे पहिल्या पादांत सांख्य, योग, कणादमत, इत्यादि-कांनीं वेदान्तवाक्यांवर आणलेल्या विरोधाचा परिहार केला आहे. विलक्षणत्वादि सर्व दोष काढून टाकिले आहेत. ( सूत्रें ३७ अधिकरणें १३ ). दुसऱ्या पादांत सांख्यादिमतांत दोष आहेत ते दाखविले आहेत, कारण, स्वपक्षाचें मंडन करून स्थापना करणें, येवढेंच पुरें होत नाहीं. परपक्षांत दोष कोणते

आहेत ते दाखवून त्या पक्षांचें खण्डन केलें पाहिजे, म्हणजे आपल्या मतांस दृढता येते. ( सूत्रें ४५ , अधिकरणें ८ ). तिसऱ्या पादाच्या पूर्वार्धात पंचमहाभूतादिकांच्या सृष्टीसंबंधानें जीं श्रुतिवाक्यें आहेत, त्यामध्यें दिसून येणाऱ्या परस्परविरोधाचें निरसन केलें आहे. जीवात्म्याविषयीं श्रुतिवाक्यांतील परस्परविरोध ह्याच पादाच्या उत्तरार्धात काढून टाकला आहे. ( सूत्रें ५३. अ. १७ ). चवथ्या पादांत लिंगशरीर किंवा इंद्रियें यांच्या संबंधीं श्रुतिवाक्यामध्यें असणाऱ्या परस्परविरोधाचा परिहार केला आहे. ( सूत्रें. २२. अ. ९ ) याप्रमाणें ह्या अध्यायांत स्मृति, सांख्य, योग, कणादमत, न्याय इत्यादिमतांकडून येणाऱ्या विरोधाचा परिहार केला आहे, आणि ह्या परपक्षांची वेदान्त विषयांस अपेक्षा नाहीं, असें सिद्ध केलें आहे. तसेंच श्रुतिवाक्यांतील विप्रतिषेध म्हणजे परस्परविरोध जो दिसून येतो, तो वस्तुतः नाहीं, असें सिद्ध करून दाखविलें आहे. जीवाहून व्यतिरिक्त असणारीं तत्वें, जीं जीवाचीं उपकरणें होतात, तीं सर्व ब्रह्मापासूनच उत्पन्न झालीं आहेत, असेंहि या अध्यायांत सांगितलें आहे. ह्या अध्यायांत एकंदर १५७ सूत्रें आणि ४७ अधिकरणें आहेत.

३ तिसरा साधनाध्याय—या अध्यायांत ब्रह्मविद्येच्या साधनांविषयीं सामान्यतः विचार केलेला आहे. उपकरणें असलेल्या जीवाची संसारांत गति कशी होते, तिचे प्रकार,

मुमुक्षूच्या जीवाच्या अनेक अवस्था, ब्रह्मस्वरूपा ( **तत्त्वमसि** ) चा विचार, पराऽपरा विद्या, विद्येचे भेदाभेद, गुणांचा उपसंहार व अनुपसंहार, सम्यग्दर्शनापासून पुरुषार्थाची सिद्धि होते, सम्यग्दर्शन प्राप्त होण्याचे उपायविधि, त्यांचे भेद, मुक्तिफलाचे नियम इत्यादि विषयांचा विचार व प्रसंगोपात्त दुसरे कांहीं आलेल्या विषयांचा ह्या अध्यायांत विचार केला आहे. पहिल्या पादांत जीवाचें परलोकांत गमनागमन सांगून वैराग्याचें प्रतिपादन केलें आहे. ( सू. २७ अ. ६ ). दुसऱ्या पादांतील पूर्वार्धात ' **तत्त्वमसि** ' या श्रुतिवाक्यांतील ' **त्वम्** ' ह्या पदाच्या अर्थाचा विचार करून तो स्थापित केला आहे. उत्तरार्धात ' **तत्** ' ह्या शब्दाच्या अर्थाचें संशोधन केलें आहे. ब्रह्म काय आहे, ही गोष्ट समजून घ्यावयाची असते, ह्मणजे ब्रह्म हें विज्ञेयवस्तु आहे. या विज्ञेयब्रह्माच्या तत्त्वाची व्याख्या या पादांत केली आहे. ( सू. ४१. अ. ८ ). तिसऱ्या पादांत, अनेक वेदशाखांमध्यें निर्गुण ब्रह्मासंबंधी आलेल्या पुनरुक्तपदांचा गुणोपसंहार केला आहे, आणि प्रसंगानुरोधानें सगुण व निर्गुण विद्येच्या संबंधीं अनेक शाखांत आलेल्या गुणोपसंहार व गुणाननुपसंहार यांचें निरूपण केलेलें आहे. आहे. ( सू. ६६. अ. ३६ ). चवथ्या पादांत, निर्गुण ब्रह्मविद्येचीं बहिरंगसाधनें व अन्तरंगसाधनें यांचें निरूपण आहे. आश्रमधर्म, यज्ञादिकर्में, हीं बहिरंगसाधनें होत. शम, दम, निदिध्यासन इत्यादि अन्तरंगसाधनें आहेत.

( सू. ५२. अ. १७ ). या अध्यायांत एकंदर सूत्रें १८६ आहेत, आणि अधिकरणें ६७ आहेत.

४ चवथा फलाध्याय—यांत सगुण व निर्गुण विद्येच्या विशेष फलांचा निर्णय केला आहे. पहिल्या पादांत श्रवण, मनन, इत्यादि साधनांच्या अभ्यासानें ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर जिवंत असणाऱ्या मनुष्यास पाप, पुण्य, क्लेश इत्यादिकांचा लेप होत नाहीं, आणि तो मनुष्य जीवन्मुक्त होतो, असें सांगितलें आहे. जीवन्मुक्ति येथें सांगितली आहे. ( सू. १८. अ. १४ ). दुसऱ्या पादांत, मेल्यावर उत्क्रमण किंवा उत्क्रान्ति कशी होते याचा प्रकार वर्णिला आहे. ( सू. २१. अ. ११ ). तिसऱ्या पादांत, सगुण ब्रह्माचें ज्ञान झालेला पुरुष किंवा त्याचा उपासक, हा मेल्यावर त्याचा उत्तर मार्ग कोणता व कसा असतो, हें सांगितलें आहे. ( सू. १६. अ. ३ ). चवथ्या पादाच्या पूर्व भागांत निर्गुण ब्रह्मज्ञान झालेल्या मनुष्यास विदेह-कैवल्याची प्राप्ति होते, असें सांगितलें आहे. उत्तर भागांत सगुणब्रह्मोपासकांना ब्रह्मलोकांत स्थान मिळतें, असें सांगितलें आहे. ( सू. २२. अ. ७ ). या अध्यायांत एकंदर सूत्रें ७७ आणि अधिकरणें ३८ आहेत.

ब्रह्मसूत्रें हा ग्रन्थ गुरुमुखावांचून किंवा टीकांचें साहाय्य न घेतां समजण्यास फार बिकट आहे. किंबहुना त्यांचा अर्थ समजणें शक्यच नाहीं. ह्या ग्रन्थावर फार जुनें असें

बौध्यायनाचें भाष्य आहे. हा ग्रन्थ सध्यां उपलब्ध नाहीं. रामानुजांचें भाष्य ह्या बौध्यायन ग्रन्थाला धरून केलेलें आहे, अशी समजूत आहे. ब्रह्मसूत्रांवर सध्यां चार मोठीं सुप्रसिद्ध भाष्यें आहेत. मध्व, रामानुज, वल्लभ आणि शंकर या विख्यात आचार्यांनीं हीं चार भाष्यें आपापल्या मतांप्रमाणें केलीं आहेत. शंकराचार्यांचें भाष्य त्यांच्या युक्तिवादाच्या कौशल्यामुळें, व मायावादाच्या योगानें सर्व भाष्यांचा मेरुमणि असें मानिलें जातें. आचार्यांच्या पुढें जे कांहीं अद्वैत वेदान्तावर ग्रन्थ झाले, त्या सर्वांची भिस्त मायावादावरच आहे. वेदान्तपारिभाषा, वेदान्तसार, योगवाशिष्ठ, पंचदशी, संक्षेपशारीरिक, शास्त्रदीपिका इत्यादि अनेक लहान मोठे ग्रन्थ वेदान्तावर झालेले आहेत. हे केवळ आचार्यांच्या मताचे आहेत. दुसऱ्या भाष्यकारांचे मतानुयायी असेहि अनेक ग्रन्थ आहेत. ते असेच महत्त्वाचे आहेत. त्या मतांचें सार येथें देतां येत नाहीं. केवल अद्वैतमताचाच सारांश पुढें दिला आहे.

उत्तरमीमांसेंतील मुख्य विषय ' ब्रह्म काय आहे ' हा आहे. पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादाचे पहिल्या सूत्रांतच हा विषय सांगितला आहे. " **अथातो ब्रह्मजिज्ञासा** ब्रह्मविषयक ज्ञान करून घेण्याची इच्छा. ब्रह्म म्हणजे काय हेंच त्यांतील पहिलें व मुख्य अधिकरण होय. अधिकरण शब्दांचा अर्थ पूर्वमीमांसेंत सांगितला आहे. कोणत्याहि एका विषयाचें पूर्ण प्रतिपादनास अधिकरण म्हणतात. विषय,

विषयावर शंका, शंकेमुळें त्या विषयाचा पूर्वपक्ष, पूर्वपक्षाचें खंडन करून विषयाविषयीं सिद्धान्त स्थापणें, आणि या सर्वांची संगति लावून देणें, या पांच भागांचें एक अधिकरण होतें. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ति, शब्द (वेद) आणि अभाव हीं सहा प्रमाणें जैमिनींस जशीं मान्य आहेत, तशींच तीं बादरायणांस मान्य आहेत. पूर्व मीमांसेच्या मताप्रमाणें यांच्या मतेंहि वेद अनादि आहेत व शब्द नित्य आहे. वेद हे जणूं काय ब्रह्माचें निश्वसित (श्वासोच्छ्वास) आहेत अशा दृष्टीनें वेदान्ती वेदांचें नित्यत्व मानतात.

वेदान्तासारख्या गहन विषयाची म्हणण्यासारखी माहिती येथें करून देणें अगदीं अशक्य आहे. तथापि स्थूलमानानें तरी त्या विषयाची दिशा कळावी, म्हणून चतुःसूत्रीचा ( पहिल्या अध्यायाचे पहिल्या पादांतील पहिल्या चार सूत्रांचा ) सारांश येथें दिला आहे. यावरून त्या विषयाबद्दल थोडीशी तरी कल्पना करतां येईल. आरण्यकें व उपनिषदें त्यांवर बादरायणाचार्यांचीं ब्रह्मसूत्रें आणि ह्या सूत्रांवर शंकराचार्यांचें भाष्य, हीं जीं वेदान्त मताचीं तीन स्वरूपें, त्यांत त्या मतासंबंधानें सर्वतोपरी अबाधित अशी परंपरा चालत आली आहे, आणि वेदान्तमतांचें मंडण एकाच पद्धतीनें झालें आहे असें ह्मणतां येणार नाहीं. कारण वेळोवेळीं ह्या मतावर जे आक्षेप आले, त्यांचें निरसन करण्यास निरनिराळे युक्तिवाद उपस्थित होऊन त्या वादांत वेदान्तमताचा विकास अधिक अधिक

होत गेला असावा. शंकराचार्यांनीं मायावादाची स्थापना करून त्याच्यायोगानें वेदांतमतावर येणारे आक्षेप दूर केले आहेत. आचार्यांच्याच मायावादावर पुढले वेदांत ग्रंथ रचले गेले आहेत, आणि आचार्यांच्या मताचें प्राबल्य झाल्यामुळें तेंच मत आतां बहुमान्य झालें आहे.

प्रकाश व अंधकार ह्या दोन वस्तू एके ठिकाणीं कधींहि असावयाच्या नाहींत. त्याचप्रमाणें मीं व तूं हे दोन शब्द एकाच वेळीं एका व्यक्तीचा बोध कधींहि करणार नाहींत. अगदीं भिन्न अशा दोन व्यक्ति दाखविणारे हे दोन शब्द आहेत. ह्याच कारणास्तव 'दृक्' व 'दृश्य' किंवा 'विषयी' आणि 'विषय' ह्या अगदीं भिन्न वस्तू आहेत. ह्यांचा एकमेकांत अभाव असतो. म्हणजे विषयी किंवा त्याचे धर्म, विषयांत व विषयधर्मांत असूं शकणार नाहींत. किंवा याचे उलट विषय आणि त्याचे धर्म विषयी व विषयीधर्मांत असणें अशक्य आहे. यासाठीं चिदात्मारूपी जो विषयी त्याचा व त्याच्या धर्मांचा अध्यास विषयावर व त्याच्या धर्मांवर होणें, किंवा विषयांचा व विषयधर्मांचा अध्यास विषयीवर होणें—ह्मणजे विषयी विषय आहे, किंवा विषय, विषयी आहे असा अवभास ( मनाची समजूत ) होणें, ही गोष्ट असंभवनीय आहे, असें स्पष्ट दिसून येईल, हें अगदीं साहजिक आहे. असें असूनहि, व्यवहारांत ह्या दोन गोष्टींत ( विषयी व विषय, धर्मी व धर्म ) विवेक न करतां आल्यामुळें, एकमेकांवर एकमेकांचा

अध्यास होत असतो. एखाद्या दोन गोष्टी घेतल्या असतां, त्यामध्यें वस्तुतः ऐक्य किंवा साम्य नसतांहि, ही एक वस्तू ती आहे, किंवा ती वस्तू ती हीच, असा समज होत असतो. ह्याप्रमाणें सत् व असत् यांस एकमेकांत मिसळून टाकून त्यापासून होणाऱ्या मिथ्याज्ञानावर सर्व नैसर्गिक लौकिकव्यवहार चालू असतात. ‘ हा मी,’ ‘ हें माझें,’ ‘ एका चंद्राचे दोन तीन चंद्र दिसतात.’ ‘ आकाश निळें असतें.’ ( इत्यादि ). याप्रमाणें आपण नेहमीं बोलत असतों व आपला असाच व्यवहार चालला असतो.

‘अध्यास होतो’ असे शब्द वर आले आहेत, तर ह्या अध्यास शब्दाचा अर्थ तरी काय? असें पुष्कळ लोक विचारतात. पूर्वीं पाहिलेल्या आणि स्मरणांत असलेल्या एखाद्या वस्तूचा अवभास त्या वस्तूहून निराळ्या असणाऱ्या वस्तूवर होणें, यास अध्यास म्हणतात. अन्तरावर असलेलें झाडाचें खोड हें मनुष्य आहे, असें वाटणें; स्वच्छ शिंप रुप्यासारखी भासणें; चंद्र एकच असतां ते अनेक दिसणें; पाण्यांत गति उत्पन्न करणारा वेग एकच असतो, परंतु त्याच्या अनेक लाटा दिसतात. चित्रपटावर अनेक देखाव्यांचा ( Perspective ) भास होणें, निरभ्र आकाश निळें दिसणें इत्यादि अध्यासाचीं उदाहरणें होत. अशा रीतीनें सत् व असत्, वस्तु व अवस्तु, किंवा चेतन व अचेतन यांचा एकमेकांवर अध्यास होत असतो. वेदां-

तांतील अनेक मतवादी लोकांची अध्यासाविषयीं व्याख्या निरनिराळी आहे. तथापि त्या सर्वांमध्यें मुख्य मुद्यासंबंधानें एकवाक्यताच आहे. कोणत्याहि एकाद्या वस्तूच्या धर्मांचा आरोप दुसऱ्या वस्तूवर करणें, ही गोष्ट सर्वांस मान्य आहे. म्हणून सामान्यतः अध्यासाचें लक्षण हेंच आहे असें मानलें तरी हरकत नाहीं.

आतां एका वस्तूचा अध्यास किंवा आरोप दुसऱ्या वस्तूवर होतो, ही गोष्ट खरी, परंतु ज्या वस्तूवर अध्यास व्हावयाचा असतो, ती वस्तू आपल्या इंद्रियास गोचर असली पाहिजे. ती आपल्या पुढें असली पाहिजे. नाहीं तर त्या वस्तूवर आरोप होणार नाहीं. चिदात्मा हा इंद्रियातीत आहे. कोणत्याहि इंद्रियास तो गोचर नाहीं, ह्यासाठीं त्याच्यावर अध्यास होणें शक्य नाहीं.---अशी शंका घेण्यास कारण नाहीं. चिदात्मा हा कधींहि कोणास गोचर नाहीं. कोणाचाच तो विषय नसतो, अशी वस्तुस्थिति नाहीं. चिदात्मा हा अस्मत्प्रत्ययाचा ( मी, मी, ) विषय असतो. आणि तो अपरोक्ष आहे, म्हणजे स्वयंप्रकाश आहे. त्याच्या अस्तित्वाची जाणीव किंवा भान सर्वांस असतें. ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. शिवाय ज्या वस्तूवर अध्यास होण्याचा असतो ती वस्तु आपल्या पुढें ( इंद्रियगोचर ) असलीच पाहिजे, असा कांहीं नियम नाहीं. कारण आकाश हें इंद्रियगोचर नसूनहि तें धूसर आहे; स्वच्छ आहे, ( इत्यादि ), असें लोक म्हणत असतात. ह्या कारणावरून चिदात्म्यावर

अनात्म ( बुद्धि, अहंकार इत्यादि ) वस्तूंचा अध्यास झाला असतां त्यांत विरोध किंवा विसंगतता कांहीं एक असणार नाहीं. चिदात्म्यावर अनात्म्याचा अध्यास होण्यास कांहीं हरकत नाहीं. अनात्म्याचा आत्म्यावर हा जो अध्यास असतो त्याला पंडित लोक 'अविद्या' असें म्हणतात. ह्या आरोपित धर्माचा ( अविद्येचा ) विवेकानें नाश करून वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान करून घेणें, तें बरोबर ओळखणें, त्या स्वरूपाची प्रतीति—अवधारण—होणें, ह्यालाच 'विद्या' म्हणतात. अध्यस्त वस्तूच्या गुणानें किंवा दोषानें आत्मा संबद्ध होत नाहीं.

आत्मा व अनात्मा ह्यांच्या एकमेकांवर होणाऱ्या अध्यासाला 'अविद्या' असें नांव दिलें आहे; याच अविद्येचा आश्रय करून सर्व लौकिक आणि वैदिक प्रमाण व प्रमेय यांचे व्यवहार चालू असतात. त्याचप्रमाणें सर्व शास्त्रें त्या अविद्येवर अवलंबून असतात. कर्माच्या विधि किंवा निषेधाविषयीं हीं शास्त्रें असोत किंवा मोक्षाविषयीं तीं असोत. सर्व शास्त्रें अविद्यामूलक आहेत. प्रत्यक्षादि प्रमाणें आणि शास्त्रें हीं अविद्यावद्विषय कशीं असतील, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं. कारण, देह, इंद्रिय, इत्यादि विषयांवर ममता, व अहंता बसून मीं माझें असा अभिमान उत्पन्न झाला नाहीं, तर मनुष्याला एकाद्या वस्तूविषयीं ज्ञान मिळवून घेण्याची इच्छाच होणार नाहीं. म्हणजे, त्याच्या अंगीं प्रमातृत्व येणार नाहीं, आणि प्रमातृत्व नसल्यावर प्रमाणांची प्रवृत्तिहि चालू रहाणार नाहीं. प्रमाता

(ज्ञान मिळविणारा) असला तरच प्रमाणांचा उपयोग होणार, नाहींतर प्रमाणें प्रवृत्त होणारच नाहींत. प्रत्यक्षादि प्रमाणांचा व्यवहार किंवा प्रवृत्ति इंद्रियांवाचून होणें अशक्य आहे. इंद्रियांस एकादें अधिष्ठान असल्यावांचून इंद्रियांचा व्यापार कधींहि संभवणार नाहीं. ज्या देहावर आत्मभावाचा अध्यास झालेला नाहीं, अशा देहाच्या साहाय्यानें कोणीहि व्यापार करणारा नाहीं. त्याचा व्यापार चालू असणें हें अशक्यच आहे. वर सांगितलेल्या सर्व गोष्टी नसल्या तर असंग असा असणाऱ्या आत्म्याला प्रमातृत्व येणार नाहीं, आणि ह्यामुळें प्रमाणांची प्रवृत्ति व्हावयाची नाहीं. म्हणून प्रत्यक्षादिप्रमाणें आणि शास्त्रें अविद्यामूलक आहेत. अध्यासाशिवाय त्यांचा व्यापार चालत नाहीं.

पशूंसारखेच पुरुषांचे प्रत्यक्षादि व्यवहार चालत असतात. एखाद्या प्रत्यक्ष विषयाचें प्रतिकूल ज्ञान (वेदना) झालें असतां, त्या विषयापासून पशु परावृत्त होतात, अनुकूल ज्ञान झालें तर त्या विषयाकडे जातात. ह्याच प्रमाणें मनुष्याची स्थिति आहे. काठी उगारून गाईकडे गेलें असतां गाय पळून जाते. हिरवा चारा किंवा अंबोण हातांत घेऊन उभें राहिलें तर गाय धांवत आपल्याकडे येते. हाच प्रकार मनुष्यांचा आहे. फायद्याचे गोष्टीकडे ते धांव घेतात. नुकसानाच्या बाबीकडे पहात सुद्धां नाहींत. पशूंच्या असल्या व्यवहारांत विवेक नसतो ही गोष्ट अगदीं प्रसिद्ध आहे. व्युत्पन्न लोकांचे व्यवहार आणि पशुव्यवहार ह्यांमध्यें तत्काल साम्य

असल्यामुळें पुरुषव्यवहारहि विवेकरहित असतात, असा निश्चय होतो.

पुरुषांचें प्रत्यक्षादि प्रमाणव्यवहार अविद्यामूलक असतील, परंतु शास्त्रीय व्यवहारहि अविद्यामूलक आहेत, असें म्हणणें ठीक होणार नाहीं. कारण कर्म करणारा व त्याचें फल भोगणारा हा देहादिकांहून निराळा आहे. अशी समजूत असल्याशिवाय स्वर्गोपभोगासारखें फळ मिळविण्याची इच्छा कोणी करणार नाहीं. इहलोकींच देह मरणानंतर नाहींसा झाल्यावर स्वर्गोपभोग घेणारा असा देहाच्या व्यतिरिक्त कोणी तरी असला पाहिजे. तो आत्मा होय. देहापासून तो निराळा आहे. अशी समजूत असते. म्हणूनच मनुष्य शास्त्रविहित कर्म करतो. ह्यावरून असें दिसून येईल कीं आत्म्यावर अध्यास नसतो; व शास्त्रीयकर्में अविद्यामूलक नसतात. हा पूर्वपक्ष झाला. ह्या शंकेवर समर्पक उत्तर देतात तें असें:—देहाहून आत्मा निराळा आहे ही बुद्धि कर्म करणारांस असते ही गोष्ट खरी आहे. परंतु हा आत्मा निर्लेप असतो असें मात्र नाहीं. क्षुधा, तृष्णा, फलोपभोगाची इच्छा, वर्णाश्रमाचा अभिमान वगैरे गोष्टींचा त्या आत्म्याला लेप असतो; यांचा त्यावर अध्यास असतो. वेदविहित कर्म करण्याकरितां वेदान्तवेद्य जो शुद्धबुद्ध निसंग आत्मा, त्याची अपेक्षा नसते. कारण वेदान्तवेद्य आत्मा हा शास्त्रीयकर्मांच्या उपयोगी नाहीं व तशा आत्मज्ञानानें कर्मास विरोध मात्र येईल. कर्म करावयाचें, तें फलोपभोगाच्या हेतूनें करावयाचें असतें. म्हणून

कर्तृत्व व भोक्तृत्व ह्या वृत्ति कर्म करणाऱ्यांत जागृत पाहिजेत. त्यांचा अध्यास आत्म्यावर असला पाहिजे; नाहीं तर कर्म कां करावें, हेंच समजणार नाहीं. आत्मा जर असल्या धर्मांनीं संबद्ध नसेल म्हणजे अविद्यावान् नसेल तर त्याचा कर्माशीं विरोधच असावयाचा. वेदान्तवेद्य शुद्ध अशा प्रकारच्या आत्म्याचें ज्ञान झालें कीं मग कशाचीच जरूरी रहात नाहीं. मोक्षप्रतिपादक शास्त्रांच्याविषयीं असेंच म्हणतां येईल.

एतावता सर्व लौकिक व शास्त्रीय व्यवहार या अध्यासावर अवलंबून आहेत. हा अध्यास नसता तर संसार चाललाच नसता. पुरुषाची परिस्थिति, त्याचें शरीर, त्याचीं इंद्रियें, त्याच्या अंतःकरणवृत्ति, या सर्वांच्या धर्मांचा पगडा त्यावर नेहमीं बसलेला असतो. त्याच्यावर त्याचा अध्यास असतो. तो अविद्येनें ग्रस्त झालेला आहे. मुलें बाळें वगैरेची बरी वाईट स्थिति असली तर त्यास बरें वाईट वाटत असतें. देहास रोग झाला असतां मी रोगी आहें, असें तो म्हणतो. इंद्रिय विगलित झालें तर मीच विगलित आहें, असें त्यास भासतें. अन्तःकरणांत राग लोभ किंवा आनंदादि विकार उत्पन्न झाले म्हणजे, मलाच राग, लोभ किंवा आनंद झाला अशी त्या पुरुषाची प्रतीति असते. याप्रमाणें आत्मा आणि अनात्मा यांचा एकमेकांवर अध्यास सतत चालू आहे. आपणांस हा अध्यास केव्हां सुरू झाला व केव्हां तो नाहींसा होईल हें कळत नाहीं. **तो अनादि व अनन्त आहे.** त्याच्यामुळेंच मनुष्याला अथवा वस्तुमात्रांस कर्तृत्व

व भोक्तृत्व आलीं आहेत. हाच संसार होय. एक वस्तू अमुक एक नसूनहि ती तीच आहे अशी बुद्धि (समजूत) होणें, हें अध्यासाचें लक्षण असल्यामुळें आणि सर्वत्र अध्यास असल्या कारणानें, वास्तविक शुद्ध आत्मस्वरूपाचें ज्ञान होणें शक्य नाहीं. अध्यासापासून होणारें ज्ञान मिथ्या असावयाचेंच. म्हणून ह्या अनर्थ करणाऱ्या अध्यासाचें (अविद्येचें) निरसन करण्यासाठीं आणि आत्मैकत्वविद्या प्राप्त व्हावी याकरितां सर्व वेदान्तांच्या अभ्यासास आरंभ करतात. वेदान्तवाक्यांचा हाच अर्थ आहे असें शारीरमीमांसेंत सांगितलें आहे, आणि तो अर्थ शंकराचार्यांनीं आपल्या भाष्यांत प्रगट करून दाखविला आहे.

ब्रह्म हें सर्व जगताचें उपादानकारण आहे आणि त्याचें निमित्त कारणहि ब्रह्मच आहे. जगत् ब्रह्मापासून झालें आहे, आणि त्या जगताचा कर्ता ब्रह्मच आहे. 'सत्यं ज्ञानमनन्तम् ब्रह्म असें' ब्रह्माचें स्वरूपलक्षण आहे. तें सत्य आहे, ज्ञानरूप आहे; त्याला अन्त नाहीं. जगताची उत्पत्ति, स्थिति, आणि लय ब्रह्मापासून होतात. लयानन्तर सर्व वस्तू ब्रह्मांत प्रवेश करून त्यांतच रहातात. कोणतीहि एकादी वस्तु निर्माण करावयाची असली तर तिला द्रव्याची अपेक्षा असते. म्हणजे ज्या द्रव्याची ती करावयाची असते तें द्रव्य तयार असणें अवश्य आहे. तसेंच त्या द्रव्याला विशिष्ट वस्तूचा आकार, रूप वगैरे देणारा कारागीरहि हवा असतो. घट तयार करावयाचा असला

तर त्याला माती लागते आणि कुंभाराचीहि जरूरी असते. माती ही घटाचें उपादानकारण, आणि कुलाल ( कुंभार ) हा त्याचें निमित्तकारण होय. सर्व जगताचें ब्रह्म हेंच उपादानकारण व निमित्तकारण आहे. या ब्रह्माचा विचार आरण्यकें व उपनिषद ( वेदान्त ) ह्यांत केला आहे. त्याचीच मीमांसा बादरायणांच्या उत्तरमीमांसा किंवा वेदान्त-मीमांसा या ग्रन्थांत केलेली आहे.

'अथातो ब्रह्मजिज्ञासा' नंतर म्हणून ब्रह्म जाणण्याची इच्छा ( करावी ), किंवा ब्रह्माचा विचार करावा. हें या मीमांसेचें पहिलें सूत्र व अधिकरण आहे. 'अथ' शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्याचा आनन्तर्य ( नंतर ) हा अर्थ येथें आहे. ब्रह्मजिज्ञासेला स्वाध्याय पूर्वी झालाच पाहिजे. परंतु त्याला कर्माचें किंवा धर्माचें प्रत्यक्ष ज्ञान असणें अवश्य नाहीं. कारण त्या ज्ञानाशिवाय ब्रह्मविचार करतां येतो. ब्रह्मासारख्या गहन विषयाचा विचार करण्यास मनाची तयारी अगोदर झालेली पाहिजे. अशी तयारी झाली नाहीं, तर ब्रह्मज्ञान होणें कठीण आहे. ह्या ब्रह्मज्ञानाचीं चार साधनें सांगितलीं आहेत, तीं प्राप्त झाल्यावर मग ब्रह्म जाणण्यास मनुष्य पात्र होतो. हीं साधनें संपादन केल्यावर मग ब्रह्म जाणण्याची इच्छा करावी असा 'अथ' शब्दाचा अर्थ आहे. हें साधनचतुष्टय येणेंप्रमाणें:—( १ ) नित्यानित्यवस्तुविवेक; नित्य वस्तु कोणती, अनित्य कोणती, याविषयीं विचार करून निश्चय झालेला पाहिजे. ( २ ) ह्या

जगांत किंवा स्वर्गांत मिळणाऱ्या कर्मफलाच्या उपभोगाविषयीं मनाची विरक्ति. ( ३ ) शम, दम, उपरति, तितिक्षा, समाधान आणि श्रद्धा हे सहा गुण अंगीं असले पाहिजेत. आणि ४ मुमुक्षुत्व—मोक्ष मिळविण्याची इच्छा. हें साधनचतुष्टय संपादन केल्यानंतर ब्रह्मज्ञान मिळविण्यास आरंभ करावा.

अग्निहोत्रादि कर्मे श्रेयः ( सुख ) संपादन करून देणारीं असतात. परंतु हें फळ कायमचें नसतें. तें अनित्य असतें, ह्या कर्मफलांचा क्षय होतो. एकंदरींत कर्मांचें फळ अनित्य आहे. मग त्या फलाचा उपभोग येथें मिळावयाचा असो, किंवा स्वर्गांत मिळावयाचा असो, असें वेदांत सांगितलें आहे. हें फल अनित्य असल्यामुळें, त्याची अपेक्षा करणें योग्य नाहीं. म्हणून वेदांत सांगितलेलें नित्य व उत्तम फल जो मोक्ष तो प्राप्त करून घेण्याची इच्छा करावी. हें परमफल ब्रह्मज्ञानानें प्राप्त होतें. 'ब्रह्मविदाप्नोति परं' असें तैत्तिरीय उपनिषदांत सांगितलें आहे. म्हणून ब्रह्मज्ञान मिळविण्याची खटपट करावी. सूत्रांतील 'अतः' शब्दावरून ह्या कारणाचा बोध होतो. म्हणून अवश्य साधनें संपादन करून मोक्षासाठीं ब्रह्मज्ञान करून घ्यावें.

ब्रह्मविषयक जी जिज्ञासा, ती ब्रह्मजिज्ञासा. 'ब्रह्म' शब्दाचा अर्थ पुढल्या सूत्रांत सांगितला आहे, म्हणून त्या शब्दाचे अर्थ ब्राह्मण, स्तोत्र इत्यादि वाचक आहेत, असें

समजूं नये. ' ब्रह्मणो जिज्ञासा ' ही कर्मणि **षष्ठी आहे, शेषे षष्ठी नाहीं.** ब्रह्माचें ज्ञान होणें ही प्रधान गोष्ट आहे. ब्रह्मज्ञान होण्याकरितां, ब्रह्माच्या आश्रयानें असणाऱ्या दुसऱ्या वस्तूंचें ज्ञान होणें अवश्य असेल; परंतु ब्रह्मज्ञान करून घ्यावयाचें, असें म्हटलें म्हणजे त्या ज्ञानाला अवश्य असणारें ब्रह्माश्रित वस्तूंचें ज्ञान करून घेणें अवश्य आहे, ही गोष्ट प्रामुख्यानें सांगावयास नको. ब्रह्मज्ञान करून घ्यावयाचें आहे, असें म्हटलें म्हणजे झालें. त्यांत आश्रित वस्तूंच्या ज्ञानाचा अन्तर्भाव होतो.

ब्रह्म प्रसिद्ध आहे कां अप्रसिद्ध आहे ? प्रसिद्ध असेल तर त्याविषयीं जिज्ञासा असण्याची जरूरी नाहीं. ब्रह्म अप्रसिद्ध असेल, तर त्याविषयीं जिज्ञासा असण्यांत अर्थ नाहीं ! असें कांहीं लोक म्हणतात. यावर आचार्यांचें उत्तर असें आहे:---ब्रह्म प्रसिद्ध आहे. तें नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्तिमत् असें आहे. बृह ( वृद्धि पावणें ) या धातूपासून तो शब्द झाला आहे अशी व्युत्पत्ति आहे. या व्युत्पत्तीवरून ब्रह्माचें वर सांगितलेलें स्वरूप दिसून येतें. शिवाय सर्वांचा जो आत्मा तोच ब्रह्म होय. ब्रह्म आणि आत्मा हे एकच. यावरून ब्रह्माचे अस्तित्वाची प्रसिद्धि आहे. आत्मा आहे अशी प्रत्येकाची प्रतीति असते. आत्मा नाहीं असें कोणी म्हणाला तर, मीच नाहीं असें त्यास म्हणावें लागेल. ' मीं नाहीं ' अशी त्यास प्रतीति होईल. आत्मा हेंच ब्रह्म होय. आतां आत्मा हेंच ब्रह्म

आहे. आणि आत्मा सर्वांस माहीत आहे, तेव्हां ब्रह्महि सर्वांस माहीत आहेच; असें झालें, तर मग ब्रह्मविषयीं जिज्ञासा करण्याची काय अवश्यकता उरली आहे? अशी कोणीं शंका घेतली तर त्यावर उत्तर असें आहे कीं, आत्मा शब्दाचे अनेक मतांत अनेक अर्थ केले आहेत. यासाठीं आत्म्याचा खरा अर्थ कोणता हें निश्चित करणें अवश्य आहे.

चेतनायुक्त देह हाच आत्मा असें प्राकृत लोक समजतात. चार्वाकानुयायांचें ( लोकायितांचें ) हेंच मत आहे. सचेतन इंद्रियें हाच आत्मा असें कांहीं लोक मानतात. कांहीं लोक मनालाच आत्मा म्हणतात. इंद्रियें किंवा मन यांना आत्मा म्हणणारे लोक चार्वाक मताच्या शाखांपैकींच आहेत. बौद्ध मतांतील योगाचार ( विज्ञानवादी ) क्षणिक जें विज्ञान त्यालाच आत्मा समजतात. बौद्धमतांतील माध्यमिक लोक शून्य हेंच आत्मा असें म्हणतात. आत्मा देहाहून भिन्न आहे, तो संसारी ( जीव ) कर्ता व भोक्ता आहे, असें नैयायिक आणि पूर्वमीमांसाकार यांचें मत आहे. सांख्य मताप्रमाणें आत्मा हा शुद्ध भोक्ता आहे. जीवाहून व्यतिरिक्त, ईश्वर, सर्वज्ञ, सर्वशक्ति असा आत्मा आहे, असें योगशास्त्राचें मत आहे. **भोक्ता जो जीवात्मा तोच तो परमात्मा असें वेदान्त्यांचें मत आहे.** याप्रमाणें आत्म्याविषयीं विप्रतिपन्न ( परस्परविरोधी ) अशीं अनेक मतें आहेत. कांहीं लोक युक्तिवादानें आपलें मत स्थापित करण्यास पहातात. कांहीं वाक्यांचा आधार घेतात. कांहींची

युक्तीच्या आणि श्रुतिवाक्यांच्या आभासावरच भिस्त आहे. अशा परस्परविरुद्ध मतांचा पूर्ण विचार न करतां जर एकाद्या मताचें अवलंबन केलें तर निश्रेयसफल प्राप्त न होतां अपाय मात्र होण्याचा संभव आहे. म्हणून ब्रह्मजिज्ञासा असावी. असें सांगून सर्व वेदांतवाक्यांच्या मीमांसेस आरंभ ह्या उत्तरमीमांसेंत केला आहे. मोक्षप्राप्ति हें याचें प्रयोजन आहे. वेदांतवाक्यास प्रतिकूल नसणारा तर्क व युक्तिवाद याचेंहि साहाय्य या मीमांसेंत घेतलें आहे. श्रुतिवाक्यें आणि त्यांस अनुकूल तर्क यांच्या आधारावर सर्व विचार केला आहे.

ब्रह्मज्ञान संपादन करावें असें पहिल्या सूत्रांत सांगितलें आहे. आतां ब्रह्म म्हणजे काय ? त्याचें लक्षण कोणतें ? हें दुसऱ्या सूत्रांत सांगतात. "जन्माद्यस्य यतः" हें दुसरें सूत्र व दुसरें अधिकरण होय. जन्मादि (उत्पत्ति, स्थिति आणि लय), अस्य (ह्याचें--जगताचें), यतः (ज्यापासून), तें ब्रह्म होय, असें ब्रह्माचें लक्षण दिलें आहे. (ह्या सूत्राबरोबर चवथ्या पादांतील सातव्या अधिकरणाचा विचार करावा. (सूत्रें २३-२७) त्या अधिकरणांत ब्रह्म हें जगाचें उपादान कारण आहे असें सिद्ध केलें आहे).

उत्पत्ति, स्थिति आणि लय, असाच जगतांतील सर्व वस्तूंचा अनुक्रम आहे. ह्याला श्रुतीचा आणि वस्तुवृत्तीचा (वस्तुस्थितीचा) आधार आहे. भृगुवल्लींत "यतो वा

इमानि भूतानि जायन्ते, यतो जातानि जीवन्ति, यत्प्रयन्त्यभि-संविशन्तीति." असें सांगितलें आहे. त्याच प्रमाणें व्यवहारांत आपल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रत्येक वस्तूची उत्पत्ति झाल्यावर तिच्या अंगीं विशेष धर्म व सत्ता येतात आणि मग त्या वस्तूची स्थिति व संहार होतात. हें जगत् नाम व रूप यांनीं व्याकृत झालेलें आहे. म्हणजे ह्यांतील सर्व वस्तुमात्राचें व्यवहारिक ज्ञान आपल्यास त्यांच्या नामरूपानें होतें. ह्या जगांत अनेक कर्ते व भोक्ते आहेत. यांनीं तें संयुक्त असतें. नियमित कालीं, स्थळीं, व निमित्तानें, क्रिया व क्रियाफळें उत्पन्न होत असतात, त्या सर्वांचा आश्रय हें जगत् आहे. या जगाच्या रचनेची कल्पना आपल्या मनाला सुद्धां करतां येत नाहीं. अशा या जगताची उत्पत्ति, स्थिति आणि लय, यांचें कारण सर्वज्ञ व सर्वशक्ति जें ब्रह्म तें आहे. असा या सूत्राचा सारांश आहे. हें ब्रह्माचें तटस्थ लक्षण आहे. जन्मादि या पदाचा उत्पत्ति, स्थिति व लय असाच अर्थ कां करावा? यास्कांनीं सांगितलेल्या सहा भावविकारांचा बोध त्या पदापासून कां होणार नाहीं? अशी शंका कोणीं घेतली, तर त्यास उत्तर असें आहे कीं, उत्पत्ति, स्थिति व लय असा अर्थ करण्यास श्रुतीचा साक्षात् आधार आहे. यास्काच्या भावविकारांस श्रुतीचा आधार आहे, ही गोष्ट खरी, परंतु साक्षात् आधार टाकून परंपरेनें येणाऱ्या आधा-रावर अवलंबून राहाणें योग्य नाहीं. दुसरें कारण असें आहे

कीं, हे भावविकार वस्तूला स्थिति प्राप्त झाल्यावर त्यामध्यें होत असतात. त्यांला जगांतील अनेक वस्तू कारणभूत झालेल्या असतात. मूळ कारणापासून ते भावविकार उत्पन्न झाले नाहींत, अशी शंका येऊं नये, ह्मणून ब्रह्मापासूनच जगाची उत्पत्ति, त्याच्यामुळेंच जगाची स्थिति आणि शेवटीं ब्रह्मांत त्याचा लय असें प्रतिपादन केलें आहे.

हें जगत् नामरूपानें व्याकृत झालेलें आहे. यांत अनेक कर्ते व भोक्ते जगाशीं संयुक्त आहेत. नियत अशा कालादिक निमित्तादिकांचा हें जगत् आश्रय आहे. याच्या रचनेविषयीं कल्पना सुद्धां करवत नाहीं. ह्या जगताचें सर्वज्ञ, सर्वशक्ति ब्रह्माव्यतिरिक्त दुसरें एकादें कारण असणें संभवत नाहीं. सांख्यांच्या अचेतन प्रधानापासून जग निर्माण झालें आहे असें दिसत नाहीं. नैयायिकांच्या परमाणूपासून असलें जगत् उत्पन्न होणें शक्य नाहीं. बौद्धांच्या शून्यापासून जगताची उत्पत्ति वगैरे व्यवहार चालणार नाहींत. संसारी जीवात्म्यापासून ही संसृति होत नाहीं. स्वभावतःच हें जगत् निर्माण होऊन चालत आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कारण कोणत्याहि कार्यास विशिष्ट देश, विशिष्ट काल, व विशिष्ट निमित्ताची अवश्यकता असते. नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्ति, इत्यादि प्रकारानें वर्णन केलेलें परब्रह्म हेंच या जगताच्या सर्व सृष्ट्यादिकांचें कारण आहे. '**सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म,**' असें ब्रह्माचें स्वरूपलक्षण सांगितलें आहे.

जीवाहून व्यतिरिक्त असा ईश्वर आहे. तो जगताचें कारण आहे. त्याचें अस्तित्व अनुमानप्रमाणानें सिद्ध होतें, असें ईश्वरकारणी लोकांचें मत आहे. (ईश्वरकारणी हें वैशेषिकांचें नांव आहे.) ह्या मता। अनुसरून 'जन्माद्यस्य यतः' या सूत्रांत व्यासानीं त्याच अनुमानाचा उपन्यास केला आहे. तेंच अनुमान प्रतिपादिलें आहे, असें म्हणतां येणार नाहीं. कारण सूत्रांत वेदान्तवाक्येंच ग्रथित केलीं असतात. त्या वेदान्तवाक्यांचे अर्थाचा विचार करून निश्चय झाला म्हणजे त्यापासून ब्रह्मज्ञान किंवा ब्रह्मसाक्षात्कार होतो. तो साक्षात्कार केवळ अनुमानानें होत नाहीं. 'जन्मादिसारखीं ब्रह्म हें कारण आहे, असें दाखविणारीं वेदवाक्यें असल्यावर त्या वाक्यांचा अर्थ दृढ करण्यास अनुमानादिप्रमाणें साहाय्य होत असलीं तर तीं घेण्यास हरकत नाहीं. मात्र हीं अनुमानादिप्रमाणें वेदवाक्याच्या अर्थाशीं संगत असलीं पाहिजेत. त्यामध्यें विरोध असतां कामा नये. अशा कामीं श्रुतीनेंच तर्काचें व पुरुषबुद्धीचें साहाय्य घेतलेलें असतें. 'श्रोतव्यो मन्तव्यः' "आचार्यवान्पुरुषो वेद" इत्यादि श्रुतीवरून पुरुषबुद्धीचें साहाय्य घ्यावें हेंच सिद्ध होतें. ब्र जिज्ञासेला केवळ अनुमान किंवा केवळ श्रुतिवाक्येंच पुरींशीं होत नाहींत. ब्रह्मज्ञानाला श्रुतिवाक्यें आणि अनुभवादि यांची यथासंभव अवश्यकता असते. तीं त्याचीं प्रमाणें होतात. ब्रह्म हें सिद्धभूत अशी वस्तु आहे. ब्रह्मविज्ञानाचा शेवट अनुभव किंवा साक्षात्कार, यांत होत

असतो. धर्म, किंवा कर्म, यासारख्या साध्य किंवा कार्य गोष्टीसंबंधानें पुरुषबुद्धीच्या साहाय्यानें विकल्प, अपवाद वगैरे उत्पन्न होणें संभवनीय आहे. भूतवस्तुसंबंधानें असल्या विकल्पना होणें शक्य नाहीं. ब्रह्मभूत वस्तु आहे. तिचें ( भूत वस्तूचें ) यथार्थ ज्ञान पुरुषबुद्धीवर अवलंबून नसतें. तें वस्तुतन्त्र असतें. त्याचें प्रामाण्यहि वस्तुतंत्रच असतें. ब्रह्मज्ञानाचीहि अशीच गोष्ट आहे. आतां ब्रह्म जर भूत वस्तु आहे, तर इतर भूतवस्तुप्रमाणें, तेंहि प्रमाणान्तरांनीं समजलें जाईल. याकरितां ब्रह्मज्ञान होण्यास श्रुतिवाक्यांची विचारणा करणें व्यर्थ आहे, अशी शंका कोणी घेतील. ही शंका बरोबर नाहीं. कारण ब्रह्म हें इंद्रियगोचर नाहीं. आणि तें इंद्रियगोचर नसल्यामुळें त्याचा ( जगताशीं ) संबन्ध दिसून येत नाहीं. ब्रह्म इंद्रियांकडून जाणतां येत असतें, तर त्याचा ह्या जगद्रूपी कार्याशीं असलेला संबन्ध दिसून आला असता. जगत् हें इंद्रियग्राह्य आहे; तेवढें तें इंद्रियांस दिसतें. पण तें ब्रह्माशीं संबद्ध आहे, किंवा दुसऱ्या कोणत्यातरी एकाद्या वस्तूशीं संबद्ध आहे, याचा निश्चय करणें शक्यच नाहीं. म्हणून ब्रह्म प्रमाणान्तरानें ज्ञेय नाहीं, आणि " जन्माद्यस्य यतः " या सूत्रांत ब्रह्माविषयींचे अनुमानाचा उपन्यास नाहीं. तैत्तिरीय उपनिषदांतील भृगुवल्लींत जें ब्रह्माचें लक्षण सांगितलें आहे, तेंच लक्षण या सूत्राचे द्वारा व्यासानीं सांगितलें आहे. नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, स्वभाव, सर्वज्ञ, स्वरूप, कारण, इत्यादि ब्रह्माचीं

लक्षणें सांगणारीं व ह्यासारखीं दुसरीं अनेक वेदान्तवाक्यें सांगण्यासारखीं आहेत. जगाचें उपादानकारण ब्रह्मच आहे; या अर्थाचें प्रतिपादन पहिल्या अध्यायाच्या चवथ्या पादांतील सातव्या अधिकरणांत पुनः केलेलें आहे. " प्रकृतिश्च प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधात् " या सूत्रापासून त्या अधिकरणांस आरंभ होतो. श्रुतींतील वाक्यांचा आधार देऊन ब्रह्म हें जगाचें उपादानकारण आहे असें सिद्ध केलें आहे. या जगाचें उपादान व निमित्त कारण ब्रह्म आहे असें प्रतिपादन करण्याचे वेळीं ब्रह्म सर्वज्ञ आहे, असें सांगितलें आहे. हेंच सर्वज्ञत्व दृढ करून सांगण्याकरतां "शास्त्रयोनित्वात्" हें तिसरें सूत्र बादरायणानीं प्रणीत केलें आहे.

" शास्त्रयोनित्वात् " शास्त्राची योनि म्हणजे कारण ( ब्रह्म आहे ), म्हणून ब्रह्म सर्वज्ञ सर्वशक्ति असें आहे. येथें शास्त्रशब्दाचा व्यापक अर्थ आहे. ऋग्वेदादि चार वेद, वेदांगें, उपांगें, उपवेद, म्हणजे सर्व वेद, स्मृति, शास्त्रें, पुराणें इतिहास, आख्यानें, किंबहुना १४ किंवा १८ विद्या ज्या स्मृतींत सांगितल्या आहेत त्या सर्व विद्यांचा अन्तर्भाव ' शास्त्र ' शब्दांत होतो. हें महत् शास्त्र सर्वज्ञ आहे. दिव्याप्रमाणें तें सर्व अर्थांवर प्रकाश पाडतें. अशा ह्या शास्त्राचें कारण ब्रह्म होय. सर्वज्ञाचे गुण असणाऱ्या या वेदादि शास्त्राचा कर्ताहि सर्वज्ञच असला पाहिजे. सर्वज्ञावांचून दुसऱ्याच्या हातून असलें शास्त्र निर्माण होणें अशक्यच आहे. या जगांत सामान्यतः आपल्यास असें दिसून येतें

कीं, एकाद्या विशिष्ट शास्त्रावर कोणीं ग्रन्थ लिहिला, तर त्या ग्रंथांत त्या शास्त्राविषयीं माहिती किंवा ज्ञानविस्तार जितका असतो, त्याहून ग्रंथकर्त्याच्या अंगीं अधिक ज्ञान असतें. उदाहरणार्थ पाणिनीनीं व्याकरणशास्त्रांत जितकी माहिती दिली आहे त्याहून त्यांच्या अंगीं खरोखर अधिक ज्ञान होतें.

अशी जर गोष्ट आहे, तर या जगांतील सर्व चराचर वस्तूंचा विचार करणारें व सर्व ज्ञानाची खाणच होऊन रहाणारें हें जें ऋग्वेदादि शास्त्र ज्या महाभूतानें सहज लीलेनें उत्पन्न केलें व जें त्याचें केवल निश्वसित आहे, असें श्रुति सांगते, अशा या महाभूताचें ( ब्रह्माचें ) सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्त्व निरतिशय आहे, त्याच्यासारखें सर्वज्ञ व सर्वशक्ति असें दुसरें कोणीहि नाहीं, हें सांगावयास नकोच.

'शास्त्रयोनि' हा बहुव्रीहि समास आहे, असें मानून ब्रह्मांची योनि ( प्रमाण ) शास्त्र आहे असाहि अर्थ या सूत्राचा करतात; सर्वज्ञ ब्रह्माचें अस्तित्व वेदावरून सिद्ध होतें असा या सूत्राचा अर्थ होतो. पूर्वीच्या सूत्रांत याच अर्थाचें प्रतिपादन केलें आहे. परंतु येथें पुनः हें सांगण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वीच्या सूत्रांत प्रत्यक्ष अक्षरांनीं तो अर्थबोध झाला नव्हता, म्हणून अनुमानदर्शकच तें सूत्र आहे, अशी समजूत होण्याचा संभव आहे. अशी समजूत होऊं नये म्हणून प्रत्यक्ष शब्दांनीं वेद हे ब्रह्माचें प्रमाण आहे, असें येथें सांगितलें आहे.

श्रुति हीं ब्रह्माचें प्रमाण आहे, असें कसें म्हणतां येईल, अशी पूर्वपक्षाची शंका आहे. कारण सर्व श्रुतिवाक्यें क्रियापर असतात. ज्या आम्नायांत ( श्रुतींत ) कर्मासंबन्धानें कांहींएक सांगितलें नाहीं, तीं सर्व वाक्यें अनर्थक आहेत असें समजावें. वेदान्तवाक्यांत कर्म, कर्ता, कर्माची देवता इत्यादि कर्मसंबंधी विषयाविषयीं कांहींएक प्रतिपादन केलेलें नसतें. किंवा उपासनादि जे कर्माचे विशिष्ट मार्ग आहेत, त्यांच्याविषयींहि वेदान्तांत प्रतिपादन केलेलें नसतें. म्हणून वेदान्तवाक्यें निरर्थक आहेत असें समजावें. शिवाय ब्रह्म हें सिद्धभूतार्थ अशी वस्तू आहे. अशा वस्तू प्रत्यक्षादिप्रमाणांनीं समजतात. त्याचें प्रतिपादन श्रुतींनीं होणें संभवतच नाहीं. यदाकदाचित् श्रुतींत ब्रह्मप्रतिपादन असलें, तर त्यापासून पुरुषार्थाची प्राप्ति होणार नाहीं. करण ब्रह्म हें सिद्धवस्तू आहे. तें सिद्ध असल्यामुळें त्यांत ग्राह्य ( उपादेय ) आणि त्याज्य ( हेय ) अस कांहीं एक नसावयाचेंच. हेय व उपादेय नसलें म्हणजे विधि व निषेध हे दोन्ही नसावयाचेच. म्हणजे सुखप्राप्ति व दुःखनिवृत्ति याविषया खटपट होणारच नाहीं. खटपट झाली नाहीं तर पुरुषार्थप्राप्ति कशी होणार ? विधि किंवा क्रिया या संबन्धीं सर्व वेदवाक्यें असतात. जेथें क्रिया स्पष्ट सांगितलेली नसते तेथें तीं वाक्यें स्तुतिपर किंवा साधनदर्शक अशीं असतात. उदाहरणार्थ 'सोऽरोदीत्तस्माद्रुद्रस्य रुद्रत्वम्' हें स्तावक वाक्य आहे. 'इषेत्वोर्जेत्वा' हीं क्रियांचीं साधनें दाखविणारीं वाक्यें आहेत. सारांश विधिसंपर्कावांचून

वेदवाक्यांना अर्थता आली आहे, असें कोठेंहि दिसत नाहीं. ब्रह्म भूतार्थ वस्तु आहे. भूतार्थ वस्तूत विधीचा संभव नसतो. कारण विधि नेहमीं कर्मविषयक असतो. भूतार्थ किंवा सिद्ध वस्तूला कर्माची अवश्यकता नसते. म्हणून विधि आणि ब्रह्म एके ठिकाणीं असणें शक्य नाहीं. विधिशिवाय वेदवाक्यांना अर्थच नाहीं, असें असल्यामुळें वेदान्तवाक्यें कर्मपरच असलीं पाहिजेत. त्यांत वैदिककर्म सांगितलेलें असेल, किंवा उपासनाकर्म असेल. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, वेदादिशास्त्र ब्रह्माचें प्रमाण आहे, असें स्थापित होतच नाहीं. अशा रीतीनें पूर्वपक्षांचें मत सांगून त्यास उत्तरादाखल " तत्तु समन्वयात् " हें चवथें सूत्र बादरायणानीं पुढें सांगितलें आहे.

' तत्तु समन्वयात्. ' तत् ( सर्वज्ञ सर्वशक्ति ब्रह्म हेंच जगताच्या उत्पत्ति, स्थिति व लय यांचें कारण आहे. ) असें वेदान्तवाक्यें प्रतिपादन करतात. ' तु ' ( वेदांत ब्रह्म प्रातपादन नाहीं, इत्यादि पूर्वपक्षांचें म्हणणें बरोबर नाहीं. ) ' समन्वयात्,' सर्व वेदान्तवाक्यांचा तात्पर्यार्थ हाच आहे. तीं सर्व वाक्यें ब्रह्मच जगताचें कारण आहे, असें निश्चितपणें सांगतात ). आचार्यानीं या वेदान्तवाक्यांचीं थोडीं उदाहरणें दिलीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:— " तदेवसौम्येदमग्र आसीत् ॥ एकमेवाद्वितीयम् ॥" ( च्छान्दोग्य. ६. २. १ ) आरंभीं एकटें तेंच होतें. एकच, दुसरें कांहीं नाहीं. " आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् " ( ऐतरेय आ. २. ४. ११ )

आरंभीं हेंच एकटा आत्मा होता. “ तदेतद् ब्रह्मापूर्वमपरमनन्तरमबाह्यमात्मा ब्रह्म सर्वानुभूः ( बृहदारण्य. २, ५, १९ ) तें हें ब्रह्म. हें कारण नाहीं, कार्य नाहीं. ह्याच्या आंत बाहेर कांहीं एक नाहीं. हा आत्मा ब्रह्म सर्व पाहणारा अनुभव घेणारा आहे. “ ब्रह्मैवेदममृतं पुरस्तात् ”( मुंडक २, २, ११ ) तें अमृत ( अमर ) ब्रह्म पूर्वीं व पुढें आहे. इत्यादि इत्यादि. या सर्व वेदान्तवाक्यांचा अर्थ ब्रह्मपर आहे, असें निश्चित झाल्यावर आणि त्यांचा समन्वय समजल्यावर त्या वाक्यांचा अर्थ दुसराच आहे, असें म्हणणें उचित होणार नाहीं. कारण श्रुतीचा अर्थ टाकून देऊन भलत्याच अर्थाची कल्पना करण्याचा प्रसंग येईल. बरें हीं वाक्यें कर्त्याचे स्वरूपाचें प्रतिपादन करतात, असें जर तुम्ही म्हणाल, तर तेंहि युक्त नाहीं. कारण ज्ञानकालीं कोण ‘कोणास कसें पाहतो ( तत्केन कं पश्येत् ). असें श्रुतिवाक्य आहे. या वाक्यावरून ज्ञान झाल्यावर कर्ता, क्रिया, साधन व फल, या सर्वांचा नाश होतो, असें सिद्ध होतें. ब्रह्म हें सिद्ध ( परिनिष्ठित ) वस्तु आहे. तेव्हां दुसऱ्या सिद्ध वस्तूप्रमाणें ब्रह्माचें ज्ञानहि प्रत्यक्षादि प्रमाणांनीं होईल, असें म्हणतां येत नाहीं. कारण सर्व वस्तूंचा आत्मा (जीवात्मा) हा ब्रह्म आहे ( तत्त्वमसि च्छांदोग्य ६–८–७) ही गोष्ट श्रुतिशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्रमाणांनीं सिद्ध होण्यासारखी नाहीं. वेदान्तवाक्यें उपदेशात्मक आहेत, असें मानलें असतां, त्या उपदेशांत अर्थ नाहीं, कारण उपदेशाचा मुख्य हेतु त्याज्य ( हेय ) कोणतें, व

ग्राह्य (उपादेय) कोणतें हें सांगण्याचा असतो. ह्या ठिकाणीं हेय नाहीं आणि उपादेय नाहीं, तेव्हां तो उपदेश निरर्थक (ब्रह्मासंबंधी) आहे. यावर सिद्धान्तवादी म्हणतात कीं, अशा आक्षेपानें उपदेश दोषार्ह होत नाहीं. हेयोपादेयरहित ब्रह्मात्मज्ञानापासून सर्व क्लेशांचा नाश होतो आणि यामुळें पुरुषार्थ प्राप्त होतो. हीच मोक्षाची सिद्धि. वेदान्तवाक्यांतच उपासनेच्या संबंधानें देवतांचें प्रतिपादन असतें. ही गोष्ट खरी आहे; परंतु यामुळ आमच्या म्हणण्यास कांहींएक विरोध येत नाहीं. ब्रह्म हें उपासनाविधीचें अंग किंवा शेष आहे, असें म्हटलें तर मात्र तें होणें संभवत नाहीं. कारण ब्रह्मैक्याचें ज्ञान झालें म्हणजे हेयोपादेयांचा विचार रहातच नाहीं. असें झालें म्हणजे क्रिया, कारक, इत्यादिकांचें द्वैतज्ञान नाहीसें होतें. एकत्वाचें विज्ञान झाल्यावर पुनः द्वैताचें विज्ञान होणें संभवत नाहीं. द्वैताचा अभाव झाल्यावर उपासनाविधि रहात नाहीं. मग ब्रह्म हें उपासनेचें साधन कसें होणार? म्हणून ब्रह्म हें उपासनेचा शेषभाग कधींहि असणार नाहीं. केवल विधीशीं संबंध असणारीं अशीं पुष्कळ वेदवाक्यें असतात. या वाक्यांत प्रामाण्य नसतें. ह्यांच्याप्रमाणेंच ब्रह्मविषयक वेदान्तवाक्यें अप्रमाण आहेत, असें प्रत्याख्यान करणें शक्य नाहीं. कारण ब्रह्मविज्ञानापासून फलनिष्पत्ति होत असते. शेवटीं जें काय सांगावयाचें आहे, तें हें कीं, वेदांचें प्रामाण्य अनुमानानें सिद्ध होत नाहीं,

आणि हें सिद्ध करण्यास दुसरीकडे पाहिलेलीं उदाहरणें आणण्याची गरज नाहीं. या सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, ब्रह्माचें प्रमाण शास्त्रें ( वेद ) च आहेत.

याप्रमाणें अनेक पूर्वपक्षांचें आचार्यांनीं खंडन करून सर्व वेदान्तवाक्यें ब्रह्मात्मज्ञान प्रतिपादन करतात; हेंच त्यांचें प्रयोजन आहे; कार्याचा किंवा कर्माचा त्यांत कांहीं संबंध नाहीं; त्याचें पर्यवसान ब्रह्मज्ञानांतच होतें, असें ह्या सूत्रावरून आचार्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. तसेंच ब्रह्म हें जगताच्या उत्पत्ति, स्थिति व लयांचें कारण आहे, असेंहि स्पष्ट सांगितलें आहे. सांख्यमताप्रमाणें ह्या जगताचें कारण प्रधान आहे, आणि तें अनुमेय आहे. कणादादि नैयायिक अणू हे जगाचें उपादानकारण आहेत, असें मानतात. व ईश्वर हा जगताचें समवायी किंवा निमित्त कारण आहे. इत्यादि अनेक मतें आहेत; त्यांचें खंडन ह्या दर्शनांत केलें आहे. याप्रमाणें परपक्षांचें खंडन करून, स्वतःचे मतांचें मंडनहि या ग्रन्थांत केलें आहे.

ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्यास साधनचतुष्टयाची अवश्यकता असते, ही गोष्ट पूर्वीं सांगितलीच आहे. साधनचतुष्टय संपादन केल्यावर मनुष्यास हें ज्ञान मिळविण्याचा अधिकार येतो. जीव व ब्रह्म यांत ऐक्य आहे. ते चैतन्य आहेत. हा या शास्त्राचा विषय आहे. हेंच प्रमेय होय. वेदान्तवाक्यें हीं त्याचें प्रमाण आहेत. ह्या दोहोंमध्यें बोध्यबोधकसंबन्ध

असतो. अज्ञानाची निवृत्ति होऊन आनन्दमय होऊन राहणें, हें ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्याचें प्रयोजन आहे.

ब्रह्मसाक्षात्कार झाला कीं, संसार संपला. जोपर्यंत अविद्या किंवा अध्यास यांचा पगडा बसलेला आहे, तोंपर्यंत संसार चालू असणारच. दोरी ही साप नसून ती साप आहे, असा भास होतो तो अविद्येमुळें होतो. एकाद्या वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा आरोप करणें म्हणजे अमूक ती खुद्द वस्तु नसून ती दुसरीच वस्तु आहे, असें वाटतें; ( वस्तुन्यवस्त्वारोपः ) ह्याचें कारण अविद्या आहे. अशा ह्या अज्ञानांत सर्व जगतांतील व्यवहार चाललेले असतात. ब्रह्म हें एकच वस्तु आहे. तें सच्चिदानन्दानन्त असें आहे. अज्ञानादि सर्व जड पदार्थ असत् आहेत. अविद्या ही सत् आहे, किंवा असत् आहे, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. ती अनादि आहे. परंतु ज्ञानानें तिचा नाश होतो. सत्व, रज, तम, असे तीन गुण हिच्या अंगीं असतात. प्रत्येकास ह्या अज्ञानाची जाणीव असते. तें अज्ञान एकच किंवा अनेक असें दिसतें. उंचावर उभें राहून दूर असणाऱ्या झाडोकडे आपण पाहिलें असतां, ती झाडी एक वस्तु आहे, असें वाटतें. परंतु त्या झाडींत झाडें असतात. त्या प्रत्येक झाडामध्यें अन्तर किंवा आकाश असतें, असें जवळ गेल्यावर दिसून येतें. याचप्रमाणें अविद्याजालाकडे समुच्चयदृष्टीनें पाहिलें असतां, ती अविद्या (अज्ञान) एक आहे असें वाटतें. हें त्या अविद्येचें किंवा अज्ञानाचें समष्टिरूप समजावें. अनेक जिवांत असणारीं जीं अनेक

अज्ञानें त्यांचा समुच्चय करून त्यांचें एक समष्टिरूप झालेलें असतें. या समष्टींत विशुद्ध असा सत्वगुण प्राधान्येन असतो. हिनें उपहित ( व्याप्त ) जो ब्रह्माचा भाग ( चैतन्य ) त्यास ईश्वर म्हणतात. तो सर्वज्ञ, सर्वेश्वर, सर्वनियंता, अव्यक्त, अंतर्यामी, जगत्कारण इत्यादि गुणांनीं युक्त असा आहे. सकल अज्ञानाचा तो अवभासक असल्यामुळें त्यास ईश्वर म्हणतात. ( मुंडक १, १, ९ ). ही समष्टि ईश्वराचें कारणशरीर आहे; हाच त्याचा आनंदमय कोश; ही त्याची सुषुप्ति अवस्था होय. स्थूल व सूक्ष्म अशा सर्व प्रपंचाचा ह्यांतच लय होतो. झाडींतील प्रत्येक झाडाचा जसा स्वतंत्रपणें विचार करतां येतो, त्याचप्रमाणें या प्रत्येक जीवगत अज्ञानाचा स्वतत्र विचार करतां येतो. ह्याला अज्ञानाचें व्यष्टिरूप म्हणतात यांत सत्वगुण प्रधान असतो; परंतु तो मलिन असतो. ह्या व्यष्टिरूपानें उपहित जो चैतन्यभाग ( ब्रह्माचा भाग ) त्यास प्राज्ञ म्हणतात. तो एका अज्ञानाचाच अवभासक आहे, अल्पज्ञ अनीश्वर इत्यादि त्याचे गुण आहेत. अहंकारादिकांचें कारण असल्यामुळें ही व्यष्टि त्या प्राज्ञाचें कारणशरीर असते. हाच त्याचा आनन्दमय कोश व हीच त्याची सुषुप्ति अवस्था. सर्व स्थूलसूक्ष्मांचा लय ह्यांतच होतो. प्रलयकालीं किंवा सुषुप्ति अवस्थेंत ईश्वर व प्राज्ञ यांस आनंदाचा अनुभव होत असतो. याचें कारण असें आहे कीं, यावेळीं अज्ञानवृत्ति अति सूक्ष्म असतात आणि त्या चैतन्यानें प्रदीप्त झालेल्या असतात. त्यांच्यामुळें आनन्द उद्भवतो.

वन व त्यांतील वृक्ष, यांच्यांत जो भेद असतो, तसाच भेद समष्टि व व्यष्टि यांत आहे, असें समजावें. तसेंच वनाचें आकाश व वनांतील, वृक्षांतील आकाश यांच्यांत जो भेद असतो तोच भेद ईश्वर व प्राज्ञ यांत आहे असें समजावें.

स्वयंप्रकाश चिद्रूप असा आत्मा असतांहि तो कसा कळेनासा झाला आणि ह्या जडजगताची कशी उत्पत्ति वगैरे झाली, याचें कारण असें आहे, कीं, ह्या (अविद्या) अज्ञानाचे अंगीं दोन मोठ्या शक्ति आहेत. एक आवरणशक्ति आणि दुसरी विक्षेपशक्ति. एक लहानसा ढग सूर्यापुढें आला असतां तो त्या देदीप्यमान सूर्यमंडलाला झांकून टाकून आपल्यास सूर्यदर्शन देत नाहीं, त्याच प्रमाणें अज्ञानाची ही आवरणशक्ति लोकांच्या बुद्धीवर झांकण घालून आपल्यास प्रत्यगात्मदर्शन करूं देत नाहीं. तिच्यामुळेंच दोरी ही खरी दोरी असूनहि ती ओळखतां येत नाहीं. या आवरणशक्तीच्या योगानें आत्म्यास कर्तृत्व, भोक्तृत्व, सुखदुःखादि संसारांतील भावना होऊं लागतात. अज्ञानाची दुसरी जी विक्षेपशक्ति, तिच्या योगानें दोरी ही साप आहे, असें खोटें ज्ञान उद्भवतें. ह्याच शक्तीच्या योगानें स्वावृत आत्म्याच्या ठिकाणीं आकाशादि प्रपंचाचा उद्भव होतो. ह्या विक्षेपशक्तीनें लिंगदेहापासून ब्रह्माण्डापर्यंत सर्व जगत् उत्पन्न केलें आहे. आवरणशक्ति वस्तूंस झांकून टाकते आणि त्या वस्तूंच्या ज्ञानाचा लोप करते. विक्षेपशक्तीच्या

योगानें खऱ्या वस्तूचे ठिकाणीं भलती वस्तु आहे, असा भास होतो आणि मिथ्याज्ञानाचा उद्भव होतो.

या दोन शक्तींनीं युक्त अज्ञान ( अविद्या ) हें चैतन्याचा उपाधि आहे. हें उपाधिबद्ध चैतन्य जगताचें निमित्तकारण व उपादान कारण आहे. चैतन्य प्रधान मानलें म्हणजे तें निमित्त कारण होतें. चैतन्याचे उपाधीला प्राधान्य दिलें असतां तेंच उपादान कारण होतें. कोळी आपल्या तंतूंचें जाळें करतो. कोळी त्या जाळ्याचा कर्ता असल्यामुळें तो त्याचें निमित्तकारण आहे. परंतु ज्या तंतूंचें जाळें तो बांधीत असतो, ते सर्व तंतू त्या कोळ्याच्या शरीरांतूनच बाहेर पडलेले असतात, अशा दृष्टीनें पाहिलें असतां, तोच कोळी त्या जाळ्याचें उपादानकारण बनतो. अशीच अज्ञानानें उपहित ब्रह्मांशाची ( ईश्वराची ) स्थिति आहे.

अज्ञानोपाधिक चैतन्यापासून ( ईश्वरापासून ) आकाश उत्पन्न झालें. आकाशापासून वायु झाला; वायुपासून अग्नि उत्पन्न झाला; अग्नीपासून पाणी आणि पाण्यापासून पृथ्वी निर्माण झाली. या सर्व पदार्थांत जाड्य गुण अधिक असल्यामुळें अविद्येचा जो तमोगुण तो तिच्या विक्षेपशक्तींत प्रधान असला पाहिजे. तमोगुण दुसऱ्या गुणांहून अधिक प्रबळ असतो. म्हणून आकाशादि द्रव्यांत जाड्य गुण अधिक असतो. सत्व, रजस् आणि तमस्, हे गुण कारणांत

जसे असतील तसे ते कार्यांत येतात. आकाशादि हीं पांच सूक्ष्म भूतें होत. यांनाच तन्मात्रा म्हणतात. यांचें पंचीकरण झालेलें नसतें. या पांच सूक्ष्म भूतांपासून सूक्ष्म शरीरें आणि स्थूल भूतें उत्पन्न होतात.

सूक्ष्म शरीरें हींच सावयव लिंगशरीरें होत. लिंगशरीराचे सतरा अवयव आहेत. बुद्धि, व मन, पांच ज्ञानेंद्रियें ( श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा आणि घ्राण ); पांच कर्मेंद्रियें ( वाणी, हात, पाय, स्नायु आणि उपस्थ ) आणि पांच प्राण ( प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान ). याप्रमाणें लिंगशरीराचे हे सतरा अवयव असतात. मन आणि बुद्धि यांत अहंकार आणि चित्त, यांचा अंतर्भाव होतो. बुद्धि आणि मन, यांत आकाशादिकांचे सात्विक अंश एकत्र मिळून असतात. बुद्धि ही अंत:करणाची निश्चयात्मक वृत्ति आहे. मन हें अंत:करणांतील संकल्प व विकल्प दाखविणारी वृत्ति आहे. आकाशादिकांचे सात्विक अंश ज्ञानेंद्रियांत पृथक् पृथक् आपापल्या इंद्रियांत असतात. बुद्धि व पंचज्ञानेंद्रियें मिळून विज्ञानमय कोश होतो. हा कोशच व्यावहारिक जीव होय. कर्ता, भोक्ता, सुखी, दु:खी, या लोकांत व परलोकीं जाणारा, इत्यादि गुण ह्या जीवांत असतात. मन आणि पंचज्ञानेंद्रियें मिळून मनोमय कोश होतो. आकाशादिकांच्या रजोगुणापासून अनुक्रमानें प्रत्येक कर्मेंद्रिय उत्पन्न होतें. ह्या आकाशादिकांचे रजोगुणांचे अंश एकत्र मिळून प्राणपंचक होतें. पंचकर्मेंद्रियें

आणि पंचप्राण यांच्या संयोगानें तीं एकत्र होऊन त्यापासून प्राणमयकोश होतो. विज्ञानमय कोशांत ज्ञानशक्ति असते. म्हणून तो कर्ता आहे, असें समजावें. मनोमयकोशांत इच्छाशक्ति असते, तो कोश कारण ( साधन ) आहे. प्राणमय कोश रजोगुणाचा असल्यामुळें त्यांत क्रियाशक्ति असते, म्हणून तो कार्यरूप आहे. ह्या तीन कोशांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचे हे तीन विभाग वर्णिले आहेत. प्राणमय कोश, मनोमय कोश आणि विज्ञानमय कोश, हे तीन कोश मिळून एक जें कार्य होतें, त्यास सूक्ष्म शरीर म्हणतात.

सर्व सूक्ष्म शरीरांचा समुच्चय करून एक दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें असतां, त्यांचें जें स्वरूप दिसतें त्यास सूक्ष्म शरीराची समष्टि म्हणतात. हें समष्टिरूप पूर्वी सांगितलेल्या झाडीसारखें आहे. हींच सूक्ष्म शरीरें अनेक दृष्टींनीं किंवा बुद्धींनीं निरनिराळीं अशीं पाहिलीं, तर त्याचें व्यष्टिरूप होतें. या समष्टीनें व्याप्त जो ब्रह्मांश किंवा चैतन्य त्यास सूत्रात्मा, हिरण्यगर्भ किंवा प्राण असें नांव आहे. दोऱ्याप्रमाणें तो सर्वांत ओंवलेला असल्यामुळें त्यास सूत्रात्मा म्हणतात. ज्ञानवान् आहे म्हणून त्यास हिरण्यगर्भ असें नांव दिलें आहे. क्रियावान् असल्यामुळें त्याला प्राण हें नांव मिळालें. या सूत्रात्म्याचें समष्टिरूप ( विज्ञानमयादि तीन कोश, हें सूक्ष्म शरीर होय. जाग्रत् स्थितींतील वासना याच्यांत असतात, म्हणून त्याची स्वप्नावस्था असते. स्थूल

प्रपंचाच्या लयाचें हेंच स्थान आहे. सूक्ष्म शरीराच्या व्यष्टीनें व्याप्त जें चैतन्य असतें त्यास तैजस म्हणतात. कारण तेजोमय अन्तःकरणाचा उपाधि त्या चैतन्यास असतो. वासना त्याचे ठिकाणीं असतात म्हणून त्याच्या अवस्थेस स्वप्नावस्था म्हणतात. व्यष्टि हीच त्याचें शरीर, आणि सर्व स्थूल प्रपंचाचा लय यांत होतो. सूत्रात्मा आणि तैजस हे स्वप्नावस्थेंत मनोवृत्तीसह सूक्ष्म विषयांचा अनुभव घेत असतात. वन आणि वनांतील वृक्ष यामध्यें जसा वस्तुतः भेद नसतो आणि त्यांतील आकाशांतहि जसा भेद नसतो त्याचप्रमाणें या सूक्ष्म शरीरांच्या समष्टि व व्यष्टि यांत भेद नाहीं आणि सूत्रात्मा व तैजस ह्यांतहि वस्तुतः भेद नाहीं. याप्रमाणें सूक्ष्म शरीराची उत्पत्ति आहे.

पूर्वी सांगितलेलीं आकाश, वायु, अग्नि, पाणी आणि पृथ्वी, हीं पांच सूक्ष्मभूतें किंवा तन्मात्रा या प्रत्येकाचें पंचीकरण करून त्यापासून पंचमहाभूतें किंवा स्थूलभूतें उत्पन्न होतात. पंचीकरणाची क्रिया येणेंप्रमाणें असतेः— आकाशादि प्रत्येक सूक्ष्म भूताचे बरोबर दोन दोन भाग करावेत. नंतर प्रत्येकाचा एक अर्धा भाग कायम ठेवून दुसऱ्या अर्ध्या भागाचे पुनः चार चार भाग करावेत. म्हणजे प्रत्येक भूताचे $\frac{1}{2}$ $\frac{1}{8}$ $\frac{1}{8}$ $\frac{1}{8}$ $\frac{1}{8}$ असे भाग होतील. प्रत्येकाचा $\frac{1}{8}$ भाग त्या भूताच्या व्यतिरिक्त असलेल्या चार भूतांच्या अर्ध्या अर्ध्या भागांत मिसळावा याप्रमाणें प्रत्येक भूताचें पंचीकरण होईल. उदाहरणार्थः—

आकाशाचा $\frac{1}{2}$ भाग + $\frac{1}{8}$ वायु + $\frac{1}{8}$ अग्नि + $\frac{1}{8}$ आप + $\frac{1}{8}$ पृथ्वी = १ आकाश झालें. यांत आकाशाचा भाग अधिक आहे म्हणून याला आकाश महाभूत असें म्हणतात. याचप्रमाणें दुसऱ्या भूतांची व्यवस्था असते. अशा रीतीनें पंचमहाभूतें (स्थूलभूतें) उत्पन्न होऊन त्यांपासून सर्व ब्रह्माण्ड, त्यांतील जारज, अण्डज, उद्भिज्ज, आणि स्वेदज, हीं चतुर्विध स्थूल शरीरें व त्यांना उचित असे अन्नपानादि पदार्थ उत्पन्न झाले आहेत. सूक्ष्म शरीराप्रमाणेंच या सर्व स्थूल शरीरांचें समष्टिरूप असतें. या समष्टीनें उपहित (व्याप्त) चैतन्यास वैश्वानर किंवा विराट असें म्हणतात. सर्व नरांचा अभिमानी आणि विराजमान असल्यांमुळें या ब्रह्मांशास (जीवास) हीं नांवें दिलीं आहेत. समष्टि ही याचें स्थूल शरीर आहे; अन्नाचा विकार यांत होतो, म्हणून त्याला अन्नमयकोश म्हणतात. स्थूल भोगांचा उपभोग ह्या स्थूल शरीरांत मिळतो म्हणून याच्या अवस्थेला जाग्रति असें नाव आहे. स्थूल शरीराचें व्यष्टिरूपहि आहे. या व्यष्टीनें उपहित चैतन्यास (ब्रह्मांश) विश्व असें म्हणतात. सूक्ष्म शरीराचा अभिमान न सोडतां स्थूल शरीरांत हा चैतन्यांश (जीवात्मा) प्रवेश करतो म्हणून त्याला विश्व हें नांव दिलें आहे. म्हणजे तो चोहोंकडे आहे असें या नावानें दर्शविलें आहे. या विश्वाचें व्यष्टि ही स्थूल शरीर होय. हाच अन्नमय कोश आणि याची अवस्था ही जाग्रदावस्था आहे. आपापल्या देवतांनीं नियंत्रित असलेलीं

पंचज्ञानेंद्रियें, तशींच पंचकर्मेंद्रियें आणि अंतःकरणचतुष्टय (मन, बुद्धि, अहंकार व चित्त) यांच्या साहाय्यानें विश्व आणि वैश्वानर हे या सर्व स्थूल विषयांचा उपभोग व अनुभव घेत असतात. वन व वनांतील वृक्ष यांत जसा भेद नसतो तसाच ह्या समष्टि व व्यष्टींत भेद नाहीं. आणि त्या वनाच्या आकाशांत व वृक्षांच्या आकाशांत जसा वस्तुतः भेद नाहीं, तसाच वैश्वानर व विश्व यांत भेद नाहीं. अशा रीतीनें पंचीकृत महाभूतांपासून हा स्थूल प्रपंच उत्पन्न झाला आहे.

वस्तूवर अवस्तूचा आरोप झाल्यामुळें, (अध्यास किंवा अविद्या याच्यायोगानें) कारणप्रपंच, सूक्ष्मप्रपंच, आणि स्थूलप्रपंच असे तीन प्रपंच होतात. ह्या प्रत्येकाची समष्टि आणि व्यष्टि, अशीं रूपें आहेत. ह्या तीन देहाच्या किंवा प्रपंचाच्या समिष्ट आणि व्यष्टि यांनीं उपहित जो ब्रह्मांश (चैतन्य) त्यास निरनिराळीं नांवें आहेत. सुषुप्ति, स्वप्न आणि जाग्रत् अशा त्यांच्या अनुक्रमें तीन अवस्था आहेत. कारणप्रपंचांतील म्हणजे सुषुप्ति अवस्थेतील ब्रह्मांशास ईश्वर व प्राज्ञ म्हणतात. सूक्ष्मप्रपंचांतील (स्वप्न) ब्रह्मांशास सूत्रात्मा हिरण्यगर्भ किंवा प्राण आणि तैजस अशीं नांवें आहेत; स्थूलप्रपंचांतील (जाग्रदावस्था) ब्रह्मांशास वैश्वानर व विश्व असें म्हणतात. ह्या तीन अवस्थेंत असणारे हे तीन ब्रह्मांश होत. या अंशांच्या पलीकडे असणारें व या सर्वांचें आधारभूत असलेलें जें परब्रह्म त्यासच तुरीय किंवा

चतुर्थ ब्रह्म म्हणतात. महावाक्यांत ह्या परब्रह्माचा विचार केलेला आहे.

ह्या प्रत्यगात्म्याच्या ( परब्रह्माच्या ) स्वरूपाबद्दल अनेक तत्त्ववेत्त्यांचें मिथ्या अध्यारोपामुळें निरनिराळें मत झालेलें आहे. ही गोष्ट पूर्वी सांगितलीच आहे. परंतु ती मनांत चांगली ठसावी, ह्मणून तीं मतें पुनः येथें सांगितलीं आहेत. अतिप्राकृत लोक आपल्या मुलाबाळांसच आत्मा समजतात. चार्वाक मताचे लोक या स्थूल शरीरासच आत्मा ह्मणतात. दुसरे चार्वाकपंथी लोक इन्द्रियें हींच आत्मा आहेत असें मानतात. कांहीं चार्वाकमताचे लोक प्राणाला आत्मा ह्मणतात. दुसरे कांहीं चार्वाकपंथी लोक मन हेंच आत्मा आहे असें समजतात. विज्ञानवादी बौद्ध लोकांच्या मताप्रमाणें बुद्धि हीच आत्मा आहे. प्रभाकर आणि तार्किक यांच्या मतानुरोधानें ज्ञान हेंच आत्मा आहे असें ते ठरवितात. भट्टाचार्यांचे अनुयायी अज्ञानानें उपहित जें चैतन्य त्यालाच आत्मा मानतात. माध्यमिक बौद्धांचें मत असें आहे कीं सर्व शून्य आहे, ह्मणून शून्य हेंच आत्मा होय. या सर्व मतांस वेदान्तवाक्यांचा आधार आहे, हें खरें आहे; तथापि प्रबल वेदान्तवाक्याच्या आधारानें त्यांचें खंडन वेदांतमतांत केलें आहे. नित्य, शुद्ध, बुद्ध, सत्यस्वभाव, प्रत्यक्चैतन्य, असा हा आत्मा आहे असें वेदांताचें मत आहे.

सद्वस्तूवर असद्वस्तूचा आरोप झाल्यावर जें अन्यथा ज्ञान ( किंवा मनांत भाव ) उत्पन्न होतें. तें दोन प्रकारानें होतें? मूळवस्तूच्या स्वरूपांत सर्वस्वीं बदल होऊन निराळेंच रूप उत्पन्न होतें. उदाहरणार्थ दूध विरजल्यावर दही होतें. हें दही अगदीं भिन्न होतें. त्यांत दुधाचे स्वरूपाचा कांहींएक अंश रहात नाहीं. या रूपान्तरास विकार किंवा परिणाम असें ह्मणतात. ( २ ) दुसऱ्या प्रकारचा जो भेद दिसून येतो, त्यांत मूळवस्तूचें स्वरूप कायम असतें, आणि या स्वरूपांत वस्तुतः भेद न होतां अन्यथाज्ञान भ्रान्तीनें उत्पन्न होतें. या रूपान्तरास विवर्त असें नांव आहे. परिणामवाद आणि विवर्तवाद, हे फार मोठे वाद आहेत. त्यांविषयीं येथें लिहिणें अगदीं अशक्य आहे. सारांश अज्ञान सर्व काढून टाकून ब्रह्मस्वरूप समजून घेतलें पाहिजे. हें ब्रह्मस्वरूप प्रतिपादन करणारीं महावाक्यें बारा आहेत. तीं येथें सांगून वेदान्तमीमांसेचा सारांश संपविला पाहिजे. १ 'तत्त्वमसि,' २ अहंब्रह्मास्मि; ३ अयमात्मा ब्रह्म; ४ एव त आत्मान्तर्याम्यमृतः ५–६ स यश्चायं पुरुषे, यश्चासावादित्ये स एकः ७ प्रज्ञाप्रतिष्ठा, प्रज्ञानंब्रह्म, ८ विज्ञानमानन्दं ब्रह्म, ९ सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म, १० सएवमेष पुरुषो ब्रह्म, ११ सर्वं खल्विदं ब्रह्म, १२ एकमेवाद्वितीयम् ॥ हीं महावाक्यें निरनिराळ्या उपनिषदांतून घेतलेलीं आहेत.

## धर्मशास्त्रें.

**धर्मशास्त्रें** हीं वेदांचें चवथें व शेवटचें उपांग होय. ऋषिप्रणीत स्मृती, इतिहास, सांख्य आणि योग ( हीं दोन दर्शनें ) या सर्वांचा धर्मशास्त्रांत अन्तर्भाव होतो. वाल्मीकींनीं केलेलें रामायण आणि व्यासाचें महाभारत ह्या दोन ग्रंथांस इतिहास ही संज्ञा आहे. हे ग्रंथ सर्वश्रुत असल्यामुळें त्याविषयीं विशेष लिहिण्याची अवश्यकता नाहीं. प्राचीनकाळीं अनेक प्रसंगीं अनेक ऋषींनीं लोकांना मार्गदर्शक म्हणून अनेक स्मृती लिहून ठेवल्या. त्या सर्वच आतां उपलब्ध आहेत असें नाहीं. तथापि बावीस ऋषींच्या स्मृती बऱ्याच प्रसिद्ध आहेत. त्या बावीस ऋषींचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ मनु, २ याज्ञवल्क्य, ३ विष्णु, ४ यम, ५ अंगिरस, ६ वसिष्ठ, ७ दक्ष, ८ संवर्त, ९ शातातप, १० पराशर, ११ गौतम, १२ शंख, १३ लिखित, १४ हारीत, १५ आपस्तम्ब, १६ उशनस्, १७ व्यास, १८ कात्यायन, १९ बृहस्पति, २० देवल, २१ नारद आणि २२ पैठिनसि इत्यादि.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे मनुष्यांचे चार वर्ण आहेत. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास हे वयपरत्वें चार आश्रम आहेत. या वर्णाश्रमांचे विशेष धर्म असतात. त्या धर्मांचें विश्वासपूर्वक आचरण करणें, हें हिंदुधर्माचें मुख्य तत्त्व आहे. काल, देश, वर्तमान यांच्या

स्थितीप्रमाणें या धर्माचरणांत अंतर पडण्याचा संभव असल्यामुळें कदाचित् प्रसंगानुरोधानें निरनिराळ्या वेळीं अनेक ऋषींनीं अनेक स्मृती केल्या असाव्यात. तथापि मुख्य तत्त्वासंबंधानें त्यांत फरक नाहीं. मनु आणि याज्ञवल्क्य या दोघांच्याच स्मृती सध्यां प्रचलित आहेत. त्यांचा गोषवारा येथें देतां येत नाहीं. तथापि मनूच्या स्मृतींत कोणकोणत्या विषयांचें प्रतिपादन मुख्यतः केलें आहे, हें सांगितलें असतां सर्व स्मृतींतील विषयांची सामान्यतः कल्पना येईल असें वाटतें. म्हणून त्या स्मृतींतील मुख्य विषय टिपेंत सांगितले आहेत*

* **टीपः**–जगाची उत्पत्ति, संस्कारविधि, ब्रह्मचर्य, विद्यासमाप्ति, ( स्नान ). विवाह, विवाहलक्षणें, पंचमहायज्ञ, श्राद्धें, स्नातकांचीं व्रतें, वृत्ति, त्यांचें लक्षण, भक्ष्याभक्ष्य, शौच, द्रव्यशुद्धि, स्त्रीधर्म, योग, तापस्य, मोक्ष, संन्यास, राजाचे धर्म, राजाचीं कार्ये, त्यांचा निर्णय, व्यवहार, साक्षिप्रश्नविधान, स्त्रीपुरुषांचे [नवराबायकोचे] धर्म, ऋक्थभाग, विभाग धर्म, द्यूत, चोरादिकांचें निरसन, वैश्यशूद्रांचे धर्मानुष्ठान, संकीर्ण वर्णांचा संभव, अनुलोम प्रतिलोम वगैरे, आपद्धर्म, प्रायश्चित्तें, कर्मसंभव जन्मादि कर्मांचे गुणदोष, देशधर्म, जातिधर्म, कुलधर्म, पाखंडगणधर्म इत्यादि.

# सांख्यदर्शन.

**सांख्य** व **योग** हीं दोन शास्त्रें वस्तुतः स्वतंत्र ग्रंथ आहेत. त्यांची धर्मशास्त्रांत कां गणना व्हावी हें कळत नाहीं. न्यायमीमांसादिकांप्रमाणें ह्यांतहि तात्त्विक विचार आहे. सांख्यशास्त्र कपिल महामुनींनीं प्रणीत केलें आहे, अशी परंपरा आली आहे. हें मत फारच प्राचीनकाळीं प्रतिपादित होऊन त्याचा प्रसार चोहोंकडे झाला असावा, असें वाटतें. सांख्यसूत्रें एकंदर ५२७ आहेत. त्याचे सहा अध्याय आहेत. त्रिविध दुःखापासून अत्यन्त निवृत्ति होणें हाच पुरुषार्थ. प्रकृति व पुरुष यांच्यामधील भेद समजून, त्यांचें विवेकज्ञान झालें असतां, मनुष्य कृतकृत्य होतो, ही गोष्ट समजून देणें, हा या शास्त्राचा मुख्य हेतु आहे. सांख्यसूत्रांचे पहिल्या अध्यायांत या शास्त्राच्या मुख्य चार अर्थांचें (विषयाचें) निरूपण केलें आहे. १ प्रकृति. २ प्रकृतिविकृति; ३ विकृति किंवा विकार आणि ४ प्रकृति व विकृतिरहित पुरुष (हेयहाने तयोर्हेतू चेति व्यूहा यथाक्रमम् सू. १६५) दुसऱ्या अध्यायांत प्रकृति किंवा प्रधान यांचीं कार्यें सांगितलीं आहेत. लिंगदेहाचे घटक तन्मात्रा, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, अहंकार, मन, इत्यादिकांचें प्रतिपादन येथें केलें आहे. (सू. ४७). ३ तिसऱ्या अध्यायांत विवेकाचें अथवा परमवैराग्याचें प्रतिपादन केलें आहे. विषयांपासून

विरक्त झालें पाहिजे, असें या अध्यायांत सांगितलें आहे. (सू. ८४) ४ चवथ्या अध्यायांत पिंगला शुक इत्यादि विरक्तांच्या आख्यायिका सांगून उदाहरणें दिलीं आहेत. (सू. ३२) ५ पांचव्या अध्यायांत परपक्षाचा निर्णय केला आहे, म्हणजे आपल्या पक्षाच्या विरुद्ध बोलणाऱ्या कुवादी लोकांचें निराकरण करून आपला सिद्धांतपक्ष दृढ केला आहे, (सू. २०,९) ६ सहाव्या अध्यायांत सर्वशास्त्रार्थ संक्षेपानें सांगितला आहे. पूर्वी न सांगितलेला अर्थ येथें सांगून वाक्यार्थाचा उपसंहार केला आहे. (सू. ७०)

सांख्य दर्शनाच्या मताप्रमाणें एकंदर २५ पंचवीस तत्त्वें किंवा मुख्य पदार्थ आहेत. पुरुष, प्रकृति (प्रधान), महत्, अहंकार, पंचतन्मात्रा, पंच ज्ञानेन्द्रियें, मन, आणि पांच महाभूतें. हे ते पंचवीस पदार्थ होत. ह्या तत्त्वांच्या अंगीं असणाऱ्या कार्यकारणधर्मावरून त्यांचे चार भाग किंवा वर्ग मानले आहेत. ह्या वर्गांसच चार अर्थ असें म्हणतात. १ केवळ प्रकृति, मूल प्रकृति (प्रधान) २ रा प्रकृतिविकृति; ३ रा केवल विकृति किंवा विकार आणि ४ था अनुभव म्हणजे प्रकृति नाहीं व विकृतिहि नाहीं. प्रधान किंवा प्रकृति ही सर्वांचें उपादानकरण आहे. सत्त्व, रजः आणि तमः, या तीन गुणांची ही साम्यावस्था होय. हिला उत्पन्न करणारें कारण कांहींएक नाहीं, म्हणून हिला मूल प्रकृति, केवल प्रकृति किंवा अमूलमूल असें म्हणतात. प्रकृतीपासून महत्तत्त्व (अन्तःकरणादि) झालें. त्यापासून

अहंकार निर्माण झाला आणि अहंकारापासून पंच तन्मात्रा उत्पन्न झाल्या. हीं सात तत्त्वें प्रकृति विकृति होत. महत् हें प्रकृतीचें कार्य ( विकृति ) आहे आणि तें अहंकाराची प्रकृति ( कारण ) आहे. ह्याच प्रमाणें अहंकार हा महताची विकृति आणि तन्मात्राची प्रकृति आहे. तन्मात्रांचें कार्य पंचमहाभूतें आहेत. पांच ज्ञानेन्द्रियें, पांच कर्मेन्द्रियें, मन आणि महाभूतें, हीं सोळा तत्त्वें केवळ विकृति अथवा विकार होत. कारण हीं कोणत्याहि दुसऱ्या द्रव्याचें कारण नाहींत. यांच्यापासून दुसरे पदार्थ उत्पन्न होत नाहींत. हीं सोळा तत्त्वें अहंकाराचीं आणि तन्मात्रांचीं विकृति ( कार्यें ) आहेत, परंतु कोणाचीहि प्रकृति नाहींत, म्हणून त्यांसच केवलविकृति असें म्हणतात. अहंकाराच्या तामस गुणापासून तन्मात्रांची उत्पत्ति आहे; त्याच्या सात्विक गुणापासून दहाइंद्रियें व मन हीं झालीं आहेत. यांत रजोगुणहि आहे. पुरुष हा कोणापासून उत्पन्न झाला नाहीं, आणि ह्यापासून कांहीं उत्पन्न होत नाहीं. हा कोणाची प्रकृति किंवा विकृति दोन्हीहि नाहीं. म्हणून त्याला अनुभव असें नांव दिलें आहे. पुरुष कूटस्थ, नित्य अपरिणामी असा आहे,

प्रत्यक्ष, अनुमान, आणि आप्तवाक्य ( शब्द ) अशीं तीनच प्रमाणें आहेत, असें सांख्यतत्त्वशास्त्रांत मानिलें आहे. ह्या तीन प्रमाणांच्या योगानें सर्व प्रमेयांची सिद्धि होते. कार्य-कारण संबंध आहे, असें मानलें असतां चार परस्पर विरुद्ध अशीं मतें प्रतिपादन केलीं जातात, आणि त्यामध्यें वाद उप-

स्थित होतो. असतापासून सत् उत्पन्न होतें असें बौद्धांचें मत आहे. नैयायिकादि मतानुयायी लोकांचे मताप्रमाणें सतापासून असत् होतें. वेदान्ती लोकांचें मत असें आहे कीं, हें सर्व जगत् सताचा विवर्त आहे. सतावर असताचा आध्यारोप आहे. जगत् ( अथवा हीं सर्व कार्यें ) सद्वस्तु नाहींत. सतापासून सत् उत्पन्न झालें आहे असें सांख्य मत आहे. पहिल्या तीन मतांचें खंडन सांख्यमतानुयायी लोकांनीं आपल्या युक्तिवादानें केलें आहे. सांख्यांस परिणामवाद मान्य आहे. ते विवर्त वाद कबूल करीत नाहींत.

हें जगत् सुखदुःखमोहात्मक आहे. या जगद्रूपी कार्याचें कारण त्या कार्यांत असले धर्म उत्पन्न करणारेंच असलें पाहिजे. सत्वगुणापासून सुख होतें, रजोगुणापासून दुःख होतें, आणि तमोगुणापासून मोह उत्पन्न होतो. म्हणून या तीन गुणांची समान अवस्था जींत आहे अशी जी प्रकृति ती ह्या सर्व सृष्टीचें मूळ कारण आहे. या मूळ कारणापासून ही विचित्र सुखदुःखमोहात्मक सृष्टि निर्माण झाली आहे. हिचा उपभोग घेणारा कोणीतरी असला पाहिजे. पुरुष हा भोक्ता होय. हाच आत्मा. पुरुष नित्यशुद्ध, अपरिणामी, उदासीन, इत्यादि गुणयुक्त असा आहे. तो सुखदुःखादिकांचा भोग घेतो. देश, काल परिस्थिति यांच्या अनुरोधानें या जगांत नानाविध व अनन्त असे सुखदुःखांचे प्रकार उत्पन्न होत असतात; या सर्वांचा उपभोग घेणारे अनन्त आत्मे असणें जरूर आहे. आत्मा जर एकच असता, तर त्याला एकसमयीं व भिन्न देशीं

भिन्न सुखदुःखादिकांचा उपभोग होणार नाहीं. यासाठीं आत्मे अनन्त आहेत. कर्मप्रमाणें त्यांच्या पाठीमागें हें भोक्तृत्व लागलें आहे. कर्मफल भोगण्यास त्या आत्म्याला अनेक जन्म घ्यावे लागतात. त्याच्या बरोबर त्याचें लिंगशरीर जात असतें. अहंकार, तन्मात्रा, इंद्रियें व मन यांचा लिंगदेह बनतो.

प्रकृति अथवा प्रधान हें अचेतन आहे. याच्या अंगीं सृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य कसें असणार; म्हणून सर्व-शक्तिमान् असा परमेश्वर असला पाहिजे, असें कोणी प्रति-पादन केलें, तर त्यास सांख्याचें उत्तर असें आहे. प्रकृति अचेतन आहे खरी; तथापि अचेतन वस्तूंच्या अंगीं कांहीं विलक्षण सामर्थ्य असतें. उदाहरणार्थ. दूध अचेतन आहे, तरी पण वत्साचें पोषण व्हावें म्हणून तें जसें आपोआप उत्पन्न होतें, त्याच न्यायानें पुरुषाचे उपभोगासाठीं प्रकृतिपा-सून सर्व सृष्टि उत्पन्न झाली आहे. लोहचुंबक स्वतः निर्व्या-पार असूनहि, लोखंडाच्याजवळ आला म्हणजे लोखंडांत व्यापार ( हालचाल ) उत्पन्न करतो. तशीच स्थिति पुरुषाची आहे. पुरुष स्वतः निर्व्यापार आहे, तथापि त्याच्या अंगांत अशी कांहीं आकर्षणशक्ति आहे कीं, त्याच्या सान्निध्यानें प्रकृति आपलीं कार्यें करूं लागते. दोघांनाहि एकमेकांची अपेक्षा असते. प्रकृतींत भोग्यता आहे, म्हणून तिला भोक्ता पुरुष पाहिजे असतो. पुरुषाला कैवल्याची इच्छा असते, परंतु प्रकृति आणि पुरुष यांचा विवेक निश्चित झाल्याशिवाय कैवल्य मिळणें कठीण आहे, म्हणून पुरुषाला प्रकृतीची

अपेक्षा असते. याप्रमाणें परस्परापेक्षा असल्यामुळें त्यांच्या सान्निध्यामुळें सर्व सृष्टि व तिच्यांतील व्यापार सुरू आहेत. रस्त्यांत अंधळ्याची आणि पांगळ्याची गांठ पडली असतां अंधळ्याच्या खांद्यावर बसून पांगळा वाट दाखवितो आणि अशा रीतीनें ते दोघेहि मार्ग क्रमण करतात, त्याचप्रमाणें प्रकृतिपुरुषांची गांठ पडून हा सर्व सृष्टिव्यापार चालला आहे. या सृष्टींतील तापत्रयापासून पुरुषाची सुटका व्हावयाची असेल तर ती प्रधान व पुरुष याच्या विवेकानेंच होईल. 'ज्ञानादेवमुक्तिः' हें सांख्यांचें मुख्य तत्त्व आहे. रंगभूमीवर नाटकांतील पात्रें आपलें काम करून जशीं पडद्यांत जातात किंवा कळवंतीण आपला नाच दाखवून निघून जाते, त्याचप्रमाणें ज्ञान झाल्यावर प्रकृति प्रवृत्त झालेली असते, ती निवृत्त होते. विवेक हाच पुरुषार्थ होय.

परमेश्वर हा करुणायुक्त होऊन जगताचा प्रवर्तक झाला आहे, असें जें परमेश्वराच्या अस्तित्ववाद्यांचें मत आहे, तें सांख्यांस कबूल नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें या सृष्टिक्रमाला परमेश्वराची अवश्यकता मुळींच नाहीं.

सांख्यशास्त्रावर ईश्वरकृष्णानीं केलेला 'सांख्यकारिका' नांवाचा एक ग्रन्थ आहे. हा ग्रन्थ संक्षिप्त असून सुबोध आहे. प्रस्तुत असलेल्या या विषयावरील ग्रन्थांत हा ग्रन्थ फार जुना आहे. ग्रन्थसंख्या फक्त ७२ आहे तथापि यांत ६० विषयांचें प्रतिपादन केलें आहे. सांख्य प्रवचनें असा

एक दुसरा ग्रन्थ आहे. विज्ञानभिक्षु व वाचःस्पती यांचें या शास्त्रावर भाष्य व टीका आहेत. कपिल महामुनींनीं प्रणीत मूलसूत्रें अशीं २२ बावीस सूत्रें निराळीं छापिलीं आहेत. या सूत्रांत सामान्य विषय प्रतिपादिले आहेत.

---

## योगदर्शन.

सांख्य व योग यांमध्यें मुख्यतत्त्वासंबन्धानें मतभेद नाहीं. पंचवीस तत्वें दोन्हीमतांस मान्य आहेत. फक्त सांख्य ईश्वरास्तित्व मानीत नाहींत. योगशास्त्रांत परमेश्वर हा सव्विसावें तत्त्व आहे, असें मानतात. म्हणून या शास्त्रास सेश्वर सांख्य असेंहि म्हणतात. सांख्याप्रमाणें योगशास्त्रहि दुसऱ्या शास्त्राहून फार प्राचीन आहे. योगानुशासन अथवा योगदर्शन हें पतञ्जलिमहामुनींनीं प्रणीत केलें आहे. या दर्शनाचे चार पाद आहेत. अथ योगानुशासनम् (१). योगश्चित्तवृत्तिनिरोधः (२). असा याचा आरंभ आहे. हा सूत्रात्मक ग्रन्थ आहे. एकंदर सूत्रें १९५ आहेत. पहिल्या पादांत योग म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध असें सांगून योगाचें लक्षण सांगितलें आहे; आणि समाधीचें सविस्तर वर्णन केलें आहे. या पादाला समाधिपाद म्हणतात. (सूत्रें ५१). २ दुसऱ्या पादांत तपः स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान, या क्रियायोगानें (व्युत्थित झालेल्या) चित्ताचीं यमानियमादि पांच साधनें सांगितलीं

आहेत. हीं बहिरंगें होत. ( सूत्रसंख्या ५५ ). ३ तिसऱ्या पादांत धारणा, ध्यान आणि समाधि हीं तीन अंतरंग साधनें सांगितलीं आहेत. यांला संयम म्हणतात. विभूती ह्या अवान्तरफल ह्मणून प्राप्त होतात, त्यांचेंहि या पादांत वर्णन आहे. याला विभूतिपाद म्हणतात. ( सूत्रें ५५ ). ४ चवथ्या पादांत जन्म, औषध, मंत्र, तप, आणि समाधि या पांचांपासून होणाऱ्या पांच सिद्धि यांचें सविस्तर प्रतिपादन करून या शास्त्राचें मुख्य प्रयोजन जें कैवल्य तें प्रतिपादिलें आहे.

योगदर्शनांतील सव्विसावें तत्त्व परमेश्वर आहे, असें वर सांगितलेंच आहे. हा परमेश्वर क्लेश, कर्माचा विपाक, आणि आशय, यांपासून अलिप्त आहे. अपल्या इच्छेनें तो निर्माण देहांत राहून लौकिक आणि वैदिक संप्रदाय चालू ठेवतो आणि संसारतापानें गांजलेल्या प्राण्यावर अनुग्रह करतो, असें त्या परमेश्वराचें स्वरूप आहे. कमळाप्रमाणें निर्मळ व निर्लेप अशा जीवात्म्यास संसाराचा ताप कसा होईल? आणि तो ताप शमन करण्याच्या कामीं परमेश्वराचें साहाय्य घेऊन त्याचें अनुग्राहकत्व कबूल करावें लागतें. अशी कोणी शंका घेईल तर त्यावर योगमताचें उत्तर असें आहे. रजोगुणापासून संसारांत फार ताप होतो.बुद्धिरूपानें प्रगट झालेल्या सत्वगुणावर त्याची छाप बसून सत्वाला त्रास होतो. या स्थितींत तमोगुणा ( मोहा ) च्या प्राबल्यानें जीवात्म्यास हा ताप आपल्या स्वतःलाच होतो आहे, असें वाटूं लागतें. हा मोह आत्म्यांत उत्पन्न होतो. अशा रीतीनें जीवात्मा तप्त होतो.

चिच्छक्तीलाच भोक्तृशक्ति म्हणतात. तीच आत्मा होय, ही चिच्छक्ति बुद्धितत्वांत प्रतिबिंबित झाली म्हणजे बुद्धीचे गुण तिच्या अंगीं येतात असा अनुभव येतो. या रीतीनें होणाऱ्या त्रिविध तापांपासून सुटका करण्यास योग हें मुख्य साधन आहे. हा योग या अनुशासनाचा विषय आहे. योगाभ्यास करून कैवल्य मिळवावें हें त्याचें प्रयोजन आहे.

चित्ताच्या वृत्तींचा निरोध करणें, यास योग म्हणतात. चित्ताच्या वृत्ति पांच आहेत १ प्रमाण, २ विपर्यय ( मिथ्याज्ञान ), ३ विकल्प, ४ निद्रा आणि ५ स्मृति. वृत्तींचा निरोध अभ्यास आणि वैराग्य ह्यांनीं होतो. चित्ताचे स्वरूपाच्या ठिकाणीं चित्त ठेवण्याच्या कामीं यत्न करणें, यास अभ्यास म्हणतात. सतत, निरंतर आणि दीर्घ काळपर्यंत आदरानें हा यत्न चालविला असतां हा अभ्यास दृढ होतो. ऐहिक व परलोकचे विषयासंबन्धानें मनांत कंटाळा असणें आणि ते विषय माझ्या स्वाधीन आहेत, मी त्यांच्या स्वाधीन नाहीं अशी बुद्धि असणें, याला वैराग्य म्हणतात. क्रियायोगाच्या साहाय्यानें अभ्यास व वैराग्य सुलभ होतात. तपः, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान यांस क्रियायोग म्हणतात. कृच्छ्रचांद्रायण इत्यादि प्रकारानें शरीराचें शोषण करणें याला तप असें म्हणतात. प्रणव गायित्री वेद इत्यादिकांचें अध्ययन, हा स्वाध्याय होय. सर्व क्रियांच्या फळाची अपेक्षा न धरतां त्या परम गुरु जो परमेश्वर त्याला अर्पण करणें, यासच ईश्वरप्रणिधान असें नांव आहे.

संसारांतले क्लेश अगदीं कमी करणें ( तनुकरण ), आणि समाधि ही भावना उत्पन्न करणें, हे दोन मोठे अर्थ साध्य करून घेतले पाहिजेत. १ अविद्या, २ अस्मिता, ३ राग, ४ द्वेष आणि ५ अभिनिवेश असे पांच फार मोठे क्लेश आहेत. अनित्य, अशुचि, दुःखदायक, आणि अनात्म अशा वस्तू खरोखर नित्य, शुचि, सुखदायक आणि आत्मस्वरूपच आहेत असें समजणें, याला अविद्या म्हणतात. अज्ञान किंवा मिथ्याज्ञान ( विपर्यय ) असाच अविद्या शब्दाचा अर्थ आहे असें सामान्यतः मानलें असतां कांहीं हरकत नाहीं. 'अतस्मिंस्तद्बुद्धिः', हें अविद्येचें लक्षण समजावें. अविद्या ही दुसऱ्या क्लेशांस उत्पन्न करते. ती त्यांचें उत्पत्तिस्थान आहे. २ ( अस्मिता ) पहाणारा आणि पाहण्याची शक्ति, हीं दोन्ही एकच आहेत असा जो अभिमान, त्याला अस्मिता म्हणतात. सत्व आणि पुरुष हीं एकच आहेत, असें मानणें यालाच अस्मिता म्हणतात. अस्मिता म्हणजे अहंपणा. ३ (राग), सुखाचें स्मरण होऊन तें साधन करून घेण्याची इच्छा, ( तृष्णा ), हीच राग होय. ४ ( द्वेष ), दुःखाचें स्मरण होऊन तें दुःख आणणाऱ्या वस्तुविषयीं तिटकारा, याला द्वेष म्हणतात. ५ ( अभिनिवेश ) ही अमुक वस्तु माझी ही मला हवी. ही माझ्या जवळून जाईल, तिचा वियोग होईल, मी मरेन इत्यादि विनाकारण मनांत उत्पन्न होणारी काळजी व भीति, ह्याच अभिनिवेश होत. हा अभिनिवेश पूर्व संस्कारामुळें स्वतःच मनांत उत्पन्न झाला असतो,

आणि त्याचा पगडा विद्वान लोकांवरहि चांगला बसला असतो. या जगांत आपण जीं कांहीं बरीं वाईट कर्में करतों त्यांच्या विपाकाचे ( फलाचे ) धर्माधर्मसंस्कार आपल्या मनांवर होतात. यांस कर्माशय म्हणतात. त्यापासून प्राणी-मात्रांस, जाति, आयुष्य आणि भोग प्राप्त होतात. सर्व क्लेशांचें मूळ हा कर्माशय आहे.

सामान्यतः हे पांच क्लेश अभ्यास व वैराग्य आणि योगाच्या आठ अंगांच्या साधनांनीं अगदीं कमी करतां येतात. त्यांच्यामुळेंच चित्ताच्या वृत्तींचा निरोध होतो. हीं आठ अंगें पुढें सांगितलीं आहेत. समाधि हा या अंगां-पैकीं शेवटचें अंग आहे. त्याचें स्वरूपहि पुढेंच सांगितलें आहे.

योगाचीं आठ अंगें आहेत. पहिल्या पांचांना बहिरंगें म्हणतात. पुढल्या तीन अंगास अन्तरंगें म्हणतात. १ यम, २ नियम, ३ आसन, ४ प्राणायाम, ५ प्रत्याहार, ६ धारणा, ७ ध्यान आणि ८ समाधि. हीं आठ अंगें होत. १ अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरि-ग्रह, हे पांच यम आहेत. २ शुचिर्भूतपणा, संतोष, तप, स्वाध्याय, लोभ नसणें आणि ईश्वरप्रणिधान, यांस नियम म्हणतात. ३ आसन म्हणजे स्थिर आणि सुख-दायक अशी शरीराची स्थापना ( बैठक ), पद्म, स्वस्तिक, दण्डक, कुक्कुट, इत्यादि अनेक योगांतील आसनें

सांगितलीं आहेत. त्यांपैकीं एखादें विशिष्ट आसन करून बसणें. ४ प्राणायाम. स्थिर आसन करून बसण्याची संवय झाली म्हणजे प्राणायाम करावा. श्वास व प्रश्वास म्हणजे नाकांतून वारा आंत घेणें आणि तो बाहेर टाकणें. पूरक ( वारा आंत घेणें ), कुंभक ( वायु पोटांत थांबवून ठेवणें ), आणि रेचक (म्हणजे तो बाहेर टाकणें), असे प्राणायामाचे तीन भाग आहेत. त्याविषयीं नियम व प्रक्रिया योगांत सांगितलेलीं असतात. प्राणायामानें इंद्रिय शुद्धि होते. ५ प्रत्याहार. यमनियमादि चार अंगांचा अभ्यास चांगला झाला आणि मन संस्कृत झालें म्हणजे मग प्रत्याहारास आरंभ करावा. इंद्रियांना आपापल्या विषयांकडे न जाऊं देतां, त्यांची ग्रहण करण्याची शक्ति किंवा विषयांकडे जाण्याची प्रवृत्ति ही बंद करून त्या इंद्रियांना चित्ताकडेच वळवून घेणें, म्हणजे सर्व इंद्रियें चित्तांत आणून ठेवणें, याला प्रत्याहार म्हणतात. चित्ताच्या स्वरूपांत त्यांचें स्वरूप मिळालें, म्हणजे, चित्तनिरोध झाल्यावर त्या इंद्रियांचाहि निरोध होतो. इंद्रियनिरोधाकरितां निराळा प्रयत्न मग करावा लागत नाहीं. ६ धारणा. अवांतर सर्व दुसऱ्या विषयांवरून चित्त एका विषयावर एका स्थानीं लावून ठेवणें, याचें नांव धारणा असें आहे. एकदेशावर चित्ताचा बन्ध ही धारणा. ७ ध्यान. त्या एका स्थानीं विशिष्ट विषयाविषयीं विचार एकसारखा, खळ न पडतां, सुरू असणें, याला ध्यान म्हणतात. प्रत्ययाची एकतानता,

असें ध्यानाचें लक्षण आहे. ८ समाधि. समाधिमध्यें केवळ अर्थाचाच निर्भास असतो, आणि स्वरूपाविषयीं कांहीं एक भान नसतें. स्वरूपशून्यत्व असतें. धारणा, ध्यान, व समाधि, यांस संयम म्हणतात. समाधीचे दोन भेद आहेत. (१) संप्रज्ञात आणि (२) असंप्रज्ञात. यांनाच (१) सबीज समाधि आणि (२) निर्बीज समाधि अशीं अनुक्रमें दुसरीं नांवें आहेत. संप्रज्ञात समाधीचे चार प्रकार आहेत. १ सवितर्क, २ सविचार, ३ सानन्द आणि ४ सास्मित. समाधि हा चित्ताची एका प्रकारची अवस्था किंवा स्थिति आहे. हिला भावना म्हणतात. ह्या भावनेंत विशिष्ट विषयाचें ध्यान चालू असतें. हा विषय भाव्य होय. हें भाव्य दोन प्रकारचें असतें (१) ईश्वर आणि (२) चोवीस तत्त्वें. जड आणि अजड असे तत्त्वांचे दोन भाग आहेत. प्रधान महदहंकारादि चोवीस तत्त्वें हीं जड होत. पुरुष हा अजड तत्त्व आहे. (१) ह्या जड तत्त्वापैकीं पृथ्वीत्यादि स्थूल तत्त्वांस ध्यानाचा विषय करून पूर्वापार अनुसंधानानें, शब्द, अर्थ-ज्ञान आणि विकल्प, यांनीं संमिश्र किंवा संकीर्ण झालेली जी समाधि त्याला सवितर्क समाधि असें म्हणतात. (१-४२). (२) तन्मात्रा अन्तःकरण ह्यांस ध्यानाचा विषय करून देश-कालादिकांसंबन्धानें विचार ध्यानांत चालला असतो. त्यावेळीं तो समाधि सविचार समाधि असतो. ( ३ ) रजः आणि तमः या गुणांनीं थोडेंसें विद्ध असलेल्या चित्ताची भावना ज्यावेळीं असते, किंवा विचार चालला असतो, त्या वेळीं

सत्त्व गुणाचा जोर फार असतो. यामुळें आनंदित असें मन असतें. म्हणून या समाधीला सानन्द समाधि म्हणतात. (४) ज्यावेळीं रज व तम गुणांचा एक लेशहि नसून केवळ सत्त्व गुणाचेंच अवलंबन असतें, त्यावेळीं चिच्छक्तीचें प्राबल्य असतें, आणि ह्या चिच्छक्तीच्या उद्रेकामुळें या समाधीला सास्मित समाधि असें नांव दिलें आहे. याप्रमाणें संप्रज्ञात (सबीज) समाधीचे चार पोटभाग ( प्रकार ) आहेत. वितर्क, विचार, आनन्द आणि अस्मिता, या चार वृत्ति ह्या चार समाधींत असल्यामुळें असल्या समाधीस संप्रज्ञात समाधि असें नांव आहे. कारण त्या समाधींत या वृत्तींचें ज्ञान कायम असतें; त्यांचा निरोध झालेला नसतो. ज्या समाधींत सर्व वृत्तींचा निरोध झाला असतो, त्याला असंप्रज्ञात किंवा निर्बीज समाधि म्हणतात.

ह्याप्रमाणें योगाच्या या आठ अंगांचें अनुष्ठान आदरानें निरंतर आणि दीर्घकालपर्यंत केलें असतां, अभ्यास आणि वैराग्य, यांच्या साहाय्यानें योगांतील उत्तम समाधीची प्राप्ति होते. योग्यांच्या योग्यतेअनुरूप त्यांचे चार वर्ग केले आहेत. ( १ ) प्राथमकल्पिक; ( २ ) मधुभूमिक; ( ३ ) प्रज्ञाज्योति; आणि ( ४ ) अतिक्रान्तभावनीय. पहिल्या वर्गांतील योग्यांत ज्योति नुसती प्रवृत्त झाली असते, परंतु दुसऱ्याच्या मनांतील विचार जाणण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आलेली नसते. दुसऱ्या वर्गांतील योग्यांचें ज्ञान सत्यमय असें असतें, त्यांची ऋतंभरा प्रज्ञा असते,

( सू. १—४८ ). तिसऱ्या वर्गांतील योग्यांनीं पंचमहाभूतें, आणि इंद्रियें, यांच्यावर जय मिळविलेला असतो. चवथ्या वर्गांतले योगी परमवैराग्यसंपन्न असे असतात. तिसऱ्या प्रकारच्या योग्यांनीं ( प्रज्ञाज्योतींतील ) महाभूतें आणि इन्द्रियें जिंकलीं असल्याकारणानें त्यास मनोजयित्व, विकरणभाव, प्रधानजय, अशा तीन सिद्धि प्राप्त होतात. शरीराला मनाची गति मिळणें, यास मनोजयित्व म्हणतात. शरीर नसून इंद्रियास देशकालविषयादिकांसंबन्धी व्यापार करण्याची शक्ति असणें, ही विकरणभाव सिद्धि. प्रकृती सर्ववृत्तीवश करून घेणें, हा प्रधानजय होय या तीन सिद्धींस मधुप्रतीकसिद्धि असें नांव आहे. मधाचा प्रत्येक थेंब जसा गोड लागतो, त्याप्रमाणें प्रत्येक सिद्धि गोड आहे म्हणून त्यास मधुप्रतीक म्हणतात. विशुद्धा सिद्धि प्राप्त झाली म्हणजे सत्त्व आणि पुरुष यांचा विवेक होऊन सर्वभूतांचें अधिष्ठातृत्व आणि सर्वज्ञत्व हीं मिळतात. ( ३ ) विशोका ही ज्योतिष्मती आहे. ( १—३६ ). संस्कारशेषता नांवाच्या सिद्धीस असंप्रज्ञात किंवा निर्बीज समाधि हें नांव आहे. या अवस्थेंत सर्व वृत्ती नाहींशा झालेल्या असतात. क्लेश, कर्मविपाक, आशय इत्यादि उत्पन्न करणाऱ्या कारणांचें बीज सुद्धां या अवस्थेंत रहात नाहीं. परमवैराग्य प्राप्त होतें. केवल संस्कार असतो. ( सू. १—१८ ). यामुळें सर्व तापांपासून निवृत्ति होते. हाच मोक्ष— निश्रेयस. संसार दुःखमय आहे. प्रधान व पुरुष यांचा

संयोग हा या दुःखाचें कारण आहे. सम्यग्दर्शन हें याला उपाय आहे, आणि अत्यन्तनिवृत्ति हीच मुक्ति होय.

पतंजलीच्या योगशास्त्रावर व्यासांचें भाष्य आहे, आणि वाचस्पति व भोज यांच्या टीका आहेत.

---

## पांचरात्र.

समाजांत भक्तिमार्गाची प्रवृत्ति होऊन पुष्कळ लोक भक्तिमार्गी झाल्यावर अनेक देवांची भक्ति लोक आपआपल्या आवडीप्रमाणें करूं लागले. त्यांचें विशिष्ट अधिदैवत हेंच परब्रह्म अशी समजूत होऊन त्या अनेक देवतांचें ब्रह्मैक्य प्रतिपादन करण्यांत आलें. श्रीविष्णु आणि शिव महादेव या देवांचें भजन आपल्या समाजांत विशेष प्रचारांत आहे. ह्या दोन मार्गांचीं अनेक दर्शनें झालीं आहेत. त्यांपैकीं नारदीय पांचरात्र आणि पाशुपत या दोन मतांचा सारांश पुढें दिला आहे.

रामानुज मतांत पांचरात्र मत येतें. या मताप्रमाणें 'चित्' शब्दानें जीवात्म्याचा बोध होतो. हा जीवात्मा परमात्म्यापासून भिन्न आहे. तो नित्य, नानाविध, अणु, असा आहे. शरीर नाहींसें झालें असतां, त्याचा नाश होत नाहीं. 'अचित्' शब्दानें दृश्य, जड, अशा ह्या जगताचा बोध होतो. हें जगत् तीन प्रकारचें आहे. भोग्य, भोगोपकरण

( भोगांचीं साधनें ) आणि भोगायतन ( शरीर ), हे जगताचे तीन प्रकार होत. पुरुषोत्तम, वासुदेव, इत्यादि शब्दांनीं जाणला जाणारा ईश्वर हा ह्या जगताचा कर्ता व उपादान कारण आहे,

वासुदेवः परंब्रह्म कल्याणगुणसंयुतः ॥
भुवनानामुपादानं कर्ता जीवनियामकः ॥

हा वासुदेव भक्तवत्सल आणि फार कृपाळू आहे. हा परमपुरुष आपल्या उपासकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें, फल देण्याकरितां आपल्या लीलेनें पंचविध स्वरूपांत राहिला आहे. १ अर्चा, २ विभव, ३ व्यूह, ४ सूक्ष्म आणि ५ अन्तर्यामी, अशीं हीं त्याचीं पांच रूपें आहेत. मूर्ति, प्रतिमा इत्यादि देवाचीं स्वरूपें यांस अर्चा म्हणतात. राम, कृष्ण इत्यादि विष्णूचे अवतारांस विभव असें नांव आहे. वासुदेव ( सर्वकारण परमेश्वर ) त्यापासून संकर्षण ( जीव ), संकर्षणापासून प्रद्युम्न ( मन ), आणि त्यापासून अनिरुद्ध ( अहंकार ), असा हा चतुर्विध वासुदेवाचा व्यूह होय. ‘ सूक्ष्म ’ म्हणजे सुपर्ण षड्गुणसंपन्न जें परंब्रह्म तो वासुदेव होय. जीवाचे ठिकाणीं राहून त्याला प्रेरणा करणारा आणि नियमन करणारा जो वासुदेव त्याला अन्तर्यामी म्हणतात. ह्या प्रत्येक प्रकारच्या मूर्तींची अनुक्रमानें उपासना करून पापाचा नाश झाल्यावर पुढल्या मूर्तींची उपासना करण्यास लागावें. उपासना पांच प्रका-

र्चा असते. १ देवळाच्या रस्त्यांचें झाडसारवण करणें. यास अभिगमन म्हणतात. २ दुसरें उपासनाकर्म, पत्र-पुष्पफलादि पूजेची सामग्री आणणें याला उपादान म्हण-तात. ३ तिसरी इज्या. इज्या म्हणजे देवतेचें पूजन करणें, ४ मंत्रांचा अर्थ लावून त्यांचा जप करणें, वैष्णव सूक्तें व स्तोत्रें यांचा पाठ, नामसंकीर्तन, आणि तत्त्वप्रतिपादक शास्त्रांचा अभ्यास यास स्वाध्याय म्हणतात. ५ पांचवी उपासना योग होय. पांचरात्र मताप्रमाणें योग ह्या शब्दाचा अर्थ देवतानुसंधान असा आहे. अनुसंधानाचा अर्थ सामा-न्यतः शोध लावणें असा असतो. देवतेकडे मनाचें धोरण लावून चिंतन करणें, असा अर्थ योगशब्दाचा करावा. अशा-रीतीनें उपासना कर्म केलें म्हणजे विज्ञान उत्पन्न होतें. ह्या विज्ञानाच्या योगानें द्रष्ट्याचें (बाह्यवस्तुविषयक) दर्शन नाश पावतें. असें झाल्यावर परमकारुणिक वासुदेव आपल्या एकनिष्ठ भक्तास आपल्या स्थानाप्रत घेऊन जातो. तेथें राहिलें म्हणजे पुनर्जन्म, दुःख, वगैरे कांहीं होत नाहीं. अशा भक्तीनें मुक्त झालेल्या लोकांचे अंगीं ईश्वराचे सर्व गुण येतात. फक्त सर्व कर्तृत्व मात्र येत नाहीं. तापत्रयांनीं गांजलेल्या लोकांनीं अमृतत्व मिळविण्यासाठीं पुरुषोत्तम, वासुदेव, विष्णु, इत्यादि पदांनीं समजलें जाणाऱ्या ब्रह्माचें ज्ञान मिळविण्याची इच्छा करावी.

हें वैष्णवमत प्रतिपादन करणारें ‘ पूर्णप्रज्ञ ’ नांवाचें दुसरें एक दर्शन आहे. आनन्दतीर्थ, पूर्णप्रज्ञ आणि माधव

या नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या आचार्यांनीं हें निराळेंच प्रस्थान प्रतिपादित केलें आहे. रामानुज मतांत सांगितलेलीं सर्व *तत्त्वें त्यांस मान्य आहेत. परंतु कांहीं परस्पर-विरोधी भेद रामानुजास योग्य वाटतात, ते पूर्णप्रज्ञास जैन-मताचे आहेत, असें वाटून पूर्णप्रज्ञानीं आपलें मत स्वतंत्रपणें प्रचलित केलें आहे. यांच्या मताप्रमाणें स्वतंत्र आणि अस्व-तंत्र अशीं दोन तत्त्वें आहेत. सर्वगुणसंपन्न अदोष भगवान् विष्णु हें स्वतंत्र तत्त्व होय. चेतन व अचेतन बाकीचें सर्व जगत् हें अस्वतंत्र तत्त्व आहे. विष्णु आणि आपण सर्व, यांमध्यें सेव्यसेवकभाव आहे. विष्णूची सेवा करण्याचे तीन मार्ग आहेत. १ अंकन, २ नामकरण आणि ३ भजन. भगवंताची नेहमीं आठवण असावी म्हणून श्रीविष्णूच्या हातांत असणारीं शंख, चक्र, गदा, पद्म इत्यादि आयुधें आपल्या शरीरावर काढावींत. यामुळें त्याच्या स्वरूपाचें स्मरण राहतें. केशव, नारायण, माधव इत्यादि नांवें आपल्या पुत्रादिकांचीं ठेवावींत, म्हणजे सहजगत्या वि णू-च्या नांवाचें कीर्तन होतें. भजन एकंदर दहा प्रकारचें आहे, तें कायेंवाचेंमनेंकरून करतां येतें. १) खरें बोलणें, कल्याणाच्या गोष्टी सांगणें, गोड बोलणें आणि

---

***टीप**:—रामानुजास मान्य असलेलीं तत्त्वें येणेंप्रमाणें. जीव अणु आहे, तो दास ( सेवक ) आहे. वेद अपौरुष, सिद्धार्थप्रति-पादक, स्वतः प्रमाण आहेत. प्रमाणें तीन आहेत. पांचरात्र. उपजीव्यत्व, प्रपंचभेदांचें सत्यत्व इत्यादि.

स्वाध्याय ( अभ्यास ) करणें हीं चार वाचेनें करावयाचीं असतात. ( २ ) दान परित्राण आणि परिरक्षण हीं करणें, हें भजन आपल्या शरीरानें करावयाचें असतें. ( ३ ) दया, स्पृहा आणि श्रद्धा ह्या तीन वृत्ति नेहमीं मनांत बाळगणें, ह्याला मानसिक भजन म्हणतात.

जीव व ईश्वर यांत भेद आहे. जड आणि ईश्वर भिन्न आहेत. जीव निरनिराळे असतात. जीवांत आणि जडांत भेद आहे आणि जडाजडांतहि भेद आहे. अशा रीतीनें ह्या प्रपंचांत पांच भेद आहेत, ह्या तत्त्वावर सर्व ब्रह्मसूत्रांचें प्रतिपादन पूर्णप्रज्ञांनीं केलें आहे. भगवान् श्रीविष्णूचा उत्कर्ष हाच सर्व वेदांचा अर्थ आहे. भगवद्गीतेंतील पंधराव्या अध्यायांतील भगवंताचें स्वरूप यांस पसंत आहे. ( श्लोक १६–२० ).

---

## नकुलीश पाशुपतदर्शन.

वैष्णव मतांत जीवाचें दासत्व असावयाचेंच. हा विशेष आहे. या दासत्वामुळें दुःखाचा सर्वस्वी नाश होण्यास परतंत्रता अगदीं अवश्य आहे, हें उघड आहे. परतंत्रता असणें हें दुःखावह आहे. या मताप्रमाणें पूर्ण पारमैश्वर्य प्राप्त होत नाहीं. म्हणून ह्याच्या साहाय्यानें खरी मुक्ति मिळत नाहीं. हें पारमैश्वर्य प्राप्त व्हावें म्हणून माहेश्वरानीं आपलें एक पाशुपतशास्त्र, पंचार्थाचें प्रतिपादन करणारें, असें

केलें आहे. ह्या शास्त्राचे पांच अध्याय केले आहेत. त्याचें पहिलें सूत्र " अथातः पशुपतेः पाशुपतयोगविधिं व्याख्यास्यामः " आध्यात्मिकादि तीन प्रकारच्या दुःखांचा अंत कसा होईल? असा शिष्यानें प्रश्न केल्यावरून गुरु दुःखांताचें प्रतिपादन करीत आहेत, असा ह्या सूत्रांतील ' अथ ' शब्दाचा अर्थ आहे. पशु म्हणजे कार्य,—हें जगत् किंवा परतंत्र असलेली वस्तु. पति ह्या शब्दाचा अर्थ ईशिता ( ईश्वर ) आहे. तो या सर्व जगताचें कारण आहे. योग आणि विधि या दोन शब्दांचे अर्थ पुढें सांगितले आहेत.

दुःखाचा अंत दोन प्रकारचा असतो. ( १ ) अनात्मक आणि ( २ ) सात्मक. सर्व दुःखांचा अत्यंत समूळ उच्छेद ( नाश ) झाला म्हणजे त्या दुःखान्ताला अनात्मक दुखान्त म्हणतात. ( २ ) आपल्या बुद्धीची शक्ति किंवा ज्ञानेंद्रियाची शक्ति ( दृक्शक्ति ), आणि कोणतेंहि काम करण्याची शक्ति ( क्रियाशक्ति ), ह्या दोन शक्तींचा मनुष्यांच्या अंगी फार मोठा विकास होत असतो. असा विकास झाला म्हणजे त्याला एका प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर त्याच्या दुःखाचा जो अंत होतो, त्यास सात्मक दुःखान्त असें नांव आहे. याचा प्रभाव असा आहे कीं, एक दृगिंद्रिय सर्व इंद्रियांचे पृथक् पृथक् व्यापार एकटें करतें, आणि मनन, विज्ञान, आणि सर्वज्ञत्व, हीहि त्याच्या अंगीं असतात. क्रियाशक्तीच्या प्रभावामुळें मनुष्य मनोजवी, कामरूपी, आणि विक्रमणधर्मी होतो. ह्मणजे मनाच्या वेगा-

सारखा वेग त्यांच्या अंगीं येतो; त्याला इच्छेस वाटेल तें रूप धारण करतां येतें; आणि इंद्रियांचा व्यापार बंद ठेऊन पाहिजेल तें काम, हवें तेथें, आणि हवें तेव्हां, करण्याचें सामर्थ्य मनुष्याचे अंगीं येतें. सारांश योगशास्त्रांत सांगितलेल्या अष्टसिद्धि मनुष्यानें संपादन केल्यावर त्याला जें ऐश्वर्य येतें तें आलें असतां, सात्मक दुःखान्त होतो.

सर्व कार्य अस्वतंत्र—पराधीन अशीं असतात. विद्या, कला आणि पशु असे कार्यांचे तीन भाग किंवा प्रकार मानले आहेत. 'पशु' म्हणजे आब्रह्मस्तंभपर्यंत सर्व प्राणीवर्ग. यांच्या गुणाला 'विद्या' हें नांव दिलें आहे. विद्या बोधस्वभावा किंवा अबोधस्वभावा असते. बोधस्वभावा विद्येची प्रवृत्ति विवेकपूर्वक होत असते, किंवा विवेक न करतां होते. या रीतीनें तिचे दोन पोटभाग होतात. विवेकपूर्वक प्रवृत होणाऱ्या बोधस्वभावा विद्येला चित् म्हणतात. ह्या चित्‌शक्तीच्या योगानें सर्व प्राणीमात्रांस बाह्य पदार्थाचें ज्ञान होतें, ही प्रमाणांनींच समजून येते.

कला स्वतः अचेतन आहे आणि ती चेतनावर अवलंबून असते. हिचे कार्य आणि कारण असे दोन भाग करतात. कार्यकला म्हणजे पांच महाभूतें (पृथ्वी वगैरे), तन्मात्रा, आणि त्या तत्त्वांचे रूप, रस, गंध, स्पर्श आणि शब्द, हे पांच गुण. हीं दोन्ही मिळून कार्यकलेचे दहा पोटभाग होतात. कारणकलेंत तेरा भाग आहेत. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, बुद्धि, अहंकार आणि मन. सांख्य-

मतांतील २३ तत्त्वांचा अन्तर्भाव ह्या मताच्या ‘ कलेंत ’ होतो. पशु म्हणजे जीवच होय. हा सांजन किंवा निरंजन असतो. शरीर व इंद्रियें यांशीं संबद्ध जीवाला सांजन जीव म्हणतात. शरीरेन्द्रियांनीं संबद्ध नसलेला जीव निरंजन होय.

चित्ताचेद्वारानें आत्मा आणि ईश्वर यांचा जो संबन्ध जडतो त्याला पाशुपत योग म्हणतात. जप, ध्यान इत्यादि क्रिया करून साध्य होणाऱ्या योगास क्रियायोग म्हणतात. दुसऱ्या प्रकारचे योगांत क्रियेचा उपरम असतो, म्हणजे क्रिया कांहीं एक करावयाची नसते. त्या योगाला संवियोग अशी संज्ञा आहे. कर्मयोग आणि ज्ञानयोग हे जे दोन मार्ग योगशास्त्रांत सांगितले आहेत तसेच किंवा तेच हे आहेत.

धर्मार्थसाधन ज्याच्या योगानें होतें, त्यास विधि म्हणतात. प्रधानविधि आणि गौणविधि असे विधींचे दोन भेद केले आहेत. धर्माचा हेतु जी चर्या तो प्रधानविधि होय. भस्मस्नान, भस्मांत शय्या करणें, जप, प्रदक्षिणा आणि उपहार हीं उपासनेंतील चर्येची मुख्य व्रतें असतात. हसणें, गाणें, नृत्य, नमस्कार, जप आणि हुडुक्कार हे सहा उपहाराचे प्रकार आहेत. ‘ द्वार ’ या नांवानें प्रसिद्ध असलेला चर्येचा दुसरा एक प्रकार आहे. *क्रथन, स्पन्दन, मंदन, शृंगा-

*टीपः—क्रथन म्हणजे झोंप लागली नसून झोंप लागली आहे असे दाखविणें. २ स्पंदन=शरीराचा कंप. ३ मंदन=हातपाय लुले झाले आहेत, असें चालणें. ४ शृंगारण=अमुक पुरुषासारखा शृंगार करणें. ५ अवितत्करण=वेड्यासारखें किंवा मूर्खासारखें आचरण, आणि ६ अवितद्भाषण=त्यांच्यासारखें भाषण.

रण, अवितत्करण आणि अवितद्भाषण, असे ह्याचे सहा भेद आहेत. उपहाराचे प्रकार ज्यांना दीक्षा मिळाली नाहीं अशा लोकांच्या समक्ष करूं नयेत.

गुरूचें लक्षण सांगतेवेळीं आठ पंचकें आणि वृत्ती यांचें वर्णन केलें आहे. या पंचकांचें पूर्ण ज्ञान होऊन त्याप्रमाणें आचरण झालें असतां पुरुषार्थ-सिद्धि होते. ( १ ) लाभपंचकः—त्यांत ज्ञान, तप, नित्यत्व, स्थिति, आणि शुद्धि हीं पांच येतात. लाभ म्हणजे उपायांचें फल. ( २ ) मलपंचकः आपल्या मनांत दुष्ट भाव जे असतात, त्यांना मल म्हणतात. मिथ्याज्ञान, अधर्म, आसक्ति, हेतु आणि च्युति, हीं पांच आपल्या अन्तःकारणाचे मल आहेत. तीं पशुत्वाच्या मूळाशीं आहेत. त्यांचा नाश केला पाहिजे. ( ३ ) उपायपंचकः—साधकास शुद्धि मिळविण्यास पांच उपाय आहेत. ते हेः—वासचर्या, जप, ध्यान, रुद्राचें स्मरण आणि लाभांची प्रतिपत्ति. ( ४ ) देशपंचक, ज्ञान आणि तप यांची वृद्धि होण्यास स्थळ चांगलें पाहिजे. गुरु, जन, गुहा, श्मशान आणि रुद्र ह्या पांचाजवळ रहावें. ( ५ ) अवस्थापंचक—लाभ होईपर्यंत कोणत्यातरी ठिकाणावर राहणें, त्यास अवस्था म्हणतात. व्यक्त, अव्यक्त, जप, दान आणि निष्ठा, अशा त्या पांच आहेत. (६) विशुद्धिपंचक. वर सांगितलेलें मिथ्याज्ञानादिक जें मलपंचक, तें समूळ नाहींसें झालें म्हणजे विशुद्धिपंचक साधलें जातें. अज्ञान, अधर्म,

आसक्ति ( संग ) च्युति, आणि पशुत्व, या सर्वांची हानि ( नाश ) करणें. त्यांची हानि झाल्यावर विशुद्धि मिळते. ( ७ ) दीक्षाकारीपंचकः—द्रव्य, काल, क्रिया, मूर्ति आणि गुरु, हीं दीक्षा घेण्यास अगदीं अवश्य आहेत, आणि ८ वें बलपंचकः—गुरुभक्ति, प्रसन्नमति, सुखदुःख रागद्वेष अशा द्वन्द्वांवर जय. धर्म आणि अप्रमाद ( जपून काळजी-पूर्वक वागणें ), हीं पांच बलें अवश्य हवींत. मलपंचक कमी कमी होत जावें, यासाठीं भिक्षा, दिलेलें अन्न किंवा अकस्मात् मिळालेलें अन्न, यांवर निर्वाह करावा असें सांगितलें आहे.

ह्या मताचे अभिमानी लोक आपल्या मतांत दुसऱ्या मतांपेक्षां कांहीं विशेष आहे असें म्हणतात. तो विशेष असा. दुसरीं शास्त्रें दुःखाची निवृत्ति झाली ह्मणजे दुःखांचा अंत झाला असें मानतात. ह्या शास्त्राप्रमाणें दुःखनिवृत्ति होऊन पारमैश्वर्य मिळालें ह्मणजे दुःखान्त होतो. दुसरे लोक कार्य अनित्य आहे असें मानतात. पशु इत्यादि कार्यें नित्य आहेत, असें यांचें म्हणणें आहे. कारण सापेक्ष असतें, असें अन्यशास्त्राचें मत आहे. निरपेक्ष ईश्वर हाच कारण आहे, असें पाशुपतमताभिमानी म्हणतात. योगापासून कैवल्यादि फल प्राप्त होतें, असें दुसऱ्यांचें मत आहे, ह्यांच्या मताप्रमाणें योगापासून पारमैश्वर्य मिळून दुःखाचा अंत होतो. स्वर्गादींचा भोग झाल्यावर जीवाला पुनः संसारांत जावें लागतें, असें दुसरीं शास्त्रें म्हणतात, ह्या शास्त्रा-

प्रमाणें जीवाला पुनरावृत्ति येईलच असें नाहीं. त्याच्या आचरणानुरूप त्याला ईश्वरसामीप्य हा मोक्ष मिळेल.

निरपेक्ष ईश्वर जगताचें कारण आहे, असें मानिलें असतां कर्मास विफलता येईल, आणि सर्व कार्यें एका समयींच होतील, असे दोन आक्षेप यांच्या मतावर प्रतिपक्षाचे लोक आणतात. त्या आक्षेपांत अर्थ नाहीं, असें या मतानुयाय्यांचें ह्मणणें आहे. केवळ ज्ञानानें किंवा साक्षात्कारानें मोक्ष प्राप्त होत नाहीं. तत्त्वांचा निश्चय यथार्थ झाला पाहिजे. यथावत् तत्त्वनिश्चयावांचून मोक्ष मिळणार नाहीं. पंचार्थ पाशुपत मताच्या साहाय्यानें तत्त्वनिश्चय होतो, असें त्यांचें मत आहे. खालीं दिलेल्या श्लोकावरून ही गोष्ट चांगली लक्ष्यांत येईल.

ज्ञानमात्रे यथाशास्त्रं साक्षाद् दृष्टिस्तु दुर्लभा ॥
पंचार्थादन्यतो नास्ति यथावत्तत्त्वनिश्चयः ॥

---

## शैवदर्शन.

नकुलीश पाशुपतदर्शनांत निरपेक्ष ईश्वर कारण मानला आहे. हें मत कांहीं माहेश्वरांस पसंत नसल्यामुळें त्यांनीं आपलें स्वतःचेंच निराळें शास्त्रप्रतिपादन केलें. त्याला **शैवदर्शन** म्हणतात. त्यांच्या मतें निरपेक्ष ईश्वर कारण मानला तर वैषम्य व नैर्घृण्य यांचा दोष ईश्वराकडे येतो; म्हणून ते लोक सापेक्ष ईश्वर कारण आहे, असें म्हणतात. ह्या **शैवदर्शनाचे** महातंत्रांत,

तीनच पदार्थ आहेत असें सांगितलें आहे. पति, पशु आणि पाश, हे ते तीन पदार्थ होत. विद्या, क्रिया, योग आणि चर्या, असे ह्या तंत्राचे चार चरण आहेत. म्हणजे हीं चार मुख्य साधनें आहेत, असें ते माहेश्वर मानतात.

साक्षात् शिव हाच पति आहे, असें ह्या पंथाचें मत आहे. मुक्ति मिळालेले जीवात्मे व विद्येश्वरादिक लोक यांस शिवत्व प्राप्त झालें आहे, हें खरें, तथापि ते स्वतन्त्र नाहींत, कारण ते परमेश्वरावर अवलंबून असतात. ते परतंत्र आहेत. सप्तलोकादि सर्व वस्तूंमध्यें विशेष रचना दिसून येते; त्यावरून हे सर्व पदार्थ कार्य आहेत असें दिसून येतें. त्यांच्या कार्यत्वावरून ते पदार्थ बुद्धिमान पुरुषानें निर्माण केले आहेत, असें अनुमानानें ठरतें. अशा अनुमानानें परमेश्वराचें अस्तित्व प्रसिद्ध होतें. देह होत असतांना कोणालाहि दिसत नाहीं, तेव्हां देह कार्य नाहीं, आणि देह कार्य नाहीं म्हणून त्याला कर्ता नाहीं, असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. देहाचें कार्यत्व अनुमानानें सहज सिद्ध करतां येईल; देहांत विशेषरचना दिसून येते. विशेषरचनेमुळें तो देह केलेला आहे. तो कार्य आहे; कार्य आहे म्हणून त्याला कर्ता असला पाहिजे. आत्म्यासारखा देह नाहीं. त्याला कर्ता आहे. हा कर्ता ईश्वर आहे. अशा अनुमानानें ईश्वराचें कर्तृत्व सिद्ध केलेलें आहे. अज्ञ जीवजन्तूंचें सुखदुःख त्यांच्या स्वाधीन नाहीं, ईश्वराच्या प्रेरणेनें ते स्वर्गात किंवा नरकांत जातील, तथापि ईश्वर प्राण्यांच्या कर्मानुरूप त्यांस सुख किंवा दुःख

देत असतो. प्राण्यांच्या कर्मावर त्यांचें सुखदुःख अवलंबून असतें, म्हणून ह्याकामीं ईश्वराचे स्वातंत्र्यास हीनता येते, असें नाहीं. सिद्धगुरूंचें असें म्हणणें आहे कीं, स्वातंत्र्याचें खरें स्वरूप म्हटलें म्हणजे स्वतंत्रास वाटेल तर कार्य करण्यास त्यानें साधनांचा उपयोग करावा, किंवा साधनाधीन न रहातां आपण स्वतःच कर्माची अपेक्षा न धरतां कार्य करावें. कर्माची अपेक्षा न धरतांच कार्य केलें तर स्वातंत्र्य आहे असें होत नाहीं. म्हणून कर्मापेक्षतेमुळें ईश्वराच्या कर्तृत्वास कमी-पणा येत नाहीं. कर्माचे फलाचा भोग, त्यांचीं साधनें व उपादान कारणें, हीं ज्याला माहीत आहेत तोच त्यांचा कर्ता होय, दुसरा कोणी त्यांचा कर्ता असणें शक्य नाहीं. असेंच बृहस्पतींनीं सांगितलें आहे. ईश्वर सर्वकर्ता आहे; तो सर्वात्मा आहे, म्हणून सर्वज्ञ आहे. अज्ञानी जो आहे त्याच्या अंगीं कर्तृकशक्ति येणार नाहीं.

हें जगद्रूपी कार्य उत्पन्न करणाऱ्या ईश्वराच्या ( शिवा-च्या ) पांच शक्ति आहेत. ह्या पांच शक्ति ‘ सद्योजातं प्रपद्यामि ’ इत्यादि पांच मंत्रांत वर्णिल्या आहेत. त्या शक्ति ईश्वराचें शरीर होत. ईश्वराचीं पांच कृत्यें ह्या पांच शक्ति करतात. जगताची उत्पत्ति, स्थिति, लय, तिरोधान आणि अनुग्रह हीं पांच कृत्यें ईश्वराचे शाक्त शरीराकडून होत असतात. ह्या स्वरूपाचें विद्वान लोक ध्यान करतात. वेद व पुराणें यांत शिवाचीं स्वरूपें अनेक प्रकारांनीं वर्णिलीं आहेत. तीं अधिकारपरत्वें भक्तांसाठीं आहेत. परमेश्वर,

मुक्तात्मे, शिवत्व मिळालेले आचार्यादि, आणि शिवत्व प्राप्त करण्याचे दीक्षादि उपाय या सर्वांचा अन्तर्भाव 'पति' शब्दांत होतो.

ह्या दर्शनांतील दुसरा पदार्थ पशु आहे. पशु म्हणजे जीवात्मा. ह्याला क्षेत्रज्ञ, अणु, अशींहि नांवें आहेत. जीवात्मे अनेक, विभु, नित्य, अप्रमेय, देहापासून भिन्न असे असतात, जीवात्म्यांत कर्तृत्व, भोक्तृत्व, हे दोन्ही गुण असतात. १ विज्ञानाकल, २ प्रलयाकल, आणि ३ सकल असे ह्या पशूचे किंवा जीवात्म्याचे तीन भेद केलेले आहेत. कर्मफलाच्या भोगानें किंवा विज्ञान, योग, अथवा संन्यास, यांच्या साहाय्यानें सर्व कर्मांचा नाश झाल्यावर आणि कलादि भोग नसल्यामुळें हा जीवात्मा ( पशु ) फक्त मलानेंच युक्त असतो. केवल मलयुक्त जो जीवात्मा त्यास विज्ञानाकल म्हणतात. प्रलयानें कलादिकांचाच मात्र उपसंहार होतो. मल आणि कर्म हीं रहातात. ह्या मलकर्मांनीं युक्त जो पशु ( जीवात्मा ) त्याचें 'प्रलयाकल' हें नांव आहे. मल, माया ( कला ! ) आणि कर्म ह्या तीन बन्धांनीं जो जीवात्मा बद्ध असतो तो सकल जीवात्मा होय. पहिल्या वर्गांतील जीवात्म्यांचें कल्मष ( पाप ) समाप्त झालें असलें, तर त्यांस विद्येश्वरांचें पद प्राप्त होतें ( अनन्त, सूक्ष्म, शिवोत्तम, एकनेत्र, एकरुद्र, त्रिमूर्तिक, श्रीकण्ठ आणि शिखंडी असे विद्येश्वर आहेत. ). ज्या जीवात्म्याचें कलुष समाप्त झालें नाहीं त्यांस सातकोटी मंत्रांची ईश्वरकृपेनें योग्यता येते. त्या

मंत्रांत त्याचा समावेश होतो. दुसऱ्या वर्गांतील म्हणजे प्रलयाकल जीवात्म्यांचीं मल व कर्म हीं परिपक्क झालीं असलीं, तर त्यास मोक्ष मिळतो. त्यांचे हे दोन पाश तुटले पाहिजेत. ज्यांचे हे दोन पाश परिपक्क झाले नसतात, त्यांना पुर्यष्टक देह प्राप्त होऊन अनेक योनींत जन्म घेत फिरत राहिलें पाहिजे. प्रत्येक जीवात्म्यास सर्गापासून तों कल्पान्तापर्यंत किंवा मोक्ष मिळेपर्यंत, हा पुर्यष्टक नांवाचा देह धारण करावा लागतो. हा देह ३१ तत्वांचा बनला असतो. (**स्यात्पुर्यष्टकमन्तःकरणं धीः कर्मकरणानि** ") हीं तत्त्वें येणें प्रमाणें— मन, बुद्धि, अहंकार व चित्त ( अन्तकरणचतुष्टय ) ह्या अन्तःकरणाबरोबर सात विद्यातत्त्वें येतात. तीं अशीं: कला ( शमदमादिंचें सामर्थ्य; ) काल, नियति, विद्या, राग, प्रकृति आणि सातवें तत्त्व 'गुग' ( पुरुष असें कोणी मानतात ). पांच तन्मात्रा व पांच महाभूतें आणि पांच कर्मेन्द्रियें व पांच ज्ञानेंद्रियें हीं सर्व मिळून ३१ तत्त्वें होतात. ह्या तत्त्वांनीं युक्त सर्व देह असतात. ह्या तत्त्वांस पुर्यष्टक म्हणतात. हें अष्टक आहे, तेव्हां ह्या तत्त्वांचे बरोबर आठ विभाग पाहिजेत, असें कोणी म्हणेल तर ते भाग याप्रमाणें होतील. १ अन्तःकरणचतुष्टय. २ कलापंचक, ३ प्रकृति, ४ गुण ( पुरुष ), ५ तन्मात्रा, ६ महाभूतें, ७कर्मेन्द्रियें,आणि ८ज्ञानेंद्रियें. 'सकल' नांवाच्या तिसऱ्या वर्गांतील पशूंचे (जीवात्म्याचे) पक्ककलुष आणि अपक्ककलुष, असे दोन विभाग केले आहेत.पक्क कलुषांना ईश्वर कृपाळू होऊन

११८ मंत्रेश्वरांच्या पदांस नेतो. ( ८ मंडली, ८ क्रोध, १ वीरेश, १ श्रीकण्ठ आणि १०० रुद्र=११८ मंत्रेश्वर ). अशा लोकांच्या कर्मादिकांचा परिपाक होऊं नये म्हणून ईश्वर स्वत: आचार्यांचा अवतार घेऊन त्यांस दीक्षा देतो आणि पुण्यमार्गास लावून मोक्षास नेतो.

ह्या शैवदर्शनांतील तिसरा पदार्थ पाश आहे असें वर सांगितलेंच आहे. पाश म्हणजे बन्ध. जीवात्म्यास संसारांत नेहमीं बांधून ठेवणारीं कारणें, यांस पाश म्हणतात. मल, माया, कर्म आणि रोधशक्ति असे हे चार प्रकारचे पाश आहेत. बिंदु हा पांचवा पाश आहे, असें कांहीं जनांचें मत आहे. हा परममुक्ति वगैरे देणारा असल्यामुळें, तो पाशवर्गांत येथें गणिला नाहीं. शैव दर्शनाच्या मताप्रमाणें, पति, पशु आणि पाश, हे तिन्ही पदार्थ नित्य आहेत.

---

## उपवेद.

जसे चार वेद आहेत तसेच चार उपवेद आहेत. ( १ ) आयुर्वेद, ( २ ) धनुर्वेद, ( ३ ) गांधर्ववेद आणि ( ४ ) अर्थशास्त्र.

**आयुर्वेद**—ब्रह्मा, प्रजापति, अश्विनीकुमार, इन्द्र, धन्वन्तरि, भारद्वाज, आत्रेय आणि अग्निवेश्य, यांनीं आयुर्वेदाचा उपदेश प्रथम केला, अशी परंपरेनें आलेली समजूत

आहे. अथर्ववेदांत वैद्यकाविषयीं माहिती आहे. ह्या उपदिष्ट आयुर्वेदांत आठ अंगांचा विचार केला असतो. निरनिराळ्या ग्रन्थकारांनीं ह्या अंगांचा समावेश निरनिराळ्या भागांत किंवा स्थानांत केला आहे. चरक ग्रन्थांत आठस्थानें कल्पिलीं आहेत. सुश्रुत व वाग्भट, हे पांच स्थानें करतात आणि उत्तरस्थान असा एक सहावा भाग त्यांच्यांत असतो.

वर सांगितलेलीं आयुर्वेदाचीं आठ अंगें अशीं आहेतः— ( १ ) कायचिकित्सा ( ज्वरादिकांची चि. ) २ बालचिकित्सा ( लहान मुलांच्या रोगांची चि. ) ३ ग्रहचिकित्सा किंवा भूतविद्या. ( भूत गंधर्वादिकांच्या पीडेची चि. ), ४ ऊर्ध्वांग किंवा शालाक्य चिकित्सा ( मुख, कंठ, नेत्र, नासिका कर्ण, मस्तक इत्यादिकांचे रोगांची चि. ), ५ शल्यचिकित्सा शरीरांत बाहेरून आलेले पदार्थ किंवा आंतच झालेले विकृत पदार्थ यांची चि. ) डागणें, रोग कापणें क्षारकर्म इत्यादि क्रियांचा ह्यांतच समावेश होतो. ६ दंष्ट्राचिकित्सा किंवा अगदतंत्र सर्पादिकांचें विष, सोमल बचनाग, इत्यादि विषारी पदार्थ चिकित्सा ). ७ जराचिकित्सा किंवा रसायणतंत्र ( जरा किंवा त्यासारखी स्थिति काढून टाकून तारुण्य आणणें याची चि. ) आणि ८ वृषचिकित्सा किंवा वाजीकरण ( शरीरांत उत्तमवीर्य, सामर्थ्य वगैरे उत्पन्न करण्याची चिकित्सा. )

काल, स्थान, आणि चिकित्सा, ह्या तीन भिन्न विचार-दृष्टीनें किंवा तत्त्वावर हीं आठ अंगें ठरविलीं असावींत, असें

दिसतें. निरनिराळ्या ग्रन्थकारांनीं ह्या अंगांचा विचार निरनिराळ्या स्थानांत केला आहे, हें वर सांगितलेंच आहे. अग्निवेश्यानें चरक संहितेचीं आठ स्थानें केलीं आहेत, त्याचीं नांवें व सारांश पुढें दिलीं आहेत. सुश्रुत व वाग्भटांनीं केलेल्या पांच स्थानांचीं नांवें येणें प्रमाणें:—१ सूत्र, २ शारीर, ३ निदान, ४ चिकित्सा आणि ५ कल्प.

चरकसंहितेंतील पहिलें स्थान सूत्रस्थान. ह्यांत मुख्यत्वेंकरून शरीरारोग्यरक्षण, स्नेहस्वेदादि विचार, उदर वगैरे रोगांचीं कारणें व लक्षणें, अन्नपानविधि, मधुरादिरस, मर्मस्थानें, इत्यादि विषयांचा विचार केला आहे. २ दुसरें निदान स्थान; यांत, ज्वर, रक्तपिती, गुल्म, प्रमेह, कुष्ठ, उन्माद व अतिसार यांचा विचार आहे. ३ तिसरें विमानस्थान; ह्यांत रसद्रव्य दोषविकार, प्रभाव, आहारमात्रा, तत्परिणाम, रोगांच्या सांथी, रोगपरीक्षणसाधन, कृमिभेद, लक्षणविचार, वैद्यकाचें अध्यापन व अध्ययन इत्यादि गोष्टींचा विचार केला आहे. ४ चवथें स्थान शारीरस्थान; ह्यांत गर्भावक्रान्ति, धातुक्षयवृद्धिविचार, त्वचादि शारीर अवयवांची संख्या, गर्भस्थापन व्याख्या, गर्भिणीव्यवस्था, प्रसव, धात्रीपरीक्षा, अरिष्टलक्षणें, आयुर्मर्यादा, वगैरे गोष्टी आल्या आहेत. ५ पांचवें स्थान. इंद्रियस्थान; ह्या स्थानांत अनेक भिन्नभिन्न विषय आले आहेत. वर्ण, स्वर, गंध, रस, स्पर्श, इंद्रियें, शील, सत्त्व, स्मृति, ग्लानि, तंद्रा, बल, आचार, आहार, आहारपरिणाम, उपाय, अ-

पाय, इंद्रियादिपासून सूचित होणारीं अरिष्टचिन्हें. वगैरे वगैरे. ६ सहावें स्थान चिकित्सास्थान; ह्या स्थानांत रसायन औषधें, वाजीकरण औषधें, ज्वरादि रोग, ऊर्ध्वांग, स्त्री व बाल यांचे रोग, त्या रोगांची चिकित्सा, इत्यादि विषय आले आहेत. ७ कल्पस्थान हें सातवें स्थान होय. ह्या भागांत अनेक औषधींचे कल्प सांगितले आहेत. उदाहरणार्थ, आवळे, गेळफल, कडू दुध्या, कुडा, आघाडा, निशोत्तर, बहावा, हिंगणबेट, निवडुंग, शंखिनी वगैरे. ८ आठवें व शेवटचें स्थान हें सिद्धिस्थान आहे. ह्या स्थानांत स्नेहन, स्वेदन, वमन, विरेचन आणि बस्ति ह्या क्रिया कोणास, केव्हां, कशा व काय प्रमाणानें करावयाच्या, आणि त्यांचा कमजास्त योग झाला असतां, काय उपाय करावे, इत्यादि गोष्टींचा विचार येथें केला आहे. चरक संहितेचा सारांश ह्याप्रमाणें आहे. ह्यावरून आपल्या सहज लक्षांत येईल कीं, शस्त्रक्रिया खेरीजकरून वैद्यकांतील बहुतेक सर्व विषयांचा विचार चरकांत केलेला आहे,

वैद्यकांत वाजीकरणाचा विचार केला असतो, म्हणून कामशास्त्राचा अन्तर्भाव वैद्यकांतच होतो, असें मानिलें आहे. कामशास्त्रावर वात्स्यायनाचा एक ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचे पांच अध्याय आहेत. शास्त्रोक्त रीतीनें विषयभोग केला तरी दुःखच होतें, असें दाखविण्यासाठीं हें शास्त्र लिहिलें आहे, असें कांहीं लोकांचें मत आहे. वस्तुतः आहारविहारादिकांस नियमितपणा असावा, म्हणजे आरोग्य

प्राप्त होतें हेंच सांगण्याकरितां, हा ग्रंथ लिहिला असावा असें वाटतें.

रोग, रोगाचीं कारणें, रोगनिवृत्ति आणि आरोग्याचीं साधनें हीं समजून घेणें, हें चिकित्साशास्त्राचें प्रयोजन होय.

**धनुर्वेदः**—हा वेद विश्वामित्रांनीं प्रणीत केला आहे. ( १ ) दीक्षापाद; ( २ ) संग्रहपाद, ( ३ ) सिद्धिपाद; आणि ( ४ ) प्रयोगपाद; असे या ग्रंथाचे चार पाद किंवा भाग आहेत. पहिल्या पादांत धनु शब्दाचें लक्षण आणि अधिकारी यांचें निरूपण केलें आहे. धनुःशब्दाचा अर्थ येथें व्यापक आहे. युद्धांत जीं जीं म्हणून शस्त्रास्त्रें उपयोगांत येतात, त्या सर्वांचा बोध धनुशब्दानें होतो. हीं आयुधें चार प्रकारचीं असतात. मुक्त, अमुक्त, मुक्तामुक्त आणि यन्त्रमुक्त, असे त्यांचे चार वर्ग आहेत. चक्रादि हीं मुक्त आयुधें होत. तरवार, त्रिशूळ हीं अमुक्त आयुधें होत. शल्य आणि त्याचे जे अवान्तर भेद आहेत, तीं सर्व मुक्तामुक्त आयुधें होत. आणि बाण वगैरे हीं यन्त्रमुक्त आयुधें आहेत. ' मुक्त ' आयुधांस ' अस्त्रें ' म्हणतात. ' अमुक्तांस शस्त्र हें नांव आहे. ब्रह्मा, विष्णु, पशुपति, प्रजापति, अग्नि, इत्यादि अनेक देवतांनीं अधिष्ठित अशीं हीं चार प्रकारचीं आयुधें असल्यामुळें त्यांचे भेदहि अनेकविध होतात. हीं समंत्रक आणि साधिदेवत शस्त्रास्त्रें शिकण्याचा अधिकार क्षत्रियांस व त्यांच्या अनुयाय्यांस आहे. पायदळ, घोडेस्वार, रथी आणि हत्तीवर बसणारे, असे

फौजेचे चार भाग असतात. दीक्षा, अभिषेक, शकुन आणि मंगलकरण इत्यादि सर्व कृत्यांचें, आणि वर सांगितलेल्या युद्धासंबंधीं गोष्टींचें विवेचन पहिल्या पादांत केलेलें आहे. विशेष शस्त्रांचीं लक्षणें व आचार्याचें लक्षण सांगून शस्त्रांचा संग्रह करण्याचा प्रकार दुसऱ्या पादांत वर्णिला आहे. गुरु-संप्रदायानें सिद्ध झालेल्या विशिष्ट शस्त्रास्त्रांचा पुनः पुनः अभ्यास करणें, आणि मंत्रांची व देवतांची सिद्धि करून घेणें, ह्यांचें निरूपण तिसऱ्या पादांत केलें आहे. देवतार्च-नानें आणि अभ्यासानें सिद्ध झालेल्या शस्त्रास्त्रांचा प्रयोग कसा करावा, हें चवथ्या पादांत सांगितलें आहे. चोरादि-कांपासून प्रजेचें पालन करणें, दुष्टांस दंडन करणें, आणि प्रसंगीं युद्ध करणें, हेंच क्षत्रियांचें धर्माचरण होय. त्यांच्या-साठीं हा आयुर्वेद झाला आहे. ब्रह्मप्रजापती इत्यादि क्रमानें हा वेद येऊन शेवटीं विश्वामित्रांनीं तो प्रणीत केला.

**गांधर्व वेदः**--हें शास्त्र पहिल्यांदा भरतानें प्रणीत करून तें लोकांत प्रसिद्धींत आणलें. गीत ( गाणें ) वाद्य ( बजावणें ) नृत्य ( नाच ) इत्यादि मन तल्लीन करण्याचे अनेक प्रकार या शास्त्रांत आलेले आहेत, त्यामुळें हें नानाविध असें आहे. देवताराधन, निर्विकल्पसमाधि इत्यादि स्तुत्यकामांत ह्या सर्व गोष्टींचा उपयोग व्हावा ह्या हेतूनें हें शास्त्र प्रचलित केलें आहे. मनोरंजनाचें अपूर्वसाधन अशा दृष्टीनें ह्या वेदाचा समाजास केवढा उपयोग आहे, हें सांगावयास नको. मनुष्यमात्रास त्यापासून आनंद होतो.

अर्थशास्त्रः—हें शास्त्रहि बहुविध आहे. नीतिशास्त्र, अश्वशास्त्र, शिल्पशास्त्र, सूपकारशास्त्र ( स्वयंपाकाचें शास्त्र ) आणि चौसष्टकलांचें शास्त्र या सर्व शास्त्रांचा अन्तर्भाव अर्थशास्त्रांत होतो. हीं शास्त्रें अनेक मुनींनीं लोक कल्याणाकरितां केलेलीं आहेत. त्यांचेविषयीं सविस्तर माहितीं येथें देतां येत नाहीं. फक्त चौसष्ट कलांचीं नांवें मात्र येथें दिलीं आहेत. १ गीत, २ वाद्य, ३ नृत्य, ४ नाट्य, ५ आलेख्य, ६ विशेषकच्छेद्य, ७ तंडुल कुसुमबलिप्रकार, ८ पुष्पास्तरण, ९ दशनवसनांगराग, १० मणिभूमिकाकर्म, ११ शयनरचन, १२ उदकवाद्य, १३ नेपथ्ययोग, १४ उदकघात, १५ चित्रयोग, १६ माल्यग्रथनविकल्प. १७ कर्णपत्रभंग, १८ पानकरसरागासवयोजन, १९ सूचीयानकर्म, २० सूत्रक्रीडा, २१ सुगंधयुक्ति, २२ वीणाडमरूकवादनि, २३ प्रहेलिका कूटवाणीज्ञान, २४ प्रतिमाला, २५ दुर्वचक योग, २६ पुस्तकवाचन,—पुस्तकवाचाशक्ति, २७ नाटकाख्यायिकादर्शन, २८ काव्यसमस्यापूरण २९ पट्टिकवेत्रवाणविकल्प, ३० पुष्पवाटिकानिमित्तज्ञान, ३१ यंत्रमातृकाधारण मातृकासंवाच्य, ३२ मानसिकाव्यक्रिया, ३३ छलितयोग, ३४ तर्ककर्म, ३५ तक्षण, ३६ वास्तु. ३७ रौप्यरत्नपरीक्षा, ३८ धातुवाद, ३९ मणिरागज्ञान, ४० बालक्रीडन, ४१ आकरज्ञान, ४२ वृक्षायुर्वेदयोग, ४३ मेषकुक्कुटलावयुद्धविधि, ४४ शुकसारिकाप्रलापन, ४५ उत्साहन, ४६ केशमार्जनकौशल,

४७ अभिधानकोश, ४८ शेखरापीडयोजन, ४९ गंधयुक्ति, ५० भूषणयोजन, ५१ ऐन्द्रजाल, ५२ कौंचमारण योग, ५३ हस्तलाघव, ५४ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया, ५५ अक्षरमुष्टिकाकथन, ५६ देशभाषाज्ञान, ५७ च्छन्दोज्ञान, ५८ क्रियाविकल्प, ५९ वस्त्रगोपन, ६० द्यूतविशेष, ६१ आकर्षकक्रीडा, ६२ म्लेंच्छितकविकल्प, ६३ वैनायिकविद्याज्ञान वैजयिक विद्याज्ञान, ६४ वैतालिक विद्याज्ञान. पाशुपत तंत्रांत ह्या कलांविषयीं विचार केलेला आहे.

---

# नास्तिक दर्शनें.

## चार्वाकमत

याज्ञवल्क्यांनीं सांगितलेल्या चवदा विद्यांची माहिती शक्य तितक्या संक्षिप्त रीतीनें वर सांगितली आहे. ह्या चवदा विद्यांत सांख्य, योग, दोन न्यायदर्शनें आणि दोन मीमांसा यांचा अन्तर्भाव होतो. ह्या सर्व विद्या हिंदु धर्माचीं प्रस्थानें किंवा आधार ग्रन्थ आहेत असें मानिलें आहे. वर सांगितलेल्या सहा दर्शनांसारखींच दुसरीं सहा दर्शनें आहेत, त्यांस नास्तिक दर्शनें म्हणतात. कारण तीं दर्शनें वेदांस प्रामाण्य देत नाहींत. तथापि त्यांच्या मतांत अनुकूल अशीं वेदवाक्यें त्या मतानुयाय्यांस सांपडलीं तर तीं वाक्यें आधार म्हणून दाखविण्यांत येतात. वेदांचें प्रामाण्य अबाधित

आहे, असें आपलें ( हिंदु धर्माचें ) मत असल्यामुळें ह्या वेद न मानणाऱ्या दर्शनांस नास्तिकदर्शनें म्हणतात. हिंदु लोकांच्या तात्विक विचारांच्या महान ओघांपैकींच हीं नास्तिक मतें अनेक प्रवाह असल्यामुळें त्या मतांचा जबरदस्त पगडा आपल्या आचारविचारांवर बसलेला आहे. यासाठीं ह्या मतांविषयीं थोडीबहुत माहिती येथें सांगितली तर ती अप्रासंगिक होणार नाहीं.

चार्वाक, बौद्ध मताचे चार पंथ, आणि आर्हत किंवा जैन हें मत, अशीं हीं सहा दर्शनें होत. चार्वाक मतांचा मूळ प्रवर्तक बृहस्पति आहे, अशी परंपरेनें चालत आलेली समजूत आहे. त्यांचा स्वतंत्र ग्रन्थ उपलब्ध नाहीं, देवांचा गुरु बृहस्पति हाच तो बृहस्पति किंवा त्या नांवाचा दुसरा एखादा तत्त्ववेत्ता होऊन गेला, हें निश्चयात्मक असें कांहींच सांगतां येत नाहीं. संजीवनी विद्या प्राप्त करून घेण्याकरितां शंकराची आराधना करण्यास जेव्हां शुक्राचार्य गेले होते, तेव्हां त्यांचें रूप धारण करून बृहस्पतींनीं असुरांस उपदेश करण्यास आरंभ केला. यज्ञादिक, व धार्मिक कृत्यें न करतां केवल ऐहिक सुखाकडेच असुरांचें मन लागावें आणि त्यांच्याकडून सदाचरण होऊं नये, असा बृहस्पतींचा उद्देश होता. त्यावेळीं त्यांनीं प्रसार केलेलें मत बहुतेक चार्वाकमतासारखेंच आहे. यावरून देवाचे गुरु हेच चार्वाक मताचे प्रस्थापक कीं काय अशी शंका येते. परमेश्वर आहे आणि तो आपल्यास निःश्रेयसत्व देईल, ही कल्पना चार्वाकानें झिटका-

रून टाकिली आहे. या जगांत घेतां येईल तितका सुखाचा उपभोग घ्यावा. हाच त्यांचा परमार्थ. असल्या मताचा एकदा प्रसार झाला म्हणजे, त्या मताचा उच्छेद करणें फार कठीण आहे. सामान्यतः पुष्कळशा लोकांची प्रवृत्ति ह्या मताप्रमाणें वागण्याची असते. म्हणूनच जणूं काय ह्या मताला ' लोकायित ' म्हणतात. मृत्यु येणार नाहीं, अशी गोष्ट कधींहि होणार नाहीं. देहाची एकदा राख झाली म्हणजे आपल्याला पुनः देह मिळणार नाहीं. यासाठीं यावज्जीव मिळेल तेवढें सुख भोगून घ्यावें. अर्थ आणि काम हेच कायते आपले पुरुषार्थ.

पृथ्वी, आप ( पाणी ) तेज आणि वायु हीं चार महाभूतेंच मुख्य तत्त्वें आहेत. ह्यांच्या विशिष्ट घटनेपासून देह होतो. मद्यउत्पादक पदार्थांत जशी मदशक्ति स्वभावतः होते, तशीच ह्या देहांत त्याची घटना झाल्यावर चैतन्यशक्ति उत्पन्न किंवा परिणत होते. देहाचा पात झाला कीं चैतन्यशक्तीचा नाश होतो. महाभूतांचा नाश झाल्यावर हें चैतन्य त्यांच्यामागून नाश पावतें. ह्या मतांस वेदाचा आधार आहे, असें चार्वाकानुयाय्यांचें मत आहे. बृहदारण्यकोपनिषदाचे दुसऱ्या अध्यायांतील चवथ्या ब्राह्मणांत बारावा मंत्र या अर्थाचा आहे. ( **विज्ञानघन एवैतेभ्यो भूतेभ्यः समुत्थाय तान्येवानुविनश्यति न प्रेत्य प्रज्ञाऽस्तीति** ) ह्यावरून चैतन्ययुक्त असलेला देह हाच आत्मा, ह्याहून निराळा आत्मा नाहीं, असें चार्वकानुयाय्यांचें मत आहे.

प्रत्यक्ष हेंच एकटें प्रमाण किंवा ज्ञानप्राप्तीचें साधन आहे, असें चार्वाकांचें मत आहे. दुसरीं प्रमाणें त्यांस मान्य नाहींत. अनुमान प्रमाणांत व्याप्तिज्ञान अगदीं अवश्य आहे. हें व्याप्तिज्ञान मनुष्यास खात्रीलायक होतें, त्याविषयीं मनुष्यास कधींहि शंका येणार नाहीं, अशी गोष्ट होणें नाहीं. अविनाभावावर त्यांचा विश्वास नाहीं. धूर पाहिल्यावर त्याठिकाणीं अग्नि आहे, हें जें ज्ञान होतें, तें पूर्वीं केव्हांतरी धूमाग्नीचा संबन्ध प्रत्यक्ष पाहिल्यावरून होतें; किंवा तें ज्ञान भ्रममूलकहि असूं शकेल. शब्दप्रमाण हें वैशेषिक मताप्रमाणें अनुमानांत अन्तर्भूत होतें. अनुमान हेंच प्रमाण मानलें जात नाहीं, तर शब्दप्रमाण कसें मानलें जाणार? उपमान प्रमाण हें दुरापास्त होय. अनुमानादिकावरून तर्क केलेलें फळ कदाचित् प्राप्त झालें, तर तें केवळ यदृच्छेनें झालें; असें समजावें. कार्यकारणसंबन्ध ह्या ठिकाणीं कांहींएक नसतो. चार्वाक 'अदृष्ट' असें कांहीं आहे, ही गोष्ट मानीत नाहींत. जगांतील वैचित्र्य वस्तुस्वभावामुळें दिसून येतें. अग्नि हा उष्ण असतो, पाणी हें थंड असतें. ह्या सर्व गोष्टी स्वभावतः होतात. अशीच व्यवस्था आहे.

जन्मास येऊन सुखोपभोग घ्यावा, हाच मनुष्याचा मुख्य पुरुषार्थ आहे. सुखाबरोबर दुःख येतें किंवा सुखसंपादनाच्या कामीं दुःख भोगावें लागतें. ही स्थिति अपरिहार्य आहे, तथापि सुख संपादण्यास मागें पुढें पाहूं नये. ह्या मताप्रमाणें स्वर्ग नाहीं, मोक्ष नाहीं, आत्मा नाहीं, वर्णा-

श्रमधर्माप्रमाणें क्रिया केल्या असतां, त्यापासून कांहींएक फल प्राप्त होणार नाहीं. अग्निहोत्र, वेद, संन्यास, भस्म धारण इत्यादि सर्व उपजीविकेचीं साधनें आहेत. अशा प्रकारचें हें चार्वाक मत आहे.

---

## बौद्धदर्शन.

आज मित्तीस ह्या जगांत चालू असणाऱ्या प्रमुख धर्मांपैकीं बुद्धधर्म हा एक आहे. सर्व लोकसंख्येपैकीं एक चतुर्थांश लोक ह्या धर्मानें वागतात. त्याची स्थापना व विस्तार यांचा स्वतंत्र इतिहास लिहूं लागलें, तर त्याचे अनेक ग्रन्थ होतील. सध्यां या धर्माच्या दोन शाखा आहेत. सिंहलद्वीप किंवा लंका, सियाम, वगैरे देशांत प्रचलित असणारी एक शाखा, आणि तिबेट, चीन जपान इत्यादि देशांत चालू असणारा धर्म, ही दुसरी शाखा. काशीच्या उत्तरेस ५० कोसांचे अन्तरावर कपिलवस्तु नांवाचें एक शहर होतें, त्या शहराचा शुद्धोदन नांवाचा राजा सुमारें २५०० वर्षांपूर्वीं त्या प्रदेशावर राज्य करीत होता. ह्या राजाच्या पोटीं बुद्धगौतमाचा जन्म झाला, त्याचें नांव सिद्धार्थ होतें. बोधीसत्त्व असेंहि त्याचें नांव आहे. हा युवराज ऐषआरामांत आणि ऐहिक सुखोपभोगांत आपले दिवस घालवीत असतांना, ह्या जगांतील जीवितयात्रा अति कष्टमय आणि अशाश्वत आहे, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आली, आणि

ह्या विचारानें त्याचें सर्व चित्त वेधून टाकलें. अशा कष्टमय स्थितींतून मनुष्याची सुटका कशी होईल, या प्रश्नानें त्याचें मन व्यग्र झालें. शेवटीं सर्वसंग परित्याग करून अरण्यांत जाऊन, तेथें चिंतन करावें, असा मनांचा निश्चय करून राजवाड्यांत आणि नगरांत स्वतःच्या पुत्राच्या ( राहुलाच्या ) जन्मानिमित्त महोत्सव चालू असतां, तो आपण तेथून निघाला, तों विंध्यापर्वताचे उत्तरेस उरुवेल नांवाचें वन होतें, तेथें जाऊन राहिला. पुढें अलर आणि उद्रक या आचार्यांच्याजवळ त्यानें तत्त्वशास्त्राचें अध्ययन केलें, आणि सात आठ वर्षे वनांत राहून, उपवासादिकष्ट सोसून ह्या गोष्टीचा विचार केला आणि नंतर आपले मतांचा प्रसार करण्यास बुद्धगौतमांनीं सुरवात केली. पालीभाषेंत ह्या बुद्धधर्माचे अनेक ग्रन्थ आहेत. ह्या मतावर 'जातक' नांवाची टीका आहे, ती प्रसिद्ध आहे. ललितविस्तार हा ग्रन्थ संस्कृतांत लिहिलेला आहे. काश्मीरांत जालंदर नगरांत कनिष्कराजा राज्य करीत असतां, बुद्धसंघांतील विद्वान लोकांची परिषद होऊन ह्या मताचीं तत्त्वें ग्रथित करण्यांत आलीं. हीं तत्त्वें ललितविस्तारांत प्रतिपादित आहेत. तिबेट, चीन वगैरे देशांत चालू असणाऱ्या धर्माचा हा आधारभूत ग्रन्थ आहे. अशोक राजाच्या वेळीं पाटलीपुत्रांत ( पाटनाशहरीं ) अशीच एक मोठी सभा ( परिषद ) भरली होती. त्या सभेनें ही आपल्या मताची स्थापना करून ती त्रिपिटक नांवाच्या ग्रन्थांत वर्णिली आहे. हा ग्रन्थ पालीभा-

पैंत आहे. सिंहलद्वीपादि देशांत चालणाऱ्या धर्माचा हा आधारभूत ग्रन्थ आहे.

भगवान् बुद्धानीं चार भावना आहेत असा उपदेश केला. ह्या भावनांविषयीं खात्री होऊन ज्ञान झालें असतां मुक्ति ( निर्वाण ) प्राप्त होते, असें बौद्ध मानतात. त्या चार भावना येणें प्रमाणें आहेत, ( १ ) **सर्वं क्षणिकम्, क्षणिकम्. ( २ ) दुःखंदुःखम्. ( ३ ) स्वलक्षणम्, स्वलक्षणम्. आणि** ( ४ ) **शून्यम्, शून्यम्.** अशा ह्या चार भावना बुद्धांच्या तात्विक मताचें मूळ आहेत. प्रश्न करून मनाची खात्री करून घ्यावी, आणि त्याप्रमाणें आचरण करावें असें त्यांचें सांगणें होतें. शिष्यवर्गाच्या बुद्धीचा विकास कमी-जास्त असल्यामुळें त्या सर्वांना हीं तत्त्वें सारखींच ग्रहण करतां आलीं नाहींत. म्हणून त्या शिष्यवर्गांत चार पन्थ उपस्थित झाले. बुद्धानीं सर्व शून्य आहे असा बोध केला. हा सर्वांना समजला नाहीं. १ पहिला पंथ 'माध्यमिक' ह्या मतानुयाय्यांस आन्तरबाह्य सर्व शून्य आहे असें वाटतें. ज्ञानावांचून कांहीं नाहीं ( २ ) दुसऱ्या पंथांतील लोकांस विज्ञानवादी किंवा योगाचार म्हणतात. यांच्या मताप्रमाणें बाह्यवस्तु वस्तुतः नाहीं, हें खरें आहे, तथापि बाह्यवस्तु आहे, असें जें आपल्यास वाटतें, त्याचें कारण असें आहे कीं आपल्या ज्ञानांतच त्या बाह्यवस्तूंच्या आकारादिकांचा अविर्भाव होतो, म्हणजे त्या आकारानें युक्त असें आपलें विज्ञान होतें, आणि ह्या विज्ञानामुळेंच बाह्यवस्तूचा भास

होतो. खरोखर आपल्या ज्ञानाशिवाय दुसरी वस्तु कांहीं एक नाहीं. (३) तिसऱ्या पन्थाचे लोक 'सौत्रान्तिक' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. ह्यांच्या मताप्रमाणें बाह्यवस्तु अनुमानानें जाणली जाते.(४) चवथ्या वैभाषिक हा चवथा पंथ होय. वर सांगितलेल्या मताभिमान्यांच्याशीं वैभाषिकांचा विरोध आहे. ते म्हणतात बाह्यवस्तु प्रत्यक्ष गोचर आहे. आपल्यास इन्द्रियांच्याद्वारा ती बाह्यवस्तु समजते.

अशारीतीनें बुद्ध मतांचे चार भिन्न भाग झाले. प्रत्येकानें आपलें मत युक्तिवादानें स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. हीं चार निरनिराळीं बुद्धदर्शनें आहेत, असें आतां मानतात.

बौद्धांची पहिली भावना किंवा सिद्धान्त असा आहे:—सर्वंक्षण ( पदार्थ ) क्षणिक आहेत. म्हणजे त्यांचें अस्तित्व किंवा आयुष्य एक क्षणभर असतें. असें म्हणण्याचें कारण हें कीं सर्व पदार्थांत अर्थक्रिया करणारें सत्त्व असतें आणि अर्थक्रिया करणारें सत्त्व जेथें असतें, तेथें क्षणभंगुरता असते. उदाहरणार्थ ढग, अभ्रें, सर्व वस्तु इत्यादि. अर्थक्रियाकारी तत्त्व हें क्षणभंगुर असतें ही गोष्ट आपल्यास प्रत्यक्ष प्रमाणानें दिसते. ( 'अर्थक्रियाकारितां' म्हणजे कांहीं तरी फल उत्पन्न करणारें काम ( कार्य ) करण्याची शक्ति; ही शक्ति क्षणिक पदार्थांत असते ). अर्थक्रिया करणारें सत्त्व हें क्षणिक वस्तूंत असते. तें अक्षणिक (स्थायी) वस्तूंत नसतें. ही गोष्ट बौद्ध अनुमानानेंहि सिद्ध करून दाखवितात. तें असें:—कोणतीहि क्रिया घडली म्हणजे, कारणाच्या मागून

कार्य उत्पन्न होतें, असें आपल्यास दिसतें. म्हणजे कारण आणि कार्य यांत क्रम असतो; किंवा असेंहि आपल्यास आढळून येतें कीं कारण आणि कार्य हीं समकालीन (युगपत्) असतात. तीं एकावेळेंस दिसून येतात. म्हणजे या ठिकाणीं अक्रम असतो. ह्यावरून जेथें क्रिया करण्याचा धर्म ( सत्व किंवा सामर्थ्य ) असतो तेथें हा क्रम किंवा अक्रम असावयाचाच. अर्थक्रियाकारितां हें व्याप्य आहे, आणि क्रमाक्रमभाव हें त्यांचें व्यापक आहे. जेथें व्यापक वस्तू नसते, त्या ठिकाणीं त्या व्यापक वस्तूनें व्याप्त असणारी वस्तु नसावयाचीच, हा तर्कशास्त्राचा नियम आहे. आतां ह्या नियमाप्रमाणें बौद्ध युक्तिवाद करतात. तो असा: अक्षणिक ( स्थायी ) वस्तूत क्रम किंवा अक्रम नसतो, म्हणून त्यांच्यांत अर्थक्रियाकारिसत्व नसतें. अशारीतीनें अर्थक्रियाकारिसत्त्व क्षणिक आहे, हें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध होतें, आणि तें अक्षणिकांत नाहीं हें अनुमानें सिद्ध करून दाखवितां येतें. ह्या कोटिक्रमावर कोणी अशी शंका घेतील कीं अक्षणिक किंवा स्थायी पदार्थांत अर्थक्रियाकारिता हा धर्म कां नसावा? यावर बौद्धांचें म्हणणें असें आहे. ही शंका बरोबर नाहीं. अक्षणिक पदार्थ अर्थक्रियाकरणारे असतात असें जर तुम्ही म्हणाल, तर आम्हीं तुम्हास दोन प्रश्न विचारतों. वर्तमान काळीं अक्षणिक पदार्थाकडून क्रिया घडत असतां त्या पदार्थाच्या अंगीं पूर्वीं त्यानें केलेल्या क्रियांचें सामर्थ्य आणि तसेंच पुढें त्याकडून होणाऱ्या

क्रियांचें सामर्थ्य, हीं त्याच्या अंगीं वर्तमान कालीं असतात किंवा नाहीं? भूत व भविष्य क्रिया करण्याचें सामर्थ्य त्या पदार्थाच्या अंगीं असतें, असें जर तुम्ही म्हणाल, तर वर्तमान काळीं प्रस्तुतक्रिया करीत असतां, त्या क्रियाबरोबर भूत व भविष्य क्रिया घडल्या पाहिजेत. कारण तें सामर्थ्य त्यांत असतें. म्हणजे तीनही कालांच्या क्रिया एकदम सुरू राहतील. हें शक्य नाहीं. भूतभविष्य क्रिया करण्याचें सामर्थ्य वर्तमानकाळीं त्या पदार्थांत नसतें, असें म्हणाल तर, जें सामर्थ्य त्या पदार्थांत नाहींच त्याच्या साहाय्यानें तोपदार्थ वर्तमान कालीन क्रिया कशी करणार? अशाच रीतीनें दुसऱ्या आक्षेपांचें निवारण करून बौद्धमताचे अनुयायी पदार्थांचें क्षणिकत्व सिद्ध करतात.

**सर्वंदुःखम्, दुःखम्.** सर्व जगत् दुःखमय आहे ही बौद्धांची दुसरी भावना होय. जग दुःखमय आहे ही गोष्ट सर्वांस कबूल आहे. ह्याचमुळें सर्व तत्त्ववेत्ते व तीर्थकार दुःख नाहींसें होऊन निश्रेयस कसें प्राप्त होईल, याविषयीं विचार व प्रयत्न करीत असतात. सामान्य लोकांची खटपट सुद्धां यासाठींच चालली असते.

बौद्ध मतांतील तिसरी भावना **स्वलक्षणम्, स्वलक्षणम्** ही आहे. अमुक वस्तूचें लक्षण काय? असें विचारलें असतां, तिचें लक्षण तीच वस्तु, असा ह्या सूत्राचा अर्थ आहे. अमुक एक वस्तु कशासारखी आहे असें विचारलें तर ती अमक्या दुसऱ्या वस्तूसारखी आहे; असें सांगतां येत नाहीं. कारण

सर्व पदार्थ असतील तर क्षणिकच असतात. विशिष्ट गुण-धर्मांनीं युक्त अशी एखादी वस्तु कोणासारखी आहे, असा विचार करून उपमान वस्तु आपण पाहतों आहों, तोंच ह्या प्रस्तुतवस्तूचे गुणधर्म क्षणांत नाहींसे होणार, तेव्हां ती वस्तु अमक्या वस्तूसारखी आहे, असें कसें सांगतां येईल? म्हणून अमुक ही वस्तू त्याच वस्तूसारखी आहे, असें म्हणावें लागतें. रूपें तें रूपेंच, सोनें तें सोनेंच. इत्यादि.

चवथी भावना **सर्वं शून्यम्, शून्यम्.** सर्व कांहीं शून्य आहे. अहो! रुपें, वगैरे पदार्थ आम्हीं स्वप्नांत किंवा जागेपणीं कधींहि पाहिले नाहींत, अशा प्रकारचा निषेध आपण नेहमीं करीत असतों. अमुक ती वस्तू नाहींच असा आपला समज असतो. जें दिसतें तेंच सत् ( वस्तु ) आहे असें जर कोणी म्हणेल, तर तें म्हणणें बरोबर होणार नाहीं. कारण त्या वस्तूचें विशिष्ट दर्शन ( दिसणें—प्रत्यक्षज्ञान ), तिची इदंता ( वस्तुचें वस्तुत्वं ), तिचें अधिष्ठान, ( ज्याचा आश्रय करून रहातें, तो आश्रय ), त्यावरचें अध्यस्त ( आरोपित ) आणि त्या अधिष्ठान अध्यस्तामधील समवायादि संबन्ध, ह्या सर्व गोष्टी सत् आहेत, असें मानावें लागेल.*

* आपण एक पांढरी शुभ्र शिंप पाहिली. १ तिचे दर्शन—प्रत्यक्षज्ञान. २ शिंपेचें शिंप असणें ( शुक्तित्व ). ३ ह्या तिच्या धर्मांचें अधिष्ठान ( आश्रय ). ४ शिंप नसून तें रुपें आहे असा तिच्यावर अध्यास ( आरोप ). ५ आणि अध्यस्त व अधिष्ठान यांच्यांतील संबन्ध हीं सर्व खरीं पाहिजेत.

दृष्टवस्तू सत् आहे असें मानलें कीं, ह्या सर्व गोष्टीहि सत् होतील. त्यांच्यापैकीं एखादि दुसरी गोष्ट असत् असली तरी हरकत नाहीं, असें म्हणून चालणार नाहीं. * अर्ध जरती न्यायानें हें म्हणणें अप्रयोजक व वेडगळपणाचें असें ठरेल. सर्व शून्य आहे. हें तत्त्व दुसऱ्या रीतीनें बौद्ध सिद्ध करून दाखवितात. ह्या जगांतील कोणताहि पदार्थ. (१) सत् (२) असत्, (३) सदसत्, आणि ( ४ ) सदसदेतर ( हीं दोन्हीहि नाहींत ), अशा चार कोटींपैकीं एका कोणत्या तरी कोटींत असला पाहिजे. उदाहरणार्थ ' घट ' घेऊं. घट हा स्वभावतःच सत् असला तर त्यास कुंभार वगैरेची जरूरी नाहीं. तो आपोआपच होईल. घट असत् आहे, असें जर म्हणाल तर कोणत्याहि कारणामुळें, किंवा कोणाच्याहि व्यापारामुळें, त्याचें असत्त्वं जाणार नाहीं, पुढल्या दोन कोटी परस्पर विरोधी आहेत. म्हणजे घट हा सत् असावा किंवा असत् असावा, दोन्हीहि असूं शकणार नाहीं. अशा कोटिक्रमानें प्रत्येक पदार्थ सत् नाहीं, असत् नाहीं आणि सदसत् किंवा सदसदेतर नाहीं, असें बौद्ध प्रतिपादन करतात. म्हणजे सर्व शून्य आहे.

---

२ * अर्धजरतीन्याय–म्हणजे अर्धी म्हातारी. एखादि वस्तु कच्ची पक्की असली तर कच्चीचा कच्चीसारखा उपयोग करावा आणि पक्कीचा पक्कीसारखा. उदाहरणार्थ, कच्चापक्का आंबा. त्याच्या कच्चा भागाचें लोणचें घालावें, आणि पक्क्या भागाचा आमरस करावा, असें कधीं होत नाहीं.

ह्याप्रमाणें वर सांगितलेल्या चार भावनांविषयीं आपल्या मनांत पूर्णश्रद्धा ठेऊन सर्व वासना मनांतून नाहींशा करून टाकाव्यात. वासनांची निवृत्ति तत्त्वज्ञानानें होते. वासना-निवृत्ति झाली म्हणजे शून्यरूप जें परम निर्वाण तें प्राप्त होतें. सर्व जगत् दुःखमय आहे, तें दुःखाचें घर आहे, सर्व दुःखांचीं साधनें, असेंच हें जगत् आहे, अशी मनाची पक्की खात्री करून घ्यावी, आणि तत्त्वज्ञानानें दुःखाचा निरोध करून टाकावा. ह्या तत्त्वज्ञानाचे चार मार्ग आहेत. ह्या भावना हेच चार मार्ग होत.

प्रत्यक्ष आणि अनुमान हीं दोनच ज्ञानसाधनें ( प्रमाण ) आहेत, असें बौद्धांचं मत आहे. जगांतील सुखादि जे चित्त-चैत्तात्मक ( मन आणि मनानें जाणतां येणारे ) पदार्थ त्यांचीं चार कारणें ( प्रत्यय ) आहेत. त्यांचीं नांवें येणें-पमाणें:—(१) आलंबनप्रत्यय, (२) समनन्तरप्रत्यय, (३) सहकारीप्रत्यय, आणि (४) अधिपतिप्रत्यय. 'ज्ञान' ह्या शब्दानें जें जाणलें जातें व नीलादि विषयांचा अवभास ज्यांत होतो असें जें चित्त, त्याला नीलादिकांचा आकार ज्यामुळें येतो, त्यास आवलंबनप्रत्यय म्हणतात. (२) पूर्व-कालीं झालेल्या ज्ञानापासून ( प्राचीन ज्ञानापासून ) प्रस्तुत-कालीं जें आपल्या बोधाचें स्वरूप असतें, त्याला समनन्तर-प्रत्यय म्हणतात. (३) प्रकाश आहे, तोंपर्यंत स्पष्टता असणें, हें सहकारीप्रत्यय. आणि (४) अधिपतिप्रत्यय म्हणजे चक्षुरादि इंद्रियांत आपापला विषय ग्रहण करण्याची

जी शक्ति असते ती होय. डोळ्याला दिसणें, कानाला ऐकूं येणें वगैरे.

'चित्तचैत्तात्मक' असे जे पदार्थ किंवा विषय वर सांगितले आहेत, त्याचे पांच स्कन्ध ( भाग ) केलेले आहेत. ( १ ) इंद्रियें आणि त्यांचे विषय ह्या दोहोंमिळून जो वर्ग होतो त्याला रूपस्कन्ध म्हणतात. ( २ ) विज्ञानस्कन्ध. ह्या स्कंधांत *आलयविज्ञान आणि प्रवृत्तिविज्ञान ह्या दोहोंचा अंतर्भाव होतो. (३) वेदनास्कंधांत सुखदुःखादिकांचें ज्ञान (जाणीव) येतें. (४) संज्ञास्कंध. ज्यांत गाय, घोडा, मनुष्य दगड इत्यादिक विषयांच्या नांवांचा उल्लेख असतो, आणि त्या नामाबरोबर विषयांचें विज्ञानहि असतें, अशा वर्गास संज्ञास्कंध म्हणतात. ( ५ ) संस्कारस्कंध हा पांचवा स्कंध आहे. ह्या स्कंधाचा वेदनास्कंधाशीं निकट संबंध आहे. राग, द्वेष, क्लेश, मद, मान, धर्म, अधर्म वगैरे विकारांचा अंतर्भाव ह्यांत होतो.

आयतनांची पूजा करावी, त्यापासून श्रेय प्राप्त होतें, असें बौद्ध धर्मांत सांगितलें आहे. ह्याशिवाय दुसऱ्या

*ज्या विज्ञानाचें 'अहं' हें आस्पद असतें. म्हणजे ज्या विज्ञानाचा आश्रय ज्ञाता ( अहं ) असतो, त्या विज्ञानाला आलयविज्ञान म्हणतात. प्रवृत्तिविज्ञानांत नीलादि विषयांचा उल्लेख असतो. अहंप्रत्यय आणि इदंप्रत्यय, किंवा संवित्ति आणि प्रकटता ह्या जशा दोन जोड्या आहेत, तशीच आणि त्या अर्थाची, ही जोडी आहे असें समजावें.

कोणाचीहि पूजा केली तर त्यापासून कांहींएक उपयोग नाहीं, असें बौद्धांचें मत आहे. पांच ज्ञानेन्द्रियें, पांच कर्मेंद्रियें, मन आणि बुद्धि, अशीं हीं बारा आयतनें आहेत. यांची पूजा करणें ह्मणजे त्यांच्याकडून होणारीं कार्यें यथान्याय करवून त्यांचा निग्रह करणें,हाच पूजेचा अर्थ असावा, असें वाटतें. नाहीं तर इंद्रियांची पूजा करणें याचा अर्थ काय, हें नीट कळत नाहीं.

'विवेकविलास' ग्रंथांत बौद्ध मताचा सारांश दहा बारा श्लोकांत दिला आहे. त्यांच्या अर्थावरून बौद्धमताची कल्पना स्थूलमानानें आपल्यास करतां येईल. 'सुगत' (बुद्ध) हाच बुद्धांचा देव. विश्व हें क्षणभंगुर आहे. चार तत्त्वें आहेत, त्यांना आर्यसत्त्व असें नांव आहे. १ दुःख, २ आयतन ३ समुदय आणि ४ मार्ग हीं तीं चार तत्त्वें होत. हा संसार दुःखमय आहे. त्याचे पांच स्कंध ( वर्ग-भाग ) आहेत. रूप, विज्ञान, वेदना, संज्ञा, आणि संस्कार हीं त्या स्कंधांचीं नांवें आहेत. पंच ज्ञानेन्द्रियें, पंच कर्मेन्द्रियें, मन आणि बुद्धि ( धर्मायतन ) अशीं बारा आयतनें आहेत. राग, द्वेष, मोहमदादि मनोविकार आपल्या मनांत उदित होत असतात, ह्या सर्व विकारांच्या समुदायांस 'समुदय' असें म्हणतात. 'आत्मात्मीयस्वभाव' असेंहि या समुदयाचें नांव आहे. ह्या जगांतील सर्व संस्कार क्षणिक आहेत, अशी मनाची स्थिर वासना ( स्थिर बुद्धि-निश्चय किंवा खात्री ) करून घेणें, हा मोक्षाचा मार्ग होय. आणि ह्यालाच

मोक्ष ह्मणतात. शिष्यांच्या ग्रहणशक्तीच्या मानाप्रमाणें बौद्ध मताचे चार निराळे वर्ग झाले आहेत आणि प्रत्येक निराळ्या वर्गाच्या बौद्धाचें प्रस्थानहि निराळें असतें. अशारीतीनें बौद्धमताचीं चार दर्शनें झालीं आहेत. ही गोष्ट वर एकदा सांगितली आहेच. त्यांच्या मतांतील भेद पुनः एकदा येथें सांगितला असतां, त्यांची कल्पना बरोबर लक्षांत येईल. वैभाषिक मताचे बौद्ध, अर्थ ज्ञानान्वित आहे, बाह्य विषय हा आपल्यास प्रत्यक्ष प्रमाणानें समजतो, असें म्हणतात. सौत्रान्तिक हे लोक बाह्य विषय अनुमानप्रमाणावरून समजतो, असें प्रतिपादन करतात. योगाचार किंवा विज्ञानवादीबौद्ध, बाह्य पदार्थ नाहींच, आपल्या ज्ञानांत बाह्य विषयांचे किंवा पदार्थांचे आकार उत्पन्न होतात आणि त्यामुळें बाह्य विषयांचें ज्ञान होतें, असें ते मानतात. माध्यमिकांच्या मताप्रमाणें केवळ शुद्ध स्वस्थ असें ज्ञान (संविद्) मात्र आहे, बाकी कांहीं एक नाहीं. ह्या चार बौद्ध पंथाच्या मतांत अशा प्रकारचा भेद आहे. चौघांच्याहि मतांत मुक्तीचें स्वरूप आणि मार्ग एकसारखींच वर्णिलीं आहेत. राग द्वेष इत्यादि मनोविकार, ज्ञान, संतानवासना, ह्या सर्वांचा उच्छेद करून टाकावा. तीं सर्व नाहींशीं झालीं पाहिजेत. असें झालें ह्मणजे त्यापासून मुक्ति प्राप्त होते. हेंच बौद्धांचें निर्वाण होय. सर्वसंगपरित्याग करून वनांत जाऊन रहावें. चित्तवृत्तीचा निरोध शमदमादिकांनीं करावा. भावनाचतुष्टयाचें मार्गानें चिंतन करावें. मैत्रीभावना, करुणाभावना,

मुदिताभावना, अशुभाभावना, आणि उपेक्षाभावना, असे चिंतनाचे पांच प्रकार असतात. श्रमणक ( भिक्षु )—वृत्ति धारण करावी, आणि अशा मार्गानें ह्याच जन्मीं निर्वाण प्राप्त करून घेण्याची खटपट करावी. असा भगवान् बुद्धानीं बोध केला आहे. भिक्षुवृत्ति धारण केली असतां मनुष्यानें शिर मुंडून टाकावें, चीरवस्त्र धारण करावें, जवळ एक कमण्डलु आणि कातडें, हीं असावींत, कषाय किंवा रक्त रंगाचें वस्त्र असावें, पूर्वाह्णांत ( दोनप्रहरांचे आंत ) भोजन करावें, आणि संघाचा आश्रय करून रहावें. बौद्ध संघांच्यासाठीं पूर्वीं फार मोठमोठालीं अशीं एकांतवासांत बांधलेलीं विहारें आजून कायम आहेत. त्या विहारांत राहून बौद्ध भिक्षु चिंतन करीत असत. वेरूळ, घारापुरी, कारलें भाजें वगैरे ठिकाण-चीं लेणीं पुष्कळांनीं पाहिलीं असतील. तीं पांडवलेणीं बौद्धांचीं विहारें होतीं.

प्राणीमात्रांस पुनर्जन्म आहे. ह्या फेऱ्यांतून क्वचित् एकादा मनुष्य सुटून निर्वाणाप्रत जातो, असें बौद्धांचें मत आहे. एकाच जन्मांत सर्व वासनादिकांचा पूर्ण उच्छेद होऊन निर्वाणाची योग्यता येणें शक्य नाहीं. शिवाय सर्व मनुष्यें संसार सोडून ह्याच कामाकडे लागतील, असा संभवहि नाहीं. अशा स्थितींत संसारांत राहूनहि मनुष्यानें कसें आचरण केलें असतां तो निर्वाणमार्गाकडे येईल, अशाबद्दल गौतमबुद्धांनीं संसारी जनाकरतां धर्म सांगून ठेविले आहेत. ह्या धर्मशास्त्राचाच आपल्या आचरणावर फार मोठा परिणाम

झाला आहे. आपण बुद्धधर्मी नसूनहि, बुद्धधर्माप्रमाणें वागणें यथाशास्त्र व उचित आहे, असें आपल्या पूर्वजास वाटूं लागलें आणि कालान्तरानें बुद्ध हा विष्णूचा अवतारच बनून राहिला. गौतमबुद्ध हाच विष्णूचा अवतार असें विधान केलें असतां पुष्कळ लोकांच्या दृष्टीनें तें असमंजसपणाचें होईल असें दिसत नाहीं.

संसारी लोकांस मार्गदर्शक असे बुद्ध धर्मशास्त्राचे अनेक ग्रन्थ पालीभाषेंत आहेत. संसाऱ्यांना दहा आदेश किंवा धर्मबंधनें सांगितलीं आहेत. त्यापैकीं पहिल्या पांचांचें पालन, कांहीं होवो, झालेंच पाहिजे. १ हिंसा, २ स्तेय- ३ व्यभिचार, ४ अनृत, ५ पैशून्य, ६ पारुष्य, ७ प्रजल्पन, ८ लोभ ९ क्रोध आणि १० अश्रद्धा, किंवा नास्तिकपणा ह्या दहा पापांचा अगदीं निषेध केला आहे. कोणाचेहि हातून असलीं कृत्यें होऊं नयेत. भगवद्गीता, मनु, याज्ञवल्क्यादिकांनीं असेच धर्म सांगितले आहेत. शुद्ध अन्तःकरण असल्यावांचून शुद्ध आचरण होत नाहीं. यासाठीं पहिल्यांदा मन प्रबुद्ध करावें, आणि तंहांचा ( तृष्णांचा ) नाश करून टाकावा. द्वेषादि वाईट मनोविकार काढून टाकावेत. शुद्ध भाव, न्यायबुद्धि, श्रद्धा आणि ह्या सर्वांचा शिरोमणि जी भूतदया, त्यांचा अंगीकार करावा. मनोनिग्रह आणि भूतदया, हीं दोन आचारांतील प्रधान कर्तव्यें आहेत. अशा रीतीनें वागून संसारी लोकांनीं धर्मसंचय करावा आणि निर्वाण मार्गाकडे जाण्याची प्रवृत्ति नेहमीं

ठेवावी. खुद्दकपथ या नांवाचा पालीभाषेंत बौद्धधर्माचा एक ग्रंथ आहे. ह्या जगांत संसारी किंवा गृहस्थ लोकांस मंगल कोणतें ह्याविषयीं बुद्धास प्रश्न केल्यावरून त्यांनीं दिलेलीं उत्तरें ह्या ग्रंथांत दिलीं आहेत. मंगलसुत्तांत हीं मंगलें सांगितलीं आहेत.

जन्मतः जातिभेद आहे, असें बौद्धधर्मात मानिलें नाहीं. क्रियेवरून मनुष्य, ब्राह्मण किंवा वसल ( वृषल ) होतो. तथापि त्या धर्मांत चार आश्रम आहेत. गृहस्थ उपासक श्रमणेर आणि भिक्षु, असे हे चार आश्रम आहेत. पुरुषांप्रमाणें स्त्रियांसहि ह्या चारहि आश्रमांत प्रवेश करतां येतो. स्त्रियांना चारीहि आश्रमांचा अधिकार आहे. गृहिणी आणि गृहस्थ ( सर्व संसारी लोक ) यांच्या आचरणाविषयीं ( शीलाविषयीं ) बुद्धांनीं जे धर्मनियम घालून दिले आहेत, त्यांचे दोन भाग करतां येतील. विधिनियम आणि निषेधनियम. यांला पालीग्रन्थांत चारित्तसील ( विहितशील ) आणि वारित्तशील ( निवारित–निषिद्धशील ) अशीं नांवें आहेत. वर सांगितलेलीं दहा पापें वारित्तसीलांत म्हणजे निषिद्ध आचरणाचे वर्गांत येतात. त्यापैकीं हिंसा, अदत्तादान ( स्तेय, चोरी ) आणि व्यभिचार हीं तीन कायिक पापें होत. खोटें बोलणें ( अनृत ), चहाडी ( पैशून्य ), कठोर बोलणें ( पारुष्य ), आणि व्यर्थ बडबड ( प्रजल्पन असंबद्ध प्रलाप ), हीं चार वाचाकृत पापें आहेत. लोभ (परद्रव्यादिकांचें अभिध्यान–घेण्याची इच्छा ), क्रोध आणि नास्तिक-

पणा ( अश्रद्धा ), हीं तीन मनाचीं पापें होत. याप्रमाणें ह्या दहा कायिक, वाचिक आणि मानसिक पापांचा निषेध केला आहे. पालीभाषेंत यांस " दस अकुसल कम्मपथ " (दश अकुशल कर्मपथ ) असें म्हणतात. विहित आचरणाचेंहि अनेक नियम सांगितले आहेत. त्या सर्वांचें सार वर सांगितलेल्या खुडुक पथांत आणि मंगलसुत्तांत वर्णिलेल्या बुद्धांच्या उत्तरांत आलें आहे. तेवढें सार समजलें म्हणजे बुद्धानीं सांगितलेल्या आचरणनियमांची चांगली कल्पना येईल. प्रोफेसर धर्मानन्द कोसंबींच्या व्याख्यानांतून पुढील बारा श्लोक उतरून घेतले आहेत, त्यांवरून भगवान् बुद्ध कशास मंगळ मानतात म्हणजे त्यांच्या मताप्रमाणें कोण कोणतें आचरण चांगलें आहे,हें स्पष्ट कळून येईल. चाईल्डर्स साहेबांनीं ह्या पद्यांचें इंग्रजींत भाषांतर फार सुंदर केलें आहे. ( See gournal of the Royal Asiatic Society New Series Vol IV Part II. )

कोणी एक देवता बुद्धास म्हणाली.

बहू देवा मनुस्सा च मंगलानि अचिंतयुं ॥
आकंखमाना सोत्थानं ब्रूहि मंगलमुत्तमं ॥ १ ॥
बहुदेवा मनुष्याश्च मंगलान्यचिंतयन् ॥
आकांक्षमाणा समुत्थानं ब्रूहि मंगलमुत्तमम् ॥ २ ॥
( संस्कृत )

पुष्कळ देवांनीं आणि मनुष्यांनीं आपली सुखवृद्धि व्हावी म्हणून चिंतन केलें, उत्तम मंगल कोणतें तें सांगा.

या प्रश्नावर बुद्धांनीं दिलेलें उत्तर पुढल्या श्लोकांत आहे.

असेवना च बालानं पंडितानं च सेवना ॥
पूजा च पूजनीयानं एतं मंगलमुत्तममं ॥ २ ॥
पटिरूपदेसवासो च पुब्बेच कतपुञ्ञता ॥
अत्तसंमापणिधि च एतं मंगलमुत्तमम् ॥ ३ ॥
बाहुसच्चंच सिप्पंच विनयोच सुसिक्खितो ॥
सुभासिताच च या वाचा एतं मंगलमुत्तमम् ॥ ४ ॥
मातापितु उपट्ठानं पुत्तदारस्स संगहो ॥
अनाकुला च कम्मन्ता एतं मंगलमुत्तमम् ॥ ५ ॥
दानंच धम्मचरिया च जातकानंच संगहो ॥
अनवज्ञानि कम्मानि एतं मंगलमुत्तमम् ॥ ६ ॥
आरति विरति पापा मज्जपाना च संयमो ॥
अप्पमोदा च धम्मेसु एतं मंगलमुत्तमम् ॥ ७ ॥
गारवोच निवातोच संतुट्ठिच कतञ्ञुता ॥
कालेन धम्मसवणं एतं मंगलमुत्तमम् ॥ ८ ॥
खंति च सोवचस्सता समणानं च दस्सनं ॥
कालेन धम्मसाकच्छा एतं मंगलमुत्तमम् ॥ ९ ॥
तपोच ब्रह्मचरियंच अरियसच्चानदस्सनं ॥
निब्बाणसाच्छिकिरिया एतं मंगलमुत्तमम् ॥ १० ॥
फुठस्स लोकधम्महि चित्तं यस्स न कंपति ॥
असोकं विरजं खेमं एतं मंगलमुत्तमम् ॥ ११ ॥
एतादिसानि कत्वान सब्बत्थ अपराजिता ॥
सब्बत्थ सोत्थिं गच्छन्ति तं तेसं मंगलमुत्तमम् ॥ १२ ॥

वर दिलेल्या पालीभाषेंतील ह्या पद्यांचा अर्थ असा आहे. (१) मूर्खांची सेवा किंवा संगति करूं नये. शाहाण्याची संगति किंवा सेवा करावी. पूज्य जे आहेत त्यांची पूजा करावी, ( माननीयास मान द्यावा ) हेंच उत्तम मंगल होय. ( २ ) योग्य देशांत वास, पदरीं पुण्यांचा सांठा, सन्मार्गी मन-हेंच उत्तम मंगल. ( ३ ) बहुशास्त्र किंवा विद्या, शिल्पज्ञान, सुशिक्षित विनय, किंवा तद्वर्तनाची संवय, सुभाषित वाणी ( समयोचित भाषण )-हेंच उत्तम मंगल ( ४ ) आईबापांची सेवा, भक्ति, बायकामुलांचें संगोपन, व्यवस्थितपणें कामें करणें-हेंच उत्तम मंगल.( ५ ) दान, धर्माचरण, ज्ञातीचें संगोपन ( संग्रह ), अनवद्य म्हणजे प्रशस्त अशीं कर्मे करणें-हेंच उत्तम मंगल. (६) पापाला कंटाळून पापकर्मापासून दूर असणें, विरत असणें, मद्यपानाचे कामीं मनाचें सयमन, धर्माचरणीं दक्षता, ( अप्रमाद )-हेंच उत्तम मंगल. ( ७ ) सत्पुरुषांचा गौरव, नम्रतेनें वर्तन, कृतज्ञता, यथाकालीं धर्मश्रवण-हेंच उत्तम मंगल ( ८ ) क्षांति, गोड भाषण, श्रमणांचें दर्शन ( भेटी घेणें ), यथाकालीं धार्मिक विषयांवर संभाषण-हेंच उत्तम मंगल. ( ९ ) तपश्चर्या, ब्रह्मचर्य, आर्यसत्यांचें ( वर सांगितलेलें तत्त्वचतुष्टयांचें ) दर्शन, ज्ञान निवार्णाचा साक्षात्कार करून. घेणें-हेंच उत्तम मंगल. ( १० ) लोकस्वभावांशीं संबन्ध झाला असतां ज्याचें चित्त कांपत नाहीं, शोकरहित, निर्मळ, आणि क्षेम असतें अशारीतीनें वागणें-हेंच उत्तम मंगल. ( सुख व दुःख, स्तुति

व निंदा, लाभालाभ, आणि जयाजय ह्या चार द्वन्द्वांस लोक धम्म=लोकस्वभाव असें म्हणतात ). ( ११ ) एतादृश ( अशीं वर सांगितलेलीं ) कर्मे करणार लोक सर्वत्र विजयी होतात, सर्वत्र त्यांना स्वस्ति ( सुख ) प्राप्त होतें,--हेंच त्याचें आचरण त्याचें उत्तम मंगल होय. ( १२ )

गृहस्थाश्रमांत राहाणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या आचरणांचे विधिनिषेध नियम ह्याप्रमाणें बुद्धांनीं सांगितले आहेत. वर दिलेल्या दिग्दर्शनावरून बौद्ध धर्माविषयीं थोडीबहुत कल्पना आल्यावांचून राहणार नाहीं. गृहस्थाश्रमांतील धर्मा-प्रमाणें दुसऱ्या आश्रमाचे धर्म त्या त्या आश्रमांना अनुरूप असे सांगितले आहेत. १ बुद्ध, २ धर्म, आणि ३ संघ, अशीं हीं तीन रत्नें आहेत, असें बौद्ध मानतात. ह्या तीन रत्नांचा सविस्तर इतिहास येथें देणें शक्य नाहीं. भगवान् बुद्धांचा जन्म राजकुलांत झाला. ऐहिक सर्व सुखांचा उपभोग घेण्या-चें सामर्थ्य व संधी असतांहि त्यांस विरक्ति उत्पन्न झाली आणि दुःखाचा संहार होऊन शाश्वत सुख कसें मिळेल ह्याविषयीं चिंतन करण्यास ते वनांत गेले. अनेकवर्ष चिंतन केल्यानंतर मनाची खात्री करून घेऊन आपल्या मताचें प्रतिपादन करण्यास बुद्धांनीं आरंभ केला. ही हकीकत वर एकदा सांगितलीच आहे. बुद्धास अशारीरीनें देवपण मिळालें. त्याच कालान्तरानें पुष्कळ शिष्य झाले. हे शिष्य भिक्षु-वृत्तिधारण करून वनांत चिंतन व धर्मसंचय करीत असत. आणि देशोदेशीं जाऊन आपल्या धर्माचा उपदेश करीत.

एकाठिकाणीं राहणाऱ्या भिक्षुगणांस संघ म्हणतात. बौद्ध धर्माचा सारांश पालीभाषेंत लिहिलेल्या धम्मपद (धर्मपद) नांवाचे ग्रन्थांत एका श्लोकांत दिला आहे तो असाः—

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा ।।
सचित्तपरियोदपनं एतं बुद्धान सासनं ।।
सर्वपापस्याकरणं कुशलस्योपसंपदा ।।
स्वचित्तस्यदमनमेतद्बुद्धस्य शासनम् ।।

बौद्धधर्माचे दोन पंथ फार प्राचीन कालींच झाले, ही गोष्ट वर नमूद केली आहे. उत्तरेकडील पंथांत (तिबेट, काशमीर चीन वगैरे देशांत) कालगतीनें धार्मिक कर्माच्या बाबींत थोडेबहुत फेरफार झाले. परंतु बुद्धाचीं मूळतत्त्वें कायम ठेवून त्यांच्या आधारानेंच हे फेरफार करण्यांत आले. ह्या पंथाला 'महायान' हें नांव आहे. ह्या नवीन धर्मांत मैत्रेय, ध्यानीबुद्ध, मंजुश्री, आणि अवलोकितेश्वर, या चौघा महात्म्यांची पूजा करावी असें सांगितलें आहे. भूतदया-करुणा किंवा प्रेम, चिंतन किंवा ध्यान, अन्तःकरणाची शुद्धि आणि प्रज्ञा (शाहाणपण) या चार गुणांचे ते महात्मे अवतारच आहेत, असें त्या देशांतील बौद्ध लोक मानतात. दक्षिणेकडील पंथास 'हीनयान' असें नांव आहे. ह्या पंथाचे धर्मनियम अशोकाच्यावेळीं ठरण्यांत आले. त्यावेळेपासून ह्यांत फेरबदल झाला आहे, असें ऐकण्यांत नाहीं. लंका, असाम, ब्रह्मदेश वगैरे देशांत हा धर्म चालू आहे.

# अर्हद्दर्शन.

चार्वाकमत, आणि बौद्धमतांतील चार प्रस्थानभेद, असे मिळून पांच प्रस्थानें झालीं. सहावें अर्हद्दर्शन होय. अर्हत् हें जिनांचेंच नांव आहे. जैन आणि बौद्ध मतांत व धर्मांत फार फरक नाहीं. जिन आणि बुद्ध हे समकालीन होते. जिन हें बुद्धाचेंहि नांव होतें. स्वर्ग आणि मोक्ष ह्या दोन अवस्था किंवा स्थिति जैनांस मान्य आहेत. बौद्धांचा क्षणिकवाद जैनांस कबूल नाहीं. सर्व सत्त्वें ( पदार्थ ) क्षणिक आहेत, असें मानिलें तर आत्मा हा क्षणिक होणार. तो स्थायी नसला तर, कर्म एकानें करावें आणि त्या कर्माचें फल दुसऱ्यानें भोगावें, असें होईल. अशारीतीनें लौकिक कर्में करून त्यांचें फल संपादन करणें हें विफल होईल. आपल्या कर्माचें फल आपल्यास मिळणार नाहीं असें जर झालें तर फल मिळविण्याची खटपट कोण करील? कोणीहि करणार नाहीं. अनुमानानें क्षणिकत्व स्थापन होतें असें बौद्धांचें ह्मणणें आहे; त्यांवर जैन म्हणतात कीं बौद्धांचें अनुमान होतच नाहीं, कारण त्यानीं सांगितलेला व्याप्तीचा दृष्टांत हा दृष्टांत होत नाहीं. सत्वाची व्याख्या बौद्धांनीं दिली आहे ती अशी:--सत्व म्हणजे अर्थक्रियाकारी पदार्थ. ही व्याख्या जैनांस कबूल नाहीं. कारण तें लक्षण धरून चाललें तर साप डसला नसून साप डसला अशी भ्रान्ति झाल्याबरोबर भीति उत्पन्न होते. साप हा भीतिरूपी अर्थक्रिया कर-

णारा आहे. तो नसूनहि त्याची क्रिया भ्रांतीमुळें घडली. म्हणून अर्थक्रियाकारित्व असें सत्वाचें लक्षण करणें ठीक नाहीं. उत्पत्ति, स्थिति ( स्थायीपणा ) आणि लय ह्या तीन अवस्थांनीं युक्त असा जो पदार्थ त्याला सत्व म्हणावें, असें जैनांनीं सत्वाचें लक्षण दिलें आहे. समानसंतानवर्तित्व हें मत, ( आंब्याच्या कोयीला मधांत भिजविली असतां त्या कोयीपासून होणाऱ्या आंब्याचे झाडाला मधासारखीं गोड फळें येतात, तसेंच सरक्या रंगांत भिजवून पेरल्या तर त्यांच्या कापशीला त्या रंगाचा कापूस येतो,)हीं त्या समान संतानवर्तित्व मतांस पोषक उदाहरणें,ज्ञान साकार असतें, इत्यादि बौद्धांची मतें जैनांनीं आपल्या युक्तिवादानें खोडून टाकिलीं आहेत. सारांश, क्षणिक वादासंबंधानें सिद्धसेन वाक्यकार असें म्हणतात कीं, हा वाद मान्य केला, तर केलेल्या कर्माचे फलाचा नाश होईल, न केलेल्या कर्माचें फल उपाभेगास प्राप्त होईल. हा संसार ( भव ) चालणार नाहीं, आणि स्मृति ( स्मरणशक्ति ) हिचा नाश होईल. असे मोठे दोष यापासून निष्पन्न होतील. ही गोष्ट न जुमानतां कोणी क्षणिक वादाचा अंगीकार करील तर तो साहसिकच म्हणावा.

एतावता पुरुषार्थ प्राप्त करून घेण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांनीं बौद्धमार्गाचा अंगीकार न करतां अर्हताचा मार्ग स्वीकारावा असें जैनांचें मत आहे. अर्हत् कोणास म्हणावें ? अर्हत् या पदाला कोण योग्य आहे ? त्याचें लक्षण काय ? हें अर्हत्स्वरूप आप्तनिश्चयालंकार ग्रंथांत

चन्द्रसुरीनीं ( हेमचन्द्रसुरींनीं ) वर्णिलें आहे. तें स्वरूप असें:—

सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ॥
यथास्थितार्थवादीचेद्वोऽर्हन्परमेश्वरः ॥

सर्वज्ञ, रागद्वेषादि मनोविकार ( षड्रिपु ) ज्यानें जिंकिले आहेत, सत्य बोलणारा, त्रैलोक्यास मान्य, परमेश्वर हाच अर्हन् होय. चार्वाकपंथी तौतातिक आणि कुमारिलभट्ट, यांचा या मतावर असा आक्षेप आहे कीं, सर्वज्ञ असा पुरुष या जगांत असणें अगदीं अशक्यच आहे. प्रमाणपंचकांपैकीं कोणत्याहि एका प्रमाणानें अशा पुरुषांचें अस्तित्व सिद्ध होत नाहीं. सर्वज्ञ असा पुरुष आपल्यास दिसत नाहीं, म्हणून त्याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण नाहीं. हेतु सांपडून व्याप्ति सिद्ध होत नाहीं, म्हणून अनुमान करतां येत नाहीं. वेदादिकासारखीं आप्तवाक्यें नाहींत, म्हणून शब्दप्रमाण धरतां येत नाहीं, सादृश्यच मिळत नाहीं, म्हणून उपमानानें सर्वज्ञता सिद्ध करतां येत नाहीं. अर्थापत्तीनें अर्हताची सर्वज्ञता आपण सिद्ध करूं लागलों तर त्याच न्यायानें बुद्धहि सिद्ध होईल. मग बुद्ध जसा तसाच अर्हन्. याच्यांत विशेष कांहींच रहाणार नाहीं.

यावर जैनांचें असें उत्तर आहे कीं, अनुमान प्रमाणानें सर्वज्ञता सिद्ध होते, आणि पंचावयवी वाक्यानें ही गोष्ट ते सिद्ध करून दाखवितात.

सकलवस्तु ग्रहण करून घेणें, म्हणजे त्यांचें ज्ञान होणें हा आत्म्याचा स्वभावच आहे, ही गोष्ट मीमांसकांस ( कुमारिलभट्टास ) मान्य आहे. म्हणून त्याबद्दल सध्यां वाद नको. आत्म्याचा हा स्वभावच आहे असें धरून चालूं. एखाद्या वस्तूचें ग्रहण करण्यास किंवा त्या वस्तूचें ज्ञान ( साक्षात्कार ) होण्यास प्रतिबन्ध करणाऱ्या कारणांचा क्षय झाला असतां, ती वस्तु साक्षात्कृत होते. तिचें ज्ञान आपल्यास होतें. उदाहरणार्थ एका करंड्यांत एक अंगठी ठेवली आहे. त्याचें झांकण हें आंगठीचा साक्षात्कार होण्यास प्रतिबन्धक आहे. हें आवरण काढून टाकलें म्हणजे अंगठी दिसते. जगांतील सर्व वस्तूंची अशीच स्थिति आहे. आवरण किंवा ग्रहण प्रतिबन्धक कारण दूर केलें असतां, सर्व वस्तुंचें ज्ञान होईल. जगांत अनन्त आत्मे आहेत, त्यांपैकीं एखाद्या आत्म्यासंबन्धानें असें घडूं शकेल कीं, सर्व वस्तूंच ग्रहणास प्रतिबन्ध करणारीं सर्व कारणें दूर करतां येतील; असें झालें असतां सर्व वस्तूंचा साक्षात्कार त्या आत्म्यास होईल, म्हणजे आत्मा सर्वज्ञ होईल. म्हणून सर्वज्ञ असा पुरुष जगांत निपजेल, ही गोष्ट शक्य आहे. सर्व वस्तूंचें ग्रहण करण्याचें सामर्थ्य आत्म्याच्या अंगीं स्वभावतःच असतें, ही गोष्ट आपण गृहीत केली आहे, ह्याला चोदनेचा आधार आहे. म्हणजे वेदांचा असा आदेशच ( हुकूम, आज्ञा ) आहे. शिवाय असल्याप्रकारचें सामर्थ्य आत्म्यांत नसेल तर ह्या जगांत ज्ञानोत्पत्ति होण्याचा संभवहि असणार नाहीं. ज्ञानच व्हावयाचें नाहीं.

म्हणून सर्व वस्तूंचें ज्ञान करून घेण्याची शक्ति आत्म्याच्या अंगीं स्वभावतः असते, हें कबूल केलें पाहिजे. अशा रीतीनें जैनमतानुयायी सर्वज्ञता सिद्ध करतात. ही सर्वज्ञता ज्यांनीं संपादन केली आहे असे अनेक सर्वज्ञ पुरुष ह्या जगांत आजपर्यंत निर्माण झाले आहेत. त्यांनीं आपल्या तत्त्वार्थाचा बोध लोकांस केला आहे, हें तत्त्वार्थकथन त्यांचे आगम होत. ह्या पूर्वींच्या आगमापासून तत्त्वज्ञान संपादन करून पुढें दुसरे सर्वज्ञ पुरुष निर्माण होतात. हे सर्वज्ञ पुरुष आपापले आगम प्रतिपादन करतात. अशा परंपरेनें आगम आणि सर्वज्ञ यांचा प्रसार ह्या जगांत बीजांकुरन्यायानें होत असतो. हा सर्वज्ञ पुरुष यथार्थवादी, जितरागादिदोष. त्रैलोक्यमान्य असा असतो, तोच परमेश्वर अर्हत् समजावा.

सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, आणि सम्यक् चरित्र (आचरण) हीं तीन मोक्षाचे मार्ग आहेत. हीं जैनांचीं तीन रत्नें होत. ह्या रत्नत्रितयाचें यथान्याय संपादन केलें पाहिजे. यापैकीं एकाचेंच साधन करून आपला कार्यभाग घडून येणार नाहीं. ह्या तिन्हींच्या प्रभावानें मोक्ष मिळतो. जिनांनीं प्रतिपादन केलेल्या तत्त्वार्थाविषयीं विपरीत मत नसून त्या तत्त्वार्थावर केवळ श्रद्धा ठेवणें, (श्रद्धान) ह्यालाच सम्यग्दर्शन म्हणतात. त्या तत्त्वार्थाविषयीं अभिरुचि मनुष्याच्या अन्तःकरणांत निसर्गतःच उत्पन्न होते, किंवा गुरूच्या अधिगमानें (व्याख्यानादि उपदेशानें) उत्पन्न होते, जीवादि जे पदार्थ किंवा तत्त्वें ह्या जगांत आहेत, त्यांचा

स्वभाव व त्या स्वभावनुरूप त्यांची व्यवथा, ह्याविषयीं कोणत्याहि प्रकारचा मोह किंवा शंका न रहातां जें मनुष्यांस ज्ञान होतें, त्या ज्ञानाला ' सम्यगज्ञान ' म्हणतात. यथावस्थिततत्त्वांच्या ज्ञानालाच सम्यग्ज्ञान म्हणतात. १ मति, २ श्रुत, ३ अवधि, ४ मनःपर्याय, आणि ५ केवल असे ज्ञानाचे पांच भेद आहेत. आवरण किंवा ज्ञानप्रतिबन्धक वस्तूंचा क्षय होऊन इंद्रियें व मन यांच्या व्यापारानें यथार्थाचें मनन जें करते ती मति होय. मतीपासून उत्पन्न झालेलें स्पष्ट असें जें ज्ञान त्याला श्रुत किंवा श्रुति म्हणतात. आवरणाचा क्षयोपशम करणारें, ज्याचा विषय अवच्छिन्न ( मर्यादित ) झाला आहे, अशा ज्ञानास ' अवधि ' हें नांव आहे. दुसऱ्याच्या मनांतील अर्थास स्फुट आणि स्पष्ट करून दाखविणारें असें जें ज्ञान त्याला मनःपर्याय म्हणतात. तप आणि अशाच विशिष्टक्रिया, जें ज्ञान मिळावें म्हणून तपस्वी करतात, त्या ज्ञानाला केवलज्ञान म्हणतात. हें केवल ज्ञान अन्यज्ञानांशीं संस्पृष्ट नसते. तें अगदीं वेगळें असतें. असे हे ज्ञानाचे पांच भेद जैनांनीं मानिले आहेत. हें ज्ञान प्रत्यक्ष किंवा परोक्ष असतें. प्रत्यक्ष किंवा अनुमान ह्या दोन प्रमाणांनीं तें प्राप्त होतें.

संसाराचा त्याग करण्यासप्रवृत्त झालेल्या श्रद्धालु आणि ज्ञानवान्, अशा पुरुषानें सदाचरणानें वागलें पाहिजे. पापजनक क्रियांची निवृत्ति करणें. किंवा सर्व निंद्ययोगांचा त्याग करणें, याला सदाचरण किंवा

सम्यक्चारित्र म्हणतात. ह्या सदाचरणाचे पांच प्रकार आहेत. अहिंसा, सुनृत, ( सत्य ), अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह, हे ते पांच प्रकार होत. ह्या पांच व्रतांचें पालन यथायोग्य रीतीनें झालें पाहिजे. अहिंसा शब्दाचा अर्थ स्पष्टच आहे. कोणत्याहि स्थावर किंवा जंगम पदार्थाची हानि न करणें. आपल्याला जें दिलें नाहीं, तें न घेणें, याचें नांव अस्तेय. ब्रह्मचर्य सर्वांस माहीत आहेच. अपरिग्रह म्हणजे सर्ववस्तूच्या संबन्धानें इच्छा न धरतां त्यांचा त्याग करणें. अशा ह्या पांच महाव्रतांचें आचरण केलें असतां मोक्ष प्राप्त होतो. हें ऋणत्रय मोक्षसाधनाचा मार्ग आहे, ही गोष्ट वर एकदा सांगितली आहेच.

जैनमतांत दोनच मुख्य तत्त्वें आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु कांहीं जैन हीं मुख्य तत्त्वें पांच (सहा) सात किंवा नऊ आहेत असें मानतात. जीव आणि अजीव अशीं दोन तत्त्वें आहेत. बोधात्मक किंवा चैतन्यात्मक जो पदार्थ त्याला जीव म्हणतात. अचित् किंवा जड पदार्थास अजीव म्हणतात. ह्या दोहोंतील उपादेय ( ग्राह्य ) कोणतें, व हेय ( त्याज्य ) कोणतें, त्याचा विचारानें निर्णय करणें, याला विवेक, असें नांव आहे. कर्त्याचे रागादि दोष, त्यापासून होणारीं कर्में हीं सर्व हेय होत. परंज्योति हेंच उपादेय आहे. ह्याला ‘ उपयोग ’ असें नांव आहे. सहज, चिद्रूप, व त्याची परिणति, यांचें पूर्णज्ञान होणें, याला उपयोग म्हणतात. वाचकाचार्यांनीं जीवसत्त्वाच्या पांच अवस्था किंवा भाग

वर्णिले आहेत. ते असेः—१ औपशमिक भाव, २ क्षायिक भाव, ३ मिश्र भाव, ४ औदयिक भाव आणि ५ पारिणामिक भाव. पूर्वकर्माचा उपशम होऊन, कर्माचें फल पुढें भोगावयास कांहीं वेळ तरी लागत नाहीं, अशा अवस्थेस औपशमिक भाव म्हणतात. कर्माचा अत्यन्त नाश होऊन मोक्षपदाची योग्यता ज्या अवस्थेंत येते, तिला क्षायिक भाव म्हणतात. हे दोन्ही भाव जेव्हां मिश्र असतात, तेव्हां तो मिश्रभाव होय. ज्या अवस्थेंत कर्माचीं फलें भोगावीं लागतात, कर्माचा पगडा जीवावर बसला असतो, म्हणजे कर्माचा उदय झाला असतो, अशा अवस्थेस औदायिक भाव म्हणतात. सहज, चैतन्यात्मक, आणि वर सांगितलेल्या चार भावांची कांहीं एक अपेक्षा न धरणारा असा जो जीवाचा भाव त्याला पारिणामिकभाव म्हणतात. जीवात्मा बद्ध नसून त्याला मी बद्ध आहे, असें वाटत असतें, असें सांख्य दर्शनांत सांगितलें आहे. त्या अबद्ध जीवात्म्याच्या स्थितीसारखाच हा पारिणामिकभाव असावा. याप्रमाणें जीव हा या पांच अवस्थांपैकीं कोणत्या तरी एका अवस्थेंत असतो. स्वरूपसंबोधन ग्रन्थांत आत्म्याचें स्वरूप येणेंप्रमाणें सांगितलें आहे.

ज्ञानाद्भिन्नो नाभिन्नो भिन्नाभिन्नः कथंचन ॥
ज्ञानं पूर्वापरीभूतं सोऽयमात्मेति कीर्तितः ॥

जीव आणि अजीव या दोन मुख्य तत्त्वांची मांडणी कांहीं जैनमती निराळ्या रीतीनें करतात. जीव, आकाश,

धर्म, अधर्म आणि पुद्गळ अशीं पांच तत्त्वें आहेत असें ते म्हणतात. ह्या पांच पदार्थांस ' अस्तिकाय ' हें नांव त्यांनीं दिलें आहे. भूत, भविष्य आणि वर्तमान ह्या तिन्ही कालीं हे पदार्थ असतात ( अस्ति ) म्हणून 'अस्ति,' आणि अनेक प्रदेशांत शरीर धारण करून ते रहातात म्हणून'काय.' अशा-कारणामुळें त्या पदार्थांस 'अस्तिकाय' असें म्हणतात. जीव अनन्त आहेत. त्यांचे मुक्त आणि संसारी असे दोन भेद आहेत. जन्ममरणाच्या रहाटगाडग्यांत सांपडलेले जे जीव हे संसारी होत. संसारी जीवाचे समनस्क आणि अमनस्क असे दोन पोटभाग करतात. बोलणें चालणें, बोध, ग्रहण, इत्यादी अनेक क्रिया करणाऱ्या शक्तीला संज्ञा म्हणतात. समनस्क जीवांत ही शक्ति असते, म्हणून त्यांना संज्ञी म्हणतात. अमनस्क जीवांत ही संज्ञाशक्ति नसते. अमनस्क जीवांचे त्रस आणि स्थावर असे दोन भाग करतात. दोन तीन चार आणि पांच अशीं इंद्रियें असणारें निरनिराळे शंखगंडादिकासारखे प्राणी असतात. ह्या चार जातींच्या प्राण्यांचा अन्तर्भाव त्रसभागांत होतो. त्रसभाग हा चतुर्विध आहे. पृथिवी आप, तेज, वायु आणि वनस्पती ( वृक्षादि ), यांचा समावेश स्थावर भागांत होतो. ह्या पांचहि स्थावर पदार्थांत जीव असतो. त्या त्या पदार्थांच्या केलेल्या कायांत ते जीव रहातात. ह्या स्थावर पदार्थांना एक स्पर्शेन्द्रिय कायतें असतें. ह्यामुळें दुसरा जन्म त्यांना घेतां येत नाहीं. म्हणून त्या स्थावरांतील जीव

मुक्तच आहेत, असें समजावें. धर्म, अधर्म आणि आकाश हे तीन अस्तिकाय एकेकटेच आहेत. त्यांच्याकडून क्रिया होत नाहीं. ते निष्क्रीय आहेत. परंतु एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पदार्थ नेण्या आणण्यास ते तिन्ही साधनें आहेत. लोकाकाशांत जीवाला चोहोंकडे जाण्यास बसण्यास वगैरे क्रिया करण्यास प्रवृत्त करणारा जो, तो धर्म होय. हा प्रवृत्त्यनुमेय आहे. ह्याच्या उलट अधर्म. अधर्म स्थित्यनुमेय आहे. एक वस्तु ज्या स्थलीं आहे, त्या स्थलावर दुसऱ्या वस्तूचा प्रवेश करणें, तेथें त्या वस्तूला अवकाश देणें, हा आकाशाचा गुण (कृत्य) आहे. पुद्गल म्हणजे, शरीर किंवा विषय. जीवाव्यतिरिक्त असा स्थावराचा जो भाग, तोच पुद्गल असें समजावें. रूप, रस आणि स्पर्श हा तीन गुणांनीं युक्त असा पुद्गल असतो. अणु आणि स्कन्ध ( समुदाय ) असे पुद्गलाचे दोन प्रकार असतात. अणूंचा उपभोग घेतां येत नाहीं. द्व्यणुकादि स्कन्ध हे उपभोगाचे विषय होत. ( द्व्यणुकादि विषय हेच उपभोगाचे साधन आहेत, असे मुक्तावलींतहि सांगितलें आहे. ) अणूंच्या संघातापासून द्व्यणुकस्कंध निर्माण होतात. हे स्कन्ध कधीं कधीं संघातानें किंवा भेदानें उत्पन्न होतात. म्हणून त्यांस पुद्गल असें नांव दिलें आहे. 'पूरयान्ति गलन्तीति' भरतात आणि गळून जातात, असा पुद्गल शब्दाचा विग्रह केला आहे. असे हे पांच अस्तिकाय किंवा मूळ पदार्थ (तत्त्वें) कांहीं जैन मानतात. अस्तिकायाच्या लक्षणा-

प्रमाणें कालाचा समावेश अस्तिकायांत होत नाहीं. तथापि जैनांच्या द्रव्याचे लक्षणाप्रमाणें काल हा एक द्रव्य आहे. 'गुणपर्यायवद्द्रव्यम्' असें जैनांनीं द्रव्याचें लक्षण दिलें आहे. वैशेषिक सूत्रांत ' क्रियागुणवत्समवायिकारणम् द्रव्यम् ' असें द्रव्याचें लक्षण सांगितलें, आहे ( १। १। १५ ) स्थलसंकोचामुळें याचें अधिक विवेचन येथें करतां येत नाहीं. यांप्रमाणें वर सांगितलेले पांच अस्तिकाय आणि काल हीं मिळून सहा द्रव्यें आहेत असें कांहीं जैनांचें मत आहे.

सामान्यतः जिनमतांत सात किंवा नऊ मूळतत्त्वें आहेत, असें वर्णिलें आहे. १ जीव, २ अजीव, ३ आस्रव, ४ बन्ध, ५ संवर, ६ निर्जरा आणि ७ मोक्ष. ह्या सातांत पाप व पुण्य हीं येत नाहींत. पाप व पुण्य हीं स्वतंत्र मूळतत्त्वें आहेत, असें कांहीं लोक मानतात. पूर्वीचीं सात आणि हीं दोन मिळून एकंदर नऊ तत्त्वें होतात.

जीव व अजीव ह्याविषयीं वर थोडेंसें निरूपण केलें आहे. काया, वाचा आणि मन ह्यांच्या कर्माचा योग जो आत्म्यास होत असतो, त्या कर्मयोगाला आस्रव असें म्हणतात. पाण्यांत बुडालेल्या दारांतून पाण्याचा ओघ [स्रव] जसा जोरानें आंत शिरत असतो, तशींच आपलीं सर्व कर्में आत्म्याकडे जोरानें जाऊन त्यास लेप करतात. म्हणून या कर्मयोगास आस्रव म्हणतात. शुभ किंवा अशुभ कर्मानुरूप हा आस्रव शुभ किंवा अशुभ असतो. उदाहरणार्थ—अहिंसा

हा शुभ कर्मयोग किंवा आस्रव आहे. शिव्या देणें, हा अशुभ आस्रव होय. योग शब्दाचा अर्थ जोडणें किंवा लेप असाच आहे. योगशास्त्रांतील अर्थ नव्हे. कांहीं जैन आस्रवाची निराळी व्याख्या देतात. इंद्रियांची प्रवृत्ति किंवा त्या प्रवृत्तीनें आत्म्यास विषयांकडे जो ओढून नेतो, तो आस्रव अशी त्यांची व्याख्या आहे. बन्ध * मिथ्यादर्शन, अविरति, प्रमाद, आणि कषाय, यांच्यामुळें आणि वर सांगितलेल्या कर्मयोगामुळें आत्म्यास बन्ध उत्पन्न होतात. म्हणजे त्याला पुद्गल ( शरीर ) धारण करावें लागतें. हे बन्ध चार प्रकारचे असतात; प्रकृतिबन्ध, स्थितिबन्ध, अनुभवबन्ध, आणि प्रदेशबन्ध, हे ते चार प्रकार होत. निंबाचा कडूपणा, गुळाचा गोडपणा, इत्यादि वस्तूंचे जे स्वाभाविक धर्म ते ह्या प्रकृतिबन्धापासून उत्पन्न झाले असतात. आज कोट्यानुकोटी × सागरोपमवर्षपर्यंत गाईच्या दुधांत माधुर्य अबाधित असें राहिलें आहे; ही जी पदार्थांच्या गुणांची स्थिति, ती स्थितिबन्धामुळें त्या त्या पदार्थांत राहिली आहे. प्रत्येक वस्तूमध्यें आपापलें कार्य करण्याचें सामर्थ्य असतें. हें सामर्थ्य त्या वस्तूंत असण्याचें कारण अनुभवबन्ध होय. अनन्त

---

* टीपः--१ मिथ्यादर्शन म्हणजे जैनमतांसंबन्धीं अश्रद्धा २ अविरति विषयांपासून इंद्रियें परावृत्त न करणें. ३ आसक्ति, प्रमाद, (आत्मरक्षण आणि सदाचरणाविषयीं चूक किंवा निःकाळजीपणा ) ४ कषाय=क्रोध, मान, माया, आणि लोभ.

× टीपः-- हें एक कालमान आहे. पुढें पहा.

स्थानीं अनन्त पुद्गल (शरीर किंवा वस्तु) असतात. ह्या सर्व वस्तू आपल्या ठिकाणीं रहातात, त्या प्रदेशबन्धामुळें तेथें रहातात. उमास्वाति ( मि ? ) वाचकाचार्य आणि विद्यानन्द वगैरे जैन विद्वानांनीं ह्या बन्धाचा सविस्तर विचार आपल्या ग्रन्थांत केलेला आहे. संवर ह्मणजे आस्रवाचा निरोध. पूर्वीं केलेलीं व सध्यां होणारीं कर्मे आत्म्यांत प्रवेश करीत असतात. त्या कर्मांचा आत्म्यास योग किंवा लेप होत असतो. ह्या योगाचा प्रतिषेध करणें हाच संवर होय. गुप्ति आणि समिति, असे संवराचे दोन भेद आहेत. काया, वाक्, आणि मन यांच्या निरोधानें कर्मांच्या योगापासून आत्म्याचें रक्षण करणें, यास गुप्ति म्हणतात. परपीडेचे परिहारानें सदाचरण ठेवणें, ह्याला समिति म्हणतात. वाक् , मन आणि काया यांच्या प्रत्येकाच्या निरोधामुळें गुप्ति होईल ह्मणून गुप्ति तीन प्रकारची असते. तसेच समितीचे पांच प्रकार आहेत. ईष्या ( ईर्या ) समिति, भाषासमिति, इषणासमिति, आदानसमिति आणि उत्सर्गसमिति. आचरणांत आपल्याकडून परपीडा न होईल अशा रीतीनें वागणें, यासच समिति म्हणतात. संचित किंवा अर्जित कर्मांचा तपादिक्रियांकरून नाश करणें, त्यांना जीर्ण करण, यास निर्जरा हें नांव आहे. सर्व कषाय, पुण्य, सुख दुःखें यांचा सर्वस्वीं नाश झाला पाहिजे. सारांश संसाराचीं बीजभूत जीं सर्व कर्मे तीं नाहींशीं झालीं पाहिजेत. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे निर्जरा स्थिति

प्राप्त झाली असें समजावें. मिथ्यादर्शनादि कारणांचा निरोध, संचित कर्माचें निर्जरेनें निरसन, नवीन कर्माचा अभाव; ह्या सर्व गोष्टी साधून कर्माचें आत्यन्तिक मोक्षण झालें म्हणजे मोक्ष मिळतो. कर्मापासून विप्रमोक्षण, हेंच मोक्ष होय. अशीं हीं जैनांचीं सात मूलतत्त्वें आहेत. सुखदुःखांचीं पुण्य व पाप हीं साधनें आहेत, तीं ह्या सात पदार्थांत आणखी मिळविलीं, म्हणजे नऊ पदार्थ होतात.

सर्व जैन मताभिमान्यांस स्याद्वादी म्हणतात. याचें कारण असें आहे कीं त्यांचा 'सप्तभंगिनय' नांवाचा एक सुप्रसिद्ध न्याय आहे. आपल्या सर्व प्रतिवाद्यांशीं वाद करतांना ह्या न्यायाचा ते नेहमीं उपयोग करतात. हें त्यांचें मोठें शस्त्रच आहे. अनन्तवीर्यांनीं ह्या न्यायाचें प्रतिपादन केलें आहे. एकाद्या वस्तुविषयीं विधान करावयाचें असल्यास 'स्यादस्ति' ( कदाचित् आहे—असेल ) असें म्हणावें. निषेधाच्या वेळीं 'स्यान्नास्ति' ( कदाचित् नसेल. ) क्रमानें विधान व निषेध करावयाचा असल्यास 'स्यादस्तिच नास्तिच' ( कदाचित् असेल—नसेल ). चवथा प्रकार "स्यादवक्तव्य" ( कदाचित् सांगतां येत नाहीं ). पांचवा प्रकार 'स्यादस्तीत्यवक्तव्यः, ( कदाचित् आहे हें सांगतां येत नाहीं ). सहावा प्रकार 'स्यान्नास्तीत्यवक्तव्यः' ( कदाचित् नाहीं हें सांगतां येत नाहीं ). आणि सातवा प्रकार 'स्यादस्तिच नास्तिचावक्तव्यः' ( कदाचित् असेल किंवा नसेल हें सर्व अनिर्वचनीय, अवाच्य आहे.—सांगतां

येत नाहीं. ); असे हे जैनमतांतील न्यायाचे सात भंगी म्हणजे प्रकार किंवा वाद करावयाच्या रीती असतात जैनांचें असें म्हणणें आहे कीं, आमच्या सप्तभंगिन्यानें आम्हीं आमच्या सर्व प्रतिपक्षांस खुंटवून गप्प बसवितों. संपूर्ण अर्थाचा विनिश्चय ज्याला करावयाचा आहे, त्यानें स्याद्वादाचा अंगीकार करावा, म्हणजे त्यास सर्वदा जयच मिळेल. अन्योन्यपक्ष प्रतिपक्षभावामुळें इतर मताभिमान्यांचे प्रवाद मत्सरमूलक असतात. आम्ही जैनमतानुयायी निःपक्षपाती आहोंत.

जिनदत्तसूरींनीं जैनमातचें सार बारा श्लोकांत दिलें आहे. त्यापासून जिनमताची कल्पना थोडक्यांत बरीचशी येते. *अठरा दोष रहित, सम्यक् तत्त्वज्ञानाचा उपदेश करणारा असा गुरु तोच जिन देव होय. सम्यग्दर्शन सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र ही तीन मोक्षप्राप्तीचे मार्ग आहेत. प्रत्यक्ष आणि अनुमान वगैरे ( परोक्ष ) हीं दोनच प्रमाणें जैनांस संमत आहेत. सर्व जगत् नित्यानित्यात्मक आहे. मूळतत्त्वें सात किंवा नऊ आहेत. सात तत्त्वें आहेत असे मानणारे लोक पापपुण्याचा अन्तर्भाव आस्रव व संवर ह्या तत्त्वांत करतात. [1]आठ कर्मांचा नाश होऊन

---

*दोष—बल, भाग, उपभोग, दान, लाभ, निद्रा, भीति, अज्ञान, जुगुप्सा, हिंसा, रती अरती, राग, द्वेष, रति, अतिस्मर, शोक आणि मिथ्यात्व हे अठरा दोष होत.

१ ज्ञानावाणी कर्म, २ दर्शनावाणी कर्म, ३ वेदनीकर्म, ४ मोहिनीकर्म, ५ नामकर्म, ६ गोत्रकर्म, ७ आयुष्यकर्म आणि ८ अन्तरायकर्म.

अनन्तचतुष्टय (काल, आकाश, परमाणु व जीव) प्राप्त झाले म्हणजे आत्म्यास मुक्ति मिळते. श्वेतांबर आणि दिगंबर, असे जैन साधूंचे दोन पक्ष असतात. श्वेतांबर आपल्या मस्तकावरचे केश काढतात. मळिन वस्त्र परिधान करतात व भिक्षेवर उदरनिर्वाह करतात. ते निःसंग आणि क्षमाशील असे असतात. दिगंबरहि आपल्या मस्तकावरचे केश कापतात. त्यांच्या हातांत मोराचीं पिसें व भांडें, हीं असतात, अन्न देणाऱ्याच्या घरीं ते उभ्यानें जेवतात. केवल व स्त्री यांचा उपभोग ते घेत नाहींत. ते मोक्षास जातात, असा हा त्या दोन पक्षांत भेद आहे.

जैन मताचा प्रचार बुद्धाच्यावेळीं होता. महावीर किंवा वर्धमान हा जैनमताचा मुख्य प्रस्थापन करणारा आहे. महावीर आणि बुद्ध हे एका वेळींच हिंदुस्थानांत आपापल्या धर्माचा प्रसार करीत होते. दोघेहि समकालीन होते. बुद्धालाहि जिन म्हणतात. युगायुगान्तरीं जिन मताचा उपदेश करणारे आणि त्याचा प्रसार करण्यास झटणारे असे अनेक सर्वज्ञ गुरु होऊन गेले, असें जैनांचें मत आहे. ह्या गुरूंस ते तीर्थंकार म्हणतात. च्यवन, जन्म, दीक्षा, केवल आणि मोक्ष हीं पांच कल्याणें ज्यास प्राप्त झालीं आहेत, त्यास तीर्थंकार हें नांव मिळतें. बौद्ध लोकहि त्यांच्या मताचा प्रसार करण्याकरतां वेळोवेळीं महापुरुषांचे अवतार होतात, असें मानतात. जैनांचे आजपर्यंत २४ तीर्थंकार होऊन गेले. महावीर हा चोविसावा होय. ह्याच्या पूर्वी

२५० वर्षे, पार्श्व तीर्थंकार होऊन गेला. ऋषभ हा त्यांचा पहिला तीर्थंकार. भागवतांत वर्णिलेला ऋषभ आणि जैन ऋषभ हे एकच असावेत असें कांहीं लोकांचें मत आहे. नेमीनाथ, पार्श्वनाथ महावीर स्वामी वगैरेचीं नांवें प्रसिद्ध आहेत. सम्मतशिखर; पालीठाणें, राजगृही इत्यादि ठिकाणीं तीर्थंकारांचें निर्याण झालेलें आहे, म्हणून त्या ठिकाणीं जैनाची आजून मोठी जत्रा भरत असते. वर सांगितले त्या दोन जैन पक्षांत अनेक भेद झाले आहेत. सध्यां त्यांचे एकंदर ८४ गच्च किंवा शाखा झाल्या आहेत. जैनांचे ग्रंथ पाली ( किंवा मागधी ) भाषेंत लिहिलेले आहेत. त्यांनीं आपले स्वतःचे वेदशास्त्रादि ग्रंथ केले आहेत. ह्या सर्व ग्रंथांत कल्पसूत्र हा मुख्य ग्रंथ आहे. ह्यांत ४५ आगम आहेत. १२ * अंगसूत्रें, १२ उपांगसूत्रें, १० पकिण्णक ( पयन्ना ) ६ च्छेद, ४ मूळसूत्रें, १ नंदिसूत्र व १ अनयोगसूत्र ह्या आगमांशिवाय, कल्पसूत्रांत महावीर स्वामीचें चरित्र आठ अध्यायांत वर्णिलें आहे. भाद्रपदमहिन्यांत पज्जूसण ( पर्यू-

---

* बारा अंगसूत्रांचीं नांवें. १ आचारांगसूत्र, २ सुघडांगसूत्र, ४ ठाणांगसूत्र, ५ भगवतीसूत्र, ६ ज्ञातासूत्र, ७ उपासकदशा, ८ अंतगडसूत्र, ९ अणूत्तर उववईसूत्र, १० प्रश्न व्याकरण सूत्र, ११ विपाकसूत्र व १२ दृष्टिवादसूत्र. उपांगसूत्रांचीं नांवें:—१ उववाई, २ रायपसेणी, ३ जीवाभिगण, ४ पन्नवणा, ५ जंबुद्वीप पनात्ति, ६ चंदपनत्ति, ७ सूरपनत्ति, ८ निर्यावलि, ९ कप्पिया १० पुप्फिया, ११ पुप्पचोळिका, व १२ वेणीदसा.

षण–उपवास ) करून जैनलोक ह्या ग्रन्थाचें पठन करतात. महावीर्याचे निर्याणानन्तर, सुमारें ९०० वर्षांनीं, म्हणजे इ. सनाचे पांचव्या शतकांत भद्रबाहूनें कल्पसूत्र हा ग्रन्थ पाली ( मागधी ) भाषेंत लिहून, त्यांत महावीराचें चरित्र वर्णिलें आहे. देवर्द्धिगणिन् यानें जैनमताचे पाली भाषेंत असलेले अनेक ग्रन्थ गोळा करून इसवी सनाचे दहाव्या–अकराव्या शतकांत ते संस्कृतांत प्रणीत केले, असें पाश्चिमात्य लोकांचें मत आहे.

हिंदुधर्मांत कालगणनेंत जसे कल्प मानिले आहेत, तसेच जैनांनीं कालाचे दोन मोठे भाग केले आहेत. त्यांचीं अवसर्पिणी आणि उत्सर्पिणी अशीं नांवें आहेत. हीं कालचक्रें मानून त्यांत सहा सहा आरें ( युगें ) आहेत असें जैन मानतात. प्रत्येक आऱ्यांत मनुष्याच्या सुखदुःखाचें मान कमीजास्ती असतें. अवसर्पिणी चक्राचा फेरा संपला म्हणजे उत्सर्पिणीचा फेरा सुरू होतो. दुसऱ्या फेऱ्यांत आऱ्यांचा क्रम पहिल्याच्या उलट असतो. अवसर्पिणींतील आरे, त्यांतील लोकस्थिति, व वर्षसंख्या खालीं कोष्टकांत दिली आहे. त्यावरून कालाविषयीं जैनांची केवढी अगाध कल्पना होती, हें सहज दिसून येईल. प्रत्येक सर्पिणीकालावधींत ६३–शिलाखी ( श्लाघ्य ) पुरुष होऊन जातात. त्यापैकीं २४ ऋषभादि सारखे तीर्थंकार होतात. १२ भरतासारखे चक्रवर्ती राजे निपजतात. ९ राम, बळरामाप्रमाणें बलदेव होतात. लक्ष्मण, व कृष्ण यांच्यासारखे ९

वासुदेव होतात, आणि बळी, रावण इत्यादिकांसारखे ९ प्रतिवासुदेव होतात. याप्रमाणें जैन मतांचा सारांश संक्षेपानें दिला आहे. यावरून जैन मतांविषयीं थोडीबहुत तरी कल्पना करतां येईल अशी उमेद आहे.

*टीप

| आरा—समाजस्थिति, | | काल मानांची वर्षे |
|---|---|---|
| १ ला | सुखमा. | ४ कोटी कोटी सागरोपम |
| २ रा | सुखं सुखमा. | ३ —,,— |
| ३ रा | सुखं दुःखंमा | २ —,,— |
| ४ था | दुःखं सुखमा | १ –,,–उणें ४२ वर्षें |
| ५ वा | दुःखमा. | २१००० वर्षे. |
| ६ वा | सुखं दुःखमा | —,,— |

३$\frac{१}{७}$—३$\frac{१}{७}$ योजनें परिघाची एक खळी एक योजन खोल खणावी, त्यांत कोटी केशांचे तुकडे तुकडे करून आंत टाकावेत. एक वर्ष गेलें कीं एक तुकडा बाहेर काढावा. अशा रीतीनें तो खड्डा रिकामा झाला म्हणजे एक पल्योपम कालावधि होतो. कोटी पल्योपम × १० कोटी पल्योपम=एक सागरोपम. १ कोटी सागरोपम × १ कोटी सागरोपम=कोटी कोटी सागरोपम. ह्यावरून अवसर्पिणी आणि उत्सर्पिणी काल केवढा आहे, याची आटकळ बांधावी.

# उपसंहार.

प्रस्थानभेद किंवा हिंदुधर्मांत मानिलेल्या चवदा विद्या ह्यांच्याविषयीं अगदीं संक्षिप्त माहिती वर दिली आहे. याशिवाय नास्तिक मतें अशीं मानलेलीं दर्शनें, यांविषयींहि थोडीबहुत हकीगत सांगितली आहे. ह्या मतांचा परिणाम आपल्या प्रस्तुतच्या धर्माचरणावर मोठा झाला आहे, म्हणून त्यांविषयीं कांहीं तरी लिहिलें पाहिजे. ही गोष्ट वर नमूद केलीच आहे. ह्या सर्व विषयांत प्रवेश करून देतील व त्यासंबन्धानें बोलण्याचा अधिकार अंशतः तरी प्राप्त करून देतील अशा योग्यतेचे ग्रन्थ मराठींत लिहिले, तर ते उंटाच्या ओझ्या येवढे होतील. असें म्हणण्यांत अतिशयोक्तीची छटा सुद्धां नाहीं. हें काम एका सामान्य व्यक्तीचे हातून होण्यासारखें नाहीं. संघसाहाय्य आणि संघाचा उद्योग त्यांनीं असलीं कामें होत असतात, कालचक्राच्या नेमिक्रमानें मनु बदलला, परिस्थिति पालटली, अशा स्थितींत पूर्वकालीन विद्याविषयीं व्यासंग सुटावा, व त्यांचा लोप होत जावा, ह्यांत नवल नाहीं. त्या विद्यांचें चिंतन चालू ठेवणें आधुनिक ज्ञानाच्या साहाय्यानें पूर्वींच्या सिन्धान्तांत फेरबदल होण्यासारखा असल्यास तो करणें, त्या सिद्धान्तांत विचारांनीं आणि शोधांनीं भर पाडणें, आणि अशारीतीनें विचारप्रगतीचें पाऊल एकंदरींत पुढें पडेल असा प्रयत्न चालू ठेवणें, असले उद्योग अशा प्रतिकूल स्थितींत सुरू राहिले, तरच भाग्य. हा विशेष आमच्या समाजांत आजून

दिसूं लागला नाहीं. ह्या कामीं सध्यां इतकी अवनति झाली आहे कीं पूर्वींचे कित्येक ग्रन्थ नामशेष होऊन बसले आहेत कांहींचें तर 'नामापि न ज्ञायते' अशी त्यांची वाट लागली आहे. वेदांतील किंवा शास्त्रांतील एखाद्या बिकट गोष्टीविषयीं खुलासा करून घ्यावयाचा असल्यास आमच्यासारख्यांस पाश्चिमात्य विद्वानांच्या ग्रन्थाकडे धांव घ्यावी लागते. हा प्रकार खरोखर अनिष्ट आहे. ह्या लहानशा पुस्तकांत थोड्याशा माहितीवरून आपले जुने मुख्य मुख्य ग्रन्थ कोणते आहेत, त्यांच्यांत काय काय विषय प्रतिपादिले आहेत येवढी तरी माहिती वाचकांस मिळेल, अशी आशा आहे. ही माहिती आमच्यापैकीं शेकडा नव्वदांस आजमित्तीस नाहीं. ती लोकांच्या पुढें ठेविली असतां एकंदरींत समाजाला फायदा होईल, असें जाणून हा प्रयत्न केला आहे

मनुष्यमात्रांतच काय, परंतु सर्व प्राणीमात्रांत एक प्रबल अनिर्वचनीय अशी भावना निसर्गतः प्रवृत्त झालेली असते. स्वरक्षण, किंवा आत्मभृति, ही ती भावना किंवा वासना होय. हिच्यामुळेंच सर्व मनुष्यांचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक व्यापार मग ते प्रेरित असोत किंवा अप्रेरित असोत, एकसारखे चाललेले असतात. अनुकूल वेदनीय जें सुख तें आपल्यास हवेंसें वाटतें; प्रतिकूल वेदनीय जें दुःख तें नकोसें वाटतें. दुःख टाळणें आणि सुख संपादणें, याकामीं आमरण मनुष्याचे अश्रान्त श्रम चाललेले असतात. आतां अमूक एक वस्तु सुखावह कां ? आणि अमूक एक दुःखावह का! हें मात्र कळत नाहीं. ह्या स्वरक्षणाच्या भावनेस घेऊन प्राणी जन्मास कां येतात, त्या भावनेची उत्पत्ति अन्तःकरणांत कां व कशी झाली आहे! ह्या सर्व गोष्टी अद्यापि विचारातीतच आहेत. परंतु ज-

गाच्या आरंभापासून आजपर्यंत ह्या बलवत्तर वासनेच्या सर्वंकष "सर्वांस ओढून नेणाऱ्या" प्रवाहांत आम्हीं वाहत चाललों आहोंत, ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. विचार, अनुभव व ज्ञान ह्यांच्या योगानें सुखदुःखांच्या स्वरूपांत अन्तर पडेल, आणि त्यांच्या संपादनाचीं व परिहाराचीं साधनेंहि नवीं नवीं अशीं शोधून काढण्यांत येतील. तथापि हेय आणि उपादेय ( दुःख आणि सुख ) ह्या वस्तु जगांत रहाणारच.

वेदकालीं, थंडी, हिम, वारे अंधकार मेघ इत्यादि अद्भुत, भीतिप्रद सृष्टींतील चमत्कार, असुर, तसेच ज्वर, उदर, यक्ष्मा इत्यादि शरीररोग, भ्रातृव्य, ( शत्रु ) दस्यु, इत्यादि "यश्च नोद्वेष्टि यंच वयं द्विष्मः" असे लोक, व अशा वस्तु दुःखकारण मानिल्या जात असत. यांचा परिहार अंगिरानीं आणलेल्या अग्नीच्या यजनानें व अग्नीच्या द्वारानें भूर्भुवः स्वर् लोकांतील देवांच्या यजनांनीं त्या वेळेच लोक करीत असत. देवांस संतुष्ट करण्याच्या कामीं मंत्र, तंत्र, व त्यांचे पर्याय, यजमानाचे अस्तिकबुद्धीप्रमाणें आणि सामर्थ्यानुरूप वाढत गेले. पुष्कळ बलाढ्य वीर, मुलेंबाळें, गुरें ढोरें, अन्नवस्त्र, पाणी, धन, प्रतिष्ठा, आयुष्य, तेज, ब्रह्मवर्चस, ग्रामणीत्व, राष्ट्राधिपत्य, सोमपान, आणि स्वर्गप्राप्ति, ह्या आणि अशाच प्रकारच्या वस्तु सुखकारण आहेत, असें वेदकालीन लोक मानीत असत. ह्या सुखद वस्तूंचीं साधनें यज्ञयागादिकच आहेत, असें त्यास वाटे. म्हणून यज्ञयागादि कर्मांनीं देवांस सतुष्ट करून त्यांपासून इष्ट वस्तू प्राप्त करून घेण्यांची आणि अनिष्टवस्तूंचा परिहार करण्याविषयीं त्यांची नेहमीं खटपट चालू असे. वेदांच्या संहितेंत

आणि ब्राह्मणांत विशेषतः ह्या कर्मांचे देव, मंत्र, स्तुति, प्रयोग, विनियोग व सामान्य तंत्रें सांगितलीं आहेत. सृष्टींतील वस्तूंविषयीं अनुभव, विचार, आणि त्यापासून ज्ञान, हीं जसजशीं वाढत गेलीं तसतशी कर्मफलावरची श्रद्धा आणि त्यापासून होणाऱ्या सुखाची अभिलाषबुद्धि कमी कमी होत गेल्या. ब्राह्मणांच्याच शेवटच्या भागांत किंवा अरण्यकांत हें वृत्यन्तर दिसून येतें. कर्मापासून होणारी सुखप्राप्ति आणि दुःखपरिहार ह्यांत समाधान मानणाऱ्या चित्तवृत्तींची पिच्छेहाट होऊन त्यांचें स्वरूपान्तर कसकसें होत गेलें व शेवटीं कर्मापासून होणारें सुख शाश्वत नाहीं, व दुःखापासून तें अलिप्त नाहीं, संसार दुःखमय, अशाश्वत आहे, खरें, शाश्वत, निरन्तर सुख ज्ञानावांचून मिळणार नाहीं, ज्ञान संपादनाविषयींच यत्न केला पाहिजे, अशी अन्तःकरणांत भावना जागृत होऊन तिचा पगडा कसा बसला! यांचा निर्णय करणें शक्य नाहीं. तथापि येवढी गोष्ट मात्र निर्विवाद आहे, कीं उपनिषदें ज्यावेळीं झालीं त्यावेळीं विचारी मनुष्यांचें अन्तःकरण असल्या विचारांनीं अगदीं व्यग्र झालें होतें. दुःखमय संसार जाऊन शाश्वत सुख कसें मिळेल ह्या प्रश्नाचा विचार अनेक तत्त्ववेत्त्यांनीं आपापल्या बुद्धिसामर्थ्याप्रमाणें केला आहे; आणि निश्रेयस मिळविण्याचे उपायही सुचविले आहेत. वैशेषिक मतांप्रमाणें, ह्या जगांत सहा किंवा सात मूलतत्त्वें ( पदार्थ ) आहेत. त्यांच्या परस्पर संबन्धाविषयीं विवेक करून, प्रत्यक्ष अनुमान मननादिकांच्या साहाय्यानें ईश्वरसाक्षात्कार करून घेतला, म्हणजे संसारदुःखाचा नाश होऊन सुख मिळतें. नैयायिक म्हणतात कीं प्रमाणप्रमेयादि सोळा पदार्थांचें तत्त्वज्ञान

करून घ्यावें, म्हणजे त्या तत्त्वज्ञानापासून निश्रेयस प्राप्त होतें. सांख्यानुयायी म्हणतात कीं हा संसार पुरुष व प्रकृति यांचा खेळ आहे. प्रकृति ही मोठी नाटकी आहे. हिच्यापासून महत् अहंकार बुद्धि वगैरे तेवीस तत्त्वें निमार्ण झालीं आहेत. यदृच्छेनें पुरुषाची आणि प्रकृतीची गांठ पडते आणि तिच्या जाळ्यांत सांपडून हा प्रपंच तो पुरुष करतो, आणि सुखदुःखादि भोगीत असतो. प्रकृतीचे खेळ ओळखून पुरुषांस आत्मज्ञान झालें म्हणजे प्रकृतिरूपी ही नर्तकी रंगभूमीवरून निघून जाते आणि तो मुक्त व सुखी होतो. योगशास्त्राचें मत असें आहे कीं नियमादि आठ साधनांनीं चित्तवृत्तीचा निरोध करावा आणि एकाग्र चित्तानें ध्यान करून समाधि लावावी ह्या अवस्थेंत बाह्य वस्तूंचें भान रहात नाहीं आणि परमेश्वराशीं ऐक्य होऊन तन्मयत्व होतें. हेंच निश्रेयस होय. पूर्वमीमांसेची भिस्त पर्वस्वी कर्मावरच. इतर मतें जोरावल्यामुळें कर्माची हानि होत चालली, त्याचा प्रतिकार करण्याकारतांच कर्मवाद्यानीं पुनः प्रयत्न केला असें ह्या मीमांसेवरून दिसतें. भक्ति ही एकप्रकारचें कर्मच आहे, असें मानून भक्तिमार्गाचा समावेश कर्ममार्गांत कोणी करतात. भक्तिमार्गी आणि द्वैतवादी वेदान्ती यांची विचारसरणी सामान्यतः समानच असते. आपलें आराध्य दैवत किंवा परमेश्वर हा सर्वज्ञ सर्वसाक्षी कर्ता करविता दयाघन असा आहे, असा भाव धरून आराधनेच्या नानाविध मार्गानें त्या परमेश्वराशीं सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता या चार मुक्तींपैकी कोणती तरी मुक्ति प्राप्त करून घेतली तर [illegible] परमसुख आहे. असें ते मानतात. अद्वैत वेदान्ती [illegible] मताप्रमाणें अनिर्वचनीय अशी एकच वस्तु आहे.

अविद्या, माया, किंवा अज्ञान याचा अध्यास त्या वस्तूवर झाल्याकारणानें हें जगत् किंवा हा संसार आहे तसा दिसतो; वस्तुतः तो संसार सत् नाहीं; कारण ज्ञानाच्या योगानें हा अध्यास नाहींसा होतो आणि सत्स्वरूपाचा साक्षात्कार होतो. जगत् मिथ्या आहे, असें म्हणण्याचें कारण हेंच आहे. यथार्थ ज्ञानानें जीव व परमात्मा ह्यांच्या ऐक्याची प्रतीति करून घ्यावी. ही खूणगांठ एकदा मनांत बसली, म्हणजे भेदाभेद उरत नाहीं, आणि केवल ज्ञानावस्थेंत मनुष्य रहातो. ही कायमची आनन्दमय अवस्था. ती प्राप्त झाली ह्मणजे सर्व कार्य झालें. अद्वैत वेदान्त्याच्या विचारांची मजल येथपर्यंत येऊन पोंचली आहे. बुद्धमहामुनीनीं विचारांतीं सर्व दुःखमय, क्षणिक आणि शून्यच आहे, असें ठरविलें. अहिंसा, सत्य, अस्तेय, शुचिभूतपणा, इत्यादि सदाचरणांनीं धर्मसंचय करून एकदा निर्वाण प्राप्त झालें, म्हणजे सर्व कांहीं झालें. जैनांस सर्वज्ञ व्हावें असें वाटतें. सम्यक्ज्ञान, सम्यक्चारित्र आणि जिनोपदेशावर श्रद्धा यांनीं मोक्ष मिळेल. तेंच त्यांचें साध्य आहे. चार्वाकांचें मत तर कांहीं विलक्षण दिसतें. तथापि त्यांच्या मनाची अशी प्रवृत्ति कां व्हावी, ह्याचा विचार करणें योग्य आहे. ते म्हणतात देहाची एकदा राख झाली कीं, पुनः त्याविषयीं कांहीं विचार नाहीं. जिवंत आहोंत तोंपर्यंत चैन करून घ्यावी. ऋण काढून सण करावा. ऋणं कृत्वा घृतं पिब. मेल्यावर पुढेंपाठीमागें कांहीं एक रहात नाहीं.

आपल्या विद्वान सत्त्वान्वेषी, तत्त्वज्ञानी पूर्वजांच्या विचारोघांच्या अशा भिन्न भिन्न दिशा आहेत. ह्या विचाराची प्रौढता, अगाधता, त्यांचें गांभीर्य, त्यांच्या प्रवाहाची

प्रसन्नता, त्यांत दिसणारें युक्तिवादाचें कौशल्य, विषयमहती आणि सत्य शोधण्याच्या कामीं बुद्धीचे परिश्रम ह्या सर्व गोष्टी आपण जे त्यांचे वंशज, त्यांस अवगत असाव्यात, येवढेंच नाहीं, तर आपल्या विचारांनीं ज्ञानांनीं, आणि सत्यशोधक बुद्धीनें पूर्वकालीन विचारोघांशीं नवीन ज्ञान-प्रवाहांचा संगम करून त्यांचा विस्तार करावा आणि मनुष्यमात्रांस त्याचें सेवन करतां येईल अशा रीतीनें त्या ओघांस दिशा लावावी, हें आपलें कर्तव्य आहे. ह्या कामीं परिश्रम करणें हें राष्ट्र हिताचें आहे. ज्या लोकांची पूर्व-कालाची परंपरा सुटली, किंवा पूर्वींपासून आलेला तात्त्विक, धार्मिक, नैतिक, परंपरागत, आनुवंशिक किंवा पिढ्यानु-पिढ्या चालत आलेला व्यवहारक्रम मोडून गेला, किंब-हुना, ज्या लोकांस पूर्वइतिहासच नाहीं, किंवा ज्यांचा अस-लेला इतिहास नष्टप्राय होत चाललेला आहे, अशा लोकांस राष्ट्रत्वपद लवकर मिळण्याची आशा थोडी असते. अशा दृष्टीनें ह्या जुन्या विद्यांकडे पाहिलें असतांहि, आपणांस त्यांची माहिती असणें, हें फार इष्ट आहे. अज्ञानांत पुरून जाऊन नाहींसा होऊं घातलेला हा ज्ञानकोश बाहेर पडून त्यांत भर पडत जावो, अशी परमेश्वराची प्रार्थना करून हा लेख येथें संपवतों.

समाप्त

जी. जी. ब्रदर्सची

# अत्यंत गुणकारी औषधें.

**खरजेचें मलम:**--हटकून तीनच दिवसांत गुण. खरूज ऊन पाण्यानें स्वच्छ धुवावी. नंतर औषध चोळून चोळून लावावें. खरजेचे लसीचा हात केव्हांहि डबींत घालूं नये. किं. १ डबीस १ आणा. ट. ख. वेगळा.

**गजकर्ण, इसब, आगपेण, खवंड, नायटे:**--वगैरेवर थंडगार मलम. हें मलम चोळण्यानें वरील सर्व विकार पांच दिवसांतच बरे होतात. मलम लावण्याचे अगोदर रोज साबणानें धुण्याची काळजी घ्यावी. मलम दिवसांतून दोन वेळ तरी लावावें. किं. १ डबीस ४ आणे. ट. ख. वेगळा.

**जळवातावर मलम:**--हें मलम जळवातावर चोळून लावावें. अंगास पडणाऱ्या भेगा नाहींशा होऊन अंग रेशमाप्रमाणें मऊ होतें. किं. १ डबीस दोन आणे. ट. ख. वेगळा.

# टॉनिक सायरप.

हें औषध अत्यंत दिव्य आहे. याचे नियमित सेवनानें मलशुद्धि होऊन चांगली भूक लागते. अन्न उत्तम पचूं लागतें. हातापायांची आग नाहींशी होऊन मानसिक दुर्-

लता जातें; व शरीर पुष्ट होतें बाजारांत मिळणाऱ्या इतर काहीं औषधांप्रमाणें हें अवरोध करीत नाहीं. १ बाटलीस १॥. रुपाया. ट. ह. चार आणे.

आमचे दुकानीं सर्व वनौषधि, गुल्कंद, मुरावळा, सर्व तऱ्हेच्या मात्रा, जानवी जोड वगैरे सामान मिळतें.

डॉ. जोशी झांजिबार म्हणतात. जी. जी. ब्रदर्सचीं सर्व मलमें मीं वापरून पाहिलीं अत्यंत गुणकारी आहेत. गरजूंनीं एकवेळ अनुभव पहावा.

**औषधें मिळण्याचें ठिकाण.**

**जी. जी. ब्रदर्स.**

**आर्यवनौषधि संग्रहालय तुळशीबाग पुणें**